# १

# परराष्ट्र धोरण : आवश्यकता आणि निर्मिती

**प्रकरणाची रचना :**

१.० उद्दिष्टे
१.१ परिचय
१.२ व्याख्या
१.३ रार्ष्ट हित आणि परराष्ट्र धोरण
१.४ परराष्ट्र धोरणाची ध्येय
१.५ परराष्ट्र धोरण तत्वप्रणालीला प्रभावीत करणारे घटक
१.६ थोडक्यात महत्वाचे
१.७ संपूर्ण प्रकरणावरील प्रश्न

## १.० उद्दिष्टे

या प्रकरणात आपण स्वतंत्र देशांना परराष्ट्र धोरणाची आवश्यकता का भासते यांवर विचारविमर्श करणार आहोत. परराष्ट्र धोरणाच्या चर्चेत असणाऱ्या महत्वाच्या व्याख्या आणि परराष्ट्र धोरण निर्धारित करतांना साधारणतः सर्व राष्ट्रांना लागू होणारे घटक यांचा आपण अभ्यास करणार आहोत. आधुनिक काळातील परराष्ट्र धोरणाला प्रभावीत करणाऱ्या अंतर्गत आणि बाह्य बाबींची समीक्षा या प्रकरणात करण्यात येईल.

## १.१ परिचय

आधुनिक राज्य-राष्ट्र संकल्पनेची पाळेमुळे वेगाने रूजून विविध राष्ट्रांदरम्यान परस्पर संबंधात वृद्धी होण्यातून सुनिश्चित परराष्ट्र धोरण आखण्याची गरज सर्व राष्ट्रांच्या सरकारांना जाणवू लागली. पाश्चिमात्य देशांच्या वसाहतवादाचा निर्णायक शेवट होऊन अनेक नव्या राष्ट्रांचा उदय झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील गुंतागुंत अधिकच वाढायला लागली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेने विविध राष्ट्रांना आपआपली भूमिका मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध होऊन राष्ट्र-राष्ट्रांमधील संवादात वाढ झाली. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आणि राष्ट्रा-राष्ट्रांतील संवादात सुसूत्रता आणण्यासाठी प्रत्येक देशाला साचेबध्द परराष्ट्र धोरणाची आवश्यकता जास्त तीव्रतेने जाणवायाला लागली. बहुतांश राष्ट्रांनी एकलकोंडेपणा न स्विकारता जास्तीत जास्त राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण स्विकारले. ज्या राष्ट्रांनी काही काळाकरता काही राष्ट्रांशी जाणूनबुजून संबंध प्रस्थापित करण्याचे टाळले त्या मागे सुध्दा एक विशिष्ट प्रकारचे परराष्ट्र धोरणच आहे. त्याचप्रमाणे, सुनिश्चित उद्दिष्टांचे परराष्ट्र धोरण न आखणे हेच एक

प्रकारचे परराष्ट्र धोरण आहे. उदाहरणार्थ, सन १९९२ पर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणाचा महत्वाचा भाग होता की इस्त्राईल या राष्ट्राशी कुठल्याही प्रकारे संबंध प्रस्थापित करायचे नाही. या धोरणाचा फायदा भारताला पश्चिम आशियातील इतर देशांशी संबंध बळकट करण्यात झाला. त्याचबरोबर जागतिक व्यासपीठामध्ये काश्मिर प्रश्नावर या देशांचा पाठिंबा प्राप्त करण्यात, या देशांतून खनिज तेलाची आयात करण्यात आणि अनेक भारतीय कामगारांना या देशांत रोजगार मिळण्याची वाट मोकळी करण्यात भारताला यश आले. त्याचप्रमाणे, दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदी सरकार विरोधातील आंदोलनाला बळकटी आणण्यासाठी या देशावर जाहीर बहिष्कार टाकण्याचे धोरण भारताने जाणीवपूर्वक स्विकारले होते. यामुळे जगभरातील विषमतेविरूध्द आणि पारतंत्र्याविरूद्ध लढणाऱ्या राष्ट्रीय आंदोलनामध्ये भारताला मानाचे स्थान प्राप्त झाले होते. त्या त्या राष्टांमध्ये ही आंदोलने यशस्वी झाल्यानंतर त्या देशांशी व्यापक संबंध प्रस्थापित करण्यात भारताला यश आले होते. थोडक्यात इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करणे किव्हा न करणे याचा निर्णय घेणे परराष्ट्र धोरणांच्या उद्दिष्टांमुळे सोपे जाते.

विशिष्ट परराष्ट्र धोरण नसणाऱ्या राष्ट्राची तुलना मैदानात उतरलेल्या पण विरोधकांवर गोल डागण्याची कोणतीच योजना नसलेल्या फुटबॉल चमूशी होऊ शकेल. फुटबॉल चमूतील ११ ही खेळाडू कोणत्याही निर्धारित उद्दिष्टाशिवाय चेंडू फक्त इकडचा तिकडे टोलवत असतील तर त्या चमुवर सुनियोजित खेळ खेळणाऱ्या विरोधी चमूतर्फे अनेक गोल डागण्यात येतील. त्याचप्रमाणे जागतिक पटलावर अस्तित्वात असणाऱ्या एखाद्या राष्ट्रच्या सरकारातील व्यक्ती परराष्ट्र धोरणाशिवाय राज्यकारभार चालवित असतील तर शक्तीशाली व योजनाबद्धरित्या कार्य करणाऱ्या इतर राष्ट्रांद्वारे त्या राष्ट्राचे शोषण होण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. परराष्ट्र धोरण अस्तित्वात नसल्यास राष्ट्राच्या परराष्ट्र विभागास द्वी-पक्षीय संबंध प्रस्थापित करण्याबाबत, बहुराष्ट्रीय व्यासपीठांवरील सहभागाबाबत मार्गदर्शक तत्वे मिळणार नाही. त्याचप्रमाणे, देशाच्या संरक्षण खात्यास संरक्षण सिद्धतेबाबत योग्य मार्गदर्शक तत्वे मिळणार नाही. त्याचप्रमाणे, देशाच्या संरक्षण खात्यास संरक्षण सिद्धतेबाबत योग्य मार्गदर्शन मिळणार नाही कारण परराष्ट्र धोरणाच्या अभावी मित्र देश, मदतीस तत्पर देश, शत्रू देश, तठस्थ देश याप्रमाणे विविध राष्ट्रांची बिभागणी करता येणार नाही. अर्थ मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालयास देशाचा आंतराराष्ट्रीय व्यापार वाढवण्यासाठी कसलेही मार्गदर्शन मिळणार नाही. थोडक्यात, परराष्ट्र धोरणाशिवायच्या राष्ट्राची तुलना अथांग सागरात कुठलेही दिशा ज्ञान नसलेल्या जहाजाशी करता येईल. ज्याप्रमाणे समुद्रातील जहाज होकायंत्र व रडारच्या मदतीने निर्धारित दिशेने वाटचाल करत बंदरावर पोहोचते त्याप्रमाणे परराष्ट्र धोरणाच्या सहाय्याने जागतिक राजकारणात राष्ट्राला योग्य दिशेने वाटचाल करत विनाकारण होऊ शकणारे संघर्ष टाळता येतात आणि आवश्यक त्या देशांशी मैत्री संबंध वृद्धिंगत करता येतात. एकंदरीत, सार्वभौम राष्ट्र-राज्ये जागतिक पटलावर अस्तित्वात असतील तोपर्यंत प्रत्येक राष्ट्राला परराष्ट्र धोरणाची आवश्यकता असेल.

## १.२ परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या

परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासकांनी या संज्ञेच्या व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केल्या आहेत. विविध व्याख्यांमध्ये सर्व तज्ञांचे एका मुद्यावर एकमत आहे की परराष्ट्र धोरणाचा संबंध एका राष्ट्राच्या दुसऱ्या राष्ट्राशी किंवा राष्ट्र-समूहाशी असलेल्या व्यवहाराशी आहे. जॉर्ज मोडेल्स्की

यांच्या मतानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे एका समुदायाने किंवा राष्ट्राने दुसऱ्या समुदायाचे किंवा राष्ट्रांचे वर्तन प्रभावीत करण्यासाठी आणि आंतराष्ट्रीय पटलावर स्वतःचे स्थान सुरक्षित व मजबूत करण्यासाठी कर्यान्वित केलेला क्रियाकलाप होय. दुसऱ्या राष्ट्रांची वर्तने यशस्वीपणे बदलण्यासाठी आवश्यक त्या निर्णयप्रक्रियेवर आणि स्वःव्यवहारावर प्रकाश टाकण्याची भूमिका परराष्ट्र धोरणाला बजावावी लागते. (George Modelski, A Theory of Foreign Polcy, (London, 1962) pp.6-7) प्रत्येक राष्ट्राच्या व्यवहाराचा व वर्तनाचा परिणाम प्रत्येक दुसऱ्या राष्ट्राच्या निर्णयाप्रक्रियेवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, कमी किंवा जास्त प्रमाणात, लाभदायकरित्या किंवा हानीकारकपणे होत असतो. दुसऱ्या राष्ट्रांच्या व्यवहार-वर्तनातून होणारे लाभ जास्तीत जास्तीत प्रमाणात मिळवणे आणि होऊ शकणारे नुकसान टाळणे अथवा अत्यल्प ठेवणे हे परराष्ट्र धोरणाचे महत्वपूर्ण कार्य आहे. परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट दुसऱ्या राष्ट्रांच्या व्यवहार-वर्तनात बदल घडवणे एवढेच नाही तर इतर राष्ट्रांच्या योग्य व्यवहार-वर्तनात खंड पडू नये यासाठी कार्यकलाप करणे हे सुध्दा आहे. उदाहरणार्थ, शीत-युध्द काळात काश्मिरच्या मुद्यावर ग्रेट ब्रिटेनच्या भूमिकेत संदिग्धता होती. ग्रेट ब्रिटेन ने संदिग्ध धोरण सोडून ठामपणे भाराची बाजू घ्यावी भारतचे परराष्ट्र धोरण कार्यान्वित होते. दुसरीकडे, सोविएत संघाने काश्मिरच्या मुद्दयावर संयुक्त राष्ट्रात भारताची साथ दिली होती. इथे भारताचे परराष्ट्र धोरण सोविएत संघाच्या भूमिकेत बदल घडू नये यासाठी आवश्यक ते निर्णय घेत होते.

परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्राची इतर राष्ट्रांसोबतची आणि आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील घटकांशी होणारी किचकट आणि गतिमान राजकीय अन्योन्यक्रिया होय. जोसेफ फ्रांकेल यांच्या मतानुसार, एका राष्ट्रांचा इतर राष्ट्रांशी असलेल्या अन्योन्यक्रियेशी संबंधीत निर्णय आणि प्रक्रियांचा संच म्हणजे त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण. (Joseph Frankel, The Making of Foreign Policy, p.1) याचा अर्थ, परराष्ट्र धोरणात राष्ट्र-राज्याच्या सार्वभौमित्वातील अधिकृत शक्तींनी किंवा संस्थांनी राष्ट्र-राज्याच्या सार्वभौमित्वाबाहेरील शक्ती किंवा संस्थांच्या प्रती घेतलेले निर्णय आणि लागू केलेल्या प्रक्रियांचा समावेश होतो. एका राष्ट्राने इतर राष्ट्रांची कायदे-निर्मिती व अंमलबजावणची प्रक्रिया प्रभावीत करण्यासाठी आणि आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील राज्यहीन अथवा राष्ट्र-राज्याच्या निर्णय प्रक्रियेत अधिकृत स्थान नसलेल्या (non-state actors) घटकांच्या कारवाया प्रभावीत करण्यासाठी उपयोगात आणणाऱ्या साधन-संचाची निवड करण्याचे काम परराष्ट धोरण करत असते. आपले राष्ट्रीय हित जपण्यासाठी राष्ट्र-राज्याच्या अधिकृत घटक संस्थांनी आपल्या सार्वभौम क्षेत्राबाहेरील सर्व व्यक्ती, संस्था आणि राष्ट्रांशी करावयाच्या वर्तनासाठी आवश्यक त्या संकल्पनांची निर्मिती करून त्यांच्या व्यवहार्य अंमलबजावणीची रूपरेषा परराष्ट्र धोरणात आखणे अपेक्षित असते. परराष्ट्र धोरणाशी संबंधीत सर्व निर्णयांमागे एखाद्या विशिष्ट राष्ट्राशी अथवा राष्ट्र-समूहाशी सहकार्य/सह-अस्तित्व प्राप्त करणे किंवा संघर्षाची स्थिती निर्माण करणे किंवा तठस्थता राखणे हा महत्वपूर्ण हेतू असतो.

ह्युज गिब्सन यांच्या मतानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे ज्ञान आणि अनुभवावर आधारीत सुरेख व्यापक योजना ज्या आधारे सरकार बाह्य-जगताशी व्यवहार करत असते. याचे ध्येय राष्ट्राच्या हितांचे रक्षण आणि जोपासना करणे असते. राष्ट्रहित नेमके कशात आहे याची स्पष्ट समज आणि ते प्राप्त करण्यासाठी किंवा टिकवण्यासाठी आपल्या साधनसंपत्ती व प्रभावाचा कितपत वापर करणे योग्य आहे. याची जाण असणे म्हणजे परराष्ट्र धोरण. याच्या शिवाय परराष्ट्र धोरण उभे राहू शकत नाही. (Huge Gibson, The road to Foreign Policy, p.9)

परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली साधी आणि संक्षिप्त असू शकते किंवा ती गुंतागुंतीची आणि संदिग्ध पण असू शकते. एक बाब स्पष्ट आहे की, परराष्ट्र धोरणात राजनयीकांच्या गाठी-भेटी, दोन किवा अधिक राष्ट्र-प्रमुखांनी एकत्र येऊन जारी केलेली वक्तव्ये आणि सरकारांनी जाहीरपणे केलेल्या घोषणा यांच्यापेक्षा खूप काही समाविष्ट आहे. परराष्ट्र धोरणात निश्चितपणे राष्ट्र-राज्याची राजकीय उद्दिष्टे, नैतिक तत्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. पादेल्फोर्द यांच्या मतानुसार परराष्ट्र धोरणात राष्ट्र-राज्याची राजकीय उद्दिष्टे, नैतिक तत्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. पादेल्फोर्द आणि लिंकन यांच्यानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्र-राज्याचे बाह्य-घटकांशी संबंधीत सर्वांगीण व्यवहार-वर्तन, राष्ट्र-राज्याच्या व्यापक ध्येय आणि हितांचे रक्षण आणि प्राप्तीसाठी इतर राष्ट्रांप्रती अंमलात आणलेल्या विशिष्ट प्रक्रियांचा संच म्हणजे परराष्ट्र धोरण. (Norman J padelford and George A Lincoln, The Dynamics of International Politics, p.195) वर दिलेल्या सर्व व्याख्यांचा सारांश असा काढता येईल की राष्ट्रीय ध्येय प्राप्त करण्यासाठी उपलब्ध राष्ट्रीय संसाधनांच्या मदतीने इतर राष्ट्रे व आपल्या सार्वभौमित्वाबाहेरील संस्था/व्यक्ती यांच्याशी होणारा क्रियाकलाप निर्धारित करणारी तत्वप्रणाली म्हणजे राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण.

परराष्ट्र धोरण पोकळीत अस्तित्वात येऊ शकत नाही. राजकीय-आर्थिक-सामाजिक-ऐतिहासिक संदर्भामध्ये परराष्ट्र धोरण तयार होत असते. राष्ट्र-राज्याच्या निर्मितीशी संबंधीत ऐतिहासिक घडामोडी, राष्ट्रियनिर्मितीची वैचारिक तत्व-चौकट आणि राष्ट्र-राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान यांच्या संगमातून राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा उगम होतो. राष्ट्राच्या राज्यसंस्थेचा प्रकार, अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा, राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडणघडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार-उकार प्राप्त होतो.

**आपली प्रगती तपासा.**

१ राष्ट्राला परराष्ट्र धोरणाची आवश्यकता का असते हे उदाहरणासह स्पष्ट करा.

२ परराष्ट्र धोरणांच्या निदान २ व्याख्यांची चर्चा करा.

## १.३ राष्ट्र हित आणि परराष्ट्र धोरण

आधुनिक काळात, परराष्ट्र धोरणात सातत्य आणि सुसंगतता राखण्यासाठी देशाच्या नागरिकांमध्ये त्याची स्वीकार्हता आणि मान्यता मिळणे आवश्यक आहे. देशाच्या परराष्ट्र धोरणाद्वारे राष्ट्रीय हितांचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या प्रक्रियेतून धोरण निर्मितीत

नागरिकांचा सहभाग निश्चित करण्यात येतो. नागरिकांनी विविध वैध मार्ग सरकारला कळवलेल्या आपल्या गरजा, इच्छा-आकांक्षा आणि ध्येय यांचे मिश्रण म्हणजे राष्ट्र-हित. प्रत्येक राष्ट्रासाठी त्यांचे राष्ट्रहित विविध पद्धतीने अधोरेखित होत असते. उदाहरणार्थ, आक्रमणाविरूद्ध बचाव करण्यासाठी आवश्यक संसाधनांची जुळवाजुळव, नागरिकांचे राहणीमान उंचावण्यासाठी आवश्यक ती संसाधन आणि संपत्ती निर्मिती, संयुक्त राष्ट्र संघटनेसारख्या जागतिक संस्थांमध्ये राष्ट्रच्या शक्तीनुसार योग्य स्थान प्राप्त करणे इत्यादी. चार्ल्स लर्च आणि अब्दुल सैद यांनी पुढील प्रमाणे राष्ट्रहिताची व्याख्या केली आहे. जी दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी राष्ट्र आणि त्याचे सरकार निरंतर कार्यरत असते ती उद्दिष्टे म्हणजे राष्ट्रहित. (Charles O. Lerche Jr. and Abdul A Said, Concepts of International Politics, (Engelwood Cliffs, 1963), p.6)

अंतर्गत संसाधनांच्या अंतर्गत अंमलबजावणीतून अंशतः राष्ट्रहिताची प्राप्ती शक्य होते. मात्र बरेचदा अंतर्गत संसाधनांचा बाह्य-शक्तींशी क्रियाकलाप घडवून आणून राष्ट्र-हित प्राप्त करावे लागते किंवा त्यांचे रक्षण करावे लागते. साहजिकच 'राष्ट्रहित' राष्ट्रा-राष्ट्राप्रमाणे आणि विविध वेळी वेगवेगळे असू शकते. प्रत्येक राष्ट्राला आपल्या राष्ट्रहिताच्या पूर्ततेसाठी आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्यात रस असतो. राष्ट्रहिताची पूर्तता ही साधारणतः अखंडीतपणे चालणारी प्रक्रिया आहे. इतर राष्ट्रांशी निर्माण होणाऱ्या संबंधांतून प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रहिताचे रक्षण व जोपासना करण्याचा प्रयन्त करत असते.

राष्ट्रहिताला २ भागांमध्ये विभाजित केले जाऊ शकतेः अत्यावश्यक किंवा केंद्रीय हित आणि दुय्यम हित. परराष्ट्र धोरणासाठी अत्यावश्यक किंवा केंद्रिय हिताचा विचार सर्वात महत्वाचा आहे. केंद्रीय हिताशी कुठल्याही प्रकारची तडजोड करण्यास राष्ट्र-राज्य तयार होत नाही आणि त्याच्या रक्षणासाठी अथवा प्राप्तीसाठी युध्द पुकारण्याची सुध्दा तयारी असते. भारतासाठी काश्मिर हा केंद्रीय हिताचा मुद्दा आहे. चीनसाठी तैवान आणि तिबेट हे केंद्रीय हिताचे मुद्दे आहेत. काही वर्षे पूर्वी, अमेरिकेसाठी अफगाणिस्तानातील तालिबान सरकारचा पाडाव करणे हा राष्ट्रहिताचा केंद्रीय मुद्दा होता तर आता तालिबानची सद्दी वाढू नये हा त्याच्याशीच संबंधीत मुद्दा अमेरिकेच्या दृष्टीने राष्ट्रहिताच्या केंद्रस्थानी आहे. केंद्रीय राष्ट्रीहिताच्या मुद्यांना परराष्ट्र धोरणात अग्रकम प्राप्त होतो आणि नागरिकांसाठी तो भावनिक मान-सन्मानासह स्वतःच्या स्वतंत्र सार्वभौम अस्तित्वाचा मुद्दा बनतो.

दुसरीकडे, दुय्यम श्रेणीतील राष्ट्रीय हितांची पूर्तता करण्याकडे राष्ट्र-राज्य दुर्लक्ष करत नसली तरी त्यांच्या पूर्ततेसाठी युध्दासारखे पाउल उचलणे टाळण्यावर त्यांचा भर असतो. उदाहरणार्थ, भारतासाठी संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व प्राप्त करणे किंवा जागतिक बॅंकेत मतदानाचा भरीव वाटा मिळवणे ही महत्वपूर्ण राष्ट्रीय उद्दिष्टे आहेत. मात्र त्याच्या पूर्ततेसाठी युध्दास सामोरे जाणे मान्य होणार नाही. परराष्ट्र धोरणासंदर्भात असे म्हणता येईल की राष्ट्रहिताचे केंद्रीय मुद्दे हे परराष्ट्र धोरणाची तडजोड न करता येणारी उद्दीष्टे असतात तर दुय्यम हिताचे मुद् हे दीर्घकालीन योजनाबध्द प्रक्रियेचे भाग असतात.

शिवाय, राष्टहिताच्या मुद्यांना विशिष्ट मुद्दे आणि सर्वसाधरण मुद् असे दोन भागांमध्ये विभाजित करता येते. राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणातील विशिष्ट मुद्दे हे प्रत्येक राष्ट्रानुसार बदलत असतात तर सर्वसाधारणा मुद्दे हे सर्व राष्ट्रांना लागू होतात. चीनशी असलेला सीमा-विवाद सोडवणे ही बाब चीनशी संबंधीत असल्याने ती विशिष्ट मुद्यांमध्ये मोडते. तसेच भोपाळ गैस

दुर्घटनेतील आरोपीना ताब्यात घेण्याची बाब मुख्यतः अमेरिकेशी संबंधीत असल्याने विशिष्ट मुद्दयांमध्ये समाविष्ट होते. दुसरीकडे, हवामान बदल आणि जागतिक तापमान वाढीच्या संदर्भात भारताने घेतलेली जबाबदारी सर्वाची पण भार कमी-जास्त ही भूमिका सर्वसाधारण हितामध्ये मोडते कारण याप्रक्रियेतील वाटाघाटीत जवळपास सर्वच देश सहभागी आहेत.

## १.३ परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्चे / ध्येय

परराष्ट्र धोरणाची मुख्य उद्दिष्ट्चे खालीलप्रमाणे आहेत. जी जवळपास सर्व देशांना समान प्रमाणात लागू होतातः

१. **देशाच्या एकात्मतेचे आणि अखंडतेचे रक्षण करण्याचे काम परराष्ट्र धोरण पार पडत असते :** उदाहरणार्थ, भारताच्या चीन व पाकिस्तानशी असलेल्या द्विपक्षीय संबंधांचा केंद्रबिंदू या देशांनी भारताच्या भूमीवर सांगितलेला दावा अमान्य करत खोडून काढणे हा असतो. या संदर्भात इतर आंतरराष्ट्रीय घटकांनी भारताच्या भूमिकेशी विपरीत नकाशे जारी केल्यास त्याबाबत नेषेध नोंदवत ते मागे घेण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न करणे हा भाग ही या अनुषंगाने परराष्ट्र धोरणात समाविष्ट होतो. देशाची एकता आणि अखडता अबाधित राखण्यासाठी सुसज्जता वाढवण्यास परराष्ट्र धोरणात प्राथमिकता देण्यात येते. भारतीय लष्कराला सुसज्ज ठेवण्यासाठी वेगवेगळ्या देशांतील शस्त्रास्त्रे आणि तंत्रज्ञान प्रणाली मिळवण्यासाठी त्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्याचे काम भारताचे परराष्ट्र धोरण करत असते.

२. **परराष्ट्र धोरणाद्वारे देशांच्या नागरिकांच्या हितांचे रक्षण करण्यात येते :** उदाहरणार्थ, द्वी-पक्षीय आणि बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधीत वाटाघाटींमध्ये भारतीय ग्राहक, शेतकरी, उद्योजक आणि निर्यातक यांच्या हितांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने भारताचे परराष्ट्र धोरण आखण्यात येते. आपल्या नागरिकांच्या आर्थिक हितांची जोपासना करणे आणि जीवनावश्यक बाबींची पूर्तता सुनिश्चित करणे हा परराष्ट्र धोरणातील एक केंद्रीय मुद्दा असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध देशातील नागरिकांच्या हितांमध्ये संघर्षाची स्थिती उत्पन्न होणे स्वाभाविक आहे आणि अशा परिस्थितीत परराष्ट्र धोरणात आपल्या देशातील नागरिकांच्या हिताच्या रक्षणास सर्वोच्च प्राथमिकता देणे क्रमप्राप्त आहे. परराष्ट्र धोरण देशाच्या आर्थिक संपन्नतेसाठी कार्यरत असणे अपेक्षित असते कारण आधुनिक काळात जागितक पटलावरील देशाचे स्थान आर्थिक निकषांवरून निर्धारित होत आहे. साहजिकच, इतर राष्ट्रे आणि राष्ट्र-समूहांशी केलेल्या करारातून आपापल्या देशाची आर्थिक प्रगती साधण्याचे उद्दिष्ट प्रत्येकच देशाच्या परराष्ट्र धोरणात समाविष्ट झाले आहे.

३. **आपल्या परदेशी नागरीकांच्या हिताचे रक्षण करणे :** देशाच्या सीमेपलीकडे अधिकृतरीत्या राहणाऱ्या देशाच्या नागरिकांच्या सुरक्षेचे आणि हिताचे रक्षण करणे हे परराष्ट्र धोरणाचे एक महत्वपूर्ण उद्दिष्ट आहे. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियातील भारतीय विद्यार्थ्यांशी होणाऱ्या कथित वर्णभेदाच्या प्रकरणांचा तपास करून त्या देशातील भारतीयांच्या सुरक्षेशी कुठलीही तडजोड होणार नाही. यासाठी प्रयत्न करणे हा भारताच्या

ऑस्ट्रेलिया प्रतीच्या परराष्ट्र धोरणाचा महत्वाचा भाग आहे. त्याचप्रमाणे, पश्चिम आशियाई देशात कामासाठी स्थलांतरीत झालेल्या भारतीय नागरिकांच्या तक्रारींचे निर्वारण करण्यासाठी प्रयत्नरत असणे तसेच भारताच्या आंतराष्ट्रीय भूमिकांचा - विशेषतः पश्चिम आशियाशी संबंधीत भूमिकांचा - वाईट परिणाम तिथल्या भारतीयांच्या सुरक्षेवर होणार नाही हे सुनिश्चित करणे हा भारताच्या पश्चिम आशियाई देशांप्रतीच्या परराष्ट्र धोरणाचा भाग आहे.

४. **डायसपोराच्या सांस्कृतीक मुल्यांचे जतन :** आपल्या देशातून परदेशात जात तिथे स्थायिक झालेल्या व्यक्तीच्या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतीष्ठतेचे, भावनांचे आणि मान-सन्मानाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नरत असणे हे परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट असते. उदाहरणार्थ, फ्रांस सरकारने शिख समुदायाच्या व्यक्तींनी पगडी/फेटा घालण्यावर बंदी आणल्यानंतर भारताने या प्रतीचा कायदा शिथिल करण्याची गळा फ्रेंच सरकारला घातली. या प्रकरणातील शिख समुदायाच्या व्यक्तींनी फ्रांसचे नागरिकत्व स्विकारले असले तरी त्यांची सामाजिक-सांस्कृतिक मुळे भारतात असल्याने भारत सरकारने हा मुद्दा उपस्थित करणे योग्य मानले.

५. **विविध देशांबरोबर आर्थिक व तंत्रविषयक देवाणघेवाण :** सर्व देशांबरोबर चांगले संबंध निर्माण करुन त्या देशांशी आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक देवाणघेवाणीची प्रक्रिया सदृढ करण्यावर परराष्ट्र धोरणात भर देण्यात येतो. याद्वारे आपल्या राष्ट्राचे हित साधण्याचा परराष्ट्र धोरणाचा हेतू असतो. सन १९५० आणि ६० च्या दशकात नव्याने स्वतंत्र होणाऱ्या आफ्रिकी आणि आशियाई देशांना मान्यता देण्यात भारत हिरीरीने पुढे होता. या देशांशी आर्थिक, शैक्षणिक आणि तंत्रिक देवाणघेवाणीद्वारे भारताने जागतिक राजकारणात आपले स्थान पक्के केले आणि आपल्या राष्ट्रीय हिताच्या पूर्ततेचा प्रयन्त सुध्दा केला.

इथे नमूद करण्यात आलेली उदाहरणे भारताच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधीत असली तरी जवळपास सर्वच राष्ट्रांचा परराष्ट्र धोरणांची निर्णयप्रक्रिया याच निकषांवर कार्यरत असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) राष्ट्रहित आणि परराष्ट्र धोरण यांच्या दरम्यान असलेला संबंध स्पष्ट करा.

२) परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे उदाहरणासह स्पष्ट करा.

## १.४ परराष्ट्र धोरण निर्धारीत करणारे घटक

परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली आखण्यात आणि अंमलबजावणीत अंतर्गत निर्णायक घटक आणि बाह्य निर्णायक घटक यांचा प्रभाव असतो. हे निर्णायक घटक खालीलप्रमाणे आहेत :

**अंतर्गत निर्णायक घटक.**

१. **आकार आणि भौगोलिक परिस्थिती:** राष्ट्र-राज्याच्याभौगोलिक आकाराचा परराष्ट्र धोरणावर स्वाभाविक परिणाम होतो. सर्वसाधारण धारणेनुसार राष्ट्र-राज्याचा भौगोलिक आकार जेवढा जास्त तेवढा आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याचा दरारा जास्त असतो. या धारणेमागे ३ कारणे आहेतः एक, मोठ्या भौगोलिक क्षेत्रफळामुळे जास्त नैसर्गिक साधनसंपत्ती राष्ट्राच्या वाटेस येऊ शकते. दोन, वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी, उदाहरणार्थ शेतीचा विस्तार करून अन्न-धान्याचे जास्त उत्पादन करण्यासाठी विस्तृत क्षत्रफळ उपयोगी येऊ शकते. तीन, मोठ्या भूप्रदेशावर ताबा मिळवणे शत्रू राष्ट्रांना कठीण असल्याने आकाराने मोठी राष्ट्रे अपराजित राहू शकतात. जागतिक पटलावर महाशक्ती म्हणून उदयास येण्याच्या भारताच्या सामुहिक इच्छा-शक्ती मागील आत्मविश्वास निर्माण होण्यात भारताच्या विशाल भौगोलिक आकाराची भूमिका मोठी आहे. जगातील राष्ट्रांमध्ये आकाराच्या मानाने भारताचा ७ वा क्रमांक लागतो. आंतराष्ट्रीय राजकारणावर वर्चस्व असणाऱ्या अमेरिका, रशिया आणि चीन या देशांचा भौगोली आकार सुध्दा विशाल आहे. मोठ्या भौगोलिक आकारामुळे भारतासारख्या देशाची सीमा अनेक राष्ट्रांशी संलग्नित होत असल्याने त्या राष्ट्रांसाठी भारत आपोआप महत्वपूर्ण देश होती तर त्याचवेळी अनेक शेजारी लाभल्याने भारताचे परराष्ट्र धोरण अधिक आव्हानात्मक होते. भारताच्या विशाल आकारामुळे आशियातील सर्वच महत्वाचे प्रदेश भारताला जवळचे होतात. दक्षिण-पूर्व आशिया, चीन, मध्य आशिया आणि पश्चिम आशिया या महत्वपूर्ण आर्थिक व सामरिक उलाढलींच्या प्रदेशांची भारताला जवळीक आहे. या प्रदेशातील देशांना भारताला दुर्लक्षित करणे शक्य नसल्याने जागतिक राजकारणात भारताला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. विशाल भौगोलिक आकारासह मोठी लोकसंख्या असल्याने जागति महाशक्तींसह सर्वच देशांना भारताची नोंद घेणे अपरिहार्य आहे. भारतातील मुबलक मनुष्यबळामुळे विकसित पाश्चात्य देशांसह पश्चिम आशियातील तेल निर्यातीने श्रीमंत झालेल्या देशांना भारताचे आकर्षण आहे. भारतातून अस्थायीरीत्या स्थलांतरीत झालेले मनुष्यबळ या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा भाग बनले आहे. त्याचवेळी भारतीय नागरिकांच्या रोजगाराच्या सुरक्षेसाठी या सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवणे भारतासाठी गरजेचे आहे.

आकाराने लहान असलेल्या देशांना मनुष्यबळ आणि साधनसंपतीच्या अभावाने जागतिक राजकारणावर फारसा प्रभाव टाकता येत नाही यात सुध्दा तथ्य आहे. आशिया-पैसिफिक क्षेत्रातील अनेक लहान-लहान राष्ट्रे, आफ्रिकेतील देश आणि कैरेबियन राष्ट्रे यांचे या संदर्भात उदाहरण देता येईल. म्हणजेच भौगोलिक आकार आणि लोकसंख्या हे घटक परराष्ट्र धोरणात महत्वाची सकारात्मक भूमिका पार पाडतात असे म्हणता येईल. राष्ट्राचे जागतिक नकाशातील स्थान सुध्दा त्याच्या परराष्ट्र धोरणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव निर्माण करत असते. महाशक्तींच्या शेजारच्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रीय मुद्दा हा त्या महाशक्तीशी कशा प्रकारचे संबंध ठेवायचे हा असतो. स्वातंत्र्यानंतर भारताला आपले

स्वतंत्र परराष्ट्र धोरण विकसित करता आले यामागे एक महत्वपूर्ण कारण होते की तत्कालीन महाशक्ती म्हणजे अमेरिका आणि सोविएत संघ, यांच्यापासून भारताचे भौगोलिक अंतर खूप जास्त आहे. मात्र सोविएत संघाच्या शेजारील यरोपीय देशांना किव्हा अमेरिकेच्या शेजारील मध्य अमेरिकी व लॅटिन अमेरिकी देशांना हे सौभाग्य प्राप्त झाले नव्हते. राष्ट्राला समुद्र किनारा आणि बंदरगावांसाठी योग्य स्थळे लाभली आहेत की नाही याचा सुध्दा त्याच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होतो. अफगाणिस्तान आणि नेपाळसारख्या चहूबाजूंनी जमिनींनी वेढलेल्या देशांना नाविक दल विकसित करणे शक्य नसते आणि आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी त्यांना इतर शेजारी देशांमधील बदरगावांच्या वापरावर अवलंबून रहावे लागते.

मात्र वरील धारणांना तडा देणारी उदाहरणे सुध्दा जागतिक राजकारणात आहेत. नेपाळला समुद्र किनारा लाभला नसला तरी आशियातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या २ अर्थव्यवस्थांमध्ये, म्हणजेच भारत आणि चीन यांच्या दरम्यान, नेपाळचे भौगोलिक स्थान असल्याचा फायदा या देशाला मिळू लागला आहे. त्याचप्रमाणे, आकाराने लहान असलेल्या इंग्लंड आणि जपान सारख्या देशांनी जागतिक राजकारणास मोठ्या प्रमाणात प्रभावी केले आहे तर दुसरीकडे बांगला देश सारखा प्रचंड मनुष्यबळ असलेला देश जागतिक राजकारणात प्रभावहीन आहे. दुसरीकडे ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा सारख्या खंडप्राय देशांचा जागतिक पटलावरील राजकीय प्रभाव क्षीणच आहे. ऑस्ट्रेलिया आणि कॅनडातील विरळ लोकसंख्येने आणि या देशांनी अमेरिकेच्या वर्चस्वाखाली नांदायचे धोरण पत्करल्याने जागतिक राजकारणात त्यांचा वेगळा प्रभाव निर्माण झाला नाही. त्याचप्रमाणे, या देशांनी सुध्दा त्यांच्या मनुष्यबळाच्या तसेच एकांगी भौगोलिक स्थानामुळे निर्माण होणाऱ्या सामरिक मर्यादा ओळखत जागतिक राजकारणात अवाजवी हस्तक्षेप करण्याचे टाळले आहे. इंग्लंड आणि जपानचा भौगोलिक आकार लहान असला तरी त्या आकाराच्या तुलनेत मुबलक मनुष्यबळाची उपलब्धता, औद्योगिक विकास, सागरी सामर्थ्य आणि व्यवस्थापन कौशल्य याच्या जोरावर त्यांनी आपले आगळे स्थान निर्माण केले आहे.

देशाच्या आकाराप्रमाणेच देशातील हवामान, जमिनीची पिक-उत्पादकता, पिकांमधील वैविध्य, जमिनीच्या आत खनिजे, नैसर्गिक वायू, तेल यांची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता इत्यादी भौगोलिक बाबींचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होती. या घटकांची मुबलक उपलब्धता असल्यास देशाला इतर देशांच्या सहकार्यवर फारसे अवलंबून रहावे लागत नाही आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वबाळावर भूमिका घेण्याचे धारिष्ट्य प्राप्त होते. स्वातंत्र्यानंतर भारताला भांडवलशाही गटात किंवा साम्यवादी गटात सहभागी होण्याची आवश्यकता भासली नाही कारण देशांतर्गत मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध होती तसेच सर्व देशांशी व्यापार करावयासाठी गरजेच्या वस्तू/उत्पादने आणि मार्ग उपलब्ध होते. त्यामुळे भारताला कोणत्याही गटामध्ये सहभागी न होता स्वतःचे गट-निरपेक्षतेचे धोरण विकसित करणे आणि त्याभोवती अनेक देशांना लामबंद करणे शक्य झाले होते.

२. **इतिहास आणि सांस्कृतिक वसा :** ऐतिहासिक अनुभव आणि सांस्कृतिक परंपरा यांचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर ठसा उमटलेला असतो. एकसंध संस्कृती आणि देशातील सर्व भागांचे समान ऐतिहासिक अनुभ असतील तर त्या राष्ट्राला सातत्यपूर्ण परराष्ट्र धोरण

आखणे तुलनेने सोपे असते. मात्र सांस्कृतिक विविधतेसह भूतकाळात प्रत्येक प्रांतांचे वेगवेगळ्या काळात वेगवेगळे ऐतिहासिक अनुभव असतील तर परराष्ट्र धोरणात देशातील सर्व भूभाग व समुदायांच्या लोकांच्या चिंता तसेच इच्छा आकांक्षांना समाविष्ट करणे ही तारेवरची कसरत होऊ शकते. भारतासारख्या खंडप्राय देशाला आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करतांना सर्व प्रांतांना आणि त्यामधील लोकांना जोडणाऱ्या समान दुव्याला सर्वेच्च स्थान देणे क्रमप्राप्त होते. भारताच्या बाबतीत हा समान ऐतिहासिक घटक होता वसाहतवाद विरोधी स्वातंत्र्य चळवळा स्वातंत्र्य आंदोलनात विकसित झालेल्या मूल्यांना आणि उद्दिष्टांना परराष्ट्र धोरणात अग्रक्रम देत जवाहरलाल नेहरू यांनी परराष्ट्र धोरणाबाबत सार्वमत बनवण्यात यश मिळवले होते. काळाच्या ओघात भारताच्या परराष्ट्र धोरणालादेखील सातत्य राखण्याच्या बाबतीत नवनव्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. जागतिक अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाची मागणी करत असतांना अण्वस्त्रधारी होणे, इतर राष्ट्रांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्विकारले असतांना श्रीलंकेतील तामिळ नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नरत असणे इत्यादी मुद्यांचा समावेश आहे.

३. **आर्थिक आणि तंत्रज्ञानाचा विकास :** आर्थिक विकास आणि तंत्रज्ञानातील प्रगती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. औद्योगिक विकासातून आर्थिकदृष्ट्या संपन्न झालेले देश आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यात देखील इतरांच्या तुलनेत खूप पुढे आहेत. स्वाभाविकतः आर्थिक उन्नती तंत्रज्ञानातील प्रगतीने देशाच्या परराष्ट्र धोरणाला आत्मविश्वास प्राप्त होतो आणि आक्रमकपणे आपली उद्दिष्ट्ये प्राप्त करण्याचे परराष्ट्र धोरण आखणे शक्य होते. आर्थिक संपन्नता आणि तंत्रज्ञानाचा विकास याच्या जोरावर देशाचे लष्करी सामर्थ्य वाढवणे सहज शक्य होते आणि सैन्य शक्ती विकसित करण्यासाठी इतर राष्ट्रांच्या मदतीवर विसंबून राहण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते. दुसरीकडे, गरजू देशांना आर्थिक मदत आणि तंत्रज्ञानाची निर्यात याद्वारे अनेक देशांवर आपला प्रभाव टाकणे आणि घनिष्ट मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे प्रगत देशांना शक्य होते. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांना परराष्ट्र धोरण ठरवतांना आर्थिक-तंत्रिक दृष्ट्या प्रगत देशांकडून मिळणाऱ्या/मिळू शकणाऱ्या मदतीची गंभीर दखल घेणे अपरिहार्य आहे. द्वितीय विश्वयुद्धानंतर जर्मनी व जपान या देशांनी लष्करी सामर्थ्य वाढवले नसले तरी त्यांची आर्थिक संपन्नता आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी साध्य केलेल्या प्रगतीमुळे जागतिक राजकारणात त्यांनी महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. भारत आणि चीनच्या जागतिक पटलावरील बहुचर्चित उद्यामागे या दोन्ही देशांनी अलीकडच्या काळात केलेली आर्थिक प्रगती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मारलेली मुसंडी आहे. या विपरीत, सोविएत संघाच्या विघटनानंतर रशियाचा औद्योकिक विकास मंदावल्याने जागतिक राजकारणात या देशांची थोडी पीछेहाट झाली आहे.

रोसेनौ यांच्या मतानुसार, तंत्रज्ञानातील बदलाने देशाचे आर्थिक आणि लष्करी सामर्थ्य बदलू शकते आणि त्याचा परिणअम त्या देशाच्या जगतिक राजकारणातील स्थानावर व भूमिकेवर होऊ शकतो. (James N Rosenau, in Thompson and Boyd, (eds), World Politics : An Introduction, pp.21-22) मात्र, हे सुध्दा तेवढेच खरे आहे की जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेत प्रगत देशांच्या तंत्रज्ञानातील वर्चस्वाला विकसनशील देश प्रशिक्षित मनुष्यबळाच्या आधारे टक्कर देऊ शकतात. भारत आणि

चीन सारख्या विकसनशील देशांचे महत्व औद्योगिक दृष्ट्या विकसित देशांमध्ये वाढले असल्याचे एक प्रमुख कारण म्हणजे या दोन्ही देशातील प्रशिक्षित मनुष्यबळाची हे आहे.

४. **लष्करी सुसज्जता :** इतर राष्ट्रांनी किंवा राष्ट्र - बाह्यशक्तींनी सशस्त्र आक्रमण केल्यास त्यास सडेतोड उत्तर देत देशाच्या सीमांचे रक्षण करण्याच्या राष्ट्रीय सामर्थ्याचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावार चांगला किंवा वाइट परिणाम होतो. या संदर्भात देशाचे लष्करी सामर्थ्य जेवढे बलवान तेवढे देशाचे परराष्ट्र धोरण स्वतंत्र वाट जोपासू शकते. मात्र लष्करी सामर्थ्यात कमतरता असेल तर स्वतंत्र परराष्ट्र धोरण ठरवण्याऐवजी जागतिक महाशक्तिशी संधी करण्यावर किंवा अनेक देशांसोबत एकत्र येत लष्करी गट तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. द्वितीय विश्वयुध्दानंतर शत्रू-पक्षापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अनेक देशांनी एक तर अमेरिकेशी युती केली किंवा सोविएत संघाच्या छत्र-छायेखाली जाणे पसंत केले. लष्करी सामर्थ्याच्या बळावर युध्दामध्ये विजय मिळवल्यास देशाच्या जागतिक प्रतिष्ठेत लक्षणीय वाढ होते आणि पराभव वाटेस आल्यास देशाची जागतिक प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात कमी होते. सन १९६२ मध्ये भारताला चीनच्या आक्रमणाचा योग्य प्रकारे सामान करता न आल्याने विकसनशील देशांमधील भारताच्या पुढारीपणाला धक्का लागला होता. मात्र त्यानंतर सन १९७१ मध्ये पाकिस्तानचा युध्दात दारूण पराभव करत आणि बांगला देशाच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावत भारताने आपली गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवली होती. सन १९९८ मध्ये भारताने अण्वस्त्राधारी होण्याचा निर्णय जाही केल्यानंतर प्रगत देशांनी काही काळ विरोधाची भूमिका घेतली पण त्यानंतर भारताशी संबंध सृद्ढ करण्यास प्राधान्य दिले.

५. **सामाजिक संरचना :** राष्ट्राच्या सामाजिक संरचनेचा किंवा त्यातील बदलांचा परराष्ट्र धोरणावर तत्काळरित्या कमी पण दीर्घकाळात दूरगामी परिणाम होऊ शकतो. अर्थात, एखाच्या देशाची सामजिक संरचना एकजिनसी आहे की विविधतेची आहे. हे ठरवण्याची परिमाणे निश्चित नाही. त्याचप्रमाणे एकजिनसी संरचनेत एकात्मता जास्त असते आणि विविध छटांच्या सामाजिक संरचनेत राष्ट्रीय एकात्मतेत कमी येते असा सिध्दांत सुध्दा छातीठोकपणे  मांडता येणार नाही. असे असले तरी एखाद्या राष्ट्रात वर्ण, धर्म, जात इत्यादीमध्ये भेदभाव आणि परस्परांवरील अविश्वास यामुखे सतत संघर्ष किंवा तणावाची स्थिती उत्पन्न होत असेल तर देशाच्या परराष्ट्र धोरणाला मर्यादा पडू शकतात. राष्ट्राच्या अंतर्गत सामाजिक संघर्षामुळे गृहयुध्द सुरू झाल्यास किंवा गृहयुध्दसृध्दा परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा विपरीत परिणाम राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर होणे अपरिहार्य आहे. २० व्या शतकात भारतासारखे क्लिष्ट सामाजिक संरचनेचे अनेक देश स्वतंत्र होऊन जागतिक राजकारणात सक्रिय झालेत. सामाजिक संरचनेतील क्लिष्टतेमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संघर्षाचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होऊ नये यासाठी भारतासारख्या देशाने राष्ट्रवादाची भावना आणि स्वातंत्र्य-लढ्याचा प्रेरणादायी इतिहास यांचा वापर प्रभावीपणे केला आहे.

६. **राष्ट्रीय सामर्थ्य :** देशाचे राष्ट्रीय सामर्थ्य विकास, तंत्रज्ञानातील प्रगती, लष्करी बळ आणि सामाजिक सामंजस्यासह राष्ट्रीय एकात्मतेची भावना या घटकांवरून निर्धारित होते. राष्ट्रीय सामर्थ्याचा देशाच्या परराष्ट्र धोरणावर मोठा प्रभाव असतो. राष्ट्रीय सामर्थ्यातील बदलावानुसार परराष्ट्र धोरणात सुध्दा बदल घडू शकतात. जागतिक

राजकारणापासून विलगीकरणाचे धोरण बदलत सक्रिय भाग घेण्याचे धोरण स्विकारले. द्वितीय विश्वयुध्दात मित्र-पक्षांचा विजय झाल्यानंतर देखील त्यावेळचा मित्र-पक्षांचा म्होरक्या ग्रेट ब्रिटेनने नेतृत्वाची छडी अमेरिकेकडे सोपवली. द्वितीय विश्वयुध्दातील सहभागाने ब्रिटेनच्या राष्ट्रीय सामर्थ्यात लक्षणीय कमी झाल्यामुळे या देशाने भांडवलशाही गटाचे नेतृत्व अमेरिकेकडे सुपूर्द केले. अलीकडच्या काळात चीनच्या राष्ट्रीय सामर्थ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानंतर या देशाच्या परराष्ट्र धोरणात आक्रमकता येऊ लागल्याचे निरीक्षकांचे मत आहे. राष्ट्रीय सामर्थ्य वाढल्यामुळे चीनच्या आशियाई आणि आफ्रिकी देशांतील प्रभाव सातत्याने वाढत असल्याबाबत निरीक्षकांमध्ये एकमत आहे.

७. **राष्ट्र-राज्याची विचारधार :** राष्ट्र-राज्याने अधिकृतपणे एखाद्या विचारधारेचा स्विकार केला असेल किंवा एखाद्या धर्म अथवा वर्णाच्या रक्षणासाठी/प्रसारासाठी राष्ट्र-राज्याची निर्मिती झाल्याचे प्रमाणित करण्यात येत असेल तर देशाचे परराष्ट्र धोरण सुध्दा त्यानुसार निर्धारित होते. सन १९३० च्या दशकात, जर्मनीतील सत्ताधारी नाझी पक्षाच्या आर्य वर्णाच्या श्रष्ठतेचा आग्रह त्या देशाच्या आक्रमक परराष्ट्र धोरणात परिवर्तीत झाला होता. त्याचप्रमाणे, अमेरिका आणि सोविएत संघ या महाशक्तीच्या परराष्ट्र धोरणात अनुक्रमे भांडवलशाही आणि साम्यवादी व्यवस्थांचे रक्षण आणि प्रसार यांना अग्रस्थान प्राप्त होते.

८. **इंटरनेट आणि त्यावरील सामाजिक माध्यमांचा फैलाव :** २१ व्या शतकात इंटरनेट, विशेषतः सामाजिक माध्यमांची संकेतस्थळे, मोठ्या प्रमाणात इ-मेल द्वारे संपर्क राखणे आणि संदेश पोहोचवणे, ताज्या बातम्या आणि संबंधीत लेखांची संकेतस्थळे, इत्यादी माहिती तंत्रज्ञानाशी संबंधीत माध्यमांचा परराष्ट्र धोरणावर नियंत्रित पण अचूक प्रभाव पडण्यास सुरूवात झाली आहे. केवळ व्यापारी आणि तांत्रिक कारणासाठी इंटरनेटच्या वापरला परवानगी देण्यात आली तरी इंटनेटची एकंदरीत संरचना अशी आहे. की त्याद्वारे माहितीची आणि भूमिकांची देवाणघेवाण पूर्णपणे थांबवणे शक्य नाही. परिणामी, खुल्या निवडणुका आणि बहु-पक्षीय पध्दती नसलेल्या देशांमध्ये सुध्दा इंटरनेट आणि त्याचाशी संबंधीत सामाजिक माध्यमांचा फैलाव झालेला असल्यामुळे त्यांच्या परराष्ट्र धोरणावरील प्रभावाकडे अभ्यासक लक्ष लावून आहेत. चीनसारख्या देशात इंटरनेट वरील चर्चेवर आणि माहितीच्या देवाणघेवाणीवर सरकारी यंत्रणेचे बारीक लक्ष असते, तरी सुध्दा चीनचे नागरिक राष्ट्रीय महत्वाच्या अनेक मुद्यांवर आपली मते मांडत सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असतात. विशेषतः राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या मुद्यांवर सरकारवर टिकाटिप्पणी करण्याचे प्रमाण चीनमध्ये लक्षणीय रित्या वाढलेले आहे. महत्वाचे म्हणजे, इंटरनेटवर व्यक्त होणाऱ्या मतांना चीनचे सरकार गांभीर्याने घेऊ लागले आहे. पूर्वीच्या यगोस्लावियाच्या विघटनाच्या प्रक्रियेत नाटोच्या विमानांनी केलेल्या बॉम्ब हल्ल्यात चीनच्या दूतावासाचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी चीनच्या नागरिकांनी इंटनेटवरून प्रचंड रोष जाहीर करत चीन च्या सरकारला नाटो विरूध्द कडक भूमिका घ्यायला लावली होती. त्याचप्रमाणे, जपानच्या बाबतीत चीनचे नागरिक सामाजिक माध्यमांतून वेळोवेळी आपला राग व्यक्त करत असतात. चीनच्या जपानविषयक परराष्ट्र धोरणावर याचा मोठ परिणाम झालेला आहे.

९. **राज्यव्यवस्थेचा प्रकार :** राष्ट्रांची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकाराची आहे याचा परराष्ट्र धोरण ठरवण्यात आणि त्याच्या अंमलबजावणीत सिंहाचा वाटा असतो. एक-पक्षीयव्यवस्था

किंवा लष्करी हुकुमशाहीत परराष्ट्र धोरणाचे निर्णय ताबडतोब घेणे शक्य असले तरी ते दूरगामी राष्ट्रहिताचे असतील याची खात्री देता येत नाही. मुळात एक-पक्षीय व्यवस्था किंवा लष्करी हुकुमशाही पद्धतीत राष्ट्रहिताची व्याख्या अत्यंत संकुचित असण्याची जास्त शक्यता असते. अशा संकुचित राष्ट्रहितावर आधारीत परराष्ट्र धोरणाचा परिणाम जागतिक राजकारणात देशाच्या एकांगी पडण्यावर होऊ शकतो. उत्तर कोरियातील कथित कम्युनिस्ट सरकार अथवा काही काळापूर्वीपर्यंत म्यानमारचा कारभार एकहस्ती चालवणारा लष्करी गटांच्या परराष्ट्र धोरणामुळे हे देश जागतिक राजकारणात वाळीत पडले होते. अशा रांजवटीत देशाच्या नागरिकांच्या इच्छा-आकांक्षांना परराष्ट्र धोरणात स्थान प्राप्त झाले की नाही हे ठरवणे कठीण असते कारण नागरिकांना त्यांची मते कुल्याने मांडून चर्चा करण्याचा वाव कमी असतो. लोकशाही व्यवस्थांमध्ये प्रसारामध्ये, राजकीय पक्षांची व्यासपीठे आणि लोकप्रतिनिधीगृहांमध्ये परराष्ट्र धोरणावर व्यापक चर्चा घडत असल्याने जनमताच ठाव घेण्याची संधी सत्ताधाऱ्यांना मिळते असते आणि जनमतानुसार धोरणांमध्ये बदल करण्याचे आव्हान सरकारला पेलावे लागते. विएतनाम युद्धाच्या काळात अमेरिकी जनमत सरकारच्या लष्करी हस्तक्षेपाच्या धोरणाच्या विरोधात गेले होते. अमेरिकी सरकारच्या विएतनाममधून काढता पाय घेण्याच्या निर्णयामागे जनमताचा रेटा हे एक प्रमुख कारण होते.

लोकशाहीप्रधान राष्ट्रे आपापसात युध्दाच्या टोकाच्या भूमिकेपर्यंत जात नाहीत आणि हुकुमशाही व्यवस्थेतील राष्ट्रांमध्ये युद्धखोरी जास्त असते या सिध्दांताला २० व्या शतकात आंतराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रात मान्यता प्राप्त झाली होती. ज्या दोन किंवा दोन पेक्षा जास्त राष्ट्रांमध्ये युध्द होते तेव्हा त्यांच्यापैकी निदान एका राष्ट्रात तरी हुकुमशाही / एक-पक्षीय व्यवस्था / लष्करी राजवट असते असे या सिद्धांतात सप्रमाण दाखवण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यानच्या युध्दांना हा सिध्दांत लागू होतो. सन १९६५ आणि १९७४ मध्ये भारत आणि पाकिस्तान दरम्यान झालेल्या युध्दांच्या वेळी पाकिस्तानात लष्करी राजवट होती पाकिस्तानात लोकशाही नांदत असतांना दोन्ही देशांमध्ये तणावाचे अनेक प्रसंग आलेत तरी युध्दास तोड फुटले नाही.

खुल्या निवडणुकीवर आधारीत बहु-पक्षीय पध्दतीत राष्ट्रहिताचा जास्त सखोल विचार करण्याची प्रक्रिया अंतर्भूत असते मात्र निर्णयप्रक्रिय किचकट होऊ शकते. त्यामुळे लोकशाहीप्रधान देशांमध्ये परराष्ट्र धोरणाचे निर्णय ताबडतोब घेणे बरेचदा शक्य नसते. लोकशाहीप्रधान देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या सरकारचे बहुमत कशा प्रकारचे आहे यांवर सुध्दा परराष्ट्र धोरणाची निर्णयप्रक्रिया अवलंबून असते. एकाच पक्षाच्या बहुमताचे सरकार असेल तर परराष्ट्र धोरणासंदर्भातील निर्णय घेणे सोपे असते आणि अनेक पक्षांच्या आघाडीचे सरकार असेल तर बरेचदा अवघड होऊन बसते. सन १९९६ नंतर भारताने आघाडीच्या सरकारांमध्ये परराष्ट्र धोरणाचे निर्णय कशाप्रकारे जाहीर चर्चेचे विषय होतात याचा अनेकदा अनुभव घेतला आहे. लोकशाहीप्रधान देशांमध्ये राष्ट्राध्यक्षीय पध्दत आहे की संसदीय प्रणाली आहे यावरून त्या-त्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाची निर्णयाप्रक्रिया ठरत असते. संसदीय प्रणालीत परराष्ट्र धोरणाबाबत मंत्रीमंडळाचा निर्णय अंतिम असतो तर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षीय पद्धतीत परराष्ट्र धोरणातील महत्वाच्या बाबींवर अमेरिकी काँग्रेसची, विशेषतः काँग्रेसचे वरिष्ठ सदन - सिनेटची - मोहोर असणे आवश्यक असते.

**१०. राष्ट्राचे नेतृत्व :** परराष्ट्र धोरण निर्धारित करण्यात देशाच्या नेतृत्वाची भूमिका महत्वपूर्ण असते. रोसेनौ यांच्या मतानुसार, "नेतृत्वाची विचारप्रणाली", आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आकलन, बौद्धिक क्षमता, व्यक्तीगत जीवनातील अनुभव, मानसिक गरजा आणि विश्वासातील व्यक्तींचे विचार या बाबींचा देशाचे परराष्ट्र धोरण ठरवण्यावर आणि अंमलबजावणीवर निश्चितपणे परिणाम होतो. (James N Rosenau in Rosenau, Thompson and Boyd, (Eds), World Politics : An Introduction, p.28) राज्यव्यवस्थेतील प्रक्रिया प्रणाली आणि सामाजिक संरचना तसेच राष्ट्रीय सामर्थ्य या सर्वांची परराष्ट्र धोरण विकसित होण्यात महत्वाची भूमिका असली तरी संकटाच्या काळात आणि पेचप्रसंगी राष्ट्राच्या नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयाची परराष्ट्र धोरणावर अमीट छाप उमटते. द्वितीय विश्वयुध्दात विन्स्टन चर्चिल यांच्या खंबीर नेतृत्वाने इंग्लंडला कठीण परिस्थितीतही विजय प्राप्त करवून दिला होता. सन १९७१ च्या भारत-पाकिस्तान युध्दादरम्यान इंदिरा गांधीच्या चाणाक्ष निर्णयांनी अमेरिका आणि चीन तर्फे आलेला दबाव झिडकारून लावत पाकिस्तानला पराभूत करण्यात त्यांनी अग्रणी भूमिका बजावली होती.

**बाह्य निर्णायक घटक**

**१. जागतिकपरिस्थिती :** विशिष्ट काळातील जागतिक परिस्थितीनुसार राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात लघुकालीन ते दिर्घकालीन बदल घडत असतात. जागतिक राजकारणाच्या संरचनेत आपापल्या राष्ट्रांच्या हितांचे रक्षण करणाऱ्याच्या उद्दिष्टांनी परराष्ट्र धोरणाची पुर्नचना करण्यात येते. भारत ज्या वेळी स्वतंत्र झाला त्यावेळी भांडवलशाही देश आणि साम्यवादी देश अशा दोन गटांमध्ये जग विभाजित झाले होते. ही परिस्थिती भारताच्या फायद्याची नव्हती पण ती बदलणे शक्यही नव्हते. त्यामुळे भारताने गट-निरपेक्षतेचा पुरस्कार करत स्वतःसाठी दोन्ही गटांपासून वेगळे स्थान निर्माण केले. भारताने कोणत्याही गटाशी लष्करी संधी न करता प्रत्येक देशांशी राजकीय आणि व्यापारी संबंध मजबूत करण्यास सुरूवात केली. मात्र, काही वर्षामध्येच भारत-चीन संबंधांमध्ये तीव्र कटुता आल्याने आणि पाश्चिमात्य भांडवलशाही गटाने पाकिस्तानला लष्करी मदत पुरवण्यास सुरूवात केल्याने भारताने आपल्या धोरणात फेरबदल केला. भारताच्या दृष्टीने ही बदललेली परिस्थिती होती. गट-निरपेक्षतेचा त्याग न करता सोविएत संघाशी मैत्रीपूर्ण संबंध बळकट करण्यावर भारताने जोर दिला. पुढे सोविएत संघाचे विघटन झाल्यानंतर एकूणच जागतिक परिस्थिती द्वी-ध्रुवीय विश्वातून एक-ध्रुवीय विश्वात परिवर्ती झाली. भारताने रशियाशी पुर्वापारचे चालत आलेले संबंध कायम ठेवलेत पण त्यासोबत अमेरिका आणि इतर प्रगत भांडवलशाही देशांशी संबंधांची पुर्नबांधणी करण्यास सुरूवात केली. यातून भारताने नव्या जागतिक संरचनेत स्वतःचे स्थान भक्कम केले.

**२. शत्रू पक्षाचे लष्करी सामर्थ्य :** जागतिक राजकारणात शांततामय सहजीवनाचे एखाद्या राष्ट्राचे ध्येय जरी असले तरी इतर देशांचा, विशेषतः शेजारी देशांचा किंव्हा वैचारिक दृष्ट्या विरोधात असलेल्या देशांचा, प्रतिसाद अनुकूलच असेल असे नाही. अशा परिस्थितीत आपल्या राष्ट्राला हव्या असलेल्या ध्येयांना तिलांजली न देता राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्याचे आव्हान परराष्ट्र धोरणापुढे उभे राहते. या संदर्भात शत्रू स्पर्धक राष्ट्रांचे लष्करी सामर्थ्य ध्यानात घेऊन परराष्ट्र धोरणाची रचना करणे क्रमप्राप्त होते. म्हणजेच, लष्करीकरण हे परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट नसले तरी राष्ट्रीय नसले तरी राष्ट्रीय हितांसाठी लष्कराला बळकट करण्याच्या दृष्टीने परराष्ट्र

धोरणात पाउले उचलावी लागतात. स्वातंत्र्यानंतर भारताने नि:शस्त्रीकरणाचा हिररीने पुरस्कार केला असला तरी शेजारी राष्ट्रांकडून असलेला धोका लक्षात घेताआपले लष्कर आधुनिक आणि बळकट ठेवण्याच्या दृष्टीने परराष्ट्र धोरणाला आयम दिला.

एकंदरीत, परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली क्लिष्ट अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांनुसार निर्धारित होते. राष्ट्राची दिर्घकालीन उद्दिष्टे, सामुहिक आकांक्षा आणि नेतृत्वाची जागतिक पातळीवर भूमिका बजावण्याची महत्वाकांक्षा यांचा अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांशी मेळ बसल्यावर देशाच्या परराष्ट्र धोरणास अंतिम स्वरूप प्राप्त होते.

**आपली प्रगती तपासा**

१. परराष्ट्र धोरणाच्या अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांची चर्चा करा.

२. भारताच्या परराष्ट्र धोरणावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या निर्णायक घटकांची चर्चा करा.

## १.६ थोडक्यात महत्वाचे

आधुनिक काळात राष्ट्र-राज्यांना आपापल्या राष्ट्रहितांचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली. परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली तयार करण्याची आणि त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया क्लिष्ट आणि सतत विकास पावणारी असल्याने त्याची नेमकी व्याख्या करण्याबाबत तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. मात्र, परराष्ट्र धोरणाच्या व्यापक उद्दिष्टांबाबत तज्ज्ञांमध्ये साधारणतः एकमत आढळते. त्यानुसार निर्धारित करण्यात आलेली परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे याप्रमाणे आहेतः १) देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करणे, २) देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी बाह्य शक्तींना आवश्यक त्याप्रमाणे प्रभावीत करणे / अंकुशात ठेवणे, ३) इतर देशांशी वास्तव्यास असणाऱ्या देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याणाबाबत योग्य ती पाउले उचलणे, ४) इतर देशांशी सांस्कृतिक संबंध बळकट करत आपल्या देशाची संस्कृती व परंपरांचा परिचय करून देणे, ५) इतर देशांशी व्यापार, वाणिज्य, तंत्रज्ञान, शिक्षण, पर्यावरण, क्रीडा इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये संपर्क वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेस त्याचा लाभ पोहोचवणे.

प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण निर्धारित करण्यामागे अनेक अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटक कार्यरत असतात. परराष्ट्र धोरणाला प्रभावीत करणारे अंतर्गत निर्णायक घटक पुढील प्रमाणे आहेतः १) आकार, लोकसंख्या आणि भौगोलिक स्थान, २) इतिहास, सांस्कृतिक मुल्ये आणि राष्ट्र-राज्य उभारणीची प्रक्रिया, ३) सामाजिक संरचना आणि राज्यव्यवस्थेचा प्रकार, ४)

आर्थिक विकास, तंत्रज्ञानातील प्रगती, लष्करी बळ आणि सामाजिक संरचनेच्या मिलाफातून उभे राहाणारे राष्ट्रीय सामर्थ्य, आणि ५) वैचारिक खंबीरता आणि नेतृत्वगुण या अंतर्गत घटकांसह, जागतिक राजकारणाची संरचना व जडणघडण आणि शत्रू / स्पर्धक राष्ट्रांचे लष्करी बळ या बाह्य निर्णायक घटकांना ध्यानात घेऊन परराष्ट्र धोरणाची रचना करण्यात येते. राष्ट्र-राज्याची उद्दिष्टे, तत्कालिक राष्ट्र हित आणि निर्णायक घटकांची वस्तुस्थिती यांच्यातील समन्वयाने देशाच्या परराष्ट्र धोरणाला अंतिम रूप प्राप्त होते.

## १.७ संपूर्ण प्रकरणावर आधारीत प्रश्न

१. राष्ट्र-राज्याला आपल्या केंद्रीय राष्ट्रहीतांची रक्षा करण्यासाठी परराष्ट्र धोरणाची गरज का भासते ?

२. परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या आणि उद्दिष्टे काय आहेत ?

३. राष्ट्र-राज्याचे परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे घटक कोणकोणते आहेत हे स्पष्ट करा.

## 1.8 REFERENCE


1. Bandyopadhyaya, J The Making of India's Foreign Policy, Allied Publishers Pvt Ltd, 2003, New Delhi
2. Bandyopadhyaya, J, North Over South : A Non-Western Perspective of International Relations, South Asians, 1982, New Delhi
3. Brecher, Miachel, India and World Politics : Krishna Menon's View of the World, OUP, 1968, London
4. Chandra, Bipin and others, India Since Independence, Penguin Books, 2007, New Delhi
5. Dixit, J.N., My south Block Years : Memoirs of a Foreign Secretary, WBSPD, 1996, New Delhi
6. Jain, P.C., Economic Determinants of India's Foreign Policy : Nehru Years, Vitasta Publishing, 2012 New Delhi
7. Mathai, M.O., Reiniscences of the Nehru Age, Vikas Publications, 1978, New Delhi
8. Mattoo, Amitabh and Happymon Jacob, Shaping India's Foreign Policy, Har-Anand Publications, 2010
9. Mishra, K.P.(ed), Studies in India's Foreign Policy, Vikas Publicatios, 1969, New Delhi
10. Mukherjee, Amitaava and J. Bandyopadhyaya, International relations Theory : From Anarchy to World Government, Manuscript India, 2001, Howrah
11. Nehru, Jawaharlal, India's Foreign policy, Publications Divisions, 1962, New Delhi
12. Panandikar, V.A.Pai and Ajay K Sharma, The Indian Cabinet : A Study in Government, Konark, 1996, New Delhi.


❖❖❖❖

# २

# परराष्ट्र धोरण ठरविणाऱ्या संस्था

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ सारांश
२.३ सरावासाठी प्रश्न
२.४ संदर्भसूची

## २.० उद्दिष्टे

परराष्ट्र धोरण कार्यक्रमात योगदान देणाऱ्या व त्याचे स्वरुप ठरविणाऱ्या घटकांच्या साखळीद्वारा परकीय धोरण आखले जाते. परराष्ट्र धोरण ठरविण्यासाठी मुख्यत्वे करुन जबाबदार असलेल्या संस्था व प्रक्रियांची आपण चर्चा करुया. बऱ्याच संस्थांमधील सततची परस्परक्रिया परराष्ट्र धोरणातील मुद्यांना अग्रक्रम देण्यात परिणत होते. असे असेल तरी भारतासारख्या देशात परराष्ट्र संबंधातील निर्णयप्रक्रियेत प्रभावी नेतृत्व महत्त्वाची भूमिका बजावते. या प्रकरणात आपण परराष्ट्र धोरण ठरविण्यास कारणीभूत असलेल्या अशा घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## २.१ प्रस्तावना

विविध स्तरावरील निर्णयप्रक्रिया ही परराष्ट्र धोरण आखणी व अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावते. जे. बंडोपाध्याय यांच्या मतानुसार "एखाद्या राजकीय पक्षाची तर्कशुद्धता ही स्वच्छ लोकानुमताचे स्वरुप व व्याप्ती तसेच त्याच्या अभिव्यक्तीची रीत, परराष्ट्र धोरण, दबावगट, संसद, परराष्ट्र कार्यालय, परराष्ट्र मंत्री व सरतेशेवटी मंत्रीमंडळ यांच्याशी संबंधित राजकीय पक्षांच्या संस्था यावर अवलंबून असते." परराष्ट्र धोरण आखण्यात समाविष्ट असणाऱ्या संस्थांना आपण दोन मुख्य वर्गात विभाजित करु शकतो. अनौपचारीक संस्था आणि औपचारिक संस्था. पहिल्या गटात देशातील श्रेष्ठ लोकांचा गट, सर्वसामान्य लोकमत व दबाव गट इ. चा समावेश होतो. औपचारिक संस्थांमध्ये मंत्रीमंडळ, संसद, राजकीय पक्ष इ. चा समावेश होतो.

**i) अभिजनांचा गट** - परराष्ट्र धोरणांची उद्दिष्ट्ये व प्राधान्यक्रम यांच्या आखणीत अभिजनांच्या गटाची महत्त्वाची भूमिका असते. देशी व परकीय सामाजिक परिस्थिती व त्या अनुषंगाने असणारी आव्हाने याबद्दलची त्यांची जाण याचे देशाचे बाह्य संबंध ठरविण्यात

महत्त्वाचे स्थान आहे. ही गोष्ट सर्वश्रुत आहे की भारताचे परराष्ट्र धोरण हे जवाहरलाल नेहरु यांची जागतिक दृष्टिकोन व त्यांची संपूर्ण मानवजातीच्या शांती व समानतेसाठी असलेली ध्येयासक्ती यांची निष्पत्ती आहे. जरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोन दशकापर्यंत नेहरुंचा परराष्ट्र संबंधाबाबतचा दृष्टीकोन वादातील असला जरी त्यांनी कृष्णा मेनन, सरदार पटेल, मौलाना आझाद, डॉ. राधा कृष्णन, के. एम. पाण्णीकर, स्वर्ण सिंग इ. लोकांचा सुज्ञ सल्ला स्विकारला. सुरुवातीच्या काळात भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा पाया रचण्यात अभिजन वर्गाची भुमिका महत्त्वाची ठरली. त्यानंतरच्या वर्षात या गटात अजून काही विद्वान, राजकारणी / नोकरशहा सामिल झाले जसे इंदिरा गांधी, टी. एन. कौल, डी. पी. धार, पी. एन. हकसार, राजीव गांधी, जे. एन. दीक्षित, ब्रजेश मिश्रा, हमीद अन्सारी, आय. के. गुजराल, जसवंत सिंग, अटल बिहारी वाजपेयी आणि मनमोहन सिंग इ.

**ii) लोकमत** - भारतासारख्या लोकशाही व प्रजासत्ताक देशात, देशाचे सार्वभौमत्व लोकांद्वारे टिकून राहते. म्हणून सरकारच्या सर्व धोरणात मग त्या अंतर्गत असो कि परराष्ट्रीय, लोकांचे अभिप्राय व आशा आकांक्षा अभिव्यक्त व्हायलाच हव्यात तथापी भारतासारख्या विशाल देशात जेथे गरिबी व निरक्षरता हि सर्वदूर पसरलेली आहे तेथे सामान्यजन अंतर्गत धोरणातील त्यांच्या आवडी व मागण्यांच्या तुलनेत देशाच्या आंतरराष्ट्रीय संबंधाविषयीच्या मुद्यांमध्ये जास्त रुची दाखवत नाही. ते फक्त युद्ध किंवा आंतरराष्ट्रीय आपत्तीच्या काळातच देशाच्या आंतरराष्ट्रीय धोरणात रुची दाखवतात. निरक्षरतेची अत्युच्य पातळी तसेच संभाषणाच्या साधनांचा अभाव हे आंतरराष्ट्रीय राजकारण आणि परराष्ट्रीय धोरण आखणीच्या क्लिष्टतेविषयी लोकांना शिक्षित करण्यातील महत्त्वाचे अडथळे सिद्ध झाले आहे. अशाप्रकारे लोकांचा देशाच्या परकिय धोरणातील सहभाग हा त्यांच्या आवडी व गरजांमुळे मर्यादीत राहिलेला आहे. लोकांची परराष्ट्र धोरणातील रुची मर्यादित असली तरी जातीवाद, साम्राज्यवाद, दहशतवाद आणि युद्ध यासारख्या मुद्यांवर भूमिका घेण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा त्यांचा नैतिक दृष्टीकोन आणि अंतर्गत राजकारणातील तत्त्वे ही त्यांच्या निवडीतून प्रतित होतात.

**iii) दबावगट** - पाश्चिमात्य लोकशाही विशेषतः अमेरिके पेक्षा भारत भिन्न आहे. जेथे भारताचे परराष्ट्र धोरण आखण्यात विविध दबावगट कमी महत्त्वाची भूमिका बजावतात तथापि नंतरच्या काळात काही दबावगटांनी हे धोरण ठरवण्यात पुरेसा प्रभाव टाकायला सुरुवात केली आहे. यामध्ये उद्योगगट, लष्करी दलाल आणि अनिवासी भारतीय यांचा समावेश होतो. अलिकडील काळात भारतीय उद्योजक गटाद्वारे आफ्रिका, दक्षिणपूर्व आशिया आणि पश्चिम आशिया च्या देशात गुंतवणूकीचे प्रमाण हे विकसीत देशांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून मिळणाऱ्या वाढिस सहकार्याने खूपच वाढले आहे. आज भारतीय कंपन्यांची औद्योगिक रुची व भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. खासकरुन आफ्रिकन देश, नेपाळ, मॅनमार तसेच युनायटेड स्टेटस् आणि युरोपियन संघ यांच्या संदर्भात. त्याचप्रमाणे अनिवासी भारतीय त्यांच्या परिने परकिय धोरणावर प्रभाव टाकतात. कारण त्यांना त्यांच्या स्वतःच्या सुरक्षितता व प्रगतीसाठी ते राहत असलेल्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध हवे असतात. १९९१ नंतर अनिवासी भारतीयांच्या सुस्थिती हा भारत अमेरिका संबंधांचा अत्यावश्यक भाग बनला. दक्षिण आशियायी क्षेत्रातील सतत वाढत्या लष्करी सामर्थ्याच्या स्पर्धेच्या संदर्भात लष्करी दलाल हे लष्करी साहित्याच्या आयातीविषयीच्या सरकारी मत ठरविण्यावर प्रभाव पाडू शकतात. तद्नुसार सरकार लष्करी साहित्याची निवड व आयतदार देश बदलू शकते. अमेरिका व ईस्त्राइल हे भारतीय लष्कराला लष्करी साहित्य पुरवणारे दोन अग्रगण्य देश असल्यामुळे मागील दोन दशकात भारतीय लष्करी

आयातीत लक्षणीय बदल घडून आले हे नविन. व्यवहार अशा वळणावर येऊन ठेपलेत की त्यांना वाटते ही व्यवस्था फक्त दिर्घकाळच चालावी असे नाही तर खरेदीचे प्रमाणसुद्धा पुरेशा प्रमाणात वाढावे.

परराष्ट्र मंत्रालयाशी संबंधित नोकरशहा हे त्यांच्या विचारसरणीच्या निश्चित मतानुसार किंवा राजकीय कलानुसार परराष्ट्र धोरणावर प्रभाव टाकण्याच्या परिस्थितीत असतात. १९६० आणि १९७० च्या काळात, हा सनदी नोकरवर्ग डाव्या विचारसरणीमुळे झुकलेला असल्याने त्याने भारतीय धोरणकर्त्यांना युनायटेड स्टेटस्च्या प्रभावापासून दूर केले तर त्याचवेळेस यु. एस. एस. आ. च्या जवळ नेऊन ठेवले. तथापि भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी हे नोकरशहा असल्याने ते चालू सरकारने आखून दिलेल्या रुपरेषेनुसारच काम करतात. त्याच वेळेस सचिव किंवा त्यापेक्षा उच्च स्तरावरील जेष्ठ भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारीच त्यांच्या त्या वेळच्या हुद्यानुसार सरकारला सल्ला देण्याची भूमिका पार पाडतात. भारतीय परराष्ट्र सेवा संस्था सुद्धा अस्तित्वात आहे. परंतु त्याचे प्राथमिक कार्य म्हणजे परराष्ट्र सेवा सदस्यांची सुरक्षितता पाहणे, त्यांना संरक्षण देणे तसेच त्यांच्या आर्थिक हिताला चालना देणे.

विविध परकीय गट सुद्धा देशाच्या परकीय धोरणावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. असे गट मैत्री संस्था, सांस्कृतिक व शैक्षणिक देवाणघेवाण गट इ. स्वरुपात असतात. असे परकीय गट हे संबंधित देशाच्या फायद्यासाठी सरकार, प्रसारमाध्यमे, लष्कर आणि नागरी संस्थांमधील श्रेष्ठ सदस्यांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात. ते विद्वानजन, पत्रकार, विद्यार्थी व तरुण नेते, कामगार संघटना पुढारी इ. शी प्रगाढ संबंध टिकवून ठेवतात. ते धोरणकर्ते व नागरी समाज सदस्यांशी जुळवून घेण्यासाठी अधूनमधून चर्चासत्रे, वादविवादसत्रे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. असे म्हटले जाते की, भारत हा असा थोड्या देशांपैकी एक देश आहे. जेथे अशा परकीय गटांचे जाळे विशाल व दाट आहे. तथापि अशा परकीय गटांच्या भारताच्या परराष्ट्र धोरणांवरील प्रभावाची व्याप्ती ठरविणे कठीण आहे.

**संसद** - अमेरिकेतील अध्यक्षीय प्रणालीच्या तुलनेत भारतीय संसद ही देशाचे परराष्ट्र धोरण ठरविण्यात कमी सक्रीयतेची भूमिका बजावते. परराष्ट्र धोरणांशी संबंधित मुद्दे हे संसदेत बहुधा एकतर युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय विवादाच्या वेळेसच चर्चिले जातात. पर‍राष्ट्रीय करारांना संसदेत मान्यता देणे हे भारत सरकारला अमेरिकेप्रमाणे बंधनकारक नाही. तथापि संसद सदस्य देशाच्या परराष्ट्रीय संबंधाच्या स्थितीविषयी संसदेच्या दोन्ही सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात चौकशी करु शकतात. अशा वेळेस परराष्ट्रमंत्री किंवा स्वतः पंतप्रधानांना या प्रश्नांची व पुरवणी प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. तसेच संसद सदस्य हे देशाच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम करणाऱ्या कुठल्याही आंतरराष्ट्रीय मुद्याशी संबंधीत विषयावर पंतप्रधान किंवा परराष्ट्रमंत्र्याच्या निवेदनाची संसदपटलावर मागणी करु शकतात. त्याचप्रमाणे पंतप्रधान किंवा परराष्ट्रमंत्री संसदेत त्यांच्या / तिच्या परदेशी भेटी विषयी किंवा इतर देशांचे परराष्ट्र वकिल / नेते यांची भारतभेट यावर संसदेच्या सभागृहात निवेदन देऊ शकतात. तसेच संसद सदस्य सभाध्यक्षांना परराष्ट्र धोरण मुद्यांवर चर्चा सुरु करण्यासाठी विशेष सुचना करु शकतात. विरोधी पक्ष देशाच्या परकिय धोरणाशी संबंधीत कुठल्याही गंभीर मुद्यांवर पंतप्रधानांविरोधी अविश्वास ठराव आणू शकतात. पंडित जवाहरलाल नेहरुंना चीनी आक्रमण आणि भारताचे परराष्ट्र धोरण या मुद्यावर सर्वप्रथम अशा अविश्वासदर्शक ठरावाला सामोरे जावे लागले. अलिकडील काळात भारत अमेरिका नागरी अणुकराराच्या मुद्यावर डाव्या पक्षांनी मनमोहनसिंग सरकारचा पाठिंबा

काढून घेतला आणि अशा प्रकारे पंतप्रधानांनी लोकसभेत त्यांचे बहुमत सिद्ध करण्याकरता विश्वासदर्शक ठराव मांडावा म्हणून राष्ट्रपतींना भाग पाडले.

संसदसुद्धा विविध सांसदिय समित्यांद्वारे देशाच्या परराष्ट्रधोरणावर पुरेसा प्रभाव पाडताना दिसतात. अंदाजपत्रक समिती आणि सार्वजनिक खाते समिती या परराष्ट्र मंत्रालयाचा अर्थपुरवठा यंत्रणेवर नियंत्रण ठेवून प्रभुत्व गाजवतात. १९६०-६१ मध्ये अंदाजपत्रक समितीने परराष्ट्र कार्यालय आणि परकीय मोहिमांचे पुर्नघटन सुचवले होते. परराष्ट्रनितीवरील संसदेची सल्लागार समिती देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या विविध पैलूंवर नियमीतपणे चर्चा घडवते असे असले तरी समितीचे निष्कर्ष आणि शिफारसी सरकारला बंधनकारक नाहीत. तथापी ती संसद सदस्यांच्या प्रश्नांना सरकारला उत्तर देण्यास भाग पाडते. अशा चर्चा द्वारे सरकार त्यांच्या दृष्टीकोनाविषयी सदस्यांना खात्री देण्याचा प्रयत्न करते जेणेकरुन संसदीय चर्चा ही तीव्र किंवा वादग्रस्त होता कामा नये. इंदिरागांधींच्या मंत्रीमंडळातील भारताचे परराष्ट्र मंत्री, एम. सी. चागला म्हणतात, "सल्लागार समिती ही परकिय धोरण राबवण्यापेक्षा धोरणे स्वीकारणे आणि टिकाटिप्पणी न करणारी संस्था आहे." एकंदरीत संसद ही देशाचे परराष्ट्रधोरण आखणी व त्याची अमंलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य देते. तथापि ती सरकारच्या चुकांचे परिमार्जन करते किंवा परकिय धोरणातील उणीवा शोधते. संसदीय चर्चाद्वारे निर्माण झालेल्या मतांविषयी सरकार संवेदनशीलता दर्शविते आणि तद्नुसार आपल्या कृती किंवा धोरणे बदलविते. २००३ मधील अमेरिकन पुढाकाराने इराकमधील युद्धाला मान्यता देण्याविषयी वाजपेयी सरकारचा नकार सरकारला मार्गदर्शन करण्याविषयी संसदेच्या हस्तक्षेपाचा परिणाम होता. थोडक्यात, संसद ही सरकारच्या परराष्ट्र धोरण विचलनावर वचक ठेवण्यास समर्थ ठरली आहे आणि युद्ध व आपत्ती काळात वादविवाद व साधकबाधक चर्चाद्वारे सर्वसामान्यजनांचे मत नोंदविण्यात बरीच यशस्वी ठरली आहे. ज्याद्वारे सरकारला परराष्ट्र धोरण बदलविण्यास बऱ्याचदा बाध्य केले आहे.

**मंत्रीमंडळ** - भारतातील सांसदीय प्रणाली अंतर्गत मंत्रीमंडळाने परराष्ट्र धोरणा संदर्भात महत्त्वाचे व सामुदायिक निर्णय घेणारी संस्था म्हणून कार्य करणे अपेक्षित आहे. परंतु स्वातंत्र्याप्राप्तीपासून आतापर्यंत मंत्रीमंडळाने त्याबाबतीत फारच मर्यादित भूमिका बजावलेली आहे. नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी व नरसिंह राव यांच्या काळात त्यांनी आपापल्या परीने स्वतः परराष्ट्र धोरणविषयक निर्णय घेतले. त्यांनी बऱ्याचदा धोरण बनविण्याच्या क्षेत्रातील काही मोजक्याच व्यक्तींचा सल्ला घेतला असला तरीही त्यांचे मंत्रिमंडळ मात्र परराष्ट्रधोरण मुद्यांवरील चर्चेपासून अलिप्त राहिले. राष्ट्रीय राजकारणातील आघाडीच्या काळात परराष्ट्रधोरण बनवण्यात मंत्रीमंडळाचे महत्त्व काही प्रमाणात वाढले. तरीसुद्धा अटलबिहारी वाजपेयींच्या पंतप्रधान काळाचा अपवाद वगळता आघाडी नेत्यांनी परराष्ट्र धोरणात्मक बाबी ठरवण्याचे काम परराष्ट्र मंत्र्याकडेच राहू दिले अशा प्रकारे मोरारजी देसाईंच्या मंत्रीमंडळात वाजपेयींनी पुरेशी स्वायत्तता अनुभवली ज्यात ते १९७७-१९७९ या काळात परराष्ट्रमंत्री होते. त्याचप्रमाणे इंद्रकुमार गुजराल यांनी एकट्याने १९८९-९० मध्ये व्हि.पी. सिंग सरकारमध्ये आणि १९९६-९७ मध्ये एच.डी. देवगौडा सरकारमध्ये परराष्ट्रमंत्री म्हणून भारतीय परराष्ट्र धोरणाला मार्गदर्शित केले. देवगौडा नंतर आय. के. गुजराल अल्पकालावधीच्या संयुक्त आघाडी सरकारचे पंतप्रधान झाले. तेव्हा त्यांनी परराष्ट्रखाते त्यांच्याकडेच ठेवले. डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये सुद्धा परराष्ट्र मंत्र्यांनी पंतप्रधान किंवा मंत्रीमंडळाच्या दबावाविना स्वतंत्रपणे कार्य केले आहे. तथापि पंतप्रधान स्वतःच अमेरिका, चिन आणि पाकिस्तान संदर्भातील भारताचे परराष्ट्रधोरण एकटेपणाने ठरवतात यद्यपी

आजसुद्धा परराष्ट्रधोरण बनवण्यात मंत्रीमंडळाची भूमिका ही नाऊत्साह वर्धक आहे. ना निर्णायक आहे.

**परराष्ट्रनिती मंत्रीमंडळ :** परराष्ट्रनिती मंत्रीमंडळ हे परराष्ट्र धोरण आखणे व अंमलबजावणी मध्ये महत्त्वाची भूमिका बजावते कारण ते परराष्ट्रमंत्री आणि पंतप्रधानांना जागतिक राजकारणाची गुंतागुंत समजविण्या संदर्भात आणि सद्य स्थितीतील किंवा तत्स्म परिस्थितीतील भारतासाठीची क्षमता जोखण्यासंदर्भात अत्यावश्यक मुलभूत तान पुरवितात. परराष्ट्रधोरणाचे जलद आणि अतिशय गुंतागुंतीचे स्वरुप हे परराष्ट्रमंत्रीमंडळाला देशाच्या परकिय संबंधात महत्त्वाची भूमिका बजावण्यास महत्त्वपूर्ण ठरते. हे मंत्रीमंडळ फक्त सर्व तपशील आणि माहितीच पुरवते असे नाही तर उपलब्ध सामुग्रीच्या विश्लेषणाच्या आधारे आवश्यक सुचना सुद्धा करतात.

परराष्ट्र मंत्रालयाचा राजकिय प्रतिनिधी म्हणून परराष्ट्रमंत्री प्रमुख असतो तर परराष्ट्र सचिव हा नोकरशाहीचा प्रमुख असतो. त्याला बऱ्याच सहकारी सचिव, अतिरिक्त सचिव, प्रतिनिधी सचिव इत्यादींचे साहाय्य लागते. नेहरुंच्या काळात मुख्य सचिवाचे सुद्धा पद होते. जो जेष्ठ अधिकारी असायचा. हि व्यक्ती परराष्ट्र कार्यालयाचा मुख्य असून परराष्ट्र मंत्रालयाच्या कृतीवर देखरेख आणि नियमनासाठी जबाबदार होती आणि धोरण तपशीलवार पंतप्रधानाना सल्ला द्यायची. वस्तुतः मुख्य सचिवाचे अधिकृतपणे वर्णन पुढीलप्रमाणे केले जायचे, "परराष्ट्रधोरण संदर्भातील, मुद्यांवर मंत्र्यांचा प्रमुख अधिकारी सल्लागार" हे लक्षात घ्यावयास हवे की, नेहरुंनी त्यांच्या बहुतेक कालावधीत परराष्ट्रमंत्रालय त्यांच्याकडेच ठेवले म्हणून त्यांना नियमितपणे अशा एका सक्षम व्यक्तिचा सक्रीय सल्ला जरुरी होता. हे पद १९६४ मध्ये नामशेष केले गेले. जेव्हा त्यावेळचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात स्वर्णसिंग यांना पूर्णवेळ परराष्ट्रमंत्री म्हणून नेमले.

सामान्य पदानुक्रम रचनेच्या जोडीने परराष्ट्रनिती मंत्रालयात इतरही बऱ्याच संस्था असतात. ज्या परराष्ट्र धोरण बनवण्यात पुरेसा प्रभाव दाखवतात त्या म्हणजे ऐतिहासिक विभाग, धोरण योजना आणि पुनर्विलोकन विभाग आणि धोरण योजना समितीच्या जागी धोरण सल्लागार समिती. राजीव गांधीच्या पंतप्रधान काळात भारतीय परराष्ट्र सेवा सदस्य पंतप्रधाकडून पुरेसे उत्तेजन मिळून परकिय धोरण नियोजनात सक्रिय सहभाग नोंदवायला लागले. अटलबिहारी वाजपेयींच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीसरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पद निर्माण केले. जे परराष्ट्रमंत्रालयाला आवश्यक माहिती पुरवते. तथापि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराची भूमिका हि याच एकमेव मंत्रालयासाठी मर्यादित नाही तर मंत्रालय असे खासकरुन संरक्षण आणि गृहमंत्रालय यामध्ये सहभाग नोंदवते.

या विश्लेषणावरुन हे स्पष्ट होते की परकीय धोरणाचे संस्थानीकरण आणि योजना याकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. तथापि बदलत्या परिस्थिती संदर्भात जेथे आंतरराष्ट्रीय संबंध हे परिपूर्णपणे बदलेले आहे व अधिक क्लिष्ट व बहुआयामी बनलेले आहे, परकिय धोरण क्षेत्रात वैज्ञानिकपणे संस्थात्मक पुरेसा पाठपुरावा निर्माण करणे हि काळाची गरज आहे जेणेकरुन देशाचे हित हे सर्वात चांगल्या प्रकारे सुरक्षित राहिल.

**आपली प्रगती तपासा :**

१) परराष्ट्र धोरण बनविण्याच नेतृत्व, दबावगट आणि लोकमत यांच्या भूमिकेविषयी चर्चा करा.
२) परराष्ट्र धोरण कार्यक्रमास अग्रक्रम देण्यात मंत्रीमंडळ, संसद आणि परराष्ट्र नीती मंत्रालय यांच्या भूमिकेची चर्चा करा.

## २.२ सारांश

बऱ्याच काळापासून, भारताचे परराष्ट्र धोरण हे विद्वान राजकारणी तज्ञ, खासकरुन सत्ताधारी पक्ष नेतृत्त्वाचे, यांच्यासाठी विशेष हक्काचा भाग होता. अलिकडील काळात दबावगटाने परकीय धोरण कार्यक्रमावर, विशेषतः व्यापार व उद्योगाच्या, प्रभाव गाजविणे सुरु केले आहे. भारतातील देश सुरक्षिततेच्या मुद्यावरील लोकभिप्राय, विशेषतः १९६२ च्या भारत-चीन मुद्यापासून अतिशय अस्थिर आहे. तथापि, अंमलबजावणीदारास शांततेच्या काळात परकीय धोरण राबविण्यास मुक्त स्वातंत्र्य आहे कारण लोक त्याविषयी जास्त जागरुक नाहीत. याउलट, संसदेची भूमिका ही संविधान किंवा कायदे पुस्तकात स्पष्टपणे उल्लेखित नाही की मागील ६५ वर्षात पुरेशी विकसित झालेली नाही. याचाच परिणाम म्हणून जनक्षोभ होतो तेव्हाच परकीय धोरण कार्यक्रमाची चर्चा संसदेत झडते. अशा प्रकारे संसद जनमताचे प्रतिबिंब दर्शविते. जरी मंत्रीमंडळ हे परकीय धोरण मुद्यांमध्ये अधिकाधिक सहभागी होत असले तरी भारतीय परराष्ट्र धोरणात अधिक समरसता आणण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाने नियमित संवादाद्वारे योग्य मार्ग विकसित करणे गरजेचे आहे.

## २.३ सरावासाठी प्रश्न

१) भारतातील परराष्ट्र धोरण बनविण्यासाठी जबाबदार असलेल्या संस्था कोणत्या?
२) भारतातील परराष्ट्र धोरणाला आकार देण्यात सरकारी संस्था व बिगर सरकारी घटक यांच्यातील गुंतागुंतीच्या परस्परक्रियेची चर्चा करा.

## २.४ संदर्भसूची


- बंधोपाध्याय जे, द मेंकींग ऑफ इंडियास फॉरेन पॉलिसी, अलाइड पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, २००३, नवी दिल्ली.

- बंधोपाध्याय जे नार्थ ओव्हर साऊथ : अ नॉन वेस्टर्न पर्सपेक्टिव ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स, साऊथ आशियन्स, १९८२ नवी दिल्ली.
- ब्रेचर मायकेल, इंडिया अँड वर्ल्ड पॉलिटिक्स : कृष्णा मेनन्स व्हयू ऑफ द वर्ल्ड, ओयूपी, १९६८ लंडन.
- चंद्रा, बिपीन अँड आदर्स इंडिया सायन्स इंडिपेन्डन्स् पेंग्विन बुक्स, २००७, नवी दिल्ली.
- झैन, पी.सी. इकोनॉमिक्स डिटरमिन्टस् ऑफ इंडिया फॉरेन पॉलिसी, नेहरु इअर्स, विटास्टा पब्लिशिंग, २०१२ नवी दिल्ली.
- दिक्षित जे. एन. माय साऊथ ब्लाक इअर्स : मेमरीझ ऑफ फॉरेन सेक्रेटरी डब्लू बी एस पी डी, १९९६, नवी दिल्ली.
- मथाई एम. ओ. रेमिनिसन्स ऑफ द नेहरु एज विकास पब्लिकेशन १९७८, नवी दिल्ली.
- मॅटो अमिताभ अँड हॅपीमन जॅकोब, शेपींग इंडियाझ् फॉरेन पॉलिसी, द्वार - आनंद पब्लिकेशन्स २०१०.
- मिश्रा के. पी. (एड) स्टडिझ इन इंडियाझ फॉरेन पॉलिसी, विकास पब्लिकेशन्स १९६९, नवी दिल्ली.
- मुखर्जी अमितवा जे. बंधोपाध्याय, इंटरनॅशनल रिलेशन्स थेअरी. फ्रॉम अनार्ची टू वर्ल्ड गव्हर्नमेंट मॅन्यूस्फिस्ट इंडिया २००१, हावरा.
- नेहरु, जवाहरलाल, इंडियास फॉरेन पॉलिसी, पब्लिकेशन्स डिव्हिझन्स, १९६२,नवी दिल्ली.
- पानंदीकर, व्हि. अे. पाई अँन्ड अजय के शर्मा, द इंडियन कॅबिनेट अ स्टडी इन गव्हर्नमेंट, कोनार्क, १९९६ नवी दिल्ली.


❖❖❖❖

# ३

# भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विकास

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये
३.३ भारतीय परराष्ट्र धोरणाची बांधणी
३.४ २१ व्या शतकातील परराष्ट्र धोरण
३.५ सारांश
३.६ सरावासाठी प्रश्न
३.७ संदर्भसूची

## ३.० उद्दिष्टे

भारतीय परराष्ट्र धोरणाला त्याच्या आरंभापासूनच विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागले आहे. या प्रकरणात आपण भारतीय परराष्ट्रधोरण जे दिर्घ काळ चाललेले स्वातंत्र्ययुद्ध आणि त्या काळातील भारतीय नेत्यांचे बाहेरील जगाशी असलेले संबंध यांचे अपत्य आहे, त्याचा अभ्यास करु या. हे प्रकरण परराष्ट्र धोरणाची ध्येये व ती ध्येये साध्य करण्याकरीता अवलंबिलेली धोरण साहित्य यांचे विश्लेषण करते. आपण शीत युद्धोत्तर काळातील परराष्ट्र धोरणाच्या नवीन कल आणि त्याच्या सलगतेचे घटक आणि त्याद्वारे होणारे बदल यांची चर्चा करु.

## ३.१ प्रस्तावना

२० व्या शतकाच्या पुर्वार्धात भारत हा ब्रिटीश सत्तेअंतर्गत एक अर्धवट आंतरराष्ट्रय प्रभाग म्हणून कार्य करित होता. पहिल्या जागतिक महायुद्धा दरम्यान ब्रिटीश सरकारने युद्धपरिणामकारक रित्या पार पाडण्यासाठी भारत व त्यांच्या अधिसत्ते अंतर्गत येणाऱ्या इतर देशांशी संरक्षण आणि परकिय बाबींशी संबधीत मुद्यांवर नेहमीच सल्ला मसलत करण्याचे ठरवले. राष्ट्रीय नेतृत्वाला जागतिक महायुद्धाच्या शेवटी स्वयंशासनाविषयी ठोस खात्री न मिळाल्यामुळे विश्वासघात झाल्यासारखे वाटले. म्हणून त्यांना शांत करण्याकरिता ब्रिटनने १९१७-१८ मधील युद्धपरिषदेत भारतीय सहभागाला उत्तेजन दिले. तेव्हापासून भारताचा इतर देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांशी अधिकृत सहभाग सुरु झाला. अशाप्रकारे भारत हा पॅरिस शांतता परिषदेत एकपक्ष होता. आणि व्हर्साईलच्या करारावर सही करणारा देश होता. याद्वारे पहिले महायुद्ध समाप्त झाले. तसेच युद्धानंतरच्या काळात स्थापन झालेल्या लीग ऑफ नेशन्सचा मूळ

सदस्य होण्यास भारताला मान्यता मिळाली. त्याचप्रमाणे भारत हा आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटना आणि आंतरराष्ट्रीय न्यायसभेचा कायम सदस्य बनला. अशा आंतरराष्ट्रीय व्यासपिठावरील भारताचा सहभाग फक्त प्रतिकात्मकच नव्हता. तर पुरेसा ठळक होता. कित्येक आंतरराष्ट्रीय अतिमहत्त्वाच्या परिषदांचा कच्चा मसुदा तयार करण्यात भारताने सक्रिय भुमिका बजावली. उदा. अफू परिषद, स्त्रिया व मुलांची वाहतुक परिषद, गुलामगिरी परिषद इ. दुसऱ्या महायुद्धानंतर भारत सन फ्रँसिस्को परिषदेला हजर राहणारा गट होता आणि संयुक्त संस्थानाच्या सनदीवर मुळ स्वाक्षरी करणारा देश होता. तसेच भारताने भारतीयांप्रती त्यासोबतच ब्रिटीश राज्यसत्ता अंतर्गत असलेल्या इतर देशांप्रती होणाऱ्या भेदाभेद धोरणाचे मुद्दे उचलून धरले. भारताने स्वातंत्र्यपूर्व काळात बऱ्याच देशांशी व्यापार संबंध प्रस्थापित केले. त्याचेवेळेस ब्रिटीश साम्राज्यातील व्यापार उदीमांशी सुद्धा घनिष्टपणे जुळवून ठेवले. १९३१ मध्ये भारत आणि ब्रिटनने एकमेकांना अधिक सवलतीचा जकातदर संमत करण्याकरता ओटावा येथे व्यापार करारावर सह्या केल्या. अशाप्रकारे भारताला स्वातंत्र्यपूर्व काळातच आंतरराष्ट्रीय व्यवहार चातुर्याचा पुरेसा अनुभव प्राप्त झाला, जो जगभरातील बहुतांश देशांशी जलद संबंध प्रस्थापित करण्यात मदतगार सिद्ध झाला.

या काळात भारताच्या राष्ट्रीय नेतृत्वाने आंतरराष्ट्रीय मुद्यांवरील राष्ट्रीय चळवळीची स्थिती स्पष्ट केली. तीन दशकांपेक्षा कमी कालावधीत जगाला दुसऱ्या महायुद्धात ओढणे हे युरोपीयन सत्तेला जड गेले. तसेच त्याने भारताच्या शेजारी देशातील, उदा. तिबेट अफगाणीस्थान आणि पर्शिया, ब्रिटाशांच्या विस्तारवादी धोरणांना प्रखर विरोध दर्शविला अशा प्रकारे भारताच्या परराष्ट्रधोरणांच्या मुलभूत तत्त्वांनी स्वातंत्र्यपूर्ण काळात आकार घेतला आणि स्वातंत्र्य लढ्याने त्याला सुसंगत दृष्टीकोन पुरविला. १९३८ मधील हरिपूरा काँग्रेसचा एक ठराव जो दुसरे महायुद्ध सुरु होण्याच्या आदल्या दिवशी झाला त्याने आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताच्या उद्दिष्ट्यांचे अचूक वर्णन केले त्या ठरावाप्रमाणे, "भारतातील लोक त्यांचे शेजारी आणि इतर सर्व देशांशी शांततेत जगू इच्छितात आणि या हेतूस्तव त्यांच्यातील सर्व प्रकारच्या संघर्षाचे निराकरण करण्यास इच्छुक आहे. म्हणून कायम स्वरुपी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी साम्राज्यशाही आणि एका व्यक्तीने दसुऱ्या व्यक्तीचे शोषण करणे थांबवावयलाच हवे." अशा प्रकारे भारताने सर्व देशातील लोकांमध्ये शाश्वत समज शांतता आणि सहकार्य प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे ओझे उचलण्याची तयारी दर्शविली. २ सप्टेंबर १९४६ रोजी म्हणजेच तात्पुरत्या सरकारची राज्यसुत्रे स्वीकारल्यावर पंडित नेहरुनी भारताच्या परराष्ट्रधोरणासंदर्भात स्पष्ट उल्लेख नोंदवला. ते म्हणाले, "आम्ही जागतिक शांतता व स्वातंत्र्याच्या प्रगती प्रित्यर्थ इतर देशांशी घनिष्ठ आणि प्रत्यक्ष संबंध विकसीत करु इच्छितो आणि त्यांच्याशी सहकार्य करु इच्छितो! शक्यतोवर आम्ही गटबाजीचे शक्तीशाली राजकारण, परस्पर विरोधी भुमिका, ज्यामुळे गतकाळात महायुद्धे झाली आणि ज्यामुळे अजुन मोठ्या प्रमाणावर निराशा येऊ शकते, त्यापासून दुर राहू इच्छितो. आमचा विश्वास आहे की —- कुठेही स्वातंत्र्याचा नकार हा इतर कुठल्याही स्वातंत्र्याला धोक्यात आणू शकतो आणि भांडण व युद्धात परिणत होऊ शकतो. खास करुन आम्ही वसाहत विषयक व पारंतत्र्य देशांच्या बंध मुक्तीत आणि सर्व जमातीसांठी कागदावर व व्यवहारातील समान संधी मिळण्याबाबत उत्सुक आहोत. — आम्हाला दुसऱ्यांवर हुकूमत गाजवायची नाही आणि आम्हाला इतर लोकांपेक्षा विशेष हक्काचे स्थान नको परंतु आम्ही आमच्या लोकांसाठी ते जेथे कोठे जातील तेथे समान व आदरणीय वागणुकीची अपेक्षा करतो आणि आम्ही त्यांच्या बाबत कुठल्याही भेदाभेद स्विकारु इच्छित नाही." नेहरुंनी पुढील गोष्ट सांगतांना आशावादच दर्शविला ते म्हणाले, "साऱ्या जगात शत्रूता, द्वेष आणि अंतर्गत कलह

असून सुद्धा हे जग घनिष्ठ सहकार्य आणि एका जागतिक प्रजासत्ताकाच्या बांधणीकडे अटळपणे सरकत आहे. अशा प्रकारच्या एका जगासाठीच मुक्त भारत कार्य करेल अशा जगात मुक्त लोकांचे मुक्त सहकार्य असेल आणि कुठलाही गट किंवा वर्ग दुसऱ्याचे शोषण करणार नाही." नेहरुंच्या विचार सरणीत ही समज स्वाभाविकच होती की भारताला त्याच्या आर्थिक विकासासाठी जागतिक शांततेची गरज आहे. आणि तो सर्व देशांतील शांततामय आंतरराष्ट्रीय संबंध बांधणीसाठी विधायकपणे योगदान देऊ शकतो.

## ३.२ भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये

भारताच्या स्वांतत्र्यलढ्याची वर्चस्ववादी विचारसरणी ही निसंशयपणे त्याच्या स्वातंत्र्योत्तर परराष्ट्र धोरणात प्रतित होते. भारतीय परराष्ट्रधोरण ठरविताना धोरण कर्त्यांनी जागतिक राजकारणातील भारतासाठी स्वतंत्र भूमिका नोंदवण्याच्या डावपेचासह राष्ट्रहित केंद्रस्थानी ठेवले त्यानुसार त्याच्या परराष्ट्र धोरणात पुढील मुद्यांनी सर्वात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त केले.

**१) सार्वभौमत्व व स्वातंत्र्य टिकवणे :** भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळेस जग हे दोन विरोधी गटात विभागले गेले होते. पहिला गट हा, तत्कालीन सोव्हिएट रशियाच्या नेतृत्वाखाली एक साम्यवादी होता तर दुसरा गट आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवलशाही गट होता. त्यांच्या विचारसरणीतील शत्रुत्वाने जगाला मानवजातीसाठी विनाशक असा परिणाम संभवणाऱ्या तिसऱ्या महायुद्धाच्या तोंडाशी आणून ठेवले. प्रत्येक गट हा त्याच्या सदस्य देशांच्या लष्करी आघाडीने मजबूत झालेला होता. त्यांचे हे शत्रुत्व नविन स्वतंत्र झालेल्या देशांना त्यांच्या संबंधित लष्करी आघाडीत खेचत होते व ही स्वंतत्र भारताची चिंता होती. या शत्रूत्वाने दोन महासत्तांमधील शीत युद्धाला जन्म दिला ज्यामध्ये दोन्ही पक्ष प्रत्यक्ष युद्धाविना एकमेकांशी सर्वपरिने लढल्या. मुक्त भारताला त्या वेळच्या अशा कठीण आंतरराष्ट्रीय परिस्थितीत स्वतःचे सार्वभौमत्व आणि निर्णयातील स्वायत्तता टिकवून ठेवायची इच्छा होती. भारतातील नेत्यांची खात्री होती की अशा प्रचंड भौगोलिक विस्तार असलेल्या व मोठी लोकसंख्या असलेल्या समृद्ध बुद्धीमत्ता, आणि पुरातन संस्कृती असलेल्या देशाचे जागतिक घडामोडीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावयाचे ध्येय असावयास हवे. तथापि ही भूमिका आंतरराष्ट्रीय संबंधातील स्वतंत्र ठसा टिकवूनच निभावली जाऊ शकते तसेच नविन मुक्त झालेल्या देशांच्या सुधारणात्मक गरजांची मागणी म्हणजे शांततामय आंतराष्ट्रीय वातावरणाचे जतन आणि बढती करणे ही होती. त्यामुळे भारताने आपले सार्वभौमत्व व स्वातंत्र्य टिकविण्यासाठी कोणत्याच गटात सामिल न होण्याचा निर्णय घेतला.

**२) राष्ट्रीय विकास :** स्वातंत्र्याच्या वेळेस भारत हा औद्योगिक उत्पादनात अविकसीत होता. तर त्याची शेती ही मागासलेल्या साधनांवर आधारित होती. भारताची प्रजा ही अनारोग्य आणि निरक्षरता यासह कायम दारिद्र्यात खितपत पडलेली होती. म्हणून धोरणकर्त्यांसमोर पहिले प्रमुख कार्य म्हणजे उद्योग व शेतीचा जलद विकास साधणे हे होते. ज्याद्वारे गरिबी कमी होईल आणि लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल. यासंदर्भात इतर देशांशी असलेल्या संबंधाचा पाठपुरावा करण्याबाबत राष्ट्रीय विकासाने अग्रस्थान मिळवले. भारताला फक्त औद्योगिक उत्पादनच हवे होते असे नाही तर ते उत्पादन विकसीत करण्यासाठी स्वतःचे तंत्रज्ञान सुद्धा हवे

होते. त्याचप्रमाणे भुकेल्या पोटांना भरण्यासाठी अन्नधान्य आयात करणे ही तातडीची गरज होती. परंतू धान्याचे विस्तृत उत्पादन योजले गेले आणि सरते शेवटी अमलात आणले गेले.

भारताला या दोन्ही महासत्ता तसेच युरोपियन देश आणि प्रजासत्ताक देश यांच्याशी असलेल्या संबंधाचा फायदा झाला अमेरिका आणि सोव्हिएट रशिया मधून आयात केलेल्या अन्नधान्याने देशातील टंचाईवर मात करणे सोपे झाले तर अमेरिका आणि युरोपियन देशांनी भारताला हरितक्रांती घडवून आणण्यात मदत केली. औद्योगिक पाया रचण्यात सहकार्य करण्याच्या सोविएत देशाच्या तयारीने सार्वजनिक विभागातील उद्योग धंद्यांच्या वाढीची खात्री मिळाली. हा सार्वजनिक विभाग भारतातील औद्योगिक विकासाचा कणा बनला. स्वातंत्र्यपूर्ण काळात भारताचा बहुतांश व्यापार हा प्रजासत्ताक देशांशी अधिक सवलतीच्या आधारावर असल्याने भारताचे त्या गटातून बाहेर पडणे हे त्याच्या व्यापार हितासाठी आणि सरतेशेवटी राष्ट्रीय विकासासाठी बाधक ठरले असते. याचाच परिणाम म्हणून भारताने सार्वभौम व स्वतंत्र झाल्यावर सुद्धा प्रजासत्ताक गटांचे सदस्यत्व कायम ठेवण्याचे ठरविले.

**३) अनिवासी भारतीयांच्या हिताचे संरक्षण :** भारतीय परराष्ट्र धोरणाने परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांच्या हिताच्या संरक्षणाकडे बरेच लक्ष पुरविले. १९ व्या शतकात बरेच भारतीय हे आफ्रिका, आशिया आणि आशिया पॅसिफिक भागातील विविध देशात स्थायिक झाले. त्यांनी त्या देशांमध्ये अर्थव्यवस्था आणि आधुनिक समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. तथापि अशा काही देशांमध्ये ते भेदभाव आणि सरकारी औदासिन्याचे बळी ठरले. भारत सरकारने त्यांचे हित व अधिकाराच्या संरक्षणासाठी सतत प्रयत्न केले आणि तद्नुसार अशा घटनांची तक्रार संबंधीत सरकारकडे आणि गरज पडल्यास आंतरराष्ट्रीय गटांकडे घेऊन गेले. विसावे शतक व त्यानंतर बरेचसे भारतीय त्यांचे शिक्षण व संबंधित क्षेत्रातील व्यवसाय याच्या पाठपुराव्यासाठी पाश्चात्य देश आखाती देश आणि दक्षिणपूर्व आशियायी देशांमध्ये स्थायिक झाले. ज्याद्वारे ते थोड्याच कालावधीत त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचा भाग बनले. भारत सरकार कुठल्याही प्रकारचा भेदाभेद किंवा त्यांच्या विरुद्ध हिंसेची दखल घेते. तसेच भारतीय व्यापारी व्यापारासाठी विविध देशांना भेटी देत असतात ज्यामध्ये जास्त मैत्रीपूर्ण नसलेल्या चीन व पाकिस्तान सारख्या देशांचा समावेश होतो. भारतीय परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे ध्येय आहे की त्या देशातील अशा भारतीयांच्या अधिकाराच्या सुरक्षा आणि संरक्षणाची ग्वाही देणे.

**४) आशिया व आफ्रिकातील वसाहतवाद नष्ट करणे :**

भारत जवळ जवळ दोन शतकांपासून वसाहतवादाच्या जोखडामुळे येणाऱ्या दैनावस्था व अपमान यांचा साक्षी राहिलेला आहे. जे देश वसाहतवादी संस्थेच्या पकडीपासून मुक्त होण्यासाठी लढा देत राहिलेले आहे त्या देशांशी दृढ ऐक्याने उभे राहणे हे भारतीय लोकांसाठी स्वाभाविकच होते. भारतीय परराष्ट्रधोरणाने ही स्थिती बुलंद आवाजात स्पष्ट केली आणि आफ्रिकन व आशियाई देशांत वसाहतवाद नष्ट करण्यात सक्रिय भुमिका बजावली. भारताने जाणले की जागतिक शांतता व सर्व लोकांच्या विकासासाठी काही सत्तांच्या वर्चस्वाचा अंत होणे आवश्यक होऊन बसले आहे. त्यादृष्टीने वसाहतवाद नष्ट करणे हे भारताचे महत्त्वपूर्ण पाऊल होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुद्धा भारत वसाहतवादाच्या अमलाखाली होता. कारण गोव्यातील लोक पोर्तुगिज साम्राज्यशाहीचा त्रास सहन करत होते. गोव्यातील पोर्तुगिजांची सत्ता संपवण्याची भारताची विनंती पाश्चात्य सत्तेच्या बंद कानावर पडली ते पोर्तुगिजांच्या पाठीमागे उभी राहिली. सरतेशेवटी भारताने गोव्यात पोर्तुगिज सत्तेविरुद्ध वसाहतवादाच्या निंयत्रणापासून मुक्ती मिळवण्यासाठी पोलिस कुमक पाठवुन लोकांच्या चळवळीला प्रतिसाद दिला. इंडोनेशिया,

व्हिएतनाम, कांगो, लिबिया, त्युणिशिया, अल्जेरिया, मोराक्को इत्यादी देशांच्या स्वातंत्र्या पुष्ठयर्थ जागतिक मताचा पाठिंबा मिळवण्यात व ते एकत्रीत करण्यास भारताची भूमिका स्तूत्य असली तरी त्यामुळे भारताने वसाहतवादी सत्तेचा रोष ओढवून घेतला. त्याच चैतन्याने भारताने पॅलेस्टाईन लढ्याला देशाचा दर्जा मिळविण्यासाठी पाठिंबा दिला. १९७१ मध्ये भारतीय लष्कराने पूर्व पाकिस्तानच्या मुक्ततेसाठी मध्यस्थी केली. जेथे त्याने पाकिस्तानी लष्करी सत्तेविरुद्ध तेथील लोकांच्या इच्छेविरुद्ध विरोचीत युद्ध केले.

**५) वंशवादाविरोधी भुमिका :** वंश विद्वेषाने जगातील बऱ्याच लोकांच्या अधिकाराला फक्त दाबलेच नाही तर त्यामुळे बऱ्याच प्रमाणावर जागतिक शांतता धोक्यात आली. अमेरिकेतील आफ्रिकी अमेरिकनांना नागरी हक्कांचा अभाव, दक्षिण आफ्रिकेतील वर्णसंकर विरोध आणि पॅलेस्टाईन स्वातंत्र्याला दडपणे इत्यादी गोष्टी खूप सोप्या लोकांना त्यांच्या रंग, वंश, विश्वास किंवा धर्म यामुळे मुलभूत मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात परिणत झाल्या. दक्षिण आफ्रिका आणि आफ्रिका खंडातील अधिसत्तेअंतर्गत येणाऱ्या बऱ्याच देशातील भारतीय वंशाचे लोक सुद्धा वर्ण द्वेषाचे बळी ठरले. तसेच दुसऱ्या महायुद्धाचे एक प्रमुख कारण म्हणजे हिटलरचा नाझीवाद व मुसोलीनीचा फॅसिवाद यांचा वर्णद्वेषी दृष्टीकोन हे आहे. ही कारणे भारतासाठी जागतिक राजकारणात खंबीर वर्णद्वेष विरोधी भूमिका स्विकारण्यास पुरेसी होती. नेहरुंनी भारताचे मत खालील शब्दात स्पष्टपणे सांगितले, "आम्ही वर्णद्वेषी नाझी विचारसरणी जेथे कोठे आणि ज्या काय स्वरुपात वापरली जात असेल तिला नकार देतो. आम्ही दुसऱ्यावर अभिसत्ता गाजवू इच्छित नाही आणि इतर लोकांवर विशेष अधिकाराचा दावा करत नाही. परंतू आम्ही आमचे लोक जेथे कुठे जातील तेथे त्यांना समानता व आदराच्या वागणुकीचा दावा करतो आणि आम्ही कुठलाही भेदाभेद स्विकारु शकत नाही. २२ मार्च १९४९ रोजी नेहरुंनी त्यांच्या भाषणात भारतीय मंडळांना सांगितले की जर जगात वर्णद्वेषी तफावत चालूच राहिली तर तेथे मोठ्या प्रमाणावर भांडणे होतच राहणार कारण त्यामुळे जगातील खूप साऱ्या लोकांच्या स्वाभिमानाला सततचे आव्हान मिळत राहील आणि ते लोक ही गोष्ट सहन करु शकणार नाही आणि हि भांडणे फक्त दक्षिण आफ्रिका किंवा इतरत्र अशा विशिष्ट प्रदेशातच सिमित असणार नाहीत तर त्यामुळे विस्तीर्ण खंडातील लोकसुद्धा प्रभावित होतील." आणि म्हणून भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर वर्णद्वेषी तफावतीचे मुद्दे प्रकाशझोतात आणले. त्याने दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या शासनाचा तीव्र शब्दात धिक्कार केला आणि संयुक्त राष्ट्रसंघात जागतिक मत एकत्र करुन त्याविरुद्ध आंतरराष्ट्रीय मजुरी मिळवण्यात पुढाकार घेतला. भारताने रोडेशिया मधील वर्णद्वेषी धोरणांची निर्भत्सना केली आणि अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीशी त्याची एकता दर्शविली

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय परराष्ट्र धोरणांच्या प्रमुख उद्दिष्टांची चर्चा करा.

२) स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाला घडविणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीची चर्चा करा.

## ३.३ भारतीय परराष्ट्र धोरणाची बांधणी

वरील हेतू साध्य करण्यासाठी भारतीय नेतृत्वाने विशिष्ट मुलभूत तत्वे योजली ज्यावर भारताच्या परराष्ट्र धोरणाची बांधणी रचली गेली. यालाच नमूद केलेले हेतू साध्य करण्याकरिता भारतीय परराष्ट्र धोरणाच्या पद्धती किंवा साधने म्हणतात. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु हे या बांधणीचे प्रमुख शिल्पकार होते. ही बांधणी म्हणजे भारतीय तत्वे आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील खरीखुरी वास्तविकता यांचे एकत्रीकरण होते.

### १) पंचशील :

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्राचे सार्वभौमत्व हे सर्वोच्च असून शांतता व संघर्ष हे त्याभोवती फिरत असतात. हे पंडित नेहरुंनी जाणले. प्रत्येक देशाच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण करण्यासाठी सर्व देशांनी एकमेकांच्या सार्वभौम अधिकाराला मान्य करायला हवे व आदर द्यावयास हवा भारताने ठासून सांगितले की सार्वभौमत्व हे देशागणिक वेगळे असू शकत नाही आणि जगातील प्रत्येक देशाने त्याचे लोक, प्रांत, संस्था आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेशी संबधीत सार्वभौम अधिकाराचा समान स्वरुपात आनंद लुटावयास हवा ह्या गोष्टींना जर मान्यता दिली आणि कोणत्याच देशाने त्याचे उल्लंधन केले नाही तर आंतरराष्ट्रीय कलह क्वचितच असतील आणि जागतिक शांततेलाही क्वचितच धोका पोहचेल. सर्व देशांनी शांततामय सहअस्तित्वाच्या पाच तत्वांना अनुसरुन या गोष्टीचे पालन करावे या तत्वांना नेहरुंनी उत्साहीपणे उचलून धरले आणि त्यांना पंचशील संबोधले. नेहरुंच्या शब्दात सांगायचे तर "मी कल्पना करतो की ही तत्वे जर विविध देशांच्या परस्पर संबंधात अवलंबिली गेली तर आजच्या जगाचा फार मोठ्या प्रमाणावरील त्रास कदाचित दूर होईल १९५४ मध्ये ही तत्वे भारत आणि पिपल्स रिपब्लिक ऑफ चायना मधील द्विपक्षीय करारात स्पष्टपणे प्रतिपादिली गेली ती तत्वे पुढीलप्रमाणे."

१) एकमेकांच्या अधिक्षेत्राची एकता आणि सार्वभौमक्ता यांचा परस्पर आदर करणे.
२) परस्पर अनाक्रमण
३) एकमेकांच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ न करणे.
४) समानता आणि परस्परहित
५) शांततामय सहअस्तित्व

यातील ५ वे तत्व म्हणजेच हे त्यावेळी अस्तित्वात असलेल्या जागतिक स्थितीला, ज्यामध्ये समाजवाद आणि भांडवलशाही या विरोधी गटांनी एकमेकांना संपवायचा पण केला होता; अनुसरुन योजले गेले. नेहरुंनी या गोष्टीचा प्रसार केला की भिन्न विचार प्रणालीवर आधारीत असलेले देश सहजीवनाने राहू शकतात आणि प्रगती करु शकतात जर त्यांनी पंचशीलाची पहिली चार तत्वे अनुसरली आणि पाचव्यात विश्वास ठेवला असेल १९५६ मध्ये सोविएत नेते ख्रुश चेव्ह यांनी यू एस एस आर चे अपेक्षित धोरण म्हणून शांततामय सहअस्तित्व जगजाहिर केले आणि १९७० मधील दोन महासत्वांमधील शत्रुता कमी होण्याने या तत्वाची उपयोगिता अजुन चांगल्याप्रकारे सिद्ध झाली.

**२) अलिप्ततावाद :**

अलिप्ततावाद हा भारतीय परराष्ट्रधोरणाचा मध्यवर्ती स्तंभ आहे. ज्याने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्याची उद्दिष्ट्ये व ध्येये पार पाडली. नेहरुनी जाणले की भारताची थोर संस्कृती आणि जगाच्या प्रमुख भागाचा एक प्रचंड भुप्रदेश म्हणून जागतिक राजकारणातील योग्य भूमिकेसाठी उत्कट इच्छा असण्याचे भारताचे ध्येय हवे होते. तसेच देशांच्या सलोख्यामध्ये भारताने जर त्याची स्वतंत्र भूमिका वठवली नाही तर वसाहतवादाच्या जोखडापासून नुकतेच मिळालेल्या अतिकष्ट साध्य स्वातंत्र्याला अर्थ राहणार नव्हता. अशाप्रकारे स्वतंत्र परराष्ट्रधोरण हे सक्तीच्या किंवा पर्यायापेक्षा अत्यंत जरुरीचे असे होते. नेहरुंची जाण होती की भारत आणि आशिया आफ्रिकेच्या इतर देशांना त्यावेळच्या लष्करी गटात सहभागी होऊन काहीही मिळणार नाही परंतू त्यांची दैन्यावस्था मात्र वाढेल त्यांच्यानुसार गरिबी, निरक्षरता आणि रोगराई या विरुद्धच्या लढ्यावर केंद्रीत होण्याऐवजी ते ज्या युद्धाचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही अशा युद्धातील प्यादे म्हणून वापरले जाऊन नष्ट होतील. भारताची रुची ही शांतता क्षेत्र वाढवण्यात असून युद्ध किंवा भांडणाचे क्षेत्र वाढवण्यात असून युद्ध किंवा भांडणाचे क्षेत्र वाढवण्यात नव्हती. म्हणून भारत हा ना भांडवलशाही देशांच्या लष्करी करारात जसे सिटो, सेंटो, बगदाद करार किंवा मनिला करार सामिल झाला नाही की, समाजवादी गटाच्या वारसा करारात सामील झाला. भारताने अशा लष्करी गटात सामिल होण्यात नकार देण्यात नविनच स्वतंत्र झालेल्या आशियाई व आफ्रिकन देशांचे नेतृत्व केले. अन्यथा ज्यांचे सार्वभौमत्व पणास लागले असते. नेहरुंनी जाहिर केले, "आम्ही एकमेकाविरोधी उभ्या ठाकलेल्या गटांच्या शक्तीशाली राजकारणापासून, ज्यामुळे महायुद्धे घडली आणि जे पुन्हा मोठ्या प्रमाणावर हानी घडवण्याकडे घेऊन जाऊ शकतात, होता होईस तोवर दुर राहण्याचे सुचवितो."

तथापी अलिप्ततावाद म्हणजे केवळ लष्करी गट किंवा विचारप्रणाली गट यापासून दर राहणे नव्हे परंतू प्रत्येक मुद्दा त्याच्या योग्यतेनुसार ठरवणे, एखादी गोष्ट चूक कि बरोबर ठरवणे आणि त्यानंतर सत्याच्या बाजूने उभे राहण्याचे स्वातंत्र्य होते. नेहरु म्हणतात, "जोपर्यंत फॅसिस्टवाद, वसाहतवाद आणि वर्णविद्वेष किंवा अणूबाँब आणि आक्रमण किंवा दडपशाही अशा वाईट प्रवृत्तींचा संदर्भ आहे तेथे त्याच्या विरोधात आम्ही खंबीरपणे व निःसंदिग्धपणे उभे ठाकू. आम्ही शितयुद्धत्व त्याच्या लष्करी कराराच्या विरोधी आहोत. आफ्रिका आणि आशियाच्या नविन देशांना शीतयुद्धात बळजबरीने ओढण्याला आम्ही हरकत घेतो. आम्ही अशा कुठल्याही विकासावर टिका करण्यास मुक्त आहोत जो विकास आम्हाला जगासाठी किंवा आमच्यासाठी घातक किंवा चूकीचा वाटतो. आणि जेव्हा केव्हा तसा प्रसंग येईल तेव्हा आम्ही त्या स्वातंत्र्याचा वापर करु." नेहरुंनी पुढे स्पष्ट केले, "जेथे धाके स्वातंत्र्याला धोका असेल किंवा न्याय हिरावला गेला असेल किंवा जेथे आक्रमण घडले असेल तेथे आम्ही तटस्थ राहू शकणार नाही आणि राहणार पण नाही ... आमचे धोरण तटस्थेतेचे नाही. तर शक्यतोवर मजबूत पायावर शांतता प्रस्थापित करणे आणि ती टिकवणे यासाठीचा एक सक्रिय प्रयत्नवाद आहे." अशाप्रकारे अलिप्ततावाद हे काही एकाकीपणाचे किंवा निष्क्रीयतेचे धोरण नाही. प्रस्तुत राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय शांतता वाढीसाठी योजलेले विधायक धोरण होते.

संबधीत मुद्यांच्या योग्यतेनुसार भारताने भूमिका स्विकारल्याची ठळक उदाहरणे आहेत. उदा. पश्चिम जर्मनीला मान्यता देण्यात आणि कोरियन युद्धाच्या सुरुवातीला उत्तर कोरियाला हल्लेखोर म्हणून घोषित करण्यात संयुक्त राष्ट्रात मतदान करण्यात असे दिसत होते की भारत भांडवलशाही गटाच्या बाजूने आहे. तथापी त्याच काळात भारताने चीनमधील साम्यवादी

सरकारला मान्यता दिली आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखाली उत्तर कोरीयाई भुप्रदेशावरील प्रतिहल्ला नासंमत केला. तसेच तो बऱ्याच आफ्रिकन आशियाई देशांच्या स्वातंत्र्य लढ्यासोबत दृढ ऐक्याने उभा राहिला आणि वसाहतवादी सत्तांवर त्यांच्या जुलमी नियमांमुळे कठोर टिका केली अशा उदाहरणात तो सोव्हियत गटाच्या वैचारिक भूमिकेत सहभागी झाला. अशाप्रकारे प्रत्येक प्रसंगी आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात आणणाऱ्या आणि लोकांच्या इच्छेचा अनादर करण्याच्या विरुद्ध भारताने भूमिका घेतली. यु एस. एस. आर हा भारता विरुद्धचा त्याचा पक्षापात सोडून द्यायला तत्पर होता. आणि त्याने अलिप्ततावादाच्या तत्वावर आधारलेली भारताची प्रामाणिक भूमिका समजून घेतली. पाश्चात्य संस्थेला भारताच्या अलिप्त धोरणाचा, अस्सलपणा समजायला खूप वेळ लागला. असे असले तरी भारताने दोन्ही गटातील सर्व प्रमुख सत्ता व देशांशी संबंध विकसीत करणे चालू ठेवले. त्यामुळे भारताला दोन्ही गटाकडून मदत लष्करी साहित्य आणि तंत्रज्ञानविषयक माहिती मिळण्याचा लाभ झाला. उदा. भारताला भिलाईमधील पहिला पौलाद प्रकल्प उभारण्यात यू.एस.एस.आर कडून सर्व तांत्रिक सहाय्य मिळाले ज्या पाठोपाठ पुढील दोन प्रकल्प उभारण्यासाठी अनुक्रमे जर्मन व ब्रिटीशांकडून साहाय्य मिळाले. देशाच्या सुरक्षेच्या गरजांसाठी शस्त्रास्त्र खरेदी करता भारताने त्याचे दरवाजे सताड उघडे ठेवले. १९६० च्या मध्यापर्यंत जरी सोव्हिएत रशिया हा भारताचा एक मोठा संरक्षण साहित्य पुरवठादार बनलेला असला तरी त्याने इंग्लंड, अमेरिका आणि फ्रान्सकडून पुरेशी शस्त्रास्त्रे खरेदी केली. भारताला काश्मिर मुद्यावर संयक्त राष्ट्राच्या सुरक्षा समितीत यू.एस.एस. आर कडून पाठिंबा मिळाला तर देशातील अन्नधान्याची समस्या सोडवून आणण्याकरता हरितक्रांती घडवून आणण्याचा प्रयत्नात यू.एस. ने आधार दिला अशाप्रकारे भारताची आंतरराष्ट्रीय दर्जा विषयीची सांशकतेने दोन्ही गटाकडील देशांशी सहकार्य व मैत्रीत परिवर्तित झाली.

सर्व जगभरातील बहुतांश गरिब व विकसनशील देशांनी भारताच्या अलिप्त धोरणा सारखेच धोरण स्विकारले ही वस्तूस्थिती भारताच्या अलिप्त धोरणाचे यश ठळकपणे दाखवते. या सर्व देशांनी शीत युद्ध काळात दोन्ही विचार सरणीच्या गटांच्या वर्चस्वाविरुद्ध अलिप्तता चळवळ स्थापन केली. बेलग्रेड मध्ये १९६१ मध्ये जगातील अलिप्तता वादी देशांचे नेतृत्व करण्याकरता नेहरु हे इजिप्त च्या नासेर आणि युगोस्लाव्हियाच्या टिटो सोबत ऐक्याने उभे राहिले.

### ३) आंतरराष्ट्रीय आकलन आणि जागतिक शांततेतील वाढ :

पंचशील आणि अलिप्ततावादाच्या तत्वांवर आधारित असलेल्या भारताने चर्चा व बोलणीद्वारा आंतरराष्ट्रीय विवादाचे निराकरण करण्यावर सातत्यपूर्ण जोर दिला. भारताने साधनांच्या शुद्धतेवर सुद्धा खूप जोर दिला त्याने नमूद केले की राष्ट्रीय हित साध्य करण्याकरता असलेली साधने सुद्धा पवित्र असावयास हवी. नेहरुंनी आंतरराष्ट्रीय आकलन व शांतता वाढवण्यासाठी युद्धाची निरर्थकता वारंवार प्रतिपादली आणि तिसरे महायुद्ध झाल्यास होणाऱ्या निर्णायक हानीचा इशारा दिला. अशाप्रकारचा जोर हा जरी नेहमीच यशस्वीतेत परिणत होत नसला तरी त्याने आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्यात खचितच मदत केली. नेहरुंनी जाणले की अणूशस्त्रांचा उपयोग करण्यासह असलेली शस्त्रास्त्र स्पर्धा ही देशा देशांमधील संशय व अविश्वास वाढविण्यास कारणीभूत ठरेल. तसेच शस्त्रास्त्रावरील खर्च सरकारला गरिबीपासून लोकांच्या उत्थानाकरता आवश्यक असलेल्या पुरेशा पैशांपासून वंचित करेल. म्हणून भारताने सामान्यतः निशस्त्रीकरण आणि विशेषतः अणुशस्त्र निराकरण यासाठी चळवळ केली. त्याचे

वेळेस भारताने हे सुद्धा नमुद केले की अणुशस्त्र निराकरणाची जबाबदारी ही मोठ्या सत्तांच्या खांद्यावर असून त्यांनी त्यांची अण्वस्त्रे मानवजातीच्या भविष्यासाठी आणि जागतिक शांततेसाठी त्यागावयास हवी. या धर्तीवर भारताने नॉन प्रोलिफरेशन ट्रिटीवर (अण्वस्त्रे नसणारांना ती पुरवू नये यासाठीचा करार) हा करार निवडक गटासाठी व भेदभावपूर्ण असल्याचा सांगून सही करण्यास नकार दिला. आंतरराष्ट्रीय चर्चा आणि सहकार्याचा एक प्रमुख पाठपुरावा करणारा असल्याने भारताने संयुक्त राष्ट्राच्या पद्धतीला पूर्ण पाठिंबा दर्शविला त्याने संयक्त राष्ट्रात आंतरराष्ट्रीय शांतता आणि लोकांचे स्वातंत्र्य यांच्याशी संबंधीत प्रसंगोचित फक्त मुद्देच उचलून धरले नाहीत तर जागतिक समितीच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी लष्कर तसा व्यक्तिशः सक्रीय सहभाग नोंदविला. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपिठाद्वारे कोरियाई आणि भारत चीन तंटे सोडविण्यात लक्षणीय भूमिका वठवली. तसेच त्याने जगाच्या वेगवेगळ्या भागात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याकामी बऱ्याच इतर संयुक्त राष्ट्रचळवळीत स्तुत्य भूमिका निभावली. असे लेबनान, टाझा, कांगो, कंबोडिया मध्ये आणि अलीकडील काळात बोस्निया - हर्ज गोविना मध्ये भारताच्या योगदानामुळे आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्यात आणि मध्यस्थी करण्यातील संयुक्त राष्ट्रपध्दती मजबूत झाली आहे. संयक्त राष्ट्र समित्यांद्वारे सुरु केलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमात जसे इलो, युनिसेफ, युनेस्को, फाओ इत्यादी भारत क्रियाशीलपणे सहभागी होत आलेला आहे. भारताची भूमिका ही शस्त्रयुद्धे टाळण्यात आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षितता प्रस्थापित करण्यात संयुक्त राष्ट्राला अधिक परिणामक्षम साधन बनवण्याचे आहे. हे तेव्हाच होऊ शकते जेव्हा संयुक्त राष्ट्रपद्धतीत अधिकाधिक राष्ट्रे सहभागी होतील आणि जबाबदारीने वागतील. ज्यांच्यासाठी भारत हा सातत्याने जागतिक समितीया लोकशाहीकरणाची मागणी करत आलेला आहे. ज्यामध्ये सुरक्षा समितीचा विस्तार समाविष्ट आहे.

**४) भारत सोव्हिएत मैत्री :**

भारताचे शीतयुद्धाच्या काळाच्या एका महासत्ते सोबतचे म्हणजेच यू एस आर सोबतचे मैत्रीपूर्ण संबंद हा विविध घटकांचा परिणाम होता. त्यावेळचे भारतीय नेतृत्व सोव्हिएत अर्थव्यवस्थेचा योजना पद्धतीने खूपच प्रभावित झाले होते. भारताच्या आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नेहरुंनी योजना आयोगाला केंद्रस्थानी ठेवले. आणि सार्वजनिक विभाग मोठ्या प्रमाणावर निर्मित करण्यास भर देण्यासह मिश्र अर्थव्यवस्थेचला चिकटून राहिले. यू. एस. एस. आर ने भारताच्या औद्योगिक विकासाच्या प्रयत्नात कुठल्याही अटीविना भारताला तांत्रिक व तंत्रज्ञान विषयक तत्पर मदत केली. हे चित्र विकसीत पाश्चात्य देशांच्या पूर्णतः विरोधी होते. ज्या देशांची नाराजी प्रकट दिसण्यापेक्षा जास्त होती. तसेच यू. एस. एस. आर. ने भारताच्या वसाहतवाद नष्ट करण्याच्या आणि वंश विद्वेष विरोधी उत्साहपूर्ण चळवळींना प्रतिसाद दिला त्याच परिणाम दोन्ही देशांसाठी सामाईक जागतिक ध्येय निर्मितीत झाला. त्यानंतर जागतिक राजकारणातील गुंतागुंत वाढली ज्यामध्ये पाश्चात्य राष्ट्रांनी काश्मिर मुद्यावर भारताला पाठिंबा दिला नाही, पाकिस्तान सोव्हिएत विरोधी लष्करी डावपेचात खेचला गेला. चीन भारताचा शत्रू बनला आणि भारत सोव्हिएत संबंधांचे वारे फिरले. आणि त्यामुळे दोन्ही देश एकमेकांचे मैत्रीपूर्ण संबंध विसरले. यू.एस.एस. आर. शी असलेल्या मैत्रीची गरज आणि क्षमता ओळखून त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९७१ मध्ये सोव्हिएत युनियन सोबत मैत्री, शांतता आणि सहकार्याच्या २० वर्षाच्या द्विपक्षीय करारावर सही केली. या करारान्वये भारताला त्याच्या सार्वभौमत्वाशी तडजोड न करता क्षेत्रीय तसेच जागतिक दर्जा मजबूत करण्यात मदत झाली. भारत अलिप्ततावादी धोरणाशी खंबीरपणे बांधील राहिला. आणि यू.एस.एस.आर. च्या मोहिमांमध्ये ना सहभागी झाला ना त्याला त्याने पाठिंबा दिला. भारताने सोव्हिएत युनियनला पाठिंबा देण्याचा मोह

तसेच दबाव झुगारुन दिला. जेव्हा त्याचे सैन्य अफगाणिस्थानात शिरले. विशेष म्हणजे यावेळेस अफगाणिस्थानातील सोव्हिएतच्या हजेरीला शह देण्यासाठी यू.एस. ने भारताचा प्रमुख शत्रू पाकिस्तानचा आघाडीवरील राज्य म्हणून वापर केला होता. याउलट भारताला तंत्रज्ञानविषयक आणि वैज्ञानिक देवाणघेवाणसह काश्मिर मुद्यावर संयुक्त राष्ट्रात सततचा पाठिंबा मिळाला. या कराराने बांग्लादेश मुक्ती युद्धात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली त्यावेळेस यू.एस. ला पाकिस्तानला मदत करावयाची होती. परंतू त्याने त्याचे पाऊल मागे घेतले. कारण यू.एस.आर. ने भारताला सर्वप्रकारचे सहकारी करण्याची तयारी दर्शविली. अशाप्रकारे सोव्हिएत युनियनशी मैत्री ही भारताच्या परराष्ट्रधोरण प्रणालीची महत्त्वाची चौकट होती.

**५) क्षेत्रीय सहकार्यात वाढ :**

भारत त्याच्या सर्व शेजाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध इच्छितो आणि सर्व दक्षिण आशियाई देशांमध्ये, सहकार्य अपेक्षितो. म्हणून भारताकडून सार्कला जबरदस्त पाठिंबा मिळाला. ज्याचा वापर क्षेत्रीय व्यापार, उद्योग आणि लोकालोकांतील देवाणघेवाण वाढण्यासाठी होतो. दक्षिण आशिया हे भौगोलिक संज्ञेत दुसरे तिसरे काहीच नसून भारतीय उपखंडच आहे, त्याला त्याच्या सर्व देशात कमी अधिक प्रमाणात सारख्याच समस्यांना तोंड द्यावे लागते. जसे गरिबी, निरक्षरता, कुपोषण, अनारोग्य, लैंगिक तफावत इत्यादी. या २० व्या शतकातील समस्यांपासून मुक्ती मिळवण्याकरीता भारत एकत्रीत प्रयत्नांचे समर्थन करतो. तथापी भारत पाकिस्तान मधील शत्रुत्व आणि भारताच्या इतर छोट्या शेजाऱ्यांची नवी दिल्लीच्या हेतूविषयीची साशंकता त्यामुळे सार्कच्या अपेक्षित प्रगतीला आळा बसला आहे. सार्कच्या प्रगतीत द्विपक्षीय संबंध अडथळे ठरणार नाहीत याची ग्वाही देण्याकरता भारत खूप कष्ट घेतो. सार्कशिवाय भारत असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट आशियन नेशन (असियन) तसेच शांघाय को - ऑपरेशन ऑर्गनायझेशन (स्को) आणि आफ्रिकन युनिअन यांना सक्रिय सहकार्य देतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या प्रमुख तत्वांची चर्चा करा.
२) 'भारत शांतता व विकासाच्या परराष्ट्र धोरणाचा पाठपुरावा करतो' हे विधान सकारण स्पष्ट करा.

## ३.४ २१ व्या शतकातील परराष्ट्र धोरण :

शीत युद्धोत्तर परिस्थितीने भारतीय परराष्ट्र धोरणा समोर बरीच नवीन आव्हाने उभी केली आहे. या नविन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भारत इतर सर्व जबाबदार देशांचे सहकार्य

मिळवत आहे. तथापी भारताच्या परराष्ट्रधोरणाच्या सहकार्याची चौकट शीतयुद्धोत्तर काळातसुद्धा कमी अधिक प्रमाणात तीच आहे. भारत हा अलिप्तता धोरणाला बांधील राहतो कारण त्याचे मुलभूत ध्येय हे देशाचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अबाधीत राखणे आणि लष्करी आघाडीच्या बाबतीत जागतिक राजकारणाला अटकाव करणे हे राहिलेले आहे. जागतिक राजकारणातील वर्चस्व आणि इतर देशांविरुद्ध लष्करी आघाडी उभारणे याला विरोध करण्याचे भारताचे मुलभूत धोरण बदललेले नाही आणि अलिप्ततावाद हा असून सुद्धा त्याच्या परराष्ट्रधोरणासाठी अर्थपूर्ण आहे. अणूसंपन्न देश बीग ५ यांचे अण्वस्त्र निःशस्त्रीकरण्यासाठी वेळेत व परिणामकारक रित्या करण्यातील अपयशाने भारताला त्याच्या दीर्घकालीन सुरक्षा आव्हांनाना सामोरे ठेवून अणूकार्यक्रम विकसीत करण्याची निवड करण्यास बाध्य केले. तथापी भारत हा अण्वस्त्र संपन्न देश म्हणून जबाबदार भूमिका निभावतो कारण त्याने सर्वसमावेशक आणि जागतिक निःशत्रीकरण उपायांसाठीच्या मागणीसह प्रथम वापर न करण्याचे धोरण जाहीर केले आहे. भारत अणूदुर्घटना टाळण्यासाठी पाकिस्तान आणि चिनसह अणूकार्यक्रम विषयक विश्वास, सबलीकरण उपाय सुचवितो आणि या देशांना विधायक चर्चेत गुंतवितो. भारताने शीतयुद्धोत्तर काळात त्याच्या परराष्ट्रधोरणाला समतोल करण्यासाठी यूनायटेड स्टेटस्, युरोपिअन संघ आणि ईस्त्राइल कडे मैत्रीचा हात पुढे केला. आणि त्याला देशी आर्थिक धोरणाशी सुसंवादी बनवले. बलाढ्य सोव्हिएत युनिअनच्या अस्तंगत होण्याने निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी त्याने दक्षिणपूर्व आशियाई, आफ्रिकी तसेच लॅटीन अमेरिकन देशांपर्यंत पोहचण्याच्या प्रयत्नांना गती दिली आहे. एक ध्रुवीय जगाच्या अस्तित्वाला भारताचा विरोध राहिलेला आहे आणि बहुध्रुवीय जगाच्या उदयासाठी भारताने रशिया, ब्राझील, चीन आणि दक्षिण आफ्रिकेसोबत हात मिळवणी केली. नवीन काळात ब्रीक्स आणि जी-२० हि भारतीय परराष्ट्र धोरणाची महत्त्वाची साधने बनलेली आहेत. असे असले तरी भारताने नॅम आणि संयुक्त राष्ट्रांचे काळाच्या कसोटीस उतरलेले व्यासपीठ त्यागलेले नाही. भारत संयुक्त राष्ट्र व आय-एस.एफ जागतिक बँक रचनेत सुधारणा सुचवतो जेणेकरुन ते अधिक लोकशाही आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे प्रतिबिंब दर्शवेल. भारत सर्व देशांसोबत दहशतवाद आणि जागतिक तापमानवाढीच्या नविन आव्हानांना तोंड देण्यासाठी सहकार्य मिळवितो. म्हणून या मुद्यावरील सर्व आंतरराष्ट्रीय चर्चामध्ये मनापासून सहभागी होतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे त्याचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित ठेवणे, सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे आणि मागील ६० वर्षात राहिलेली शांततामय आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था वाढविणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) १९९० नंतरच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीतील बदलांवर चर्चा करा.
२) २१ व्या शतकातील परराष्ट्र धोरणातील भारताच्या प्राधान्याविषयी चर्चा करा.

## ३.५ सारांश

स्वतंत्र भारताच्या संस्थापकांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुद्धा भक्कम चौकट उभारली आहे. ही चौकट पंचशील, अलिप्ततावाद, जागतिक शांततेत वृद्धी, भारत सोव्हिएत मैत्रीत वृद्धी आणि क्षेत्रीय सहकार्यात वाढ या तत्त्वांवर आधारित आहे. या तत्त्वांनी भारताला राष्ट्रीय हित आणि सिमांचे रक्षण करण्यात, आर्थिक विकासाच्या खात्रीत, अनिवासी भारतीयांच्या हिताच्या संरक्षणात आशिया व आफ्रिकेतील वसाहतवाद नष्ट करण्यात आणि वंशविद्वेष संपवण्यात मदत केलि. अशाप्रकारे भारताने फक्त त्याचेच हित जोपासले असे नाही तर त्याच्या विचारसरणी व तत्वांनुसार जगाला आकार देण्याचा सुद्धा प्रयत्न केला. शीत युद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणातील रचनात्मक बदलांनी भारताला नविन वास्तविकतेशी जुळवून घेण्यास भाग पडले. तरीसुद्धा त्याच्या परराष्ट्रधोरणाची मुलभूत चौकट कमी अधिक प्रमाणात तीच राहिली.

## ३.६ विभागावर प्रश्न :

१) भारतीय परराष्ट्रधोरणावरील जवाहरलाल नेहरुंच्या प्रभावाची चर्चा करा.
२) न्याय आणि समान जागतिक सुव्यवस्थेच्या विकासात भारताच्या योगदानाची चर्चा करा.
३) १९९१ नंतरच्या भारतीय परराष्ट्रधोरणातील बदल व सलगता यावर चर्चा करा.

## ३.७ संदर्भसूची :


- चंद्रा, बिपीन आणि इतर इंडिया सिन्स इंडिपेंडन्स, पेंग्विन बुक्स, २००७, नवी दिल्ली.
- दिक्षित जे. एन. इंडियाझ फॉरेन पॉलिसी, पीक्स बुक्स् २००३ नवी दिल्ली.
- दत्त व्हि. पी. इंडियाझ फॉरेन पॉलिसी सीन्स इंडिपेन्डन्स नॅशनल बुक ट्रस्ट २०११, नवी दिल्ली.
- दत्त व्हि. पी. इंडियाझ फॉरेन पॉलिसी इन अ चेंजींग वर्ल्ड, विकास पब्लिशिंग हाऊस १९९९, नवी दिल्ली.
- गांगुली सुमित, इंडियाझ फॉरेन पॉलिसी, ओयूपी २०११.
- खन्ना व्हि. एन. फॉरेन पॉलिसी ऑफ इंडिया, विकास पब्लिशिंग प्रा. लिमिटेड, २०१०, नवी दिल्ली.
- पांडे बी. एन. (एड) अ सेन्टेनरी हिस्ट्री ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस, १९९० नवी दिल्ली.
- राजा मोहन सी. क्रॉसिंग द रु बीकन : द शेपींग ऑफ इंडियाझ न्यू फॉरेन पॉलिसी, पेंग्विन बुक्स इंडिया, २००६.
- सिसोदिया, एन. एस. अँड सी उदयभास्कर, इंमर्जिंग इंडिया सिक्युरिटी अँड फॉरेन पॉलिसी, पर्सपेक्टीव्ह बिब्लीओफाईल साऊथ आशिया, २००५.


❖❖❖❖

# ४

# भारत, दक्षिण आशिया आणि सार्क

**घटकाची रचना :**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ दक्षिण आशिया : काही वैशीष्टे
४.३ भारत
४.४ पाकिस्तान
४.५ श्रीलंका
४.६ बांग्लादेश
४.७ नेपाळ
४.८ अफगाणिस्तान
४.९ भुतान व मालदिव
४.१० दक्षिण आशियातील सहकार्याला पूरक बाबी
४.११ सहकार्याला मारक व संघर्षाचे घटक
४.१२ सहकार्याचा उपोद्घात
४.१३ सार्क : सहकारासाठी यंत्रणा
४.१४ सार्कची वाटचाल
४.१५ सार्कची कामगिरी
४.१६ सार्कची क्षमता, भारताची भूमिका आणि मूल्यांकन
४.१७ प्रकरणावरील प्रश्न
४.१८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

(अ) दक्षिण आशियाबद्दल एक समग्र चित्र सादर करता येईल.
(ब) दक्षिण आशियातील देशांमधील गुंतागुंतीचे संबंध समजतील.
(क) दक्षिण आशियातील सहकार्याचे आणि संघर्षाचे घटक आपल्याला कळतील.
(ड) एक प्रादेशिक संघटना म्हणून सार्कबद्दल आपणास माहिती मिळेल.
(इ) सार्कच्या कार्याबद्दल व उपलब्धीबद्दल आपणास ज्ञान होईल.
(फ) दक्षिण आशिया संदर्भात भारताच्या भूमिकेचे विश्लेषण करता येईल.

## ४.१ प्रस्तावना

मोठ्या आशिया खंडाचा एक भाग असलेल्या दक्षिण आशिया प्रदेशाबद्दलचे वर्णन ह्या प्रकरणात केले आहे. त्यामध्ये – दक्षिण आशियातील देशांचे वैशिष्ट्ये, त्यांच्यातील परस्पर संबंध, बहुपक्षीय संबंध, त्यांच्यातील तणावाचे मुद्दे, त्यांच्यावरील अंतर्गत व बाह्य दबाव, आणि जागतिक राजकरणात ह्या देशांची पत - ह्याबद्दल विवेचन केले आहे. तसेच ह्या प्रदेशातील मुख्य देशांची प्रादेशिक संघर्षाच्या मुद्द्यावरील भूमिकेबद्दल चर्चा केली आहे. शेवटी, भारताच्या विशेष भूमिकेला अनुसरून सार्कच्या वाटचालीचे स्पष्टीकरण केले आहे. ह्या प्रकरणाच्या अभ्यासानंतर तुम्हाला दक्षिण आशियातील गुंतागुंतीचे संबंध समजतील आणि त्याचे विश्लेषण करता येईल.

## ४.२ दक्षिण आशिया : काही वैशिष्टे

दक्षिण आशिया मध्ये अफगानिस्तान, बांग्लादेश, भुतान, भारत, मालदिव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका हे आठ देश येतात. भौगोलिक दृष्ट्या दक्षिण आशिया एकत्रित व सलग भूभाग असून विषुववृत्ताच्या उत्तरेस वसला आहे. दक्षिण आशियाची उत्तरेकडील सिमा हिमालय पर्वतरांगानी बनली असून दक्षिणेस तीनही बाजूला हिन्दी महासागर आहे. हा प्रदेश समशीतोष्ण हवामान क्षत्रात येतो आणि त्यामुळे येथील पर्जन्यमान व हवामान, मातीचा पोत, जंगल, झाडे व फुले, पिकांच्या जाती व शेतीची वैशिष्टे इत्यादि विकासित झाली आहेत. आणि त्यामुळे दक्षिण आशियातील जनतेचे राहणीमान व जीवनशैली सुध्दा प्रभावित झाली आहे. सामाजिक दृष्ट्या दक्षिण आशियातील जीवनात अनेक वंश, जाती, धर्म व पंथ, भाषा, वेशभूषेचे प्रकार, चालीरीती व परंपरा निर्माण झाल्या. त्यामुळे दक्षिण आशियात अनेक प्रकारची विविधता दिसते. परंतु ह्या विविधतेही संमिश्र सांस्कृतिक एकतेचा आणि समग्र व आध्यात्मिक जीवनदृष्टीचा एक सशक्त धागा ह्या प्रदेशाला एकत्र जोडतो आणि विविधतेत एकता हे एक समान सूत्र ह्या प्रदेशाचे वैशिष्ट्ये बनते. हे सांस्कृतिक वैशिष्ट्य व समग्र जीवनदृष्टी हजारो वर्षाच्या वैचारिक देवाणघेवाणीतून, मंथनातून आणि सृजनशील प्रयोगातून निर्माण झाली आहे. ह्याबरोबर ह्या प्रदेशातील देश आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी बांधलेले असून त्यांची अर्थव्यवस्था भौगोलिक समीपतेमुळे परस्परांना पूरक झाली आहे. दक्षिण आशियातील देशांनी इतिहासात युध्दे, परकीय आक्रमणे, वसाहतवाद ह्याची प्रचंड झळ सोसली असून त्याविरूध्द प्रखर संघर्षसुध्दा अनुभवला आहे. स्वातंत्र्यानंतर ह्या देशांना सारख्याच आर्थिक – सामाजिक – राजकीय समस्यांनी भेडसावले आणि जागतिक पातळीवर हे देश विकसनशील म्हणून गणले जातात. जगातील संपन्न व बलाढ्य देशांच्या सत्तेच्या खेळात हे देश नगण्य ठरले असून नेहेमीच दुर्लक्षित राहिले. अशा समदुःखीपणामुळे हे देश आपल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी एक समान व्यासपीठ शोधत होते. ते त्यांना १९८५ मध्ये सार्कच्या स्थापनेमुळे मिळाले. परंतु हा विकास अनेक अडचणींचा व खडतर होता.

ह्या विकासाचे व बदलांचे आकलन होण्यासाठी प्रथम दक्षिण आशियातील आठही देशांची प्राथमिक माहिती घेणे आवश्यक आहे.

## ४.३ भारत

भारत हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश आहे. १९४७ पर्यन्त भारत, पाकिस्तान व बांग्लादेश हे एकच देश होते आणि ह्या विस्तृत प्रदेशाला भारतीय उपखंड म्हटले जात असे. इतिहासात हिंदू सम्राटांनी पश्र्चिमेकडील अफगानिस्तान पासून पूर्वेकडील जावा-सुमात्रा बेटांपर्यत आपल्या राज्याचा विस्तार केल्याचा उल्लेख आढळतो. त्यामुळे ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या भारतीय संस्कृतीची अनेक उदाहरणे संपूर्ण दक्षिण आशियात आजही दिसतात, ज्यामध्ये प्रामुख्याने हिंदू सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक वैशिष्टे आढळतात. मध्ययुगीन काळात हिंदू संस्कृती बरोबर इस्लामी व ख्रिस्ती संस्कृतींची सरमिसळ झाल्याने एक विशिष्ट प्रकारची संमिश्र संस्कृती येथे विकसित झाली. भारतीय उपखंड हा एक संपन्न प्रदेश म्हणून ख्यात होता. येथे व्यापारासाठी अनेक देशातील लोक येत असत. पश्र्चिम व पूर्वेकडील देशांना जोडणारा हा एक दुवा होता. १९ व्या व २० व्या शतकात भारतातील स्वातंत्र्य चळवळी बरोबरच सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक पुनरूत्थानाच्या चळवळीसुध्दा जोमात सुरू होत्या. त्यामुळे भारत एक सुसंस्कृत, आधुनिक, सुदारणावादी, प्रगतीशैली, नैतिक व संयमी देश म्हणून जगात पुढे आला. भारताची स्वातंत्र्य चळवळ ही केवळ दक्षिण आशिया साठीच नाही तर साऱ्या जगातील वसाहतवाद विरोधी चळवळींना प्रोत्साहनपद ठरली. ह्यामुळे दुसऱ्या महायुध्दानंतर स्वतंत्र्य झालेल्या तिसऱ्या जगाचे राजकीय नेतृत्व आपोआपच भारताकडे आले. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले, पण तुकडे होऊन. तरीही दक्षिण आशियामध्ये भारताचे स्थान फार महत्वाचे राहिले. क्षेत्रफळ, लोकसंख्या, अर्थव्यवस्था, सैनिक शक्ति, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगति, भक्कम प्रशासकीय व्यवस्था इत्यादि सर्वच बाबतीत भारत इतर देशांपेक्षा मोठा व उजवा आहे. नव्या संविधानांतर्गत अनेक आदर्श व सर्वमान्य मूल्यांच्या आधारे सशक्त राजकीय संस्थांची निर्मिती करून भारताने राजकीय परिपक्वता साधली आणि जगासमोर आदर्श ठेवला. भारतीय नेत्यांनीही सुरूवातीला जागतिक राजकरणात आघाडीची भूमिका वठवली. तिसऱ्या जगाचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवावे आणि शीतयुध्दाची झळ त्यांना लागू नये ह्या उदात्त हेतूने भारताने जागिक राजकरणात अलिप्ततावादाच्या रूपाने नवे शस्त्र दिले. पण त्याचे स्वतःचेच धोरण सोविएत रशियाच्या बाजूने झुकल्याने सक्षिण आशियातील अन्य देशही जगात स्वतःसाठी आधार शोधू लागले. ह्यामुळे भारताचा दबदबा जगात जरी वाढला तरी शेजारची राष्ट्रे मात्र काहीशा भितियुक्त किंवा संशयित नजरेतून भारताकडे पाहू लागली. भारताच्या रक्तरंजित फाळणीमुळे मुळातच संबंध अत्यंत कलुषित झाले होते. तसेच भारत दक्षिण आशियात भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती स्थानावर आहे. त्यामुळे प्रत्येक देशाची सीमा भारताच्या सीमेला भिडते. ज्यामुळे व्यापार सहज होतो, परंतु सीमेवरील चकमकीही वाढतात. भारताबद्दल सुरूवातीपासूनच इतर देशांच्या मनात अविश्र्वास निर्माण झाला. पुढे तीन युध्दात भारताच्या सफल कामगिरीमुळे आणि यशस्वी अणुचाचण्यांमुळे भारताबद्दलची भीती अधिकच वाढली. ह्या सर्व परिस्थितीमुळे दक्षिण आशियातील देशांमध्ये आर्थिक-सामाजिक-तांत्रिक सहकार्य शक्य असूनही केवळ राजकीय अविश्र्वास व मतभेदांमुळे सर्वच क्षेत्रात सहकार्याच्या प्रयत्नांना खीळ बसली. भारताच्या दक्षिण आशियातील मध्यवर्ती स्थानामुळे आणि एकूण सर्वांगीण प्रगतीमुळे वास्तविक अन्य देशांना फायदा होऊ शकतो, पण दुर्दैवाने नुकसानच अधिक झाले आहे. ह्याला भारताप्रमाणेच अन्य देशही जबाबदार आहेत. ह्याबद्दल आधिक विश्र्लेषण करणे सुलभ व्हावे म्हणून दक्षिण आशियातील अन्य देशांबद्दल माहिती करून घेणे आवश्यक आहे.

## ४.४ पाकिस्तान

१४ आगस्ट १९४७ रोजी अखंड भारताची फाळणी होऊन स्वतंत्र झालेला पाकिस्तान दक्षिण आशियातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. फाळणी झाली तेव्हा भारताच्या पश्चिमेला आणि पूर्वेला असे दोन पाकिस्तानचे भाग होते आणि मध्ये हजारो मैलांचा भारत होता. १९७१ मध्ये पूर्वेकडील पाकिस्तान उठाव होऊन तो स्वतंत्र झाला आणि बांग्लादेश हा नवीन देश दक्षिण आशियात उदयाला आला. आज पाकिस्तान हा सुमारे ७ लाख ९० हजार चौरस किलोमीटर चा प्रदेश असून त्याला दक्षिणेकडे १०४६ की. मी. चा समुद्रकिनारा लाभाला आहे. पूर्वेकडे भारत, पश्चिमेकडे अफगानिस्तान, नैर्ऋतेकडे इराण, ईशान्येकडे चीन असे देश आहेत. पाकिस्तानमध्ये – पंजाब, सिंध, खैबर पख्तुंख्वा व बलुचिस्तान आणि वायव्येकडील केंद्रशासित प्रदेश – हे ४ प्रांत असून राजधानी इस्लामाबाद हा विशेष दर्जा असलेला प्रांत आहे. ईशान्येकडील आझाद कश्मीर हासुध्दा एक प्रेश पाकिस्तान कडे असून त्याबद्दल भाराताशी वाद सुरू आहे. स्वतंत्र पाकिस्तान हा एक धर्मनिरपेक्ष, समताधिष्ठित, आधुनिक, संघराज्य व्हावा असे पाकिस्तानचे जनक जिना ह्यांचे स्वप्न होते. परंतु त्यांच्या अकाली निधनानंतर १९५६ मध्ये संविधानात बदल करून पाकिस्तान इस्लामी राष्ट्र घोषित करण्यात आले. त्यानंतर पाकिस्तानचे राजकारण कायाम अशांत व अस्थिर राहिले. पाकिस्तानमध्ये – १९५८-१९७१, १९७७-१९८८ आणि १९९९-२००८ असे तीनदा लष्करी शासन आले आणि जेव्हाकेव्हा निवडणूकीद्वारे लोकनियुक्त शासन आले तेव्हाही लष्करचे त्यावर नियंत्रण राहिले. पाकिस्तानच्या राजकरणात लष्कर व आय. एस. आय. ह्या गुप्तहेर संगठनेचे प्रचंड वर्चस्व आहे. विशेषतः भारताच्या बाबतीत त्यांचाच शब्द अंतिम असतो.

पाकिस्तान अधिकृत इस्लामी देश असून तिथे हिंदू, ख्रिस्ती, बौध्द, ज्यू, शीख असे अल्पसंख्या धार्मिक गटही आहेत. वांशिक दृष्ट्या येथे प्रामुख्याने पंजाबी वंशाचे लोक असून (४४%) इतर पाश्तुनी, सिंधी, बलूची, सराइकी, पारशी, पठाण अशा वंशाचे लोक आढळतात. मुहाजीर म्हणून संबोधण्यात येणारा भारतातून आलेल्या मुसलमानांचा एक गट वेगळ गणण्यात येतो ज्यांना फारशी सन्माननीय वागणूक मिळत नाही. पंजाबी वंशाचे लोक पाकिस्तानच्या सर्वच क्षेत्रात वरचढ असून विशेषतः सैन्य, राजकारण व उद्योग ह्यात त्यांचे प्रभुत्व आहे. पाकिस्तानची अधिकृत भाषा उर्दू असून शासकीय, न्यायालयीन उच्च शिक्षण आणि परकीय व्यवहारासाठी इंग्रजी वापरली जाते. तसेच सुमारे ६० भाषा येथे बोलल्या जातात ज्यात पंजाबी, सिंधी, पश्तु व बलूची ह्या भाषा प्रमुख आहेत. शिक्षण क्षेत्रात पाकिस्तान मध्ये आधुनिक शिक्षण मिळते – ज्यात सर्वच विद्याशाखांमध्ये उच्चतम अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. पाकिस्तानच्या शास्त्रज्ञाला भौतिकशास्त्रात नोबेल मिळाले हे तेथील उच्चशिक्षणाचे द्योतक आहे. प्राथमिक स्तरावर मदरशाद्वारे काही प्रमाणात शिक्षण मिळते, पण आज इंग्रजी शिक्षणाकडे ओढा वाढत आहे. एकूण साक्षरतेचे प्रमाण मात्र कमीच असून पाकिस्तानची समाजव्यवस्था आजही पुरातन, धार्मिक प्रभावाखाली आणि सरंजामीवृत्तीची आहे. स्त्रियांवर अनेक पुरातन बंधने आहेत. वेठबिगारी अस्तीत्वात आहे. गरीब-श्रीमंत आणि शहरी-ग्रामीण अशी प्रचंड तफावत आहे आणि त्याशिवाय कुपोषण, दारिद्र्य, बेरोजगारी, वाढता जन्म-मृत्यू दर, वाढती महागाई अश्या समस्या येथे आहेत.

पाकिस्तानची अर्थव्यवस्था शहरी आणि ग्रामीण दोन्ही क्षेत्रावर आधारित आहे. इंडस नदीचे खोरे हे शेतीसाठी मुख्य क्षेत्र आहे. येथ गहू, तांदूळ, कापूस, ऊस ही महत्वाची पिके होतात. पाकिस्तान मध्ये जंगलेही विस्तृत असून साग, देवदार, महागनी, शिसम, अल्पाइन असे उत्तम लाकूड येथे मिळते. वस्त्रोद्योग आणि साखर कारखाने येथील जुने उद्योग असून नव्या उद्योगात सीमेंट, रसायनिक उद्योग, अन्न-प्रकिया उद्योग, लोखंड, स्टील अश्या उद्योगांची वाढ झाली आहे. बदलत्या जागतिक प्रभावामुळे इलेक्ट्रॉनिक, बांधकाम उद्योग व वीजनिर्मिती ह्यातही वाढ झाली आहे. थेट परकीय गुंतवणूक अलीकडे वाढल्यामुळे बँकिंग व्यवसायात भरभराट झाली आहे. पर्यटन हे पाकिस्तानचे उत्तम व्यवसायचे क्षेत्र आहे, पण राजकीय अस्थिरतेमुळे व वाढत्या हिंसाचारमुळे त्यावर विपरीत परिणाम झाला आहे. अलीकडच्या काळात शेतीचे क्षेत्र कमी होत असून उद्योग व सेवाक्षेत्रात वाद होत आहे. पाकिस्तानवर आजही अंतर्गत व विदेशी कर्ज आहे. पाकिस्तानचे दरडोई उत्पन्न कमी असून लोकसंख्यावाढ वेगाने होत आहे. महागाईवर आणि अन्य आर्थिक समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास सरकार अपयशी ठरले आहे. शस्त्रनिर्मिती, सैन्य व संरक्षण, अनुचाचण्या व अवकाश संशोधन यावर पाकिस्तान गरजेपेक्षा जास्त खर्च करत आहे. एकीकडे पाकिस्तानची वैज्ञानिक प्रगति दिसत असली तरी राजकीय दृष्ट्या ते एक असफल राष्ट्र आहे.

## ४.५ श्रीलंका

श्रीलंका हा बेटासारखा देश भारतीय महासागरात दक्षिणेला व बंगालच्या उपसागराच्या नैऋत्तेला स्थित असलेला भारताचा शेजारी असून मन्नारच्या आखाताने व पाक समुद्रधुनीद्वारे त्यामध्ये सीमा तयार झाली आहे. श्रीलंकेला ज्ञात असा ३००० वर्षाचा इतिहास आहे. भारत व श्रीलंकेमध्ये प्राचीन काळापासून संबंध आहेत. प्राचीन हिंदू ग्रंथात, विशेषतः रामायणात, ह्या बेटांचा उल्लेख लंका अस आढळतो आणि श्रीरामाने तेथील राजा रावणाशी युध्द करून आपली पत्नी सीता हिला बंदिवासातून मुक्त केले अशी आख्यायिका आहे. नंतरच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार या बेटांवर झाला आणि सम्राट अशोकाने महेंद्र नामक आपल्या दुताला येथे धर्मप्रचारासाठी पाठवले. दक्षिण भारतातील चोल, पंड्या, चेरा आणि पल्लव घराण्याच्या राजांनी लंकेवर आक्रमणे केली. युरोपिय वंशपैकी पोर्तुगीज, डच, ग्रीक, फ्रेंचांनी येथे आक्रमणे केली व नंतर १९ व्या शतकात इंग्रजांनी आपले राजकीय नियंत्रण प्रस्थापित केले. श्रीलंकेला चारही बाजूंनी समुद्रकिनारा असल्यामुळे त्याचे व्यापारीक, राजनैतिक व संरक्षणात्मक महत्व फार आहे. युरोप, आफ्रिका व पूर्वेकडील देशांमध्ये व्यापाराचा, खास करून सिल्क व मसाल्यांच्या पदार्थासाठी, हा एका प्रमुख मार्ग आहे. आशिया खंडावर लष्करीदृष्ट्या लक्ष ठेवण्यासाठी हे बेट अत्यंत उपयुक्त आहे. द्वितीय महायुध्दानंतर अमेरिकेने तसा प्रयत्न केला. श्रीलंकेला जंगल, पर्वत, नद्या आणि उत्तम हवामान व भरपूर पर्जन्यमान अशी नैसर्गिक देणगी लाभली आहे. येथील वातावरण वर्षभर समान राहते व मुख्यत्वे ते दमट असते. श्रीलंकेत नैसर्गिक बंदरे आहेत आणि त्यांच्या आधुनिकीकरणा मुळे जहाजबांधणी उद्योग येथे चांगला वाढला आहे. श्रीलंका चहा, कॉफी, दालचीनी व अन्य मसाल्याचे पदार्थ, रबर ह्यांच्या उत्पादनात व निर्यातीत आघाडीवर आहे. उस, कापूस, भात हे सुध्दा येथे भरपूर होते. पर्यटन हासुध्दा एक महत्वाचा परकीय चलन देणारा व्यवसाय आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे अलीकडे श्रीलंकेत संगणक, इलेक्ट्रॉनिक, दळवळणाची साधने व अन्नप्रक्रिया इत्यादि उद्योग वाढले आहेत, तसेच सेवाक्षेत्र व बँक व्यवसायाचीही वाढ झाली आहे. आखाती देस व युरोपात गेलेल्या श्रीलंकन तरूणांकडून भरपूर परकीय चलन देशात येते.

श्रीलंकेचा समाज विविधतेने भरला आहे. येथे सिंहली वंशाचे लोक प्रमुख असून त्यानंतर भारतीय व श्रीलंकन तामिळ, मूर आणि बर्गर्स असे लोक आढळतात. भारतीय तामिळ हे ब्रिटिश काळात भारतातून चह-मळ्यात काम करण्यासाठी आणले गेलेले मजूर आहेत. श्रीलंकेची ७०% जनता बौध्द आहे. ख्रिस्ती व मुस्लिम अनुक्रमे ७% व ९% आहेत. हिंदू १२% असून हे सर्वच तामिळ आहेत. श्रीलंकेत सिंहली व तामिळ ह्या प्रमुख भाषा असून इंग्रजी ही व्यवहाराची भाषा आहे. तसेच काही प्रमाणात पौर्तुगीज व मलय भाषांच्या जवळची बोली भाषा येथे बोलली जाते. ह्या संमिश्र समाजामुळे येथील संस्कृतीही संमिश्र झाली आहे. धार्मिक सण, खान-पानाच्या सवयी, कौटुंबिक परंपरा इत्यादींमध्ये हिंदू, बौध्द, ख्रिस्ती, पोर्तुगीज संस्कृतीची वैशिष्टे आढळतात. श्रीलंकेला लोककला, संगीत-वादन, नृत्य-नाट्य, साहित्य, चित्रकला, वास्तुकला ह्यांचीसुध्दा जुनी व सशक्त परंपरा लाभली आहे.

श्रीलंकेत प्राचीन व मध्ययुगीन काळात अनेक राजांची राज्ये होती. त्यांचा प्रामुख्याने दक्षिण भारतातील  राजवटींशी राजनैतिक, आर्थिक व कौटुंबिक संबंध होता. श्रीलंकेचा १५०५ नंतरचा इतिहास हा परकीय आक्रमणाचा इतिहास आहे. प्रथम पोर्तुगीज व नंतर डचांनी श्रीलंकेच्या काही भागात आपले वर्चस्व स्थापित केले. १९ व्या शतकात भारतात ब्रिटीशांनी आपले पाय घट्ट रोवले होते. युरोपात फ्रेंच व डच ह्यांच्यातील युध्दात फ्रेंच जिंकल्यास श्रीलंकेच्या त्यांच्ये राज्य येईल ह्या भीतीने ब्रिटीशांनी १७९६ मध्ये भारतातून श्रीलंकेच्या उत्तर किनाऱ्यावर नियंत्रण मिळवले. शेवटी १८१८ मध्ये कॅंडीच्या शेवटच्या राजाला हरवून ब्रिटीशांनी श्रीलंकेवर पूर्ण सत्ता प्राप्त केली. ब्रिटीश सरकारने श्रीलंकेत अनेक राजकीय, सामाजिक व आर्थिक सुधाणा केल्या ज्यामुळे श्रीलंका एक आधुनिक, प्रगतिशील देश म्हणून विकसित झाला. ह्याच वेळेस भारतातील स्वातंत्र्य चळवळीतून प्रेरणा घेऊन श्रीलंकेतही ब्रिटिश राजवटीविरूध्द सिलोन नॅशनल कॅंग्रेस च्या द्वारे आंदोलन सुरू झाले आणि १९४८ मध्ये श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाले.

श्रीलंका एक विकसनशील देश म्हणून गणला जातो. सुरवातीला तेथे डोगमोर संविधान, नंतर सोलबरी संविधान असे प्रयोग झाले. १९७२ मध्ये व्यापक संविधान-सुधारणा होऊन श्रीलंका एक लोकशाही गणराज्य झाले. ह्या गणराज्यात संघीय व एकात्म शासन पध्दतीचे मिश्रण आढळते. राष्ट्राध्यक्ष हे देशाचे व शासनाचे प्रमुख असून ते सैन्याचे सरसेनापती आहेत. ते संसदेला जबाबदार असतात आणि संसदेतील सदस्यांतून आपले मंत्रिमंडळ बनवतात. १९८७ च्या संविधान्न दुरूस्तीनंतर प्रथमच श्रीलंकेत विक्रेंद्रीकरण करण्यात येऊन नऊ प्रांत व २५ जिल्ह्यांची रचना करण्यात आली. नऊ प्रांतात प्रोव्हिंशियल कौन्सिल स्थापून निर्वाचित शासनाची तरतूद करण्यात आली. २५ जिल्ह्यांचे प्रशासन हे प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांद्वारे पहिले जाते. तसेच तेथे लोकसंख्येनुसार मुनिसिपल कौन्सिल, नगरसभा आणि प्रदेशसभा आहेत. श्रीलंकेचे लष्कर हे तटस्थ असून संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत त्यांचनी योगदान दिले आहे.

श्रीलंकेचा साक्षरतेचा दर ९२.५% हा विकसनशील देशात अत्यंत वरचा आहे. जन्मदर हजारी १७.६ आणि मृत्युदर हजारी ६.२ आहे. श्रीलंकेचे दरडोई उत्पन्न २००५ मध्ये दुप्पट झाले आणि त्याच काळात दरीद्र्याचे आणि बरोजगारीचे प्रमाण निम्म्यावर आले. आरोग्यसेवा, पिण्याचे पाणी, बॅंकिंग, सेवा, संगणकीकरण, दूरसंचार, वाहतूक ह्या क्षत्रात उत्तम प्रगति केली आहे.

स्वातंत्र्यानंतर श्रीलंकेला सर्वात गहन आणि दीर्घकाळ एका समस्येने त्रासले – ती म्हणजे तामिळ-सिंहली संघर्ष आणि त्यातून फोफावलेला तामिळ दहशतवाद. ब्रिटिश काळापर्यन्त तामिळ-सिंहली संबंध सौहार्दाचे होते. पण कोलंबोची जागा कोणासाठी असावी ह्यावरून नाराजी सूरू झाली. तामिळ नेत्यांनी ५०% आरक्षणाची मागणी केली, ती मान्य झाली नाही. स्वातंत्र्यनंतर १९५६ मध्ये सरकारने सिंहली भाषेला अधिकृत भाषा घोषित केले त्यावरून तामिळांना आपल्या अस्तित्वाला धोका असल्याचे जाणवले आणि त्यांनी शांततामय मार्गाने संघर्ष सुरू केला. परंतु ही तेढ वाढत गेली आणि तमिळांनी तमिळबहुल प्रदेशाचे वेगळे राज्य (ईलम) मागितले. ८० च्या दशकात तामिळ वाघांच्या (एल.टी.टी.ई.) संघटनेद्वारे सशस्त्र संघर्ष सुरू झाला. हजारो तामिळ मारले गेले आणि लाखो निर्वासित झाले. १९८५ ते २००५ ह्या दरम्यान श्रीलंका सरकार व तामिळ वाघांच्या दरम्यान चर्चेच्या अनेक बैठका झाल्या पण सर्व असफल ठरल्या. १९८७ मध्ये भारताच्या पुढाकाराने तेथे शांतिसेना पाठवण्यात आली. भारत श्रीलंकेच्या संविधांनांतर्गतच तमिळांना योग्य न्याय देण्याच्या बाजूने होता. एलटीटीई ची वेगळ्या राज्याची मागणी भारताला पसंत नव्हती. शांतीसेनेचा प्रयोग मात्र फासला आणि भारताविरूध्द असंतोष वाढला. भारताच्या तामिळनाडूमध्ये ह्याबद्दल फारच तीव्र भावना असतात. त्यामुळे भारत सरकारची कोंडी होते. श्रीलंका सरकार मात्र नोर्वे च्या मध्यस्थीने तमिळांशी वाटाघाटी करत होता, पण त्यातही यश आले नाही. शेवटी २६ वर्षे चाललेल्या ह्या संघर्षाचा अंत श्रीलंका सरकारने २००९ मध्ये जोरदार, व्यापक सैनिकी कारवाईदवारे केला. ह्या यशस्वी कारवाईमुळे श्रीलंकेत शांतता प्रस्थापित झाली असली तरी जागतिक स्तरावर मात्र श्रीलंकन लष्कराने अत्याचार करून मानवधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप होत आहे व युनोच्या तशा चौकशीला तोंड द्यावे गालत आहे. ह्या सर्व संघर्षाच्या काळात भारतातील तमिळांच्या मनात श्रीलंकन तमिळांबद्दल असलेल्या भावनिक पाठिंब्यामुळे भारताला सतत तारवरची कसरत करावी लागली. ह्या कळीच्या व गहन प्रश्नशिवाय काही अन्य प्रश्न होते – जसे, भारतीय मासेमाऱ्यांना सतत अटक करणे, त्रिंकोमाली बेटावर अमेरिकेला लष्करी तळासाठी परवानगी देणे, ईत्यादि. परंतु तणावातही दोन देशांतले संबंध चांगले राहिले.

## ४.६ बांग्लादेश

बांग्लादेशची निर्मिती १९७१ मध्ये भारताच्या सक्रिय पाठिंब्यामुळे झाली. त्यापर्वी तो पाकिस्तानचा भाग होता आणि त्याही पूर्वी, म्हणजे १९४७ पर्यन्त, अखंड भारताचा भाग होता. बांग्लादेशचा इतिहास भारतीय राजघराण्यांचा इतिहास आहे. येथे मौर्य वंश, मग्ध घराणे, सेना घराणे अशांची राजवट होती. बौध्द काळात पाल घराणे येथे सत्तेवर होते. त्यानंतर मुघल काळात खिलजी घराणे व बंगालच्या नबाबांचे येथे राज्य होते. ब्रिटिस काळात हा भाग बंगाल प्रांताचा हिस्सा होता आणि १९०५ व १९११ अश्या दोनदा बंगालचे तुकडे करण्याचे प्रयन्त हाणून पडण्यात आले. १९४७ ते १९७१ हा काळ पश्र्चिम पाकिस्तानच्या दडपशाहीचा होता. भूगोलाने वेगळे केलेले पूर्व व पश्र्चिम पाकिस्तान भाषा, संस्कृती, इतिहास ह्या आधारावर मनानेही कधीच एकसंघ व एकरूप झाले नाहीत आणि शेवटी ते वेगळे झाले.

बांग्लादेशचा भूगोल हा गंगा, ब्रम्हपुत्र व मेघाना ह्या मोठ्या नद्यांच्या त्रिभुज प्रदेशाचा आणि समुद्रासपाटीपासून फार खालच्या भागात आहे. येथील जमीन व मातीचा पोत नद्यांमुळे शेतीसाठी फारच पोषक झाला आहे. परंतु हा भाग समुद्रसपाटीपासून खाली असल्याने येथे दरवर्षी पुर, वादळे व अन्य नैसर्गिक संकटे येतात, तसेच हा भाग भूकंपप्रवणसुध्दा आहे.

बांग्लादेशच्या सुपीक मातीमुळे आणि दमट, समशीतोष्ण हवामानामुळे येथे तांदूळ, बटाटा, ज्युट, चहा, आणि काही उत्तम फळांचे उत्पादन होते. मासेमारी व त्याच्या निर्यातही बांग्लादेश आघाडीवर आहे. वस्त्रोद्योग व तयार कपड्यांचे उद्योग येथे प्रमुख असून त्याद्वारे देशात सर्वात जास्त परकीय चलन येते. अलीकडे उत्तम बंदरांचा विकास होऊन जहाजबांधणी उद्योगही चांगला वाढला आहे. काही पुरातन, ऐतिहासिक वास्तूंमुळे आणि सुंदरबन सारख्या जगातील एकमेव अशा तीन नद्यांच्या संगमावरील त्रिभुज प्रदेशात नैसर्गिकरित्या तयार झालेल्या पाणथळीच्या जंगलामुळे पर्यटन व्यवसायालही येथे वाव आहे. बांग्लादेशची जनता द्राविडी, इंडो-आर्यन, तिबेटी-बर्मी अशा संमिश्र वंशाची आहे. येथील संस्कृती बंगाली संस्कृती म्हणून ओळखली जाते. त्यात वेशभूषा, सण-वार, खान-पान सवयी, संगीत-वादन, वस्तूशिल्पकला, चित्रकाला इत्यादि घटकांचा समावेश होतो, ज्यावर हिंदू संस्कृतीची छाप आढळते. मुख्यतः येथे ८९% मुसलमान असून त्यातील बहुतांश इस्लामच्या सुफीपंथाचे पालन करतात. तसेच येथे हिंदू, बौध्द व ख्रिस्ती धर्माचे लोकही आहेत. ९८% जनता बंगाली भाषा बोलते आणि इंग्रजीसुध्दा संपर्क भाषा म्हणून वापरली जाते. बंगाली भाषा संस्कृतोद्भव, प्राचीन व अत्यंत समृद्ध भाषा असून मध्ययुगीन काळापासून २०व्या शतकापर्यंत उत्कृष्ट साहित्यनिर्मिती ह्या भाषेत झाली आहे. जनतेला बंगाली भाषा आणि बंगाली संस्कृती ह्याचा प्रचंड अभिमान आहे.

निर्मितीच्या वेळेस बांगलादेशची आर्थिक स्थिति फारच नाजुक होती. पण हळूहळू ती सुधारली. बांग्लादेश लोकसंख्येच्या बाबतीत जगात ८व्या क्रमांकावर आणि लोकसंख्या-घनतेच्या बाबतीत जगात ११व्या क्रमांकावर येतो. बांग्लादेश प्रथम प्रचंड वेदेशी कर्जत बूडाला होता, पण २०१० पर्यन्त हे प्रमाण २% वर आले. मृत्युदर, जीवनमान, आरोग्यसेवा, शैक्षणिक स्तर, साक्षरता, कुपोषण ह्याबाबतीत बांग्लादेश अजूनही फार मागे आहे. बांग्लादेशला विस्तृत आणि उत्तम समुद्रकिनारा लाभल्याने तेथे उत्तम बंदरे आणि समुद्री-वाहतुकीचे मार्ग आहेत, ज्यामुळे व्यापारात फायदा होतो. अलीकडे देशात रस्ते, रेल्वे, पूल, विमानतळ, मॉल्स बांधण्यात आले आहेत. नोबेल पुरस्कार प्राप्त महमद युनूस ह्यांच्या लघु-कर्ज योजनेमुळे बांगलादेशात दरिद्रयचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. बँकिंग, विमा, संगणक, सांदेशवहन, अशा क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. वीजनिर्मिती मात्र मागे पडली असून त्याचा विपरीत परिणाम उद्योगांवर पडतो. शेती ही निसर्गावर अवलंबून असून नैसर्गिक आपत्तिंमुळे फार नुकसान होते. त्यावर मात करण्यासाठी डच सहाय्याने बंधारे व कालवे बांधणे आणि आपतीग्रस्त जनतेसाठी नवीन व सुरक्षित वसतिस्थान निर्माण करणे असे उपाय योजले आहेत. पण ह्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर फारच मोठा बोजा पडतो. काही काळ राजकीय अस्थिरतेमुळेसुद्धा देशाचे नुकसान झाले परंतु २००५ मध्ये अर्थतज्ञ गोल्डमन सैक्सने बांग्लादेशचा समावेश एन-११ ह्या जगातील अकरा देशांत केला जे २१व्या शतकात खूप वेगात आर्थिक प्रगति करू शकतात.

बांग्लादेशमध्ये एकात्म संसदीय शासनव्यवस्था असून एक-सदनीय लोकनिर्वाचित संसद सर्वोच्च कायदेमंडळ आहे. पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे देशाचे वास्तविक शासक असून राष्ट्रध्यक्ष हे देशाचे नाममात्र प्रमुख आहेत. बांग्लादेशचे कायदे मुख्यतः ब्रिटिश कायद्यांवर आधारित असले तरी काही बाबतीत धार्मिक कायद्यांनुसार न्याय दिला जातो. बांग्लादेशच्या लष्कराने दोनदा उठाव करून सत्ता ताब्यात घेतली असली तरी नजीकच्या काळात त्याने तटस्थ भूमिका घेतली आहे. लष्कराला आपत्तिव्यवस्थापनाचे फार मोठे काम करावे लागते, तसेच युनोच्या शांतिसेनेमध्ये बांग्लादेशचे जवान सर्वात जास्त संख्येने सहभागी होतात. बांग्लादेशचे सात प्रशासकीय भाग केले असून, त्यांचेही ६४ जिल्हे आहेत. ह्यांचा कारभार

प्रशासकीय अधिकाऱ्यांद्वारे पहिला जातो. मोठ्या शहरांमध्ये महापालिका आणि अन्य भागात वॉडर्स आहेत, ज्यांच्या ५ वर्षांनी निवडणुका होतात.

भारत व बांग्लादेश ह्यांच्यात सुरवातीला अत्यंत चांगले संबंध होते, परंतु लष्करी राजवट आणि इस्लामी कट्टरवाद्यांच्या दडपणामुळे हळूहळू भारत विरोध वाढला. दोन देशात प्रमुख वाद – तिस्ता नदीचे पाणिवाटप, सीमेवर कुंपणाची उभारणी, फराक्का धरण, सीमेवरील घुसखोरी, भारताच्या अतिपूर्वेकडील राज्यात जाण्यासाठी बांग्लादेशातून मार्ग (चिकन कॉरीडॉर) आणि बंगालच्या उपसागरातील बेटांवर हक्क – हे आहेत. त्याबद्दल वाटाघाटी सुरू आहेत. ह्या वादांच्या भोवऱ्यातही दोन्ही देशात अनेक क्षेत्रात सहकार्यहोत आहे.

## ४.७ नेपाळ

नेपाळ हा भारताच्या उत्तरेला हिमालयाच्या पर्वतराजीमध्ये वसलेला देश आहे. त्याच्या उत्तरेला चीन आहे. चारही बाजूंनी जमीनीने वेढल्याने व्यापारासाठी त्याला शेजारच्या देशांवर अवलंबून राहावे लागते. नेपाळच्या उल्लेख प्राचीन हिंदू ग्रंथात आढळतो ज्यावरून नेपाळचा उगम एका ने नामक मुनीद्वाचे हजारो वर्षापूर्वी झाला असा इतिहास आहे. येथे नंतर गोपाल, महिशपाल, किरात अशा टोळ्या होत्या, त्या काही भागात राज्य करीत. तिबेटी-बर्मी वंशाचे लोकही पुरातन काळापासून येथे राहत होते. ख्रि. पू. ५०० च्या सुमारास येथे प्रथम शाक्य आणि नंतर मौर्य, गुप्त आणि लिछचवी अशा वंशाचे राजे सत्तेवर होते. मध्ययुगीन काळात ठाकुर व मल्ल घराण्यांचे राज्य होते. शेवटी १८व्या शतकात शाह घराण्याने विस्तृत प्रदेश काबिज करून खऱ्या अर्थाने आधुनिक नेपाळी राजेशाही रूजवली. १८१६ मध्ये ब्रिटीशांशी झालेल्या युध्दात काही प्रदेश त्यांना देण्यात आला. त्यानंतर शाह कुटुंबात अंतर्गत दुहीमुळे राणा वंशाच्या सेनापतीने सत्ता काबिज केली. हे शासक ब्रिटिश समर्थक होते आणि त्यांनी स्वतःला नाममात्र शासक करून ब्रिटिशांचे अंकित होण्यात धन्यता मानली. परंतु राणा शासकांच्या कारभारावर जनता नाराज होती. शेजारच्या भारताप्रमाणे येथेही नेपाळी कॉंग्रेसच्या नेतृत्वात लोकशाही प्रस्थापनासाठी आंदोलन सुरू झाले. १९५१ मध्ये राजे त्रिभुवन हे भारताच्या मदतीने राजे झाले आणि नेपाळी कँग्रेसच्या नेत्यांचे सरकार स्थापन झाले. १९५९ मध्ये 'पक्ष-विरहित पंचायत' नामक शासनाचा प्रयोग सुरू झाला. परंतु १९८९ मध्ये जन-आंदोलनामुळे तो बंद झाला आणि व्यापक संविधान दुरूस्त्या करून संसदीय शासन अस्तित्वात आले. ह्याच काळात नेपाळी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात राजेशाही विरूध्द आंदोलन तीव्र होत होते. २००१ मध्ये दुर्दैवी आणि रहस्यमय घटनेत शाही महालात युवराजाने राजा, राणी व इतर सात जणांची हत्या केली. नंतर आलेल्या राजाला जनसमर्थन नव्हते. परंतु त्यांनी २००५ मध्ये सर्व अधिकार स्वतःकडे घेतले त्यामुळे जनक्षोभ अधिकच वाढत गेला. शेवटी २००६ मध्ये पुनरूज्जीवित संसदेने ठराव करून नेपाळला एक धर्मनिरपेक्ष, सांघिय, गणराज्य घोषित केले आणि २००८ मध्ये राजाला राजमहाल सोडण्यास भाग पाडून जगातील एकमेव हिंदू राज्य संपुष्टात आले. ह्या सर्व आधुनिक इतिहासात नेपाळमध्ये कमालीची राजकीय अस्थिरता होती. कोणत्याच एका पक्षाला बहुमत नव्हते. परंतु २००८ मध्ये नेपाळी कम्युनिस्ट पक्षाने सर्वाधिक जागा जिंकून गठबंधन सरकार स्थापन केले.

ह्या सर्व अंधाधुंदीच्या काळात भारताने नेपाळला मदत करायचा प्रयन्त केला, परंतु त्याच्यापेक्षा जास्त प्रभाव चीनचा राहिला. नेपाळी साम्यवादी पक्षांमुळे आणि चीनने प्रचंड आर्थिक मदत केल्याने हे शक्य झाले. वास्तविक सुरवातीपासूनच नेपाळी जनतेत भारताबद्दल नाराजी होतीच, ती अलीकडच्या काळात वाढली. असे असले तरी दोन्ही देशातील करारांचे पालन व्यवस्थित सुरू होते. संस्कृतिक दृष्ट्या भारत व नेपाळ ह्यांच्यात फार पुरातन व घनिष्ठ संबंध आहेत. नेपाळचे राजघराणे भारतातील राजपूत घराण्यांशी विवाहसंबंधने जोडले आहेत. नेपाळमधील पशुपतिनाथ हे शिवमंदिर हिंदुंचे श्रध्दास्थान आहे, तर भारतातील पुरातन देवस्थाने नेपाळच्या हिंदुसाठी श्रध्येय आहेत. नेपाळचे सण, परंपरा, चालीरीती, धार्मिक विधी, संगीत, वादन लोकगीते ह्यावर हिंदू संस्कृतीचाच प्रभाव आहे. वेशभूषा, खानपान पध्दती, पदार्थाचे प्रकार, काही क्रीडा प्रकार हे भारतीय प्रकारांशी मिळते-जुळते आहेत.

नेपाळचा राजकीय प्रवास अत्यंत चढ-उताराचा आहे. राजेशाही ते संसदीय राजेशाही ते पक्ष-विरहित पंचायत आणि शेवटी सांघीय गणराज्य – असा त्याचा प्रवास आहे. आज नेपाळमध्ये नवीन संविधान तयार करण्याची प्रद्धिंया सुरू आहे, परंतु त्यात अनेक मतभेदांमुळे वेळ लागत आहे. सध्याच्या अंतरिम सरकारमध्ये अंतरिम राष्ट्रध्यक्ष, संसद व त्यातून निवडलेले पंतप्रधान व मंत्रीपरिषद आणि न्यायपालिका अशी रचना आहे. ६०१ सदस्यांची संसद नवे संविधान तयार करण्याचेसुध्दा काम करत आहे. नेपाळ मध्ये प्रशासकीय सोयीकरिता १४ झोन व ७५ जिल्हे आहेत. त्यांचा कारभार प्रशासकीय अधिकारी पाहतात.

नेपाळमध्ये भारतीय-तिबेटी, बर्मीज आणि काही प्रमाणात चीनी वंशाचे लोक आहेत. भारतीय वंशाचे लोक हे उत्तर भारतातून आले आणि आज त्यांनी नेपाळच्या सर्वच क्षेत्रात वर्चस्व प्राप्त केले आहे. गोरखा नामक वंशाचे लोक हे लढवय्ये, प्रामाणिक व मेहनती म्हणून प्रसिध्द असून भारतात ब्रिटिश काळापासूनच सैन्यात खास गोरखा रेजीमेंट निर्माण करून त्यांना सेवेत घेण्यात येत असे, जी रेजीमेंट आजही अस्तीत्वात आहे. देवनागरी लिपीत लिहिली जाणारी आणि संस्कृतोद्र्व अशी नेपाळी भाषा येथे प्रामुख्याने बोलली जाते. शिवाय भोजपुरी, मैथिली, थारू, तामांग, मगर, दोतेली अशा भाषाही येथे बोलल्या जातात. ८१ज्ञ हिंदू असून बौध्द, ख्रिश्चन, मुस्लिम, मंधुम अश्या धर्माचेही लोक येथे आहेत. बौध्द धर्माचा संस्थापक सिध्दार्थ गौतम ह्याचे जन्मस्थान नेपाळच्या तराई प्रदेशातील कपिलवस्तू जिल्ह्यातील लुंबिनी येथे आहे. ही जागा युनेस्को द्वारे जागतिक ऐतिहासिक वास्तु म्हणून संरक्षित आहे.

नेपाळ जगातील अति-मागास देशांपैकी एक आहे. येथील मुख्य व्यवसाय शेती असून हिमालयाच्या बर्फाच्छादीत प्रदेशात ती शक्य नसल्याने दमट व काहीश्या उष्ण हवामानाच्या भारताच्या सीमेजवळील तराई प्रदेशतच शेती होते. प्रामुख्याने चहा, तांदूळ, मका, उस, तंबाखू, ज्युट ही पिके होतात. तसेच दूध व दुग्धजन्य पदार्थांचेही उत्पादन होते. नेपाळच्या नैसर्गिक सौदर्यामुळे आणि धार्मिक स्थाळांमुळे पर्यटन हा फार मोठा व्यवसाय आहे. पण राजकीय अस्थिरतेमुळे हा उद्योग मंदावला आहे. तयार लोकरी कपडे, चामड्याच्या वस्तु, स्थानिक कलाकुसरीच्या वस्तु व दागिने अशा वस्तु निर्यात केल्या जातात. पाणी ही एकमेव मुबलक नैसर्गिक संपत्ती आणि नद्या व पर्वत रांगांची अनुकूल स्थिति असल्याने येथे वीजनिर्मितीला भरपूर वाव असूनही त्याकडे दुर्लक्ष झाले. ज्युट, लोकर, साखरनिर्मिती अश्या उद्योगांव्यातिरिक्त अन्य उद्योग फारसे वाढले नाहीत. सामुदायिक जंगल व्यवस्थापनातून काही पारंपरिक उपजीविकेची साधने संवर्धित करण्याचे प्रयन्त अलीकडे झाले आहेत.

नेपाळमध्ये निरक्षरतेचे प्रमाण, जन्म-मृत्यू दर, बाल-मृत्यू दर हे फार जास्त आहे. आरोग्यसेवा अत्यंत असमाधानकारक असून जूने व छोटे मलेरिया, डायरिया, गलगंड, कुष्ठरोग, क्षयरोग, पोलिओ असे रोग येथे आढळतात. एच.आय.व्ही. चे प्रमाणही येथे गंभीर आहे. महागाई, कुपोषण, बेरोजगारी, दारिद्र्य ह्याचेही प्रमाण जास्त आहे. मादक द्रव्यांचे सेवन, बाल-गुन्हेगारी आणि वेश्याव्यवसाय येथे फारच वाढला आहे व त्यामुळेच एच.आय.व्ही. व अन्य लैंगिक रोग येथे जास्त आढळतात. हिमालयातून गंगा, ब्रम्हपुत्र व इंडस ह्या नद्या उगम पावतात, त्यामुळे पुर येतो. तसेच हिमालयाची घसरण होत असल्याने भुस्खलनाची गंभीर समस्याही नेपाळला भेडसावते आहे. नेपाळचा सर्वाधिक खर्च पेट्रोलजन्य पदार्थाच्या आयातीवर होतो. अलीकडे विदेशात गेलेल्या नेपाळी नागरीकांकडून बऱ्यापैकी विदेशी चलन नेपाळला मिळते आहे. नेपाळची प्रगति होण्यासाठी तेथे प्रथम संविधान तयार होऊन राजकीय शांतता प्रस्थापित झाली पाहिजे. तसेच खंबीर नेतृत्व सत्तेवर आले पाहिजे.

## ४.८ अफगाणिस्तान

अफगाणिस्तान हा सार्क मध्ये नंतर सामील झालेला आठवा देश आहे. दक्षिण आशियाबरोबरच तो पश्चिम व मध्य आशियाचाही भाग म्हणून गणला जातो. अफगाणिस्तानला समुद्रकिनारा नसून त्यांच्या दक्षिण व पूर्वेकडे पाकिस्तान, पश्चिमेकडे इराण, उत्तरेकडे तुर्कमेनिस्तान, उझ्बेकिस्तान व ताजिकिस्तान आणि ईशान्येकडे चीन वसले आहेत. अफगाणिस्तान हा अत्यंत विरोधी हवामानाचा देश असून उत्तरेकडे $-15^{\text{O}}$ पर्यन्त थंडी तर पूर्व व दक्षिणेकडे $35^{\text{O}}$ पर्यन्त उष्णता वाढते. येथे हिंदुकुश, आमीर अश्या पर्वतरांगा आणि आमु सारख्या नद्या व तलाव आहेत. तरीही. तरीही अफगाणिस्तान शुष्क प्रदेश आहे. हिंदुकुशचा भाग भूकंप-प्रवण प्रदेश आहे. अफगाणिस्तान हा प्राचीन जमिनी व्यापाराचा आणि जनतेच्या स्थलांतराचा प्रमुख मार्ग होता. तसेच ह्या प्रदेशाने अनेक आक्रमणे व लढाया अनुभवल्या आणि अनेक घराणी व राजांच्या सत्ता भोगल्या. त्यामध्ये ग्रीक, कुशाण, मौर्य, कबुलशहा, सफरीद, गझनवी, घोरी, तीमुर, मुघल, दुर्राणी इत्यादि घरण्यांचा समावेश आहे. इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात अफगाणिस्तान मेसोडोनीया, मौर्य आणि मुघल अश्या साम्राज्याचा भाग होता. इस्लामी सुवर्णयुग म्हणून ओळखले जाणाऱ्या ११ व्या शतकात अफगाणिस्तानमध्ये महम्मद गझनीचे राज्य होते आणि तो इस्लामी जगताच्या केंद्रास्थानी होता. भारतातील मुघल साम्राज्याच्या काळात येथे बाबर आणि लोधी साम्राज्याचा भाग होता. १७व्या शतकात होतकी घराण्यातील मीर वाईज होतक याने पर्शियाच्या जोखडातून अफगाणिस्तानला मुक्त केले आणि आधुनिक अफगाणिस्तानची उभारणी केली. १८व्या शतकात नादीर शाह ने साम्राज्य पूर्वेकडे दिल्ली पर्यन्त वाढवले. १७६१ मध्ये अहमद शाह अब्दालीने पानीपतच्या युध्दात मराठ्यांचा पराभव केला. भारतात ब्रिटिश राजवट आल्यावर त्यांचे अफगाणिस्तानवर पूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्याचे प्रयन्त फारसे यशस्वी झाले नाहीत. परंतु त्याचे राजनैतिक संबंध ब्रिटीशांच्या मार्फत होऊ लागले. त्यांनंतर वेगवेगळे सत्ताधारी तेथे आले, ज्यांनी अफगाणिस्तानचे स्वातंत्र्य व विशिष्ठ ओळख कायम ठेवत राज्य केले. ब्रिटिशांनी अफगाणिस्तानच्या सीमारेषा निर्धारित केल्या, जसे डुरँड रेषा, जी अजूनही अफगाणिस्तान-पाकिस्तान मध्ये कायम आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर अफगाणिस्तान शीतयुध्दाच्या राजकरणात सापडून अमेरिका व सोविएत रशिया ह्यांच्या चढाओढीत अडकला. अफगाणिस्तानचे व्यापारी, सामिरक व राजनैतिक महत्व ओळखून दोन्ही देशांनी हरप्रकारची मदत अफगाणिस्तानला दिली.

१९७३ मध्ये राजे झहीर शहाविरूध्द बंड करून दाऊद खानने सत्ता काबिज केली. १९७८ मध्ये साम्यवादी पी.डी.पी.ए. पक्षाने उठाव केला आणि सत्ता बळकावली. परंतु त्या पक्षातही अंतर्गत मतभेदांमुळे नवे नेते सत्तेवर येत गेले. १९७९ मध्ये सोविएत रशियाने अफगाणिस्तानात थेट सैन्य घुसवून आपले अंकित सरकार स्थापन केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने मुजाहिदीन व पाकिस्तानात आश्रयाला आलेले अफगाण निर्वासितांना भरपूर मदत देणे सुरू केले. ह्यामुळे अफगाणिस्तानात साम्यवादी नेते आणि कट्टर इस्लामी विचारांचे समर्थक 'तालिबान' ह्यांच्यात यादवी सुरू झाली. दोन्ही गटांकडे शस्त्रसाठा असल्याने नागरी युध्दात प्रचंड हानी झाली. त्याचप्रमाणे ह्या युध्दाला ताझ्जिक, उझ्बेकी, हाझरा असा वांशिक आणि शिया-सुन्नी असा धार्मिक रंगसुध्दा चढला. त्यामुळे गुंतागुंत अधिकच वाढली. रशियाने सैन्य मागे घेतल्यावर अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीसाठी प्रयत्न सुरू झाले. २००१ मध्ये नाटो-प्रणीत सैन्याने तालीबानी तळांवर हल्ले केले आणि त्यांना पलायन करण्यास भाग पाडले. काही महत्वाची ठाणी ताव्यात आल्यावर युनोच्या पुढाकाराने International Security Assistance Force स्थापून अफगाणिस्तानच्या सुरक्षेसाठी व पुनर्बांधणीसाठी प्रयत्न सुरू झाले आणि त्यादृष्टीने पहिले पाऊल म्हणून हमीद करझाई हे पुरोगामी, सुधारणावादी नेते तालीबानी शासनाला उलथून अध्यक्ष झाले. मध्यंतरी तालीबानी गटाचा वैचारिक व राजकीय सर्वेसर्वा नेता ओसामा बिन लादेन ह्याने अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला करवून अमेरिकरलाच नव्हे तर साऱ्या जगाला हादरवले आणि जगातील दहशतवादाचा चेहरा व मुख्य सुत्रधार म्हणून ओसामा गणला गेला. त्याचाही खातमा अमेरिकेने शिताफीने पाकिस्तानमधील त्याचे गुप्त ठोकाण जलालाबादवर हल्ला करून बदला घेतला. आजही अफगाणिस्तानमधील परिस्थिति पुर्णपणे निवळली नाही. अजूनही तेथे कट्टरवादी हल्ले होतातच आणि पाक-अफगाण सीमेवरही संघर्ष सुरूच असून रालीबानी कट्टर नेते व विचार पुर्णपणे नष्ट झालेले नाहीत. नाटो सैनीक २०१४ पर्यन्त माघारी जाणार आहे आणि अफगाणिस्तान मध्ये नव्या संविधानांतर्गत निवडणुका होणार आहेत. त्यानंतर तेथे काय परिस्थिति राहील हे सांगणे कठीण आहे.

अफगाणिस्तानमध्ये ९९% इस्लामचे अनुयायी असून त्यातील ८५% सुन्नी आहेत. अन्य पारसी, ख्रिस्ती, बौध्द, हिंदु आणि शीख असून एक नुरीस्तानी किंवा काफिरी म्हणून प्राचीन जादूटोणा व तत्सम प्रथा पाळणारी जमातही येथे आहे. बहुतांश जनता अफगाणी, ग्रीको-इराणी, तुर्की वंसाची आहे. पुश्तु व दरी ( पर्शियन ) ह्या दोन प्रमुख भाषा असून अन्य ३० पेक्षा जास्त भाषा येथे बोलल्या जातात. पर्शियन ही उच्चभ्रू व सभ्य भाषा समजली जाते आणि तीच शासकीय कामकाजात व दैनंदिन व्यवहारात वापरली जाते. येथील संस्कृती फार प्राचीन असून त्यावर ग्रीक, इराणी, हिंदू व बौध्द संस्कृतीचा प्रभाव दिसतो. कठीण भौगोलिक स्थितीमुळे येथील जमाती अजूनही अनेक छोट्या टोळ्यांमध्ये राहतात आणि त्यामुळे त्यांचे समाज-जीवन खडतर, भटक्या स्वरूपाचे व साधे बनले आहे. तसेच त्यांचा स्वभाव अत्यंत आक्रमक व लढाऊ बनला आहे. अफगान लोकंना आपला इतिहास, संस्कृती, परंपरा ह्यांचा प्रचंड अभिमान असून त्यासाठी किंवा कोणतीही समस्या सोडण्यासाठी ते एकदम आक्रमक होतात. अफगाणिस्तान प्राचीन काळात हिंदू व बौध्द संस्कृतीचे प्रमुख केंद्र होते हे अनेक मंदिरे, स्तूप, मूर्त्या, शिलालेख, ह्यातून सिध्द होते. अलेक्झांडर च्या काळातील आणि नंतर येथे प्रसारित झालेल्या इस्लामी संस्कृतीचीही वैशिष्ठे येते आढळतात. त्यामुळे येथे पर्यटनासाठी भरपूर वाव आहे, पण राजकीय अस्थिरतेमुळे ते विकसित होऊ शकले नाही. तसेच येथे अन्य उद्योगही फारसे विकसित झाले नाही. मात्र पारंपरिक गालिचे आणि सतरंज्या विणण्याचे उद्योग येथे आहेत ज्यांच्या निर्यातीतून परकीय चलन मिळते. दुसरा जुना व्यवसाय म्हणजे अफुची शेती ज्यावर लाखो लोक अवलंबून

आहेत. अफगाणिस्तान हा जगात अफूच्या चोरट्या व्यापारासाठी प्रसिध्द आहे. ह्याचा परिणाम मादक द्रव्यांच्या व्यसनाधीनतंवर होतोच शिवाय शस्त्रांचा चोरटा व्यापार करून दहशतवादाला मदत करणेसुध्दा शक्य होते. ह्यामुळे हा प्रश्न अधिकच क्लिष्ट झाला आहे. मात्र अलीकडे आफुच्या शेतीवर सरकारने बंधने आणली आहेत. तसेच अलीकडच्या काळात विदेशात शिकून आलेल्या तरूणांनी बांधकाम व्यवसाय धडाक्यात सुरू केला असून सरकारच्या व परकीय मदतीने मोठे प्रकल्प येथे सुरू आहेत. अफगाणिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा कणा म्हणजे येथे असलेल्या तेल, नैसर्गिक वायुम तांबे, लोखंड, लिथियम, कोळसा, सोने व अन्य महत्वाच्या खनिजांचे साठे, ज्यामुळे तेथे खाजगी उद्योग विस्तारण्यास वाव असून देशाला प्रचंड परकीय चलन मिळू शकते. गेल्या दशकात येथे दूरसंचार, संगणक, बँकिंग अश्या व्यवसायात वाढ झाली आहे. अफगाणिस्तान मध्ये आरोग्यसेवा फारच तोकडी असून विविध प्रकारचे रोग आढळतात आणि बाल-मृत्युदर, माता-मृत्यूदर जास्त आहे. विशेष म्हणजे येथे अपंगाची संख्या सर्वाधिक आहे. ह्याचे कारण खाणीमध्ये होणारे अपघात. गेल्या दशकात मात्र अन्य देशांच्या मदतीने येथे उत्तम व आधुनिक दवाखाने उघडले आहेत. अस्थिरतेमुळे शिक्षणावर विपरीत परिणाम झाला होता पण २००१ मध्ये नव्या शाळा उभारून राष्ट्रीय शिक्षणाचे पुंनरूज्जीवन करण्यात आले. येथे जुनी ६ विद्यापीठे होतीच शिवाय २००६ मध्ये अमेरिकरच्या पुढाकाराने एक ने व आधुनिक विद्यापीठ सुरू करण्यात आले. आज साक्षरता वाढत आहे आणि चांगल्या सुविधांमुळे लोकांचे जीवनमानही उंचावत आहे. अफगाणिस्तानात पारंपारिक संगीत प्रसिध्द आहे आणि त्याच प्रमाणे हिंन्दी चित्रपटांची गाणीही खूप प्रसिध्द आहेत. येथे हिंन्दी चित्रपट आवडीने पहिले जातात आणि बऱ्याच हिंन्दी चित्रपटांचे कथानक अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवर बेतले आहे. अफगाणिस्तान एक अत्यंत मागास देशाच्या छबितून हळूहळू बाहेर येत असून त्याची पुढील प्रगति राजकीय स्थितिवर अवलंबून आहे.

## ४.९ भुतान व मालदिव

दक्षिण आशियातील सर्वात लहान आणि विकासात सर्वात खालच्या पातळीवर असलेले देश भुतान व मालदिव आहेत. भुतान हा भारताच्या पूर्वेला हिमालयच्या पूर्वेकडील शेवटच्या पर्वतरांगांमध्ये वसलेला देश असून त्यांच्या पूर्वेला चीन व इतर तीन बाजूस भारत आहे. येथे पूर्वी अनेक टोळ्या होत्या त्यांना १७व्या शतकात तिबेटमधून धार्मिक अत्याचारामुळे पलायन करून आलेल्या लामा वंशाच्या नाम्याल नामक योध्याने एकत्र केले आणि एका समाईक कायद्याद्वारे भूतानची राजवट स्थापन केली. ब्रिटिश काळात जवळचे काही प्रदेश काबिज केल्याने ब्रिटिश व भूतानच्या राजांमध्ये युध्द झाले पण काही प्रदेशांच्या बदल्यात ब्रिटीशांशी तह होऊन शांतिपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. ह्याच काळात राजघराण्यात यादवी होऊन वांगचूक घराणे सत्तरेवर आले जे आजही आहेत. १९५३ मध्ये राजाने लोकशाही प्रक्रियेचा भाग म्हणून १३० सदस्यांची एक संसद आणि १९६८ मध्ये मंत्रीपरिषद निर्माण केली. त्यातच पुढे १९९९ मध्ये जनता व प्रसारमाध्यमांवरील बंधने उठवून २००५ मध्ये नवे संविधान तयार करण्यात आले आणि २००७ मध्ये देशात पहिल्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यानंतर २००८ मध्ये राजाने स्वेछेने सत्ता निर्वाचित सत्ताधाऱ्यांकडे सुपूर्द केली आणि भुतानचे अमर्याद राजेशाहीकडून संवैधनिक राजेशाहीत परिवर्तन झाले. हा बदल अत्यंत क्रांतिकारी, समयोचित आणि शांततापूर्ण होता. भुतान चे २० प्रशासकीय विभाग आहेत. त्यांचे प्रशासन स्थानिक निर्वाचित मंडळातर्फे पहिले जाते. मोठ्या शहरात नगर पालिका आहेत. भुतानचे परराष्ट्र संबंध १९४९ पासून भारतातर्फे

पहिले जात होते, पण २००७ पासून भूतानचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व मान्य करून भारताने परराष्ट्र धोरणातून आपले अंग काढून घेतले. भूतानचे सर्वच प्रमुख देश व संघटनांशी संबंध आहेत, परंतु चीनशी मात्र अधिकृत संबंध प्रस्थापित झाले नाहीत. चीन व भूतान मधील मधील सीमा निर्दारित नसून त्याबाबत अजूनही वाद आहेत. भारत व बांग्लादेशचे नागरिक वगळता इतर सर्वच देशांच्या पर्यटकांना भूतानमध्ये फिरण्यासाठी प्रती दिन २५० डॉलर द्यावे लागतात. त्यामुळे पर्यटन व्यवसाय येथे विकसित झाला नाही. वास्तविक तो भुतान च्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा आधार आहे. शेती हा येथे पारंपरिक आणि मोठा व्यवसाय आहे, ज्यात तांदूळ, मिरची, सफरचंद व लिबवर्गातील फळे, बार्ली, अशी पिके होतात. अन्य उद्योगात वन-संरक्षण, हस्तकला, गृहोद्योग, पशू-पालन अशी क्षेत्रे आहेत. जल-विद्युत निर्मिती भारताच्या मदतीने विकसित झाली असून त्यातून चांगले उत्पन्न मिळते. तसेच मसाल्याचे पदार्थ, विलायची, हस्तकलेच्या वस्तु, पारंपरिक दागिने, मौल्यवान खडे व रत्ने, इमारती लाकूड, सीमेंट, कॅल्शियम कार्बाइट, जिप्सम, फळांवर प्रक्रिया करून केलेले पदार्थ आणि मद्य ह्यांची निर्यात केली जाते. अलीकडच्या काळात काही आधुनिक उद्योग येथे उभारले गेले आहेत. तसेच, रस्ते, बांधकाम उद्योग, इ-कॉमर्स असे नवे उद्योग सुरू झाले आहेत. तसेच भारताच्या मदतीने रेल्वे मार्ग बांधणे सुरू आहे. भुतान चे चलन गुल्तृम (Ngultrum) भारताच्या रूपयाशी जोडले गेल्याने आणि भुतानचा ६०% वित्तीय खर्च भारत करत असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारे सर्व बरे-वाईट परिणाम भुतानवरही दिसतात.

भुतानमध्ये पूर्व भुतानी आणि पश्चिमी भुतानी लोक प्रामुख्याने आहेत आणि काही नेपाळी वंशाचे लोक आहेत. येथे ७६% लोक बौध्द असून, २३% हिंदू आणि १% इतर धर्माचे आहेत. मुख्य भाषा भुतानी असून इतर ५३ भाषा बोलल्या जातात. भूतानची संस्कृति ही बाह्य प्रभावापासून मुक्त राहिली असून, वेशभूषा, संगीत, नृत्य, वास्तूकला, वादन, पाककला ह्याबाबतीत येथे स्वतंत्र व खास वैशिष्टे आढळतात. बौध्द धर्म अधिकृत धर्म असून त्याचे दृश्य अवशेष येथे आढळतात. तसेच येथे धार्मिक स्वातंत्र्य आहे. मात्र, नेपाळी हिंदू निर्वासित आणि तिबेटमधून आलेले निर्वासित ह्यांचे भुतानी जनतेशी खटके उडतात. अधिकृत नागरिक म्हणून सरकार त्यांना मान्यता देत नाही आणि त्यांच्या बाबतीत फार कडक कायदे आहेत. त्यामुळे मनावाधिकाराच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

मालदिव हा भारताच्या दक्षिणेला हिंन्दी महासागरात वसलेला बेटांचा देश आहे. भारताच्या लक्षदिव बेटांच्या साऊथ-वेस्टला ४०० की. मी. वर आणि श्रीलंकेच्या साऊथ-वेस्टला ७०० की. मी. वर मालदिवच्या सुमारे ११०० बेटांची गोलाकार रचना आहे. त्यांचे एकत्र गट करून २६ अटॉल बनले आहेत. ११०० बेटांपैकी फक्त १८५ वर मानवी वस्ती आहे. 'मालदिव' हा शब्द संस्कृत मधून उत्पन्न झाला असून त्याचा अर्थ 'दिव्यांची माला किंवा हार' असा होतो आणि मालदिवच्या बेटांची रचना माळेप्रमाणे गोल असल्याने त्याला हे नाव समर्पक ठरले आहे. भारत व श्रीलंकेतून आलेल्या लोकांचे येथे प्राचीन काळापासून सुरू झाले. नंतर भारताच्या उत्तरेतून आणि आखाती परदेशातूनही लोक आले. कालौघात येथे जनतेची सरमिसळ झाली आणि त्यामुळे येथे भारताच्या आर्यन व द्रविड संस्कृतीची, बौध्द संस्कृतीची आणि इस्लामी संस्कृतीची अशी संमिश्र वैशिष्टे आढळतात. बौध्द धर्माचा प्रसार येथे अशोकाच्या काळात झाला आणि त्याचा प्रभाव १२ व्या शतकापर्यंत राहिला. त्यानंतर इराणी युसुफ ताबरिजी ह्याने इस्लाम धर्म येथे रूजवला आणि आज मालदिवमध्ये ९८% मुस्लिम आहेत. १९६८ मध्ये एका जनमताद्वारे मालदिवने अध्यक्षीय पध्दत स्वीकारली आणि ८०० वर्ष जुनी राजेशाही संपली.

१९७८ मध्ये मौमून अब्दुल गयुम हे अध्यक्ष झाले आणि पुढील ३० वर्षे त्यांनी राजकीय स्थैर्य दिले. १९८०, १९८३ आणि १९८८ मध्ये सत्ता उलथवण्याचे प्रयत्न झाले, पण भारताच्या हस्तक्षेपाने ते अयशस्वी झाले. मालदिवचे संविधान २००८ मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारित करण्यात आले आणि न्यायपालिका इतर दोन संस्थापासून स्वतंत्र करण्यात आले. इस्लाम मालदीवचा अधिकृत धर्म असून संविधांनातील कायद्यामुसार न्याय दिला जातो. जेथे संविधानातील तरतुदी अपुऱ्या पडतात तेथे शरीयत प्रमाणे न्याय दिला जातो. प्रशासकीय दृष्ट्या मालदीवचे २६ अटॉल हे प्रत्येकी एका मुख्य अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली असतात. हे अटॉल ७ प्रशासकीय विभागात बांधले आहेत.

मालदिव हे समुद्रात असल्याने येथे वर्षभर दमट व उष्ण हवामान असते. हा देश समुद्रासपाटीपासून फक्त १.५ मीटर उंच आहे आणि हवामानाच्या झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे ही सर्व बेटे भविष्यात समुद्रात बुडण्याची भीती आहे. ही मालदिवची सर्वात गंभीर समस्या आहे. मालदिवची अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारित आहे, ज्यातून २८% उत्पन्न मिळते. सरकारने शांत व स्वच्छ बेटांवर समुद्रकिनारे विकसित केले असून तिथे सर्व आधुनिक सोयीसह रीसॉल्ट बांधले आहेत. माले ह्या राजधानीत असलेले विमानतळ आधुनिक पध्दतीने विकसित करण्यात आले आहे. मासेमारी येथे पुरातन व्यवसाय असून अत्यंत उत्तम व दुर्मिळ जातीचे मासे येथे मिळतात, ज्याच्या निर्यातीतूनही सुमारे १५% उत्पन्न मिळते. मासेमारीचे तंत्रसुध्दा जपानच्या साहाय्याने आधुनिक पध्दतने करण्यात आले आहे. बाकी येथे नारळ, पपई अन्य फळे आणि काही प्रमाणात तांदूळ अशी उत्पादने होतात. पिण्याचा पाण्यासाठी समुद्राच्या पाण्यातून क्षार काढण्याची यंत्रे येथे वापरली जातात.

मालदिव ची जनता ही द्रविड-आर्यन अश्या मिश्र वंशाची असून त्यामुळे येथील संस्कृतिक वैशिष्टे संगीत, वादन, कला, नृत्य-ह्यावरहि तीच छाप दिसते. येथील भाषा धीवेही सिंहली-तामिळ अश्या मिश्रणातून तयार झाली आहे. मालदीवमध्ये प्राथमिक शिक्षण मिळते, मात्र उच्च शिक्षणासाठी इजिप्त किंवा अमेरिकेत जावे लागते.

## ४.१० दक्षिण आशियातील सहकार्याला पूरक बाबी

वर आपण दक्षिण आशियातील देशांची मूलभूत माहिती घेतली. त्यातून काही समान वैशिष्टे प्रकर्षाने लक्षात येतात. ह्या समानतेमधुन दक्षिण आशियातील देशांमध्ये सहकार्याला पूरक असा समान धागा पुढील गोष्टीमधून लक्षात येतो.

१) दक्षिण आशियाला १०,००० वर्षाचा इतिहास आणि तेवढीच जुनी संस्कृती आहे. प्राचीन काळी फार मोठी, विकसित, सुसंस्कृत अशी सभ्यता अस्तीत्वात होती, ज्याची तुलना प्राचीन चीनी, इजिप्शियन, मेसोपोटेमियन अशा सभ्यतांशी केली जाते. दक्षिण आशियातील मोहेंजोदारो-हरप्पाची सभ्यता आणि नंतरची वैदिक काळातील सभ्यता व आर्य संस्कृती हे सर्व सिंधु (इंडस), काबुल, गोमती, झेलम, रावी, बियास, सतलज आणि गंगा ह्या नद्यांच्या भोवती विकसित झाल्या. 'सप्त-सिंधु' नामक अत्यंत प्रगत व संपन्न प्रदेश ह्याच दक्षिण आशियाच्या मध्यभागी येतो. दक्षिण आशियाचा इतिहास हा स्थालांतराचा इतिहास आहे. मध्यपूर्वेकडून आलेले लोक दक्षिण आशियाच्या सप्त-सिंधु

भागात वसले, त्यानंतर तिथून ते आणखी पुढे दक्षिणेकडे व पूर्वेकडे सरकले. नंतरच्या काळात श्रीलंका, मालदिव येथे व्यापार व धर्म प्रसारासाठी लोक गेले व स्थायिक झाले. १९व्या शतकापर्यंत चाललेल्या ह्या स्थालांतरामुळे आणि लोकांच्या मिसळण्यामुळे दक्षिण आशियातील जनता विशिष्ठ वंशाची आणि संस्कृतीची झाली आहे.

२) भौगोलिक दृष्ट्या दक्षिण आशिया हा एक सलग भूप्रदेश आहे. हिमालय, ऋतु ह्यात एकसारखेपणा आढळतो. येथील मातीचा पोत, जीवसृष्टी, वनस्पतीसृष्टी ह्यातही साधर्म्य दिसते. शेती व उगवणारी पिके ह्यातही साम्य दिसते. त्याचबरोबर पुर, वादळ, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीही येथे सारख्याच भेडसावतात. आजच्या काळात येथील पर्यावरणीय समस्याही सारख्याच आहेत.

३) दक्षिण आशियातील आठही देशांचे एकमेकांशी प्राचीन काळापासून घनिष्ठ संबंध आहेत. किंबहुना इतिहासाच्या काही कालखंडात हे देश एकाच साम्राज्याचा भाग होते. मौर्य, गुप्त, हर्षवर्धन, अशोक, अकबर ह्यांच्या काळात अफगानिस्तान पासून म्यानमारपर्यत साम्राम्य पसरले होते. इतर काळात जरी राज्ये वेगवेगळी झाली असली तरी त्यांचात राजकीय, व्यापारी, सांस्कृतिक संबंध कायम होते. श्रीलंकेतील सिंहली हे भारतातील बिहार, उत्तरप्रदेश मधून आलेल्या जनतेचे वंशज आहेत. नेपाळमधील राजघराणी भारतातील राजपूत घराण्याचे वंशज आहेत. पाकिस्तान, बांग्लादेश व भारतामधील जनताही एकाच वांशिक गुणसूत्रांचे धारक आहेत.

४) लोकांच्या स्थलांतराने आणि परस्पर देवाणघेवाणीने सर्वात जास्त प्रभाव येथील सांस्कृतिक घटकांवर, लोकांच्या दैनंदिन जीवनावर आणि एकूणच जीवनदृष्टीवर दिसून येतो. मूलतः येथे वैदिक-हिंदू संस्कृतीचा प्रसार सर्वात जास्त काळ व सर्वदूर पसरला होता. त्यामुळे येथील भाषा, साहित्य, नाट्य, गायन, वादन, नृत्य, चित्रकला, वास्तूकला, हस्तकला, मूर्तिकला, इत्यादीवर ह्याच संस्कृतीचा प्रभाव दिसतो. तसेच बौध्द संस्कृतीची वैशिष्टे नंतर आली आणि त्याही नंतरच्या काळातील आक्रमणांमुळे ग्रीक-रोमन, इस्लामी व ख्रिस्ती संस्कृतीची काही वैशिष्टे येथे रूजली. भाषेबद्दल प्रमुख्याने जाणवते ते म्हणजे भौगोलिक सीमा न मानता भाषा ह्या प्रदेशाला एकत्र आणते. उर्दू व पंजाबी भाषा भारत व पाकिस्तान मध्ये बोलली जाते, बंगाली भारत व बांग्लादेशमध्ये समान आहे आणि तामिळ भारत श्रीलंकेमधील दुवा आहे. हिंन्दी ही कमी अधिक प्रमाणात सर्वच दक्षिण आशियात लोकांना समजते. ह्या भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य हे सर्व परदेशात वाचले जाते. २०व्या शतकात इंग्रजी ही एक समान भाषा झाली आहे. जनतेमध्ये एकमेकांशी वागण्याच पध्दत, नमस्काराची पध्दत, कपडे व वेशभूषा, दागिने, सण, जन्म-लग्न-मृतू ह्याबदलचे विधी व चालीरीती, खान-पानाच्या पध्दती इत्यादीबद्दल पुष्कळ साधर्म्य आढळते.

५) धार्मिक बाबतीत दक्षिण आशिया एक अजब प्रदेश आहे. जगातील सर्व धर्माचे अनुयायी येथे आढळतात. हिंदू, बौध्द, जैन, शीख हे धर्म भारतात निर्माण झाले आणि जगभर पसरले. इस्लाम, ख्रिश्चन, जुडाईसम (ज्यू), झेड-अवेस्ता (पारशी) हे धर्म बाहेरून येथे आले अन स्थिरावले. हिंदू धर्म येथील सर्वात प्राचीन, सर्वदूर पसरलेला आणि व्यापक धर्म आहे. हिंदूची काही धार्मिक स्थळे नेपाळ (पशुपतिनाथ मंदिर), श्रीलंका, बांगलादेशात आहेत. शिख धर्माचा संस्थापक नानक यांचे जन्मस्थान बाबाडेरानानक पाकीस्तानात

आहे. गौतम बौध्दाचे जन्मस्थान लुंबिनी हे नेपाळमध्ये असून बामियन बौध्द ह्या प्रसिध्द मुर्त्या व गुंफा अफगाणिस्तानात आहेत. श्रीलंकेत बौध्दाशी संबंधित प्राचीन अवशेष व स्तूप आहेत. नेपाळ व श्रीलंकेतील हिंदूना श्रध्देय अशी ठीकाणे भारतात आहेत. दक्षिण आशियातील मुसलमानांना पवित्र असे प्रसिध्द दर्गे व मशिदी भारतात आहेत. ही धार्मिक वास्तविकता येथील जनतेला एकत्र बांधण्यास समर्थ आहे. त्याशिवाय कालौघात अन्य सर्व धर्मानी आणलेल्या तत्वज्ञानाची हिंदू विचारांशी देवाण-घेवाण झाली. मुळात सहिष्णू व सर्व उत्तम चिवाराचे स्वागत करणारा हिंदू धर्म हा एक राजकीय-सामाजिक-न्यायिक जीवनाचा मार्ग म्हणून अधिकच उजळला. मध्ययुगीन काळात संतांनी हिंदू धर्माचे खरे मानवतावादी स्वरूप भक्तिसंप्रदायाच्या माध्यमातून पुढे आणले आणि इस्लामला सुफीसंतांनी नव्या रूपात सादर केले. बौध्द धर्म, ज्याला एकेकाळी राजाश्रय होता आणि तो दक्षिण आशियाच्या सीमा ओलांडून बाहेत परसरला, त्याला १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी पुनरूज्जीवित केले. ह्या सर्व धार्मिक विचारांच्या मिश्रणाने व आदान-प्रदानाने दक्षिण आशियातील लोकांचे धार्मिक विचार अत्यंत सखोल झाले असून त्यातून त्यांची जीनदृष्टीही समग्र, सुध्ढ, मानवतावादी, व्यापक बनली आहे.

६) १९व्या आणि २०व्या शतकात परकीय राजवटीने दक्षिण आशियाला सारखेच पोळले आहे. डच, पोर्तुगीज, फ्रेंच, ब्रिटिश असे युरोपिय व्यापारासाठी आले आणि हळूहळी राजकीय सत्ता काबिज केली. अखंड भारत, श्रीलंका, नेपाळ, भुतान इतक्या विस्तृत प्रदेशावर ब्रिटिशांची सत्ता दुसऱ्या महायुध्दापर्यंत होती. काही छोट्या पोर्तुगीज व फ्रेंच वसाहती होत्या. ह्या राजवटीचा दक्षिण आशियावर बरा-वाईट परिणाम झाला. राजकीय दृष्ट्या ह्या प्रदेशाचे एकत्रीकरण झाले. नव्या राजकीय संस्था येथे वाढल्या, उदा. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ. नोकरशाही व्यवस्था आणि नवी प्रशासकीय यंत्रणा आली. नवे कायदे आणि कायद्याचे राज्य आले. न्यायव्यवस्था स्वतंत्र व आधुनिक रूपात आली. महत्वाचे म्हणजे नवे विचार – स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता, न्याय, लोकशाही, कायद्याचे राज्य, प्रतिनिधिक सरकार, मतदान, निवडणुक – असे विचार रूजले. नव्या शिक्षण पध्दतीमुळे जगाचा इतिहास, औद्योगिक क्रांती, युरोपातील युध्दे आणि विविध चळवळी, विज्ञन-तंत्रज्ञानाची प्रगति, वैज्ञानिक दृष्टीकोण, वैचारिक स्थित्यंतरे ह्यांची ओळख झाली. त्यातून दक्षिण आशियाच्या वाईट, क्रूर सामाजिक प्रथांबद्दल चीड निर्माण झाली. मुख्य म्हणजे दक्षिण आशियाच्या लोकांमध्ये स्वातंत्र्याचे महत्व समजून अत्याचाराविरूध्द उठाव करण्याची प्रेरणा निर्माण झाली. असहकार, अहिंसा, शांतिपूर्वक विरोध ही नवे शस्त्रे येथील स्वातंत्र्य चळवळीने जगाला दिली. दक्षिण आशियातील वसाहतवादाविरूध्दचे आंदोलन हा आधुनिक इतिहासाचा परमोच्च व प्रेरणादायी काळ आहे.

७) परकीय राजवटीने दक्षिण आशियाची आर्थिक प्रगति केली तसेच शोषणही केले. नवीन राज्यव्यवस्थेबरोबरच काही आर्थिक शुधारणा झाल्या. सर्वप्रथम संपूर्ण प्रदेशात एक सामायिक चलन 'रूपया' सुरू झाले, जे ब्रिटिश पौंडाशी जोडले होते आणि सर्व अंतर्गत व्यवहारासाठी त्याचा उपयोग होऊ लागला. रेल्वे, टपाल सेवा, दूरसंचार सेवा, दूरध्वनी, पक्के डांबरी रस्ते, वीज अशा सुधारणा झाल्या. वस्त्रोद्योगाचे यांत्रिकीकरण झाले; ज्यूट उद्योग वाढला; रबर उद्योग विकसित झाल; कोळसा, लोखड ह्यांच्या खाणी विकसित झाल्या; सीमेंट व स्टील कारखाने सुरू झाले. शेतूमध्ये काही नगदी पिके सुरू झाली,

जसे तंबाखू, चहा, कॉफी, इंडिगो. तसेच कापूस, ज्यट, मसाल्याच्या पदार्थाचे व्यापारी दृष्टीने उत्पादन सुरू झाले. ह्यामुळे उद्योगाला पोषक असे वातावरण निर्माण झाले आणि दक्षिण आशियातील अर्थकारण अधिकच एकत्रित झाले. मात्र, ब्रिटीशांच्या कर-पध्दतीने जनतेचे हाल केले. विशेषतः शेतसारा पध्दतीने आणि जमीनदारी पध्दतीने शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले. तसेच उद्योगांवर लावलेल्या करांमुळे स्थानिक उद्योग बुडाले. लोकांचे पारंपारिक उदरनिर्वाहाचे मार्ग नष्ट होऊन बेरोजगारी, उपासमार, दारिद्र्य, कर्जबाजारी, गरीब-श्रीमंत आणि शहरी-ग्रामीण भेद, इ. समस्या निर्माण झाल्या. हे धोरण जाणीवपूर्वक ब्रिटिश वस्तु खपवण्यासाठी होते. त्यामुळे दक्षिण आशियाला काही आधुनिक, प्रगतिशील गोष्टी दिल्या, त्याचबरोबर काही गंभीर समस्या निर्माण केल्या ज्या पुढील कळातही डोकेदुखी ठरल्या. हे सर्व देश अविकसित किंवा विकसनशील गणले गेले.

८) परकीय राजवटीचा दक्षिण आशियातील समाजावरसुध्द खोल परिणाम झाला. समानतेवर आधारित युरोपिय समाजाच्या तुलनेत येथील विषमता व सामाजिक उतरंड क्रूर व अमानवी होती आणि त्याच्या सुधारणेसाठी चळवळी सुरू झाल्या. अन्य अनेक सामाजिक कुप्रथांविरूध्दसुध्दा आंदोलने झाली. नव्या शिक्षणामुळे दृष्टी बदलली, इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढला, आधुनिक विज्ञानाचे शिक्षण मिळाले आणि त्यामुळे अनेक कालबाह्य आचार-विचारांचा प्रभाव कमी झाला, अंधश्रध्दा कमी झाल्या, जाचक रूढी-परंपरा नाहीशा झाल्या. पण त्याचबरोबर लोकांमध्ये आपल्या चांगल्या परंपरांबद्दल, चालीरीतींबद्दल, धार्मिक विचारांबद्दल, इतिहासाबद्दल, संस्कृतीबद्दल कमीपणा व न्युनगंड निर्माण झाला आणि पाश्चात्य सर्वकाही श्रेष्ठ अशी भावना निर्माण झाली. ह्यातून पाश्चात्यांच्या अंधानुकरणाची सवय दक्षिण आशियात सुरू झाली.

९) दक्षिण आशियातील देशांना अनेक समान आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांनी ग्रासले आहे. ह्या देशात बेरोजगारी, दारिद्र्य, विदेशी कर्जाचा बोजा, कुपोषण, चलनफुगवटा, महागाई ह्या समस्या तर आहेतच, शिवाय चोरटा व्यापार, भ्रष्टचार, आर्थिक घोटाळे, प्रशासनातील दिरंगाई व अकार्यक्षमता, जीवनावश्यक वस्तूंची, कृत्रिम टंचाई, अश्या समस्यांनी या देशांना ग्रासले आहे. शिवाय काळे धन आणि त्यातून निर्माण झालेली एक समांतर अर्थव्यवस्था ह्या सुध्दा एक गहन प्रश्न ह्या देशांपुढे आहे. भारत वगळतात इतर देशात राजकीय अस्थिरता ही सुध्दा गंभीर समस्या आहे. सामाजिक पातळीवर सरंजामशाही प्रवृत्ती काही प्रमाणात अजूनही कायम आहेत. गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण, उच्च-नीच आणि जातीचे व वांशिक असे भेद अजूनही दिसतात. भारताचा अपवाद वगळता अणुतंत्रज्ञान, अवकाशसंशोधन, मोठ्या व अवजड यंत्रांची निर्मिती अश्या बाबतीत दक्षिण आशियातील देश फार मागे आहेत. ह्या सर्व समस्यांना एकत्रितपणे सोडवणे अधिक फायद्याचे ठरले असते.

१०) परकीय राजवटीच्या काळात दक्षिण आशियात सैन्याचा चांगला विकास झाला आणि त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ह्याचा उपयोग दक्षिण आशियातील देशांना झाला. आंतरराष्ट्रीय राजकारणात मात्र ह्या देशांना कधी सहभागी होता आले नाही आणि त्या अनुभवाच्या अभावामुळे दुसऱ्या महायुध्दांनतर ह्यांचे नुकसान झाले. अलिप्ततावादी चळवळीत असूनही शीतयुध्दाच्या राजकारणात हे देश अडकले आणि महासत्तांच्या चढाओढीत जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करू शकले नाहीत. ही न्यूनता दक्षिण आशियात समान आहे.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की दक्षिण आशियात ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक, सामाजकि आणि सांस्कृतिक असे वरील घटक आहेत. ज्यामुळे ह्या देशांना एकत्र जोडणारा मजबूत धागा अस्तीत्वात आहे. तसेच त्यांच्या समोर अनेक गंभीर समान प्रश्न आहेत. ज्यामुळेही हे देश एकत्र येऊ शकतात. पण काही विपरीत आणि नकारात्मक घटकांमुळे हे होत नाही.

## ४.११ सहकार्याला मारक व संघर्षाचे घटक

वर उल्लेख केलेले सहकार्याला पूरक घटक अस्तीत्वात असले तरी दुदैवाने दक्षिण आशियात अपेक्षित सहकार्य झाले नाही ही वास्तविकता आहे. ह्या सहकार्याला रोखणारे किंवा मारक असे कोणते घटक आहेत ते आपण आता पाहू.

१) दक्षिण आशियाचा इतिहास संघर्षमय आहे, ज्यामुळे येथे नकारात्मकता फार दिसते. परकीय राजे येथे आले तेच मुळातच युध्द करून आणि येथे सत्ता ताब्यात घेतल्यावर बळजबरीने जाचक कर वसूलणे, ताब्यात घेतलेल्या राज्यातील जनतेचा छळ करणे, राजदरबारी आपल्या खास मर्जीतील सरदारांना नेमणे, स्थानिक सरदारांना दुय्यम वागणूक देणे आणि जबरस्तीने धर्मांतर करवणे असे प्रकार झाले. मुघल राजवटीबद्दल हे प्रकर्षाने जाणवते. सर्वसामान्य जनतेमध्ये असा धार्मिक भेद नसला तरी पुढे ब्रिटिश राजवटीत हे विष मुद्दाम पसरवण्यात आले. त्यामुळे दक्षिण आशियात १९व्या शतकात हिंदू-मुस्लिम द्वेष वाढला ज्याचे पर्यवसान १९४७ मध्ये भारत व पाकिस्तान असे दोन वेगळे देश होण्यात झाले. ही फाळणी रक्तरंजित, द्वेषमूलक होती. त्याने दोन देशांतील सिमा आखून अनेक कुटुंबे तोडली, अनेकांनी जमिनी, संपत्ति, घरदार घमावले, लाखो मृत्यूमुखी पडले आणि तेवढेच बेघर व निर्वासित झाले. ही घटना दक्षिण आशियाई जनतेच्या मानसिकतेवर कायमची जखम करून गेली. त्यानंतरही भारतात हिंदी-मुस्लिम तनाव कायम राहिला आणि जेव्हा त्यांच्यात दंगे झाले तेव्हा त्याचे पडसाद सीमेपलीकडेही होऊ लागले. ह्या तणावामुळे दक्षिण आशियातील दोन प्रमुख देशातील राजकीय संबंधही कायम तणावाचे राहिले.

२) द्विराष्ट्रवादाच्या सिध्दांतावर दोन देश निर्माण झाले. पण हे विभाजन पाकिस्तानच्या मते अपूर्णच होते. मुस्लिम-बहुल जम्मू-काश्मीरचे भारतातील विलीनीकरण पाकिस्तानला मान्य नव्हते आणि त्याने प्रथम १९४८ मध्येच भाडोत्री सैनिकांच्या मदतीने काश्मीर बळकवण्याचा प्रयत्न केला, जो असफल झाला. मात्र भारताने गरज नसताना हा प्रश्न युनोमध्ये नेला, ज्याने 'जैसे थे' चा आदेश दिला. तेव्हापासून हा प्रश्न एक डोकेदुखी आणि भारत-पाक संबंधातील मुख्य मुद्दा बनला.

३) पाकिस्तान सतत प्रत्येक क्षेत्रात भारताशी बरोबरी करण्याचा प्रयत्न करू लागला. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये लष्करी सामर्थ्य वाढवण्याची स्पर्धा सुरू झाली. त्याने इर्षेने भारताशी १९६५ मध्ये युध्द सुरू केले, पण पराभूत झाला. १९७१ मध्ये भारताने यशस्वी मध्यस्थी करून लष्करी कारवाईद्वारे पाकिस्तानच्या पूर्व भागाला "बांग्लादेश" म्हणून स्वातंत्र्य मिळवून दिले. अशारीतीने पाकिस्तानचा भारताला नमवण्याचा प्रत्येक डाव फसला.

४) दक्षिण आशियात भारताचा दक्षिणेकडील शेजारी श्रीलंकेशीसुध्दा तणावाचे संबंध राहिले. हा वाद रामिळ विरूध्द सिंहली असा होता. श्रीलंकेत अशोकाच्या काळापासून भारतातून लोक स्थलांतरीत झाले. नंतर ब्रिटिश काळात तामिळनाडूतून मजूर येथे आले. स्वातंत्र्यानंतर श्रीलंकन सरकारने सिंहल भाषा अधिकृत केली त्यामुळे तमिळांना आपल्या अस्तित्वाला धोका असल्याचे जाणवले. त्यातून संघर्ष वाढत गेला. एल.टी.टी.ई. ह्या संघटनेद्वारे हा लढा आक्रमक झाला आणि त्याला दहशतवादाचे स्वरूप आले. श्रीलंका सतत तामिळ दहशतवाद्यांना भारत मदत करत असल्याचा आरोप करीत असे. भारतातील तामिळ जनता ह्याबाबतीत फार संवेदनशील होती. १९८७ मध्ये शांतिसेना पाठवून भारताने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, पण तो अंगलट आला. ह्या दहशतवादामुळे भाराचे राजीव गांधी आणि श्रीलंकेचे प्रेमदासा ह्यांची हत्या झाली. श्रीलंका बरेचदा भारतीय मासेमाऱ्यांनासुध्दा समुद्रात सीमा ओलांडली म्हणून अटक करीत असते. ह्या प्रश्नांमुळे भारत-श्रीलंका संबंध तनवचे राहिले.

५) बांग्लादेशच्या निर्मितीत भारताचे योगदान असूनही थोड्याच वर्षात फराक्का धरण, सीमेवरील कुंपण, नद्यांच्या पाणी-वाटपाचा प्रश्न, सीमेवरील घुसखोरी व चकमकी असे वाद निर्माण झाले. आणि बांग्लादेशने त्याबाबत ताठर भूमिका घेतली. तसेच भारतात लाखो बांगलादेशी निर्वासित आहेत आणि सतत सीमा ओलांडून लोक येत असतात आणि भारतीय जनतेत सहज मिसळतात. त्यांना बांग्लादेश परत घेण्यास नकार देते. त्यामुळे भारत व बांग्लादेशात तणाव, निर्माण झाल.

६) भारत दक्षिण आशियातील मध्यवर्ती देश आहे. त्यांची लोकसंख्या, आकार, नैसर्गिक साधने, भक्कम अर्थव्यवस्था, तांत्रिक व औद्योगिक प्रगति, यशस्वी अणुचाचण्या, विकसित राजकीय संस्था आणि राजकीय स्थैर्य इत्यादीमुळे शेजारच्या देशांना भारताची एकप्रकारे भीती वाटते. अगदी सुरवातीच्या काळात भारताचे धोरण व्यापक आशियाई आणि विकसनशल राष्ट्रांचे संघटन करण्याकडे होते. नेहरूंनी त्यासाठी बांडुंग परिषदेसाठी पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे नव्या स्वतंत्र झालेल्या देशांना अलिप्ततावादाच्या धोरणात एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. भारत हा जागतिक राजकरणात जास्त रस घेतोय आणि जगाचे नेतृत्व करतोय असा शेजारच्या देशांचा समज झाला. त्यामुळे दक्षिण आशियाच्या संघटनेकडे काहीसे दुर्लक्ष झाले.

७) तसेच तीन युध्दात भारताच्या विजयामुळे भारताचा दबदबा वाढला. शेजारचे देश आपले जागतिक स्थान उंचावण्यासाठी आणि राजनैतिक पाठिंबा मिळवण्यासाठी दक्षिण आशिया बाहेर मित्र देश किंवा संघटना शोधू लागले. पाकिस्तान सिटो (SEATO) व सेंटो (CENTO) ह्या मध्यपूर्वेतील आणि इस्लामी जगतातील संघटनांचा सदस्य झाला. तसेच अमेरिकेलाही त्याने जवळ केले. श्रीलंकेनेही अमेरिकेशी जवळीक साधून त्रिंकोमाली येथे हवाई तळ उपलब्ध करून दिला. बांगलादेशसुध्दा इस्लामी संघटनांशी जोडला गेला.

८) भारताची अर्थव्यवस्था आपल्या अर्थव्यवस्थेवर वरचष्मा प्रस्थापित करेल अशी शेजारच्या देशांना भीती वाटत होती. कापड, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, ज्युट, गहू, तांदूळ, उस, ह्या उत्पादनाच्या बाबतीत ह्या देशांत स्पर्धा होती. तसेच लोखंड, कोळसा, तांबे, अश्या खनीजांच्या उत्पादनातही स्पर्धा होती. भारतात जसे उद्योग निर्माण झाले तसे अन्य

देशात होऊ शकले नाहीत. भारताबद्दलच्या संशयित भूमिकेमुळे अनेक क्षेत्रात सहकार्य होऊ शकले असते ते झाले नाही. उदा. वीजनिर्मिती, धरणे, रस्ते, वस्त्रोद्योग, मासेमारी ई. दक्षिण आशियातील देशांचा बाहेरच्या देशांशी व्यापार जास्त होता आणि शेजारच्या देशांशी कमी होता.

९) दक्षिण आशियात भारताच्या केंद्रीय स्थानामुळे अन्य देशांशी तणावाचे संबंध तर होतेच, परंतु अन्य देशांतही काही प्रमाणात तणाव होते. बांग्लादेशातील अडीच लाख बिहारी जनतेला पाकिस्तानमध्ये पाठवण्याचा मुद्दा त्या देशांमध्ये वादाचा झाला. मालदिव हा दक्षिण आशियातील दुर्लक्षित देश, पण त्याने आपले पर्यटन वाढवण्याचा प्रयत्न केला तेव्हा श्रीलंकेला आपल्या पर्यटनावर त्याचा विपरीत परिणाम होईल अशी भीती वाटली. भारताच्या ह्या शेजारच्या राष्ट्रांनी परस्पर संबंध वाढवले त्यामागे एक अंतस्थ हेतु भारताविरूध्द आपली स्थिति सुरक्षित करणे हा होता.

१०) दक्षिण आशियात बाहेरच्या देशांनी बरेचदा हस्तक्षेप करून येथील तणाव वाढवला आहे. मालदिवचे गान बेट इराण, सोविएत रशिया, लिबिया कडून लष्करी तळासाठी घेण्याचा प्रयत्न झाला. त्रिंकोमाली व दिएगो गार्सिया बेटांवर अमरेकिचे तळ होतेच. अमेरिका व रशियाने दक्षिण आशियातल्या गंभीर प्रश्नांमध्ये लक्ष घातले. मुख्यतः बांग्लादेशाच्या निर्मितीच्या वेळी अमेरिकेचे आरमार भारतीय महासागरात सज्ज होते, तर रशियाने भारताशी मैत्रिकरार केला होता. चीन हा दक्षिण आशियात जास्त सक्रिय होता आणि त्याला भारताचे वाढते सामर्थ्य सहन होत नव्हते. प्रथम त्याने तिबेट बळकावून थेट भारतालाच आव्हान दिले आणि १९६२ मध्ये युध्दात आपले सामर्थ्य सिध्द केले. तसेच नंतर नेपाळ व बांगलादेशमध्ये आपला प्रभाव वाढवला आणि नेपाळमध्ये तर राजवट बदलण्यातही हातभार लावला. पाकिस्तानने चीनशी जवळीक साधून पाकव्यास काश्मीरमध्ये चीनला रस्ते बांधून व्यापारास मुभा दिली. त्याहीपेक्षा गंभीर म्हणजे चीनकडून अणुतंत्रज्ञान मिळवले. यामुळे दक्षिण आशियातील सत्ता-संतुलन आणि परस्पर संबंध बिघडले.

वरील विवेचनावरून आपल्या हे लक्षात येते की दक्षिण आशियातील संबंध हे भारतकेंद्री आहेत. भारताची सीमा अन्य प्रत्येक देशाशी जोडली आहे. अत्यंत दुर्देवी आणि हिंसक भूतकाळामुळे येथील राजकीय संबंध अविश्वासाचे व संशयाचे झाले. धार्मिक, सामाजिक समानता असूनही ताठर व कट्टर भूमिकेमुळे एकता प्रस्थापित होऊ शकली नाही. त्यांचे पर्यवसान आर्थिक, शैक्षणिक, संस्कृतिक, वैज्ञानिक, तांत्रिक क्षेत्रातील दुराव्यात झाले. "विविधतेत एकता" हे दक्षिण आशियांचे वैशिष्ठ असून त्यात एकतेपेक्षा विविधतेवर जास्त जोर दिल्या गेला. ह्याला कमी-अधिक प्रमाणात सर्वच देश जबाबदार आहेत.

दक्षिण आशियातील नेत्यांमध्ये एकमेकांशी सहकार्य व्हावे अशी सुप्त भावना अस्तीत्वात होती. नेहरूंनी त्याकरता मार्च-१९४७ मध्येच दिल्ली येथे एक परिषद बोलावली होती आणि त्यात व्यापक आशियाच्या सहकार्याबद्दल योजना मांडली. नंतर बांडुंग येथे आशिया व आफ्रिका खंडाच्या सहकार्याबद्दल चर्चा झाली. त्याही पुढे वसाहतवादाविरूध्द, वर्णभेदाविरूध्द आणि महासत्तांच्या दंडेलीविरूध्द नव्या स्वतंत्र झालेल्या देशांचे एक संघटन असावे असा विचार पुढे आला आणि त्यातून अलिप्ततावादाचा जन्म झाला. अलिप्ततावादाने काही काळ विकसनशील

राष्ट्रांना शीतयुध्दाच्या राजकारणाविरूध्द एक व्यासपीठ दिले, पण तेवढीच त्याची मर्यादा होती. त्याने संस्थात्मक स्वरूप धारण केले नाही आणि तो अखेर एक विचार म्हणूनच राहिला. तसेच जगामध्ये हळूहळू प्रादेशिक स्तरावर सहकार्याला सुरवात झाली. युरोप, लॅटिन अमेरिका, मध्य आशिया, आफ्रिका, पश्चिम आशिया अश्या प्रादेशिक पातळीवर निरनिराळ्या क्षेत्रात सहकार्य सुरू झाले. ह्या संगठ्नांनी आर्थिक, व्यापारी, शैक्षणिक, तांत्रिक क्षेत्रात सहकार्याचे एक यशस्वी उदाहरण जगासमोर ठेवले. शेवटी दक्षिण-पूर्व आशियातील देशांनीही आपली संघठना–आशियान–(ASEAN) स्थापन केली. ह्या काळात दक्षिण आशियाची ओळख दक्षिण-पूर्व आशियामुळे होती. पण जेव्हा आशियन स्थापन झाला तेव्हा दक्षिण आशिया एक वेगळा प्रदेश म्हणून प्रकर्षाने समोर आला. सुप्त स्वरूपात असलेल्या दक्षिण आशियातील एकतेच्या जाणिवेला हळूहळू स्फूर्ति मिळत गेली आणि सहकार्याची कल्पना आकार घेऊ लागली.

७०व्या दशकात दक्षिण आशियाची ओोळख येथील नेत्यांनाही होऊ लागली. ह्या देशांचे परस्परावलंबित्व, त्यांची सामायिक वैशिष्ट्ये आणि अनेक समान प्रश्न एकत्रित सोडवता येऊ शकतात ही जाणीव व्हायला लागली. एकमेकांशी लढण्याने नुकसानच अधिक होते हे राज्यकर्त्यांना उमगले. ह्याच दशकात जगात अधिक स्थित्यंतरे झाली. १९७७ मध्ये युनोच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या विली ब्राण्ड आयोगाने आपल्या अहवालात विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांना आपल्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.७% मदत द्यावी. ह्यामुळे दक्षिण आशियातील राष्ट्रांचे मनोबल वाढले आणि एकमेकांशी सहकार्य करण्याच्या भावनेला बळ मिळाले. १९८० मध्ये अफगाणिस्तानमध्ये रशियाने सैन्य घुसवले. ज्यामुळे दक्षिण आशियात शीतयुध्दाची थेट झळ पोचली आणि आधीच अशांत क्षत्रात युध्दाची भीती निर्माण झाली. ह्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने "कार्टर योजने" अंतर्गत दक्षिण आशियासाठी क्षेत्रीय सहकारी सुरक्षेची योजना मांडली. दक्षिण आशियातील नेत्यांनी ह्याला संमिश्र प्रतिसाद दिला तरीही त्यामुळे संरक्षणासाठीही एकत्र येण्याची गरज मात्र अधोरेखित झाली.

दक्षिण आशियात ह्याच दशकात काही महत्वाच्या घटना घडल्या. भारतात प्रथमच जनता पक्षाचे गैर-कॉंग्रेसी सरकार निवडून आले तर श्रीलंकेत जयवर्धने हे सत्तेत आले आणि पाकिस्तानात जन. झिया-उल-हक व बांग्लादेशात जन. झिया-उर-रहमान ह्या लष्करशहांनी सत्ता काबिज केली. हे नेते नव्या विचारांचे, पुरोगामी, भूतकाळचे ओझे न बाळगणारे, नव्या पद्धतीने कार्य करणारे आणि थोडे पश्चिम देशांशी जवळिक असलेले नेते होते. दक्षिण आशियाच्या समस्यांबद्दल त्यांचा स्पष्ट आणि सकारात्मक दृष्टीकोण होता व त्यांना क्षेत्रीय सहकार्याचे फायदे समजले होते. तसेच सत्तेत नवीन असल्याने ह्या नेत्यांना आतंरराष्ट्रीय राजकरणात स्थान मिळण्यासाठी एकमेकांच्या पाठिंब्याची गरज होती. भारताबद्दलची भीती व संशयसुध्दा काहीसा कमी झाला होता. जागतिक संगठना व बड्या राष्ट्रांच्या बद्दल भ्रमनिरास आणि प्रचंड नाराजी दक्षिण आशियात निर्माण झाली होती. त्यामुळे अनेक अडचणी व संघर्षाचे मुद्दे असूनही एकता, परस्परावलंबित्व व सहकार्याची उत्कट गरज आणि वर उल्लेखिलेल्या सामायिक घटकांमुळे १९८० च्या दशकात प्रत्यक्ष सहकार्याच्या प्रयत्नांना सुरूवात झाली.

ह्या प्रयत्नाना चालना देण्याचे श्रेय बांग्लादेशचे अध्यक्ष जन. झिया-उर-रहमान यांना जाते. त्यांनी १९७७ ते १९८० दरम्यान दक्षिण आशियातील नेत्यांच्या स्वतः भेटी घेऊन दक्षिण आशियातील संस्थात्मक सहकार्याचे महत्व पटवले. तसेच त्यांनी सहकार्याचे काही ठळक व समायिक विषय आणि एक प्राथमिक संस्थात्मक आराखडा समोर ठेवला. जन. रहमान यांनी हे

करताना स्पष्ट केले की प्रस्तावित सहकार्य कोणत्याही नव्या सत्ताकेंद्राच्या निर्मितीसाठी नसून व्यापक अलिप्ततावादाच्या सिध्दांतानुसार ही रचना असेल. हा विचार व्यवहारी आणि वास्तववादी होता. १९८३ ला दिल्ली येथे दक्षिण आशियाई देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेत रेहमान यांचा प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आणि १९८५ मध्ये ढाका येथे सातही देशांच्या प्रमुखांच्या शिखर परिषदेत 'सार्क जाहिरनामा' मंजूर होऊन दक्षिण आशियाई देशांचा संघ (South Asian Association for Regional Cooperation – SAARC) स्थापन झाला. १९८५ मध्ये सात देश सार्कचे सदस्य होते आठवा अफगाणिस्तान २००५ मध्ये सदस्य झाला.

सार्क जाहीरनाम्यात पुढील उद्दिष्टे सांगण्यात आली आहेत.

१) दक्षिण आशियातील जनतेचे जीवनमान उंचवण्यार्थ त्यांच्या कल्याणाल प्रोत्साहन देणे.
२) दक्षिण आशियात आर्थिक वृध्दी, सामाजिक प्रगति आणि सांस्कृतिक विकासाचा वेग वाढवून प्रत्येक व्यक्तिला त्यांच्या पूर्ण क्षमता साध्य करण्यासाठी स्वाभिमानाने जगण्याच्या संधी उपलब्ध करून देणे.
३) दक्षिण आशियातील देशांत सामूहिक स्वयंनिर्भरता वाढवणे व मजबूत करणे;
४) परस्परांवरील विश्र्वास, सामंजस्य आणि एकमेकांच्या समस्यांच्या आकलनासाठी योगदान देणे;
५) आर्थिक, सामाजि, सांस्कृतिक, तांत्रिक व वैज्ञानिक क्षेत्रात परस्पर सहकार्य व सक्रिय सहभाग वृद्धिंगत करणे;
६) इतर विकसनशील देशांशी सहकार्य मजबूत करणे;
७) सामायिक प्रश्नांबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्परातील सहकार्य मजबूत करणे;
८) समान उद्दिष्टे व ध्येय असलेल्या आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनांना सहकार्य करणे सार्क मधील सहकार्यासाठी आधारभूत अशा खालील तत्वांचाही अंतर्भाव सार्क जाहीरनाम्यात करण्यात आला आहे.

- सार्वभौम एकता, भौगोलिक एकात्मता, राजकीय स्वातंत्र्या, राज्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे आणि परस्पर लाभ ह्या तत्वांवर सार्क संघटनेच्या अंतर्गत सहकार्य अवलंबून आहे.
- हे सहकार्य द्विपक्षीय व बहुपक्षीय सहकार्याला पर्याय नसून पूरक आहे;
- हे सहकार्य सदस्य राज्यांच्या द्विपक्षीय व बहुपक्षीय करारांच्या सुसंगत राहील

तसेच सार्कने कामकाजाबाबत पुढील सर्वसामान्या नियमसुध्दा स्वीकारले आहेत.
(□) सार्क अंतर्गत सर्वच स्तरावरील निर्णय सर्वसंमतीने घेतले जातील, आणि
(□) संघटनेतील सर्व चर्चांमधून द्विपक्षीय व वादग्रस्त मुद्दे बाहेर ठेवण्यात येतील.

## ४.१३ सार्क : सहकार्याची यंत्रणा

सार्कच्या स्थापनेमुळे अशा पद्धतीने एक क्रांतीकारी निर्णय होऊन दक्षिण आशियामध्ये एका नव्या पर्वाला सूरवात झाली. दक्षिण आशियातील नेते अत्यंत जागृत, सहकार्याबद्दल प्रामाणिक व उत्साही आणि वास्तववादी होते. आधुच्या अनुभवामुळे त्यांनी जुन्या चुका टाळल्या

आणि सकारात्म भूमिकेतून सार्कची उभारणी केली. स्थापनेबरोबर सार्कची यंत्रणा मजबूत पायावर उभी राहावी म्हणून काही निर्णय घेण्यात आले. मुख्य म्हणजे केवळ वैचारिक पातळीवरच सार्कचे चैतन्य न ठेवता त्याला एक संस्थात्मक-घटनात्म स्वरूप देण्यात आले. ही रचना कशी आहे ते आता आपण पाहू –

## (अ) सार्क सचिवालय –

दक्षिण आशिया जगातील शेवटचा प्रदेश ठरला ज्याने आपली संघटना उभारली. अन्य संघटनांच्या धर्तीवर सार्कनेही आपल्या सहकार्याला संस्थात्म व कायमस्वरूपी रूप दिले. सर्वप्रथम सार्कने आपले सचिवालय स्थापन केले जे कायमस्वरूपी मुख्यालय म्हणून कार्य करते. हे सचिवालय सार्कच्या सर्व निर्णयांचे व कागदपत्रांचे संरक्षक म्हणून काम करते. सार्कच्या सर्व स्तंरावरील कार्यक्रम, बैठक आयोजित करण्याची मुख्यालयाची जबाबदारी असेत. तसेच सार्कच्या विविध उपसमित्या व अभिकरणांमध्ये समन्वय साधण्याचे कार्यही सचिवालय करते. त्याचप्रमाणे दक्षिण आशियातील सर्व देश, सार्कच्या समित्या व विविध खाती ह्यांच्यातील दुवा म्हणूनही मुख्यालय कार्य करते. शेवटी सार्क व दक्षिण आशियाची सर्व माहिती संकलीत करणे, त्याचा योग्य उपयोग करणे आणि अभिलेख म्हणून ही माहिती जतन करणे हे सुध्दा मुख्यालयाचे कर्तव्य आहे. मुख्य म्हणजे सार्कचे सर्व निर्णय आणि प्रकल्पांचे कार्यान्वयन सार्क मुख्यालय करते. सार्कच्या प्रशासकीय कार्यात हे मुख्यालय अग्रभागी असून ते नेपाळची राजधानी काठमांडू येथे स्थित आहे. सचिवालयाचे प्रत्यक्ष कामकात १९८७ मध्ये सुरू झाले. सचिवालयाचा प्रशासकीय प्रमुख महासचिव असतो आणि त्याची निवड सार्क सदस्य राष्ट्रांच्या राजदूतांमधून चक्रक्रमाने दोन वर्षाकरता होते. महासचिव सार्कच्या अध्यक्षांना उत्तरदायी असतो. त्याशिवाय आठ संचालक असतात जे प्रत्येक देशांतून नियुक्त होतात. महासचिव व आठ संचालक हे व्यावसायिक परराष्ट्र सेवेतील राजदूत असतात आणि ते वरिष्ठ परराष्ट्र सचिव दर्जाचे अधिकारी असतात. ह्या अधिकाऱ्यांव्यातिरिक्त इतर दुय्यम कर्मचारी वर्ग मुख्यालयाद्वारे नियुक्त केला जातो. बांग्लादेशचे वरिष्ठ राजदूत अबुल अहसन हे पहिले महासचिव होते. भारताच्या दोन राजदूतांना आजपर्यंत महासचिव होण्याची संधी मिळाली आहे.

## (ब) शिखर परिषद –

सार्क संघटनेच्या रचनेत सर्वात वरिष्ठ स्थान शिखर परिषदेला आहे. सार्कच्या सदस्य राष्ट्राच्या राष्ट्रप्रमुख किंवा शासन प्रमुखांची ही शिखर परिषद असते. शिखर परिषदेच्या यजमान देशाच्या प्रमुखांना सार्कचे अध्यक्ष निवडले जाते. सार्कची ही महत्वाची व अंतिम निर्णय घेणारी संस्था आहे. स्थापनेपासून आजपर्यत १७ शिखर परिषदा झाल्या आहेत. प्रथम शिखर परिषद दरवर्षी घेण्याचे ठरेले होते, पण नंतर त्यात बदल करून दर दोन वर्षांनी ती घेण्यात येते. शिखर परिषदेच्या अधिकृत व जाहिर बैठकीला जोडूनच राष्ट्रप्रमुखांमध्ये अनौपचारिक बैठक खाजगीरित्या घेण्याचीही प्रथा पडली आहे, ज्यामध्ये नेते आपल्या कर्मचाऱ्यांच्या मदतीशिवाय अनौपचारिक वातावरणात चर्चा करू शकतात. त्याचा फायदा कधी कधी वादग्रस्त मुद्दे निवळण्यात होतो. अधिकृत शिखर परिषदेत सार्कच्या प्रगतिचा आढावा घेतला जातो आणि भविष्यातील उद्दिष्टे, धोरणे व कार्यक्रम निर्धारित केले जातात.

**(क) मंत्री परिषद –**

शिखर परिषदेनंतर दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे मंत्री परिषद. ह्यात सर्व सदस्य राष्ट्रांचे परराष्ट्र मंत्री असतात. सार्कची धोरणे व कार्यक्रम ठरवणे, सहकार्याची नवी क्षेत्रे ठरवणे, तांत्रिक समित्यांची उभारणी करणे आणि सार्कच्या एकून कामकाजावर देखरेख ठेवणे असे परिषदेचे कार्य आहे. परिषद दर दोन वर्षानी किंवा आवश्यकता असल्यास जास्त वेळा घेतली जाते. परिषदेच्या अहवालावर शिखर परिषद अंतिम शिक्कामोर्तब करते.

**(ड) स्थायी समिती –**

सार्क सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र सचिवांची स्थायी समिती असते, जी मंत्री परिषदेला जबाबदार असते. गरजेनुसार ह्यांच्या बैठका होतात आणि त्याचा अहवाल मंत्रीपरिषदेकडे दिला जातो. सार्कच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेणे, प्रकल्पांची योजना आखणे, आर्थिक सहाय्य ठरवणे, योजनांची प्राथमिकता ठरवणे, दक्षिण आशियांतर्गत किंवा अन्य देशांकडून सहाय्य मिळवणे, नवे मार्ग व साधने निर्धारित करणे आणि सार्कच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करणे अशा जबाबदाऱ्या स्थायी समितीकडे आहेत.

**(इ) तांत्रिक समिती –**

सार्कचे कार्य एकात्मिक कार्यक्रमाद्वारे चालते. त्याकरता मान्यताप्राप्त क्षेत्रासाठी तांत्रिक समित्या आहेत. त्यांचे कार्य हे त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्राकरता कार्यक्रमांची व योजनांची आखणी करणे हे आहे. तसेच योजनांची अंमलबजावणी करून त्याचा अहवाल स्थायी समितीला सादर केला जातो. सध्या सार्कमध्ये सहा तांत्रिक समित्या आहेत.

(१) कृषी व ग्रामीण विकास
(२) आरोग्य व लोकसंख्या
(३) महिला, युवक आणि बालक
(४) विज्ञान व तंत्रज्ञान
(५) वाहतूक
(६) पर्यावरण

**(फ) कार्यक्रम समिती –**

स्थायी समितीला मदत करण्यासाठी कार्यक्रम समित्या करण्यात आल्या आहेत. प्रादेशिक प्रकल्पांची निवड करणे, त्यांचे कार्यक्षेत्र ठरवणे, खर्चाचा हिशेब व पैसाचे वाटप ठरवणे, बाह्य मदत निर्धारीत करणे आणि प्रकल्पांची प्राथमिकता ठरवणे ह्याबाबत कार्यक्रम समिती स्थायी समितीला मदत करते व सल्ला देते.

**(ग) कार्यगट –**

सार्क अंतर्गत येणाऱ्या कार्यक्रमांना सुदृढ करण्यासाठी कार्यगटांची खास योजना करण्यात आली आहे. सार्क जाहिरनाम्यानुसार कार्यगट विविध प्रकल्पांमध्ये समन्वय राखतात, त्यांच्या प्रस्तावित लक्ष्याच्या पूर्तीवर लक्ष ठेवतात, तसेच योजना कार्यान्वित करण्यासाठी योग्य अशा तांत्रिक सल्ला देणे आणि आर्थिक बाबतीत मार्गदर्शन करणे अशी कार्यगटाची कामे आहेत. सध्या सार्कमध्ये जीवतंत्रज्ञान, उर्जा, माहिती व दूरसंचार तंत्रज्ञान आणि पर्यटन ह्या क्षेत्रात कार्यगट अस्तित्वात आहेत.

**(ह) प्रादेशिक केंद्र –**

हा एक सार्कने स्वीकारलेला अनोखा मार्ग आहे. काही विशेष महत्वाच्या क्षेत्रांसाठी सार्क प्रादेशिक केंद्र स्थापन केले आहेत. ते सर्व संमतीने एखाद्या सदस्य देशात स्थापन केले जातात. त्याचे व्यवस्थापन यजमान देशाचा परराष्ट्र खात्याचा प्रतिनिधीची, सार्कचा महासचिव, सार्कचा एक संचालक आणि सर्व सदस्य देशांच्या प्रत्येकी एक प्रतिनिधींच्या बनलेल्या एका संचालक मंडळाद्वारे केले जाते. सध्या अकरा सार्क केंद्रे कार्यरत आहेत. त्यांची नवे आणि यजमान देश पुढीलप्रमाणे – (१) सार्क कृषी केंद्र (ढाका), सार्क हवामान शास्त्र संशोधन केंद्र (ढाका), सार्क क्षयरोग केंद्र (काठमांडू), सार्क दस्तावेज केंद्र (दिल्ली), सार्क मानव संसाधन विकास केंद्र (इस्लमाबाद), सार्क सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन केंद्र (मालदिव), सार्क माहिती केंद्र (नेपाळ), सार्क उर्जा केंद्र (पाकिस्तान), सार्क आपत्ती व्यवस्थापन केंद्र (भारत), सार्क वनशास्त्र केंद्र (भूतान), सार्क सांस्कृतिक केंद्र (श्रीलंका).

ह्या प्रत्येक केंद्राकडे विशिष्ठ कार्य असून दक्षिण आशियाच्या दृष्टीने प्रत्येक केंद्र महत्वाचे आहे.

## ४.१४ सार्कची वाटचाल

सार्कच्या स्थापनेनंतर सहकार्यची काही महत्वाची क्षेत्रे निर्धारीत करण्यात आली ती अशी आहेत.
(१) कृषी व ग्रमीण विकास (२) जैव तंत्रज्ञान (३) संस्कृती व क्रिडा (४) शिक्षण (५) उर्जा (६) पर्यावरण (७) वित्त (८) मानव संसाधन विकास (९) माहिती, दूरसंचार व प्रसारमाध्यमे (१०) दारिद्रय निर्मूलन (११) विज्ञान व तंत्रज्ञान (१२) सुरक्षा व कायदेविषय बाबी (१३) सामाजिक विकास (१४) पर्यटन व वाहतूक (१५) व्यापार व अर्थव्यवस्था.

वरील क्षेत्रे दक्षिण आशियातील जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची निगडीत असून सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक, संस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांशी संबंधित आहेत. तसेच ह्या क्षेत्रांचे विषय गैरराजकीय आणि वादमुक्त असून ह्यामुळे त्याबाबतीत भरीव सहकार्य सहज होऊ शकते. ह्या प्रत्येक क्षेत्रात सार्कने विविध योजना व प्रकल्प सुरू सुरू केले आहेत.

सार्कद्वारे काही महत्वाचे करार करण्यात आले आहेत, ते असे –

१) सार्क लवाद परिषद करार
२) सार्क कस्टमविषयक करार
३) सार्क विकासनीधी करार
४) सार्क खाद्याकोष करार
५) सार्क मुक्त व्यापर करार ( SAFTA)
६) सार्क प्रादेशिक मानक आयोग करार
७) सार्क दूहेरी कर निर्मूलन करार

ह्याव्यतिरिक्त काही महत्वाचे करार (Convention) सुध्दा सार्कने केले आहेत. उदाहरणार्थ-

१) शरीर विक्रयासाठी स्त्रीया व मुलांचा व्यापार करण्यास प्रतिबंध करार.
२) बालक विकास वृध्दी करार
३) गुन्हेगारी चौकशीसाठी परस्पर सहकार्य करार
४) दहशतवाद प्रतिबंधक प्रादेशिक करार
५) मादक द्रव्य व अंमली पदार्थाविषयी करार

**सार्कचे आर्थिक व्यवस्थापन आणि निधी संकलन –**

सार्कचे प्रशासन चालविण्यासाठी आणि विविध योजनांकरता निधी उभारण्यासाठी अनेक मार्ग सार्कने अवलंबले आहेत. सदस्य राष्ट्रे ठरवून दिलेल्या प्रमाणात सार्कच्या गंगाजळीत निधी देतात. त्याचबरोबर विविध प्रकल्पांकरता पुढील प्रकारे निधी उभा केला जातो.

(अ) सार्कची स्थापना झाली तेव्हा सार्क प्रादेशिक निधी आणि सार्क प्रादेशिक प्रकल्प निधी असे दोन कोष तयार करण्यात आले होते. १९९६ मध्ये त्यांचे एकत्रिकरण करून दक्षिण आशिया विकास निधी (डअऊऋ) निर्माण करण्यात आला. ह्या निधीद्वारे सार्कचे प्रकल्प, रचनात्मक व मानवसंसाधन विकासाचे प्रकल्प आणि संरचनात्मक विकासाचे प्रकल्प ह्या करता अर्थसहाय्य दिले जाते.

(ब) १९९३ मध्ये जपानशी सार्क संघटनेचा करार होऊन जपानच्या अर्थसहाय्यातून विशेष निधी उभारण्यात आला. त्यातून एक भाग सध्या चालू असलेल्या सार्कच्या विविध प्रकल्पासाठी वापरला जातो आणि दुसरा भाग जपानने ठरवलेल्या क्षेत्रांमध्ये संशोधनात्म कार्य, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे व कार्यशाळा ह्यासाठी वापरला जातो. त्यामध्ये विशेषतः आरोग्य, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, दूरसंचार, शिक्षण आणि प्रसारमाध्यमे अशा क्षेत्रांमद्ये कार्यक्रम घेण्यात येतात.

## ४.१५ सार्कची कामगिरी

१९८५ मध्ये स्थापना झाल्यापासून सार्कने ठरवून दिलेल्या क्षेत्रात आपले कार्य सुरू केले. सार्कने जाणीवपूर्वक वादग्रस्त, द्विपक्षीय व राजकीय स्वरूपाचे मुद्दे बाजूला ठेवले. कारण त्यामुळेच भरीव सहकार्य आजपर्यत होऊ शकले नव्हते.तसेच निर्णयप्रक्रियेत प्रत्येक स्तरावर सर्वसंमती आवश्यक केली आहे. ह्या अटींमुळे सर्वमान्य असे निर्णय घेतले गेले आणि त्यांच्या ांमतबजावणीमध्येही पूर्ण सहकार्य, एकवाक्याता आणि प्रामाणिकता प्राप्त झाली. सार्कच्या नियमावलीतील हे मुद्दे वास्तववादी आणि आवश्यक होते, त्यातून सार्कच्या नेत्यांची दूरदृष्टी आणि प्रगल्भता दिसते. सार्कची आजपर्यतच्या कामगिरीतील ठळक बाबी खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) सार्कमुळे उशीरा का होईना एकमेकांवर अविश्वास असलेले देश प्रथमच एका छत्राखाली एकत्र आले. राजकीय दृष्ट्या अत्यंत स्फोटक स्थिती असलेल्या दक्षिण आशियात आणि विकासाच्या भिन्न टप्प्यावर असलेले हे देश एकत्र आले ही फार मोठी उपलब्धी आहे. एकतेच्या विरोधी कार्य करणारे आणि सहकार्यत अडसर निर्माण करणारे अनेक घटक जोरावर असूनही सामायिक फायद्याची प्रबल इच्छा आणि एकत्र सहकार्य करण्याची तीव्र इच्छा अखेर जास्त प्रभावी ठरली आणि सार्कची स्थापना झाली.

२) दक्षिण आशियामध्ये अर्थव्यवस्थेत परस्पर साध्यर्म आहे आणि आर्थिक समस्याही सारख्याच प्रमाणात भेडसावत आहेत. त्यामुळे सार्कने आर्थिक क्षेत्रात सहकार्याच्या योजना आखल्या त्या महत्त्वाच्या होत्या आणि त्यात सार्कने यशसुध्दा संपादन केले. व्यापार, वित्तीय व्यवस्थापन, चलनविषयक क्षेत्र ह्या मूलभूत क्षेत्रात काही भरीव सहकार्य झाले आहे.

उदाहणार्थ - सार्क मुक्त व्यापार करारांतर्गत (SAFTA) दुहेरी कर आकारणी बंद करण्यात आली, दक्षिण आशियाअंतर्गत व्यापाराला प्रोत्साहन देण्यात आले आणि काही पारंपारिक वस्तूच्या व्यापाराला करमुक्त करण्यात आले, ह्या करारानुसार प्रत्येक सार्क देशाने एकमेकांना 'अत्यानुकुल राष्ट्राचा' (Most Favoured Nation) दर्जा दिला आहे. पाकिस्तानने मात्र भारताला तो दर्जा दिलेला नाही. सार्क देशांच्या योजना आयोग, मध्यवर्ती बँका, ह्यांच्यातही विचारांची देवाण-घेवाण होते. तसेच स्टॉक एकस्चेंजचे अधिकारी, उद्योगपती व व्यापाऱ्यांच्या संघटना ह्यांच्यातही चर्चा होतात. त्यातून काही समान समस्या सोडवण्याचा आणि सहकार्य करण्याचा प्रयत्न होतो.

३) शिक्षण, क्रीडा, संस्कृती आणि प्रसार माध्यमे ह्या क्षेत्रात सार्कने भरीव कार्य केले आहे. दक्षिण आशियामध्ये सांस्कृतिक वैशिष्टचे विविध प्रकारची आहेत. त्यामुळे सार्कद्वारे सांस्कृतिक देवाण-घेवाण करण्याच्या पुष्कळ योजना राभवण्यात आल्या. त्यात चित्रपट महोत्सव, कवी-लेखक संमेलन, मुशायरे, नृत्य महोत्सव, खाद्य मेळावे, संगीत मैफिल असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. दूर-चित्रवाणी व रेडियोवर सार्क प्रश्न मंजूषा, सांस्कृतिक वैशिष्ट्यांवरील माहिती पट असे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. मोठ्या वृत्तपत्रसमूहांच्या संपादकांना दक्षिण आशियात व्हिसामधून सूट देण्यात येते. शिक्षण क्षेत्रात दक्षिण आशिया विद्यापीठ दिल्ली येथे सुरू झाले आहे आणि त्याद्वारे शिष्यवृत्ती आणि शिक्षा वेतनवृत्ती देऊन दक्षिण आशियासंबंधी विषयांवर संशोधन करण्यास प्रोत्साहन दिले जाते. सार्क क्रिडा स्पर्धा व युवक मेळावे आयोजिक केले जातात. पर्यटनाच्या वाढीस आणि सहकार्यस येथे भरपूर वाव असल्याने ग्रुपसहली आयोजित करणे आणि व्हिसाच्या नियमात शिथिलता आणणे असे उपया योजण्यात आले आहेत.

४) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दक्षिण आशियाच्या देशांतील सहकार्य फार महत्वाचे आहे. ह्या देशांच्या अर्थव्यवस्थेला पूरक अशा योजना आखण्यात आल्या आहेत. त्यातही अशी क्षेत्रे निवडली आहेत जी दक्षिण आशियातील देशांना जास्तीत जास्त उपयोगी ठरतील.

उदा. सौर उर्जा, जैव-खते, झिंग्यांची मासेमारी, कमी दरातील घरे बांधणी, इलेक्ट्रॉनिक्स, परमाणू जीवशास्त्र, जैवीक इंधन, सांडपाण्यावर प्रक्रिया, प्रदूषण नियंत्रण, अन्न-प्रक्रिया, रडार तंत्रज्ञान, औषधी व सुगंधी वनस्पतींचे उत्पादन, हवामान तंत्रज्ञान, कीटकनाशके, अपारंपारिक व नवे उर्जास्त्रोत अशा क्षेत्रात सहकार्याच्या योजना सुरू आहेत.

५) लोकसंख्यावाढ आणि आरोग्य हे दक्षिण आशियातील कळीचे प्रश्न आहेत. त्यामुळे त्याबद्दल सार्कने अनेक योजना हाती घेतल्या आहेत. क्षयरोग, मलेरिया, कृष्ठरोग, गॅस्टो, अतिसार, रेबीज, आयोडीन कमतरता, पोलीयो अशा जुन्या आजारांवर सामायिक

उपाययोजना सूरू करण्यात आल्या. तसेच एड्स, मधूमेह, कर्करोग अशा नव्या गंभीर रोगावरही सहकार्यच्या योजना आहेत. माता-बालसंगोपन, कुपोषण, गरोदरपणातील मातेची काळजी आणि बालकांचे लसीकरण अशा करता उपक्रम राबवण्यात येत आहेत. महिला आणि मुलींच्या विकासाकरता विशेष लक्ष पुरवण्यात येत आहे. आधुनिक आरोग्य केंद्रद्वारे आणि ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारून आरोग्यसेवांचा विस्तार करण्यात येत आहे. वैद्यकीय पर्यटन हा एक नवीन उपक्रमही सुरू झाला आहे.

६) दक्षिण आशिया हा शेतीप्रधान प्रदेश आहे, परंतु शेतीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. लहरी पर्जन्यावरील अवलंबित्व, नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान, जमिनीचा घसरता कस, खते, कीटकनाशके ह्यांचे वाढते दर, जमिनींचे वारसाहक्काने होणारे तुकडे ह्यामुळे शेती नुकसानीची होत असून दारिद्र्य, उपासमार आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा समस्या वाढत आहेत. त्याकरता सार्कने काही महत्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. त्यामध्ये मुख्य म्हणजे शेतीबद्दल, जमिनीच्या दर्जाबद्दल, पिकांबद्दल, प्रत्येक प्रदेशातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीबद्दल आणि तिथे उपयोगी तंत्रज्ञानाबद्दल सार्कने मूलभूत माहिती संकलीत केली आहे. ज्याद्वारे एकमेकांना फायदा होऊ शकतो. कृषी विद्यापीठे व कृषी संशिधन संस्थांद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, पिकांच्या नविन जाती निर्माण करणे, शेतीकरता योग्य असे नवे तंत्रज्ञान विकसित करणे आणि शेतकरी व अधिकारी ह्यांच्यात संवाद वाढवणे असे उपक्रम सुरू आहेत. त्याचबरोबर स्थानिक पातळीवर विकासाच्या योजना आखणे, जनतेचा सहभाग वाढवणे, सामाजिक वनीकरणास प्रोत्साहन देणे, ग्रामीणभागात वीज व पाटबंधारे योजना राबवणे आणि शेतीवर आधारित समांतर व पूरक व्यवसायास प्रोत्साहन देणे असेही उपक्रम सार्कने राबवले आहेत. मुख्य म्हणजे शेती व ग्रामीण विकास हा दक्षिण आशियाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने त्याकडे सार्क प्राधान्याने लक्ष देत आहे.

७) सार्कच्या जाहिरनाम्यानुसार राजकीय व वादग्रस्त विषय कार्यकक्षेच्या बाहेर असले तरी सार्कने दोन अत्यंत धाडसी करार केले आहेत. एक मादक द्रव्य व अंमली पदार्थाच्या प्रतिबंधाचा करार आणि दोन, दहशतवाद विरोधी करार. दक्षिण आशियाला सध्या भेडसावणाऱ्या ह्या दोन गंभीर समस्या आहेत. ह्यांच्याबद्दलच्या ह्या करारांद्वारे सार्कने राजकीय स्वरूपाचे धाडसी पाऊल उचलले आहे, ज्याद्वारे सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.

## ४.१६ सार्कची क्षमता, भारताची भूमिका आणि मूल्यांकन –

दक्षिण आशियामध्ये विपरीत वातावरणात सार्कची स्थापना झाल्यामुळे फार अपेक्षा उंचावल्या आहेत. सार्कच्याद्वारे सहकार्य वाढवण्यात व ते सदृढ करण्यात अजूनही भरपूर वाव आहे. पूर्ण दक्षिण आशियाला पुरेल इतकी वीजनिर्मिती नद्यांवर धरणे बांधून होऊ शकते. पाटबंधारे योजनांद्वारे शेतीला फायदा होऊ शकतो. दक्षिण आशियांतर्गत खनिज संपत्तीवर आधारीत मूलभूत उद्योग स्थापन केले जाऊ शकतात. उदा. लोखंड, स्टील तसेच ह्या प्रदेशात शेतीमाल, मसाल्याचे पदार्थ, चहा-कॉफी, रबर, फळे इत्यादींचा परस्पर व्यापार वाढू शकतो. युरोपातून आयात करण्यापेक्षा अनेक वस्तूंचा पुरवठ दक्षिण आशियातूनच होऊ शकतो.

त्याचप्रमाणे दक्षिण आशियात मुबलक होणाऱ्या मालाची निर्यात प्रदेशाबाहेर सामायिक स्वरूपात होऊन अधिक फायदा मिळू शकतो. ह्या सर्व बाबतीत सार्क अधिक सक्रीय होणे आवश्यक आहे. मुक्त व्यापार करार (SAFTA) अधिक कणखरपणे अंमलात येणे सुध्दा गरजेचे आहे.

सार्कद्वारे दक्षिण आशियातील छोट्या देशांना जागतिक स्तरावर ओळख मिळाली. उदा. मालदिवच्या समुद्रपातळी वाढविण्याच्या समस्येला जगामध्ये वाचा फोडण्याचे काम सार्कने केले. अशाचरीतीने सार्क एकत्रितपणे प्रदेशातील अनेक गंभीर समस्यांबाबत एकजूटीने आंतरराष्ट्रीय पातळीवर आवाज उठवून काही सहाय्य प्राप्त करू शकतो. असेच सहकार्य युनीसेफ, यू एन डी पी, एस्कॅप या संस्थांद्वारे आणि जपान, जर्मनी ह्या देशांकडून प्राप्त झाले आहे. सार्कद्वारे दक्षिण आशियातील राष्ट्रांची जागतिक प्रतिमा उंचावण्यास आणि जगात दबदबा वाढवण्यास भरपूर वाव आहे. अलिप्ततावादाशी बांधिलकी कायम ठेवून जागतिक प्रश्नांवर ठोस भूमिका घेऊन एक गट म्हणून सार्क जागतिक राजकारणात सक्रिय व भरीव भूमिका घेऊ शकतो.

सार्कच्या यशापयशामध्ये भारताची मोठी जबाबदारी आहे. भारताचे स्थान मध्यवर्ती आहे याची त्याला जाणीव आहे. आतापर्यंत चुकीच्या किंवा अतिउत्साही व आदर्शवादी भूमिकेमुळे सहकार्यास खीळ बसली. म्हणून ८० च्या दशकात भारताने सावध भूमिका घेत अन्य देशांना सार्कबद्दल ठोस भूमिका घेण्यास वाव दिला. नंतरच भारताने सार्कला स्वीकारले. त्यानंतरही सार्कच्या अनेक योजनांत भारताने उदार भूमिका घेत निर्णयप्रक्रिया सुकर होण्यास हातभार लावला. भारत-पाकिस्तान तणावाचे संबंध ही प्रमुख्याने सार्कची डोकेदुखी आहे. दोन्ही देश आता अणुतंतज्ञान संपन्न झाल्याने तणाव वाढला आहे. त्यातच भारत-पाक सीमेवर चकमकी होण, भारतात आतंकवादी हल्ले करणे, काश्मीरचा मुद्दा वारंवार उकरून काढणे असे प्रकार पाकिस्तानकडून होतच आहेत. तरीही भारताने संयम राखत चर्चा करण्याची तयारी ठेवली आहे. द्विपक्षीय प्रश्न सार्कच्या आड येऊ नयेत हा भारताचा प्रयत्न असतो. सार्कच्या आतार्पंतच्या वाटचालीत अनेक प्रसंगात भूतान, मालदिव या देशांनी समस्या निवारकाची भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे छोटे देशही महत्वाची भूमिका पार पाडू शकतात आणि सार्कचे चैतन्य जागृत ठेऊ शकतात. अंतर्गत अशांतता, परस्पर अविश्वास आणि अन्य अनेक अडचणी असूनह सार्क देश एकत्र आले आणि सार्क संघटना टिकली हे फार मोठे यश आहे. सार्कची आजपर्यतची प्रगती धिम्यागतीची व सावध आहे. फार क्रांतीकारी असे यश त्याला मिळले नाही, पण वास्तविक परिस्थितीचा आढावा घेतल्यास हे मर्यादित यश सुध्द लक्षणीय आहे. सर्व सार्क सदस्यांना 'आपण एकत्र जगलो नाही तर एकएकटे नष्ट होऊ' ह्या सत्याचे भान आहे. परस्पर सहकार्याचे मजबूत करेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. सार्क देशांमध्ये राजकीय स्थित्यंतरे कशी होतात, राजकीय स्थैर्य व शांतता किती प्रमाणात नांदते, सैन्य आणि धार्मिक कट्टरवादी किती सक्रिया होतात आणि राजकीय नेते किती समंजस भूमिका घेतात ह्यावर सार्कचे भावितव्य अवलंबून आहे.

## ४.१७ प्रकरणावरील प्रश्न

१) दक्षिण आशियातील समानतेचे घटक स्पष्ट करा.
२) सार्क संघटनेची उद्दिष्टये सांगा.
३) सार्कने राजकीय विषय कार्यकक्षेबाहेर का ठेवले आहेत ?

४) सार्कने शेती व ग्रामीण विकासात राबविलेल्या योजनांची माहिती द्या.
५) सार्कने स्थापन केलेल्या कोणत्याही एका प्रादेशिक केंद्राची माहिती द्या.
६) सार्कने मंजूर केलेल्या दक्षिण आशिया मुक्त व्यापार कराराचे पारिणाम सांगा.

## ४.१८ अधिक वाचनासाठी

१) Kashikar, M.S. : "SAARC : Its Genesis, Development & Prospects"; Himalaya Publishing House, Mumbai, 2000.

२) The SAARC News Letter, SAARC Secretariat, Kathmandu, Relevant Issues.

३) "From SARC to SAARC : A Milestones in the Evolution of Regional Coorperation in South Asia"; SAARC Secretariat, Kathmandu, 1988.

४) Muni, S.D. and Anuradha : "Regional Cooperation in South Asia", National Publishing House, Delhi, 1984.

५) SAARC Summit Declarations, SAARC Secretariat Publication, relevant years.

६) Das, D. K. (ed) : "Policies, Programmes and Prespectives : Study of Regional Coorperation in South Asia"; Deep & Deep Publishers, New Delhi: December-1992: ISBN : 81-7100-389-3.

७) Dev Raj Dahal & Nischal N. Panday (eds.) : "New Life Within SAARC" (2005); Institute of Foreign Affairs (IFA) & Freiedrich-Ebert-Shiftung (FES)

८) Gupta, Anshuman : "SAARC : SAPTA TO SAFTA" (2002); Shipra Publications.

९) E. Sudhakar : "SAARC : Origin, Growth and Future" (1994) Gyan Books Pvt. Ltd.

१०) Sharma, Suman : "India and SAARC", (2011), Gyan Book Pvt. Ltd.

११) Singh, Sudhir Kumar : "Handbook of SSARC", (2001), Pentagon Press.

१२) Saurabh, B. C. Uperti : "Strengthening SAARC – Exploring Vistas from Expanded Coopreration" (2012). Pentagon Press.

❖❖❖❖

# ५

# भारत आणि चीन

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ शीतयुद्ध काळातील भारत चीन संबंध
५.३ सीमा प्रश्नावर चीनची भूमिका
५.४ सीमा मुद्यावरुन युद्ध
५.५ शीत युद्धोत्तर काळातील भारत चीन संबंध
५.६ भारताप्रती चीनचे बदलते धोरणचित्र
५.७ हितांचे एकमेकांवरील अतिक्रमण : एकत्रीत प्रयत्नांची अत्यावश्यकता
५.८ यू.एस. व चीनमधील रुंदावणारी दरी भारतासाठी सूचीत अर्थ
५.९ भारत चीन करारातील अडथळे
५.१० निष्कर्ष
५.११ सारांश
५.१२ सरावासाठी प्रश्न
५.१३ संदर्भसूची

## ५.० उद्दिष्टे

हा विभाग शीत युद्ध काळ आणि शीत युद्धोत्तर काळातील भारत चीन संबंधांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो तसेच सीमा प्रश्न, तीबेट, चीन, पाकिस्तान परस्परसंबंध, भारत चीन युद्ध यासारख्या ज्वलंत मुद्यांवर चर्चा करतो. या विभागाचा मुख्य हेतू हा भारत चीन संबंधातील भांडणापासून ते सहकार्य, हितांचे एकमेकांवरील अतिक्रमण, आणि वाढत्या करारातील शीत युद्धोत्तर काळातील संक्रमण समजणे हे आहे. त्याचवेळेस हा विभाग भारत चीन करारातील धोक्याची क्षेत्रे व अडथळे यांच्यावर सुद्धा प्रकाश टाकतो. या विभागाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थी भारत चीन संबंधांचा संपूर्ण पल्ला आणि हे संबंध भांडणापासून सहकार्यापर्यंत कसे विकसीत झाले याचे आकलन करण्यास समर्थ ठरेल.

## ५.१ प्रस्तावना

भारत आणि चीन हे आशियातील दोन सर्वात मोठे देश आहेत आणि त्यांच्यात वाढ व विकासाची क्षमता आहे. भारत १९४७ मध्ये स्वतंत्रा झाला तर चीन १९४९ मध्ये साम्यवादी

बनला. सामाजिक-आर्थिक आणि राष्ट्रउभारणीसाठी भारत व चीन दोघांनी वेगवेगळे मार्ग अनुसरले. भारताने लोकशाही पद्धत स्वीकारली तर चीनने साम्यवादी व्यवस्था. भारत हा साम्यवादी चीनला एक स्वतंत्र व सार्वभौम देश म्हणून मान्यता देणाऱ्या सुरुवातीच्या मूठभर देशांपैकी एक होता आणि त्याने चीनला सहकार्य करण्याची इच्छा दर्शवली. चीन आणि भारत यांनी १ एप्रिल १९५० रोजी परराष्ट्रसंबंध प्रस्थापित केले. बिगर साम्यवादी देशांमधून चीनसोबत परराष्ट्र संबंध प्रस्थापित करण्यात भारत हे दुसरे राष्ट्र होते. १९५४ मध्ये चीनचे अध्यक्ष झाऊ एन लाय आणि भारतीय पंतप्रधान नेहरुंनी एकमेकांना भेटी दिल्या आणि शांततामय सहअस्तित्वाच्या प्रसिद्ध पंचसुत्रांची एकत्रीतपणे सुरुवात केली. ही विचारसरणी स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वासाठी परस्पर आदर करण्याच्या तत्वाला अधोरेखित करते आणि एकमेकांच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ करण्यापासून रोखते.

## ५.२ शीतयुद्ध काळातील भारत चीन संबंध

शीत युद्ध काळात भारत आणि चीन हे दोघेही एकमेकांचे हित व उद्देश याविषयी भयभीत व प्रतिकूल होते. चीन भारताला साम्राज्यशाहीची एक पुरवणी समजत होता. भारत आशियातील चीनच्या विस्तारवादी धोरणा विषयी चिंतीत होता. या दोन देशातील संबंध, न सुटलेला सीमावाद, तिबेट मुद्दा आणि चीन-पाकिस्तान परस्पर संबंध यासारख्या बऱ्याच मुद्यांमुळे निर्माण झालेल्या भांडणे व अविश्वासाच्या वारसामुळे वैशिष्ट्यपूर्ण बनने चालूच राहिले.

**अ) सीमा प्रश्न -**

भारत आणि चीनमधील संबंध १९५० मध्ये अतिगुंतागुतीच्या सीमावादावरुन अतिशय गंभीरपणे ताणले गेले. सीमारेखा ही जमीनीवर स्पष्टपणे आखली गेलेली नसल्याने बऱ्याच ठिकाणी त्यात फरक होता. १९१३-१४ मध्ये त्यावेळचे चीन, तीबेट आणि ब्रिटन यांच्या प्रतिनिधींनी शिमल्यात बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये झालेल्या बोलणीनुसार त्यावेळच्या ब्रिटीश, भारत, आणि तिबेट यांच्यामध्ये ८९० किलोमीटरची सिमारेषा आखली गेली. या सीमारेषेला मॅकमोहन रेषा म्हणतात. भारत आणि चीन मध्ये मॅकमोहन रेषा, अॅक्साई चीन आणि सिक्कीम वरुन वाद आहे. चीनने भारताच्या उत्तर आणि उत्तरपूर्व क्षेत्राच्या लडाख, सिक्कीम आणि नेफा, बऱ्याच मोठ्या भूभागावर दावा केला. त्याचवेळेस पाकिस्तान आणि चीनमधील काराकोरम विभागातील भुप्रदेश देण्याघेण्यावरुन भारत चिडलेला होता.

## ५.३ सीमा प्रश्नावर चीनची भूमिका

- भारत आणि चीनमधील सीमारेषा ही औपचारिकपणे आखली गेलेली नाही.
- मॅकमोहन सीमारेषा ही ब्रिटीश वसाहतीच्या काळातील तिबेटवरील हल्ल्याची निष्पत्ती आहे.
- मॅकमोहन करार हा ब्रिटीश वसाहतसत्ता आणि तेव्हा अस्तित्वात असलेला स्वतंत्र तिबेटचा प्रांत यांच्यात घडून आला आणि म्हणून तो चीनला अमान्य आहे.
- तिबेट प्रांत हा फार जास्त काळ स्वतंत्र राहिला नाही आणि तो सार्वभौम चीनचा भाग बनला आणि म्हणून मॅकमोहन सिमारेषाचा दर्जा अनावश्यक बनला.

- पश्चिम विभागात चीनने अक्साई चीनवर आणि उत्तर पूर्व विभागात जम्मू काश्मिर मधील लडाख जिल्ह्यावर दावा केला आहे.
- चीनने जम्मू काश्मिरमधील सुमारे ३८ हजार चौरस किलोमीटरच्या भारतीय भुप्रदेशावर ताबा घेतलेला आहे.
- १९६३ च्या चीन पाकिस्तानच्या सीमा कराराअंतर्गत पाकिस्तानने पाकिस्तान व्याप्त काश्मिरमधील ५१८० चौ.किमी च्या भारतीय भुप्रदेशावरचा हक्क चीनसाठी सोडून दिला आहे.
- चीन अरुणाचल प्रदेशातील सुमारे ९० हजार चौरस किलोमीटर भारतीय भुप्रदेशावर आणि भारत चीन सिमेच्या मध्यविभागातील जवळजवळ २००० चौ. किमी भुप्रदेशावर दावा करत आहे.

## ५.४ सीमा प्रश्नावरुन युद्ध

सीमाप्रश्न हा १९५० च्या अखेरीस एक परिपूर्ण सिमावाद बनला. सिमेवरती चीनी लष्करी तुकड्यांची हजेरी वाढल्याने युद्धांची संभाव्यता वाढली. आणि त्यांनी भारतीय क्षेत्रात वारंवार घुसखोरी केली. चीन भारतीय भुप्रदेशाच्या लडाख व नेफा क्षेत्रात शिरला ज्याचा भारताने तीव्र शब्दात विरोध केला. चीनने १९५० च्या अखेरपर्यंत भारतीय भुप्रदेशाचा खूप मोठा भाग बेकायदेशीर पणे व्यापला. त्याने १९५५ ते १९६० पर्यंत ३० पेक्षा अधिक वेळा घुसखोरी केली. १९६० मध्ये भारत व चीन मधील मॅकमोहन रेषा चीनने औपचारिकता मान्य केली. १९६१ मध्ये चीनने भारतीय भुप्रदेशाच्या सिक्कीम लडाख आणि नेफा क्षेत्रात घुसखोरी केली. भारत व चीनमध्ये सिमातंट्याच्या मुद्यांवर युद्ध भडकले. अशाप्रकारे चीनने भारताच्या लडाखमधील मोठ्या भुप्रदेशाचा बेकायदेशीरपणे ताबा घेतला.

युद्धानंतर १९७०-७१ पर्यंत द्विपक्षीय संबंध ताणलेले राहिले. १९७६ मध्ये परराष्ट्र संबंध हे पुनः प्रस्थापित झाले. डिसेंबर १९८८ मध्ये पंतप्रधान राजीव गांधीच्या चीन भेटीच्या दरम्यान दोन्ही देश सीमा प्रश्न सोडविण्यासाठी एक आघाडी कार्यरत गट स्थापन करण्यावर सहमत झाले. १९९३ मध्ये सिमेवर शांतता व सुरक्षितता टिकविण्यावर करार केला गेला. सिमा समस्या ही जरी एक प्रमुख ज्वलंत बाब असली तरी शांततामय समेटाची शक्यता ही १९८८ पासून आघाडी चर्चा समितीवर विकसीत विश्वासदर्शक उपायांच्या मालिकेमुळे वाढली.

### ब) तिबेटचा मुद्दा :

तिबेट हा भारत आणि चीनमधील सर्वात संवेदनशील मुद्दा आहे. आणि त्याने त्यांच्या संबंधात कटुता आणलेली आहे. तिबेट मुद्यांमुळे भारत चीन संबंध १९५० मध्ये बिघडले चीनने १९४५ मध्ये साम्यवादी बनल्यानंतर विस्तावादी धोरण अवलंबले आणि तिबेट त्याचा पहिला बळी ठरला. चीनने तीबेटच्या भुप्रदेशावर फक्त हक्कच सांगितला नाहीतर त्यावर लष्करी नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुद्धा केला. ऑक्टोबर १९५० मध्ये चीनने तीबेटमध्ये लष्करी तुकड्या पाठवून त्यावर लष्करी नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. चीनच्या तीबेटमधील भुप्रदेशावर नियंत्रण मिळविण्यासाठी लष्कर घुसवण्याच्या धक्कादायक प्रयत्नाला भारताने विरोध केला जरी भारताने तिबेटला चीनचा भाग म्हणून मान्यता दिली असली तरी चीनने ज्या पद्धतीने हा मुद्दा हाताळला त्यावरुन भारताने टिका केली. भारताला हा मुद्दा शांततामय मार्गाने आणि

तिबेटचे धर्मगुरु दलाई लामा यांच्या बरोबरच्या बोलणीद्वारे सोडवावा असे वाटत होते. मे १९५१ मध्ये चीनने तिबेटवरती एक करार लादला. ज्याद्वारे तिबेट चीनच्या प्रांतात आला. १९५१ मध्ये भारताने चीनशी एका करारान्वये तिबेटला चीनचा अविभाज्य भाग म्हणून मान्यता दिली आणि चीनी संतापाला शांत करण्याचा प्रयत्न केला. तथापी तिबेटचा मुद्दा १९५९ मध्ये पुन्हा अचानकपणे उद्भवला आणि भारत चीन संबंध गंभीरपणे ताणले गेले. चीनच्या तिबेटच्या जबरदस्तीने ताबा घेण्याला विरोध करण्यासाठी चीनमध्ये प्रचंड निदर्शने झाली. तिबेटीयन सरकारने स्वतंत्र तिबेटची विचारणी केली. चीनी सैन्याने तिबेटीयन उठाव निदर्यपणे दडपला. अटक टाळण्यासाठी दलाई लामा तिबेटमधून पसार झाले आणि त्यांनी भारतात आश्रय घेतला. भारताने सुद्धा दलाई लामांना राजकिय आश्रय संमत केला. ज्यामुळे चीन चिडला. भारताची ही चाल चीनला अजिबात आवडली नाही.

### क) चीन पाकिस्तान परस्परसंबंध :

चीन पाकिस्तान संबंध हे मुलतः सामाईक भारताविरोधी हितावर उद्भवले व विकसीत झाले. एका विश्लेषकाच्या नोंदी नुसार पाकिस्तान चीनकडे भारत विरुद्ध सुरक्षिततेची हमी म्हणून पाहतो, तर चीनसाठी पाकिस्तान हे कमी दर्जाचे दुय्यम प्रतिबंधक आहे. पाकिस्तानने चीनसोबत १९५१ मध्ये परराष्ट्र संबंध स्थापन केले. भारताप्रमाणेच पाकिस्तान हा सुद्धा अशा थोड्या देशांपैकी एक आहे ज्याने साम्यवादी चीनला मान्यता दिली आणि परराष्ट्र संबंध स्थापले. चीन व पाकिस्तान हे दोघेही भारताविरोधी शत्रुता जोपासतात. ते दोन्ही भारत विरोधी शत्रुत्वाचा दृष्टीकोनाने एकत्र आले आणि त्यांनी संघटन स्थापले. भारत हा घटकासोबतच चीनचे पाकिस्तान सोबतचे सान्निध्य अजुन दोन घटकांमुळे आहे पहिले म्हणजे पाकिस्तानचे युद्ध शास्त्र डावपेचात्मक स्थान पाकिस्तानचे इराणमधील हर्मूजच्या सामुद्रधुनीशी निफटता आहे. ज्याद्वारे २० टक्के खनिज तेलाची वाहतूक चालते. दुसरी गोष्ट म्हणजे चीनला त्यांच्याच झीन झँग प्रदेशातील उघर चळवळीला युक्तीने हाताळण्यात पाकिस्तानची मदत हवी आहे. उघनूला पाकिस्तान मधील मुस्लिम दहशतवादाचा पाठिंबा आहे.

चीनच्या पाकिस्तानसोबतच्या राजकीय आणि लष्करी आघाडीने दक्षिण आशियातील आण्विक देवाणघेवाणत हातभार लावलेला आहे. या गोष्टीची नोंद घेणे प्रसंगोचित ठरेल.

चीन व पाकिस्तान मधील लष्करी आघाडीने शीतयुद्ध काळापासूनच भारताच्या सुरक्षेच्या वातावरणाला धोका निर्माण केला. भारत हा चीन पाकिस्तान संबंधाकडे भारतीय राष्ट्रीय सुरक्षेला असलेला सर्वात मोठा धोका म्हणून बघतो. चीन पाकिस्तानकडे एक लष्करी डावपेचात्मक भागीदार म्हणून बघतो. जो भारतावर नियंत्रण ठेवू शकतो आणि भारताच्या प्रभाव दक्षिण आशियाई उपखंडापर्यंतच सिमित करु शकतो. चीन अधिकृतरित्या अण्वस्त्रे हस्तांतरण न करण्याच्या कराराला चिकटून असला तरी त्याने पाकिस्तानला आण्विक आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमात मदत करणे चालू ठेवले. शीत युद्ध काळात चीनने पाकिस्तानला प्रमुख लष्करी, तंत्रज्ञान व आर्थिक साहाय्य पुरविले. चीनने पाकिस्तानला संवेदनशील आण्विक आणि क्षेपणास्त्र व तंत्रज्ञान व सुटे भाग सुद्धा दिले. चीनने १९६५ आणि १९७१ मधील भारताविरुद्धच्या युद्धात पाकिस्थानची बाजू उचलून धरली व तिला पाठिंबा दिला. चीनने भारताच्या जम्मू काश्मिर क्षेत्रावरील पाकिस्तानच्या दाव्याला पाठिंबा दिला. तज्ञांचे म्हणणे आहे की, चीनची पाकिस्तानला लष्करी व आर्थिक मदत म्हणजे चीनच्या भारताला घेरण्याच्या डावपेचात्मक चालीचा एक भाग आहे. चीन एक संबंधाने चीनेक्षा पाकिस्तानलाच अधिक फायदा करवून दिला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारताने चीनसोबत परराष्ट्र संबंध केव्हा प्रस्थापित केले ?
२) भारत चीन मधील सिमासमस्येवर चर्चा करा.

## ५.५ शीत युद्धोत्तर काळातील भारत चीन संबंध

**परकेपणापासून कराराकडे :**

शीत युद्धोत्तर काळात चीनी भारतीय संबध हे अधिक प्रगल्भ आणि व्यवहार्य बनले. करारप्रक्रिया ही १९८० च्या उत्तर काळात सुरु झाली ती १९९० मध्ये विश्वासदर्शक बांधणी उपायांच्या मालिकेने मजबूत बनली. यामुळे शीतयुद्ध काळातील गैरसमजूत आणि अविश्वास तसेच प्रत्यक्ष युद्धाची संभाव्यता कमी होण्यास मदत झाली. शीतयुद्धोत्तर काळात भारत चीन संबंध सुधारले कारण व्यापार व इतर क्षेत्रातील सर्वतोपरी सहकार्य मजबूत झाले. आज भारत आणि चीन या दोघांचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे त्यांचे आर्थिक स्थिती सुधारणे आणि अनुकूल सुरक्षित वातावरण निश्चित करणे. दोघानाही त्यांच्या सीमेवर शांतता टिकवणे. उर्जा स्त्रोतांचे स्थैर्य व मिळवण्याचे मार्ग आणि स्थिर आशियाई व्यवस्था हवी आहे.

शीतयुद्धोत्तर काळात भारतीय व चीनी परराष्ट्र धोरणाची ध्येये व उद्दिष्ट्ये बदलली. शीत युद्धोत्तर काळात भारत व चीनने उभरत्या जागतिक व्यवस्थेचा तर्कसंगतीला अनुसरुन परराष्ट्रधोरण पुन्हा निश्चित केले. आणि वास्तविक राजकारणावर जोर दिलेल्या वैचारिक घटकांना एवढे महत्त्व दिले नाही. दोघेही बाजूने जबरदस्त जाण आहे की आर्थिक विकास हा शांततेशिवाय शक्य नाही. आणि फक्त शांतताच त्यांना २१ व्या शतकाची जागतिक सत्ता बदलण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण करु शकते. चीन हा लष्करी सुरक्षितता, राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि क्षेत्रीय ऐक्य याचे संरक्षण, आर्थिक प्रगती, सामाजिक कल्याण, महासत्तेचा दर्जा प्राप्त करणे आणि आधुनिकीकरण यावर लक्ष केंद्रित करत आहे. त्याच्या आर्थिक विकासासाठी चीनला दीर्घकालीन स्थैर्याचे आंतरराष्ट्रीय वातावरण आणि आजूबाजूचे स्थिर वातावरण हवे आहे. चीनच्या दक्षिण आशियाई परराष्ट्र धोरण कार्यक्रमात शेजारील शांतता खास करुन भारताप्रती ही सर्वोच्य स्थानी आहे.

## ५.६ भारताप्रती चीनचे बदलते धोरणचित्र

शीत युद्धोत्तर काळात चीनचे भारताप्रती असलेले धोरण बदलले. भारताचा त्याच्या महत्त्वाकांक्षी आर्थिक उदारीकरण कार्यक्रमाद्वारे त्याची अर्थव्यवस्था खूली करण्याचा प्रयत्न पूर्व

आशियाई शेजाऱ्यांसोबत आर्थिक दृष्ट्या करारबद्ध होण्याचा त्याचा प्रयत्न एक आण्विक सत्ता म्हणून त्याचा उदय माहिती तंत्रज्ञान व क्षेपणास्त्र विकास क्षेत्रातील त्याची प्रगती, भारत अमेरिका करारातील दृढता यामुळे भारताची प्रतिमा कमालीची बदलली. या घटनांनी चीनला त्याची भारताला कमी लेखण्याची त्यांची पारंपारिक मनोवृत्ती बदलण्यास भाग पाडले. चीनने जाणले की भारत हा त्याच्या वाढत्या आर्थिक वृद्धी आणि लष्करी सामर्थ्याच्या आधारे पुढे मागे आशियातील एक प्रमुख सत्ता आणि जगभरात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येणे निश्चित आहे. त्याचवेळेस त्याने हे जाणले की भारताला नियंत्रीत ठेवण्याच्या पारंपारिक धोरणामुळे काहीही मिळणार नाही म्हणून भारताला नियंत्रणात ठेवण्याऐवजी चीन त्याच्याशी करारान्वये जुळण्याचा प्रयत्न करत आहे. चीनची ही जाण क्षेत्रीय तसेच जागतिक स्थरावरील बऱ्याच निवन विकासामुळे असण्याची शक्यता आहे. त्यातील प्रमुख गोष्टी पुढीलप्रमाणे.

- शीतयुद्धोत्तर काळातील भारत-अमेरिका संबंधातील मजबुती.
- अण्वस्त्र संपन्न देश म्हणून भारताचा उदय.
- ८% वार्षिक वृद्धी दरासह सातत्यपूर्ण आर्थिकवाढ, क्षेत्रीय व जागतिक प्रसंगांना प्रभावित करण्याची भारताची वाढती क्षमता.
- भारताची क्षेत्रीय आणि जागतिक सत्तांसोबत वाढती गुंतवणूक.
- क्षेत्रीय अधिसत्ता बनण्याचे भारताचे ध्येय.
- विविध महत्त्वाच्या समित्यांवरील भारताचे सदस्यत्व.

या घटकांनी चीनच्या भारताप्रती असलेल्या ऋचीवर प्रभाव टाकला आणि चिनला भारताची दकल घ्यावी लागली. चीनच्या बदलत्या धोरणाचा दक्षिण आशियामधील विविध मुद्यावरील शीतयुद्ध काळातील चीनच्या भुमिकेवर सुद्धा तेवढाच प्रभाव टाकला. असे भारताविरुद्ध पाकिस्तानला दिलेला चीनचा अकारण पाठिंबा, काश्मिर मुद्यावरील चीनची भूमिका, चीनची छोट्या दक्षिण आशियाई देशांप्रती असलेली वृत्ती.

## ५.७ हितांचे एकमेकांवरील अतिक्रमण : एकत्रीत प्रयत्नांची अत्यावश्यकता

भारत आणि चीनच्या हितांचे एकमेकांवरील अतिक्रमण मुख्यतः ३ क्षेत्रात आहे.

**अ) अर्थव्यवस्था आणि व्यापार :** जलद गतीने बदलत्या आंतरराष्ट्रीय वातावरणात जेथे क्षेत्रीय अर्थव्यवस्थेने विचार सरणींना बदलून टाकले आहे, भारत व चीन या दोघांनी त्यांची आर्थिक बंधने दृढ करायचे ठरविले आहे. हे आर्थिक सहकार्य वर्षानुगणिक वाढत आहे. आणि काही अर्थतज्ञ २१ व्या शतकाच्या मध्यापर्यंत चीनडीया (चीन-इंडिया) च्या उदयाचे भाकित करत आहे. व्यापारात सातत्यपूर्ण वाढ होत आहे. आणि २०११ पर्यंत भारत चीनमधील व्यापाराने ५० अब्ज डॉलरचा पल्ला पार केला आणि त्यांनी २०१५ पर्यंत १०० अब्ज डॉलरचे उद्दिष्ट ठेवले आहे. जग हे भारत आणि चीनकडे उभरत्या अर्धसत्ता म्हणून बघत आहे आणि २०५० पर्यंत ल्या यू एस व जापानला बदलून जागतिक अर्थसत्ता बनतील. अर्थव्यवस्था आणि व्यापार ही अशी क्षेत्रे आहे जेथे दोन्ही देशांना परस्पर गुंतवणूक आणि सहकार्यापासून फायदा होऊ शकतो. राजकीय मुद्यांमुळे त्यांच्या संबंधात ताण असला तरी भारत चीनमधील व्यापारसंबंध मागील २ दशकापासून सातत्यपूर्ण प्रगती दर्शवत आहे. व्यापाराने २० अब्ज

डॉलरचा आकडा आधीच पार केला आणि तो २०२० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत पोहचेल. भारताचे आर्थिक उदारीकरण धोरण, पूर्व आशियाई देशांशी आर्थिकदृष्ट्या गुंतवणूकीचे धोरण त्यामुळे चीनशी आर्थिक सहकार्यात प्रचंड योगदान दिले आहे. भारत व चीनचे आर्थिक व व्यापरहितक हे दक्षिण व उत्तरपूर्व आशियामध्ये अतिक्रमीत होते. दोघेही या उपखंडाच्या देशांना आर्थिक व व्यापार करारात गुंतवणूक करण्याचे धोरण आखत आहे. हा मुद्दा सिद्ध करण्यासाठी भारताचे 'पूर्व धोरण पाहा' हे सर्वात चांगले उदाहरण आहे. विविध क्षेत्रीय व जागतिक एकत्रीत आर्थिक व व्यापार व्यासपीठ ब्रीक W.T.O यांचे भारत व चीनचे असलेले सदस्यत्व यामुळे सहकार्य वाढले आहे.

**ब) दहशतवादावर नियंत्रण :**

भारत व चीन हे दोन्ही दहशतवादाच्या हिंसेचे बळी आहे. अर्थात हिंसेची तीव्रता ही दोघांसाठी वेगळी आहे. योगायोगाने दोन्ही देशातील दहशतवादाचे स्त्रोत हे पाकिस्तान मधून उद्भवले आहे. भारत व चीनमधील दहशतवादाच्या हिंसाचाराच्या मुळाचा भाग पाकिस्तान मधून काढला जाऊ शकतो. पाकिस्तानची जिहादी गटांशी असलेली ऐतिहासिक मिळवणी आणि त्याचे सीमापलिकडच्या दहशतवादाला असलेले प्रोत्साहन व मदत यामुळे या उपखंडातील दहशतवादी हिंसाचारात भर पडलेली आहे. पाकिस्तानसोबत चीनची घनिष्ठ मैत्री असून सुद्धा चीन त्याच्या झीन-झँग क्षेत्रातील पाकिस्तानच्या भूमिकेला मान्यता देतो. चीनच्या झीन-झीयाँग क्षेत्राच्या मुस्लिम उराईझ मधील चिन विरोधी चळवळीच्या आव्हानाला चीन तोंड देत आहे. या मुस्लिम चळवळींना पाकिस्तानच्या जिहादी गटाकडून बाह्यपाठिंबा मिळत आहे. थोडक्यात दक्षिण आशियातील दहशतवादाच्या नियंत्रणात आणि पाकिस्तानला शिस्त लावण्यात भारत आणि चीनचे हित एकच आहे. भारत आणि चीनचे दहशतवाद विरोधी एकत्रीत प्रयत्न हे दहशतवादाच्या धोक्यांना प्रतिहल्याने तोंड देण्यासाठी निर्णायक ठरतील. २००२ मध्ये भारत आणि चीनने दहशतवादाला तोंड देण्यासाठी एक एकत्रीत कार्यरत गट स्थापन केला. शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (स्को) रशिया, उझबेकीस्थान, ताजिकीस्थान आणि फिरगिझस्थान या सोबत चीन पाचवा (५ वा) सदस्य देश आहे. ही संघटना २००१ मध्ये एकत्रीत दहशतवाद विरोधी यंत्रणा म्हणून स्थापन झाली. भारत स्को चा सदस्य बनण्याच्या प्रयत्नात आहे. जर भारत त्याचा सदस्य बनला तर दहशतवादावरील भारत चीन भागीदारीत जबरदस्त वाढ होईल.

**क) आण्विक उर्जा :**

आण्विक उर्जा हे असे उभरते क्षेत्र आहे जेथे हितांच्या अतिक्रमणाच्या (एकच असणे) संधी अधिक आहे. भारत आणि चीन हे दोघेही उर्जेसाठी भुकेलेले देश आहे. आणि आण्विक उर्जेत त्यांच्या वाढत्या उर्जेची गरज भागवण्याची आणि त्यांचे आखातावरील परावलंबित्व कमी करण्याची क्षमता आहे. चीनला भारताशी आण्विक उर्जाव्यापाराने अधिक लाभ होऊ शकतो. चीन हा आण्विक पुरवठादार गटाचा सदस्य आहे आणि त्याला भारताला आण्विक इंधनाचा पुरवठा करुन खूप लाभ होऊ शकतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारत आणि चीन यांच्या हितांचे अतिक्रमण असलेली प्राथमिक क्षेत्रे ओळखा.
२) भारताप्रती चीनच्या बदलत्या धोरणाला जबाबदार असलेल्या घटकांची चर्चा करा.

## ५.८ अमेरिका व चीनमधील रुंदावणारी दरी भारतासाठी सूचीत अर्थ

शीत युद्धोत्तर काळात अमेरिका चीन संबंधाना खालील घटकांमुळे ताणतणावांना तोंड द्यावे लागत आहे.

अ) चीन हा जवळजवळ सर्व क्षेत्रात यू एस ची जागा घेत आहे. तज्ञ भाकीत करीत आहेत की यू एस ही अस्तगत जाणारी सत्ता आहे आणि २१ व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारत व चीननंतर तिसऱ्या स्थानावर फेकला जाईल. चीनच्या वाढत्या लष्करी व आर्थिक सामर्थ्याने आशियातील यू एस ची अत्यंत महत्त्वाची अशी सुरक्षितता आणि व्यापार हित धोक्यात आणलेले आहे. १.३ अब्ज लोक ४०% बचत दर आणि २००० अब्ज डॉलर चलनसाठा अशा उभरत जाणाऱ्या चीनने जगाला खचितच आश्चर्यचकित केले आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा उत्पादक देश बनला आहे. मागील दीड दशकात चीनने त्याची सुरक्षा पद्धती प्रातिनिधिकपणे मजबूत केली आहे. हे लष्करी सामर्थ्य हा चीनच्या परराष्ट्र व डावपेचात्मक धोरणाचा गाभा आहे.

ब) चीनचे जवळजवळ १५ देशांशी क्षेत्रीय भांडणे आहेत आणि हे आशियामधील यू एस च्या सहभागाचे एक महत्त्वाचे कारण आहे. चीनचे भारत, रशिया, जपान आणि बऱ्याच दक्षिणपूर्व आशियायी देशांशी सिमासमस्या आहेत. यातील प्रमुख म्हणजे सेंकाकूवरील जापानशी असलेले भांडण आणि स्पार्टलेवरील दक्षिणपूर्व आशियाई देशांशी असलेला तंटा चीनने तैवान, तिबेट, झीन-झीयांग यासह दक्षिण चीनला त्याच्या लष्करी डावपेचात्मक हिताचे केंद्रीय क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या चीनच्या भूमिकेने दक्षिणपूर्व आशियाई देशांना असुरक्षित बनवले आहे. नुकतेच चीनने दक्षिण पूर्व आशियाई देशांशी सीमामुद्यावरुन खूपशी आक्रमक आणि भांडखोर राजकारणी जाहिर निवेदने केली. त्यामुळे सनसनाठी निर्माण झाली आहे. चीनच्या या चालीने जपान दक्षिण कोरिया भारत व इतर बरेच दक्षिणपूर्व आशियाई देश यांना शत्रू केले आहे. हे देश आता चीनचे दु:साहस रोखण्यासाठी प्रतिडावपेचाचा गंभीरपणे विचार करत आहे.

क) या चालींनी आशियामधील यू एस चे सुरक्षा व व्यापार हित यांना धोका उत्पन्न केला आणि आशियामधील सत्तेची वाढती असमानता टिकवण्यासाठी यु एस चा सहभाग दृढ केला. यू एस व चीन मदील संबंधात तान निर्माण करणारे बरेच मुद्दे आहेत. जसे उत्तर कोरीयाई आण्विक कार्यक्रमावरील चीनची भूमिका, चीन व पाकिस्तानमधील आण्विक संबंध रिझर्व्ह बँकेंचे जागतिक चलन असलेले अमेरिकन डॉलर बदलण्याचा चीनचा प्रयत्न, चीनची एकपक्षीय राजकारण पद्धती, चीनमधील मानवी अधिकारांच्या उल्लंघनांची उदाहरणे संयुक्त राष्ट्रसुरक्षा परिषदेतील इतरांसोबतचे यू.एस. प्रणित कित्येक ठरावांना चीनचा विरोध.

ड) चीन हा त्याच्या संरक्षणावरील खर्च सातत्याने वाढवत आहे. मागील एका दशकापासून चीनच्या संरक्षण अर्थसंकल्प हा वाढतच चालला आहे. २००० पासून २०१२ पर्यंत चीनचा संरक्षण अर्थसंकल्प ५ पटीने वाढला आहे. चीनने त्याच्या १२ व्या पंचवार्षिक योजनेत संरक्षण खर्च १२ टक्कांनी वाढवला आहे. चीनच्या त्यांच्या संरक्षण खर्चात वाढ करण्याच्या प्रयत्नाने त्याच्या शेजाऱ्यांना अधिक असुरक्षित बनवले आहे.

इ) या मुद्यांना अनुरक्षून काही तंज्ञ शीत युद्धासारख्या परिस्थितीच्या पुनरुत्थानाच्या शक्यतेचे भाकीत करतात. आशियातील चीनच्या जलद वाढणाऱ्या प्रभावाच्या नियंत्रणासाठी अमेरिकेने त्यांचे आशियातील डावपेचात्मक धोरण पुनर्रचित केले आहे. हे नविन धोरण आशियातील अमेरिकेच्या वाढत्या प्रभावाचे द्योतक आहे. या नविन धोरणाचा भाग म्हणून यू एस. मध्य, दक्षिण आणि दक्षिणपूर्व आशियावरील लष्करी वर्चस्वावर नियंत्रण ठेवून चीनच्या उर्जास्त्रोतांच्या वाहतूक मार्गांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. अमेरिका चीनच्या शेजारील देशांशी संरक्षण कराराची बोलणी करुन आणि या देशांना अमेरिकाचे उपग्रह करुन चीनला वेढायची योजना करत आहे. तैवानला अमेरिकेचा शस्त्रपुरवठा, दक्षिण कोरिया व भारतासोबत एकत्रीत लष्करी सराव, पिवळ्या समुद्रात विमान वाहके पाठवणे इ. अमेरिकेच्या अलिकडील काळातील काही चाली आहेत. यामुळे चीन संतापला आहे आणि यू. एस. चीन संबंधात ताण आला आहे.

फ) यू. एस. चीनमधील राजकारणी सुधारणांची इच्छा करतो व त्यांना उत्तेजन देतो अमेरिका चीन मधील एकपक्षीय प्रगतीवर टिका करतो आणि त्यांच्या राजकारण पद्धतीत लोकशाही सुधारणा आणण्याचे आवाहन करतो. यू. एस. चे असे प्रयत्न म्हणजे चीनच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ आहे असे मानतो.

ग) चीनमधील मानवी हक्क उल्लघंनाची उदाहरणे ही अमेरिकेच्या टिकेच्या केंद्रस्थानी आहे. यू. एस. UNHRC सारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठाचा वापर चीनवर टिका करण्यासाठी करतो आणि विविध आंतरराष्ट्रीय बिगर सरकारी संस्थांना मानवी हक्क उल्लंघनासाठी चीनला लक्ष बनवण्याकरता निर्देशीत करतो.

ह) यू. एस. च्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीने चीनला संताप, आणला आहे. कारण तो हा कार्यक्रम म्हणजे चीनविरोधी सुरक्षापद्धती निर्मित करण्याचा आणि चीनचे आंतरखंडीय बॅलिस्टीक क्षेपणास्त्रांचे उदासिनीकरण करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न समजतो. या कार्यक्रमाचे ध्येय म्हणजे युरोप व आशिया मधील अमेरिकेचे मित्र राष्ट्र आणि अमेरिकेला चीन व रशियाच्या संभाव्य क्षेपणास्त्र हल्ल्यापासून छत्रीमयक संरक्षण पुरवणे होय. चीनची २००८ ची संरक्षण श्वेतपत्रिका अशा अमेरिकेच्या प्रयत्नाविषयीची चिंता उघडपणे व्यक्त

करते ती पत्रिका म्हणते, “अमेरिका हा लष्करी आघाड्यांना आधार देऊन आणि क्षेपणास्त्र विरोधी प्रणालीच्या उपयोगितेला वेग देऊन त्याचे या क्षेत्रातील लष्करी सामर्थ्य मजबूत करत आहे.” चीन हा अमेरिका वर १९७२ च्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्र विरोधी कराराच्या जो क्षेपणास्त्र विरोधी पद्धती विकसित करण्यास सदस्य देशाना प्रतिबंध करतो, शर्थींचा भंग करण्याच्या आरोप लावत आहे.

ञ) चीन घटकामुळे यू. एस. व भारताला त्यांचे सहकार्य वाढवायला संधी प्रधान केली. यू. एस. व भारताचे हित चीनला नियंत्रणात ठेवण्यात एकच आहे.

## ५.९ भारत चीन करारातील अडथळे

**अ) आशियातील चीनचे वाढते प्राबल्य :** मागील काही काळात चीन हा भारतासह विविध आशियाई देशांसाठी सर्वात मोठा धोका व सुरक्षा आव्हान म्हणून उदयास आला आहे. चीनने मागील काही काळात बऱ्याच हल्लेखोर व आक्रमक चाली केल्या आहे. ज्यामुळे पूर्व आशियाई देशांमध्ये भिती व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. चीन पूर्व आशियाला केवळ त्याच्याच प्रभावाचे क्षेत्र म्हणून रुपांतरित करण्याचा प्रयत्न करत आहे. चीनचे तैवान, तिबेट आणि झीन-झीयांग सह दक्षिण चीन समुद्राला त्याचे मध्यवर्ती डावपेचात्मक क्षेत्र बनवले आहे. चीन हिंदी महासागरात सुद्धा प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहे. ज्यामुळे भार भयभीत आहे. भारतीय संरक्षण विश्लेषक निर्देश करतात कि, चीन भारताच्या सर्व शेजारील राष्ट्रातील त्याचा प्रभाव वाढवून आणि त्या शेजारील राष्ट्रांना त्याचे उपग्रह बनवून भारताला वेढायचा प्रयत्न करत आहे. यामुळेच भारताने पाकिस्तानची चिंता करणे सोडून द्यावे व चीनवर लक्ष केंद्रीत करावे.

**ब) चीनच्या तोलामालाचा देश म्हणून भारताला प्रक्षेपित करणे :** अमेरिका आणि भारत या दोघांची अशी पक्की समज आहे की त्यांची नविन राष्ट्रीय भौगोलिक डावपेचात्मक हित हे आशिया आणि विशेषतः चीनला नियंत्रण करण्यात मागील दीड दशकातील भारत यू. एस. गुंतवणूकीची मजबूती म्हणजे ड्रगनला माणसाळवण्याची सुयोग्य निर्देशीत चाल आहे. या चालीचा एक भाग म्हणून यू.एस. भारताला एक उदयोन्मुख क्षेत्रीय सत्ता म्हणून पाठिंबा देत आहे व उत्तेजन देत आहे. आणि चीनच्या तोलामोलाचा एक देश म्हणून प्रक्षेपीत करत आहे. शीत युद्धोत्तर काळातील भारत यू.एस संबंधातील सुधारणा या भारत चीन गुंतवणूक प्रक्रियेतील अडचणी सिद्ध झाल्या. भारताला चीनचा तोलामोलाचा देश म्हणून माडंण्याचा अमेरिकेचा प्रयत्न चीनसाठी गंभीर डोकेदुखी बनला आहे.

**क) चीन पाक परस्पर संबंध :** चीन व पाकिस्तानमधील आण्विक संबंध भारतासाठी एक चिंतेचा विषय आहे. चीन पाकिस्तानाल कित्येक वर्षापासून क्षेपणास्त्र आण्विक तंत्रज्ञान व सुटे भाग पुरवत आलेला आहे. जे दक्षिण आशियातील अण्वस्त्रे देण्यासाठीचे एक महत्त्वाचे कारण बनले आहे. अशाप्रकारे वागून चीन नॉन प्रॉलिफरेशन ट्रिटी (ज्यांच्याकडे अण्वस्त्रे नाही त्यांना ती देऊ नये असा करार) चे उल्लंघन करीत आहे.

**ड) भारत व चीन मधील वाढती आर्थिक व लष्करी तफावत :**

भारत व चीनमधील आर्थिक व लष्करी तफावत दिवसेंदिवस वाढत आहे. ज्यामुळे भारताने त्याचे परराष्ट्र आणि सुरक्षाधोरण पर्यायांवर पुनर्विचार करणे अत्यावश्यक बनले आहे. चीनची अर्थव्यवस्था ही दरवर्षी १० ते १२ टक्यांनी वाढत आहे आणि चीनचा दरडोई जीडिपी हा साधारणतः ४००० डॉलर आहे. याउलट भारताचा आर्थिक वृद्धी दर ८% असून त्यांचे दरडोई जीडीपी फक्त १००० डॉलर आहे. जर भारत व चीन दोघांनी येत्या दोन दशकात हाच वृद्धीदर जोपासला तर चीनची अर्थव्यवस्था ही भारतापेक्षा ८ पट जास्त होईल. अर्थतज्ज्ञांच्या मतानुसार २०४० पर्यंत चीनचा जीडीपी हा १२३ हजार अब्ज डॉलर पर्यंत वाढेल आणि तो जगाच्या एकूण उत्पन्नाच्या ४०% होईल.

**इ) वेढण्याचे चीनी धोरण :** चीन भारताला वेढण्याचा प्रयत्न करत आहे. भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये चीनची हजरी ही भरमसाठ व नाट्यमय रित्या वाढली आहे. संरक्षक संश्लेशक सांगतात कि चीन भारताच्या शेजाऱ्यांना उपग्रह बनवत आहे. पाकिस्तानी आण्विक कार्यक्रमाला पाठिंबा व प्रोत्साहन देण्याचा चीनचा प्रयत्न बौद्धिक सहकार्याद्वारे मॅनमार मध्ये चीनचा वाढता प्रभाव, इंडिया व तिबेटकडे निर्देशीत केलेली चीनची तैनात क्षेपणास्त्रे हे चीनचे भारताला वेढण्याच्या योजना सिद्ध करतात. जे मोहन मलिक एक भारतीय डावपेच विश्लेषक यांच्यानुसार, "भारत आणि चीनमध्ये हितांचा मुलभूत विरोध आहे. जो इतिहास संस्कृती आणि भौगोलिक राजकारणामध्ये दडलेला आहे. आणि भारताला एक मोठी सत्ता म्हणूनक उदयास येण्यापासून रोखण्याच्या आणि मध्य आशियापासून दक्षिणपूर्व आशियापर्यंत पूर्वी असलेल्या एक महान सत्ता व एक महान संस्कृती ची भूमिका निभावण्यापासून रोखण्याच्या चीनच्या निश्चयातून स्पष्ट होते." मागील एक दशकात चीन हा भारताचा बाह्यसुरक्षा ताबेवार बनला आहे. भारताभोवतीचे चीनचे वाढते प्राबल्य हा भारताचे लष्कर बांधणीसाठी एक संदर्भ मुद्दा बनला आहे. भारताचे संरक्षण आधुनिकीकरण चीनकेंद्रीत बनले आहे. भारत हा आर्थिक आणि सुरक्षा क्षेत्रात चीनशी वाढण्याच्या तफावतीला धैर्याने तोंड देत आहे आणि लष्करबांधणीत खास करुन आण्विक बलाद्वारे या असमतोलाची तुट भरुन काढण्याचा प्रयत्न करत आहे.

**भारतासमोरचे पर्याय :**

भारताच्या डावपेच कर्त्यासमोरील सर्वात महत्त्वाचा लष्करी प्रश्न म्हणजे युद्धखोर चीनशी कसे वागावे. चीनी घटक हा भारतीय लष्करी विचारसरणीवर बहुतकरुन वर्चस्व दाखवतो. हे पुराव्याने सिद्ध झाले आहे. जेव्हा अलिकडेच भारतातील तज्ज्ञांच्या एका गटाने २१ व्या शतकातील भारतासाठी सुरक्षा डावपेचाचा मसुदा बनवला. या डावपेचाला अलिप्ततावाद २; २१ व्या शतकातील भारतासाठीचे परराष्ट्र व लष्करी धोरण संबोधले जाते हा मसुदा फेब्रुवारी २०१२ मध्ये काढला गेला. या डावपेचाद्वारे चीनला एक भीतीदायक आव्हान म्हणून ओळखले गेले आणि चीनच्या संदर्भात भारताची लष्करी स्वायत्तता टिकविण्याच्या सर्वसमावेशक तत्त्वांच्या अत्यावश्यकत्मेर जोर दिला गेला. हे डावपेच चीनशी संबधीत दोन ध्येयांवर केंद्रित आहे. पहिले म्हणजे भारतातील त्याच्या शत्रूपासून विशेषतः चीनपासून संरक्षण करण्यासाठी पुरेशा संरक्षणक्षमता संपादन करणे दुसरे म्हणजे इतर सत्ता खास करुन अमेरिका सोबतचे आर्थिक व लष्करी पातळीवरील भागीदारी विसरणे. प्रसिद्ध परराष्ट्र व सुरक्षा धोरण तज्ञ प्रोफेसर कांती वाजपेयी नमूद करतात की भारत व चीनमधील आर्थिक व लष्करी वाढत्या तफावतीला लक्षात घेता भारताला त्यांच्या पर्यायांवर पुनर्विचार करायला हवा. त्यांनी आर्थिक व लष्करी तफावत भरुन काढण्यासाठी भारतासमोर चार पर्याय आहे असे सांगितले.

१) प्रंचड प्रमाणात लष्करी बांधणी सुरु करणे खास करुन त्याच्या अण्वस्त्राचे दर्जात्मक व संख्यात्मक विस्तारण.
२) यू.एस., रशिया आणि जापानसोबत मैत्रीपूर्ण आघाडी करणे.
३) चीनशी असलेले मुख्यवाद मिटवणे.
४) चीनला न दुखवणे.

भारत हा चीनसोबत आर्थिक व लष्करी क्षेत्रात सामर्थ्याचा समतोल विकसीत करुन चीनच्या विस्तारवादी व वर्चस्ववादी धोरणांना तोंड देऊ शकतो. प्रो.वाजपेयी असेही नमूद करतात की वरीलपैकी कुठलाही एक पर्याय सुरु करण्याऐवजी वरील सर्वांचे चातुर्यपणे एकत्रीकरण करणे हा भारतासाठी सर्वात चांगला पर्याय होऊ शकतो. अलीकडील काळात भारताने अमेरिका सोबत आर्थिक व लष्करी गुंतवणूक प्रघाड केली आहे. तसेच तो रशिया सोबतचे आर्थिक व लष्करी संबंध मजबूत करत आहे. भारत हा स्थानिक मुद्यांच्या वर उठण्याचा प्रयत्न करत आहे. आणि विविध जागतिक मुद्यांवर भूमिका बजावत आहे. भारताला चीनच्या नैसर्गिक तोलामोलांचा देश म्हणून प्रक्षेपित करण्याचा अमेरिकेचा प्रयत्नांना भारत विधायकपणे प्रतिसाद देत आहे. आणि विविध मुद्यांवर अमेरिका सोबत जागतिक भागीदार बनत आहे. कित्येक तंज्ञाना वाटते की चीनपासून जरी प्रत्यक्ष लष्करी धोका नसला तरी भारताने लक्षात ठेवावे की चीन हा सर्वात मोठा अनकालनीय शत्रू आहे आणि म्हणून त्याच्या संरक्षण मुद्यावर तडजोड करु नये.

क्षेपणास्त्र सामर्थ्याने चीनला लेचापेचा बनवणे. एप्रिल २०१२ मधील ५००० किमी पल्ल्याच्या बॅलिस्टीक क्षेपणास्त्र अग्नी ५ च्या यशस्वी चाचणीने भारताचे जगातील लष्करी स्थान बदलले. अग्नी ची चाचणी ही मुख्यतः भारताची चीनविरोधी आण्विक प्रतिबंधाची संदर्भात समजली जाते. या क्षेत्रातील चीनच्या वाढत्या प्राबल्याने निर्माण झालेल्या असुरक्षा आणि धोक्याच्या वातावरणातील भारताची अग्नी ५ क्षेपणास्त्राची चाचणी ही कायदेशीर देशहिताच्या सुरक्षा व संरक्षणासाठी होती. ही चाचणी भारताच्या आण्विक प्रतिबंध कार्यक्रमाचा एक अत्यावश्यक भाग बनली आणि त्याला खरोखर अभेद्य व विश्वसनीय बनवले. अग्नी ५ चा पल्ला हा ५००० किमी पेक्षा जास्त असल्याने तो चीनची राजधानी बिजिंगवर अण्वस्त्र वाहून नेऊ शकतो. या चाचणीने भारताला चीनसोबत समानतेच्या दर्जाचा एक घटक मिळवून दिला. अग्नीच्या यशस्वी चाचणीने चीनचे या क्षेत्रातील विशेष स्थान गमावले आणि त्याला भारताच्या वाढत्या सामर्थ्याला स्विकारणे भाग पडले. त्याने एका बाजूने भारताच्या आण्विक प्रतिबंध कार्यक्रमाला विश्वनीयता पुरविली आणि भारताच्या वाढत्या आण्विक क्षमतेचाक तीव्र संदेश भारताच्या शत्रू राष्ट्रांपर्यत विशेषतः चीनपर्यंत पोहचवण्यात यशस्वी झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारत चीन गुंतवणूकीवरील अडचणी कोणत्या ?
२) चीनच्या संबंधात भारतापुढील पर्यायांची चर्चा करा.

## ५.१० निष्कर्ष

शीत युद्धोत्तर काळात भारत आणि चीन यांच्यातील परस्परसंबंध खरोखर बदलले. भारत आणि चीन हे मित्र बनू शकत नाही. तथापि ते त्यांचे संबंध नियमित करण्यास आणि एकमेकांच्या चिंता समाविष्ट करण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षांना जुळवून घेण्यास शिकले. ने.एन. विनितांनी नेमकेपणे म्हटले आहे, "भारत व चीन हे मित्र बनू शकतात ज्यांचे संबंध हे व्यवहार्यता आणि परस्पर हिताच्या एकत्रीकरणावर आधारित असावयास हवे आणि एकमेकांच्या हितांची वस्तूनिष्ठता आणि योग्य मित्रभाषीपणा सुरक्षिततेची जाण आणि आर्थिक गरजाद्वारे सौम्य केल्या जाव्या." बरेच जण मानतात की भारत व चीन मध्ये भविष्यात प्रत्यक्ष युद्ध होण्याची शक्यता नाही कारण दोघेही अण्वस्त्र संपन्न आहे आणि त्यांच्या मध्ये दहशतीचा समतोल आहे. पारंपारिक युद्ध दे युद्ध अतिदुरची शक्यता आहे कारण ते खूप खर्चिक असेल आणि हानी ही लाभापेक्षा जास्त असेल.

## ५.११ सारांश

भारत आणि चीन हे आशियाचे दोन मोठे देश आहे आणि दोघांमध्ये वाढ व विकासाची क्षमता आहे. भारत १९४७ मध्ये स्वतंत्र झाला तर चीन १९४९ मध्ये साम्यवादी बनला.

- शीत युद्धकाळात भारत आणि चीन हे परस्परांच्या हीत व उद्देशाविषयी भयभीत व विरोधी होते. भारत व चीनमधील संबंधातील भांडणे व अविश्वासाचा वारसा हा बऱ्याच मुद्याद्वारे होता विशेषतः न सुटलेला सिमाप्रश्न, तिबेट मुद्दा आणि चीन पाकिस्तान संबंध.
- भारत चीनमधील संबंध १९५० मध्ये सीमाप्रश्नाच्या मुद्यावर अतिषय गुंतागुंतीचे बनले ज्याची परिणती १९६२ मधील युद्धात झाली.
- तिबेट मुद्यामुळे भारत चीन संबंध १९५० मध्ये बिघडले.
- चीन पाक संबंध हे मुलतः सामाईक भारत विरोधी हितावरुन उभरले व विकसीत झाले. ज्यामुळे शीतयुद्ध काळात आणि शीतयुद्धोत्तर काळात भारत चीनमध्ये तणाव निर्माण झाला.
- शीत युद्धोत्तर काळात चीनी भारतीय संबंध हे अधिक प्रगल्भ व व्यवहारी बनले. गुंतवणूकीची प्रक्रिया जी १९८० च्या उत्तर काळात सुरु झाली ती विश्वास बांधली उपायांच्या मालिदेद्वारे १९९० मध्ये मजबूत झाली.
- चीनी धोरणातील बदल हा क्षेत्रीय तसेच जागतिक स्तरावरील विविध नविन सुधारणांमुळे घडून येऊ शकला.
- यू.एस. चीन संबंधामध्ये शीत युद्धोत्तर काळात ताण तणाव निर्माण झाला त्याचा भारतासाठी सुचित अर्थ आहे.
- भारत चीन संबंध हे शीत युद्धोत्तर काळात खरोखर बदलले भारत आणि चीन मीत्र बनू शकत नाही तथापी ते त्यांचे संबंध नियमित करण्यास आणि एकमेकांच्या चिंता समाविष्ट करणाऱ्या त्याच्या महत्त्वाकाक्षांना जुळवून घेण्यास शिकले.

## ५.१२ सरावासाठी प्रश्न

१) शीतयुद्ध काळातील भारत चीन संबंधावर चर्चा करा.

२) शीत युद्धोत्तर काळातील भारत चीन संबंधातील बदल स्पष्ट करा.

३) शीत युद्धोत्तर काळात भारत चीन संबंध हे परकेपणापासून गुंतवणूकीपर्यंत आले याच्याशी तुम्ही सहमत आहात का? चर्चा करा.

४) शीत युद्धोत्तर काळात चीनी धोरण भारताप्रती बदलण्यास जबाबदार असलेल्या घटकांची चर्चा करा.

५) अलिकडील काळातील यू. एस. चीन संबंधातील बदलांची आणि त्याचे भारतासाठी असलेले सूचीत अर्थ याची चर्चा करा.

## ५.१३ संदर्भसूची

1) Amitabh Mattoo Imaging China, in Kanti Bajipai and Amitabh Matoo edited The Peacock and the Dragon India China Relations in the 21st Century HAR - ANAd Publications 2000.

2) J. Mohan Malik "India China relations in the 21st Century. The continuing Rivatry," Brahma Challeney edited recurring India's future in the New Millennium, Orient Longman 1999.

3) Franklin and Harding, The India - China Relation Riverly and engagement (New Delhi Oxford University Press 2004)

4) N. S. Sisoida Emering India : Security and Foreign Policy Perspectives India and the Asia Pacific (New Delhi : IDSA 2005)

5) Dittmer L. South Asia's Security ditemina Pakistan and China. (New York : M. E. Sharpe 2005)

6) Malviya J. G. Indian and Chinese Foreign Policies in Perspective Indian Foreign Policy (LA, USA, Radiant Publisher, 1998).

❖❖❖❖

# ६

# भारत आणि अमेरिका संबंध

**विभाग रचना**

६.० उद्देश
६.१ परिचय
६.२ विभागरचना
६.३ शीत युद्धोत्तर काळात दक्षिण आशियाप्रती यूएस चे परराष्ट्र व सुरक्षा धोरण
६.४ भारत यूएस परराष्ट्रधोरण कार्यक्रमावरील प्रभावशाली मुद्दे
६.५ ९/११ नंतर दक्षिण आशियाप्रती यूएस चे सुरक्षाधोरण : भारतासाठी सूचीत अर्थ
६.६ परस्पराप्रती लाभ
६.७ गुंतवणुकीच्या खुणा
६.८ अंतिम नोंदी
६.९ सारांश
६.१० विभागवार प्रश्न
६.११ संदर्भ सूची

## ६.० उद्देश :

हा विभाग शीतयुद्ध व शीत युद्धोत्तर काळातील यूएस चे दक्षिण आशियाप्रती परराष्ट्र आणि सुरक्षा धोणांवर चर्चा करून या काळातील भारत अमेरिका संबंधाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो या विभागाचा मुख्य हेतू म्हणजे भारत यूएस संबंधांचा परकेपणापासून गुंतवणूकीपर्यंतचा विकास, त्यांच्यातील हितांचे साधर्म्य आणि वाढती गूंतवणूक समजून घेणे होय. त्याचवेळेस हा विभाग भारत यूएस संबंधातील काही निराशाजनक बाबी आणि अडचणींवर सुद्धा प्रकाश टाकतो. या विभागाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी भारत यूएस संबंधाचा पूर्ण पल्ला आणि हे संबंध शीत युद्धोत्तर काळात परकेपणापासून गुंतवणूकीपर्यंत कसे विकसीत झाले हे समजण्यास समर्थ ठरेल.

## ६.१ परिचय :

२१ व्या शतकात शिरलेल्या भारत यूएस भागिदारीचा आशियातील आणि विशेषतः दक्षिण आशियातील सुरक्षा वातावरणावर जबरदस्त प्रभाव आहे. हा विभाग भारत आणि यूएसमधील संबंधाने परकेपणापासून (शीतयुद्धकाळ) ते गुंतवणूकीपर्यंत (शीतयुद्धोत्तर काळ) कशी प्रगती केली आणि या बदलाला जबाबदार असलेल्या घटकांचे विश्लेषण करतो. या

प्राथमिक उद्देशांसह हा विभाग या दोन्ही देशांच्या हितांच्या रूपांतरणाची क्षेत्रे आणि या घटकांमुळे ते देश कसे जवळ आले याचीही चर्चा करतो. हा विभाग मुद्दा मांडतो की जरी भारत आणि यूएस च्या जागतिक दृष्टीकोनात प्रमुख फरक असले तरी पुरक हितांच्या पायावर सुरक्षा संघटनांची तेथे शक्यता आहे.

## ६.२ विभाग रचना :

हा विभाग ६ भागात विभागला गेला आहे. **पहिला विभाग** हा परकेपणाच्या शीतयुद्ध अवस्थेपासून गुंतवणूकीच्या शीत युद्धोत्तर अवस्थेपर्यंत भारत यूएस संबंधांच्या हळूवार विकासाशी संबंधीत आहे. **दुसरा विभाग** हा दक्षिण आशियाई खंडाच्या वैशिष्ट्यपूर्ण समस्या आणि या समस्यांमुळे यूएस क्षेत्राकडे लक्ष कसे वेधले गेले आणि भारत यूएस सहकार्य सूकर कसे झाले याची माहीती देतो. ९/११ नंतर दक्षिण आशियाप्रती यूएस सुरक्षा धोरण आणि यूएस ची काश्मिर मुद्यावरील बदललेली भूमिका याचा समावेश **तीसऱ्या** भागात आहे. **चौथा** भाग हा यूएस व भारताचे एकमेकांप्रती असलेले महत्व आणि ही गुंतवणूक परस्पर लाभदायक कशी आहे याच्याशी संबंधीत आहे. **पाचवा भाग** हा गुंतवणूकीचे प्रतिबिंब आणि ही गुंतवणूक मजबूत करण्यासाठी भारत आणि यूएस ने वापरलेले विविध टप्पे व चाली यांच्यावर प्रकाश टाकते. हा विभाग असा आशावाद ठेवून शेवट करतो की भारत आणि यूएस मधील ही सध्याची गुंतवणूक ही डावपेचात्मक भागिदारी बदलू शकते आणि आशियातील सत्ता चित्राचा सध्याचा समतोल बदलू शकतो.

**भाग १**

**भारत यूएस संबंधाचा विकास**

**अ शीतयुद्ध काळ : ताणतणावाच्या अवस्था**

२१ व्या शतकात भारताने आशियातील गुंतवणूकीला उच्चप्रधान्य दिले आणि या नविन धोरणाद्वारे भारताला दुय्यम दर्जा देण्यात आला शीतयुद्धोत्तर काळात आशियामध्ये उघड झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण घटनांच्या मालिकेने या क्षेत्रातील यूएस ची गुंतवणुक अत्यावश्यक बनली. आशियात आणि विशेषतः दक्षिण आशियात विविध नविन घटनांनी यूएस चे लक्ष वेधले. दक्षिण आशियातील भारत व पाकिस्तानचे अण्वस्त्र सबलीकरण होणे, काश्मिरचे रूपांतरण संभाव्य आण्विक चकमकीच्या ठिकाणात होणे. भारताचा हळूहळू पण सातत्यपूर्ण उगम आणि चीनचा हिंदी महासागरात प्रवेश करण्याचे वाढते प्रयत्न हे इतर मुद्यांसोबतचे अजून काही प्रमुख मुद्दे होते यामुळे यूएस चे लक्ष या उपखंडाकडे वळले क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाबींतील एकत्रीत हिताच्या आधारावर बिल क्लिंटन पासून बराक ओबामा शासनापर्यंत दक्षिण आशियाप्रती असलेल्या यूएस सुरक्षा धोरणात भारताला निकटचे दोस्तराष्ट्र म्हणून जुळवून घेण्यावर विशेष जोर दिला गेला. हे समजणे प्रसंगोचित ठरेल की या गुंतवणूकीच्या काळात भारत आणि यूएस च्या विशिष्ट मुद्यावरच्या भिन्न जाणीवा जसे पाकिस्तानला मदत, काश्मिर आणि दहशतवाद या सुरक्षा आणि व्यापाराच्या क्षेत्रातील सहकार्याच्या मार्गात आडव्या आल्या नाही. ही गोष्ट त्यांच्या विवाद्य मुद्दे त्याचा एकत्रीत हितापासून वेगळे करण्याची त्यांची परस्पर इच्छाशक्ती दर्शवते.

जगातील सर्वात मोठे लोकशाही असून आणि वैश्विक लोकशाही मुल्यात विश्वास असून सुद्धा शीत युद्धकाळात भारत यु.एस. संबधाने सततचे चढउतार पाहिले. (१) हे संबंध शीत राजकारणापासून उत्पन्न झालेल्या विशिष्ट महत्त्वाच्या क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांच्या संदर्भातील परराष्ट्रधोरण फल आणि चित्र यातील फरकामुळे निर्माण झालेल्या ताणतणावाचे साक्षी आहे. तेथे एकमेकांपुरती असलेली चिंता व सक्तीच्या वस्तुनिष्ठ आकलनाचा स्पष्टपणे अभाव आहे. भारताला यु.एस. च्या हेतूविषयी शंका होती आणि त्याने त्याच्या अलिप्ततावादी धोरणाच्या बुडव्याखाली यु.एस.पासून सुरक्षित अंतर टिकवणे पसंत केले. चीनचा साम्यवाद भारताविरोधी गेल्यानंतर यु.एस. ने दक्षिण आशिया अखंडात त्याची धोरणे दर्शविण्यासाठी भारताला गुंतवण्याचे योजले. शीत युद्ध काळादरम्यान यु.एस. हा या उपखंडाच्या राजकारणात प्रत्यक्ष सहभागी नव्हता आणि दक्षिण आशियात फक्त बाहेरुन कृती करणारा होता. यू.एस. साठी उत्तर व दक्षिण पूर्व आशिया ही महत्त्वाची क्षेत्रे होती. कारण येथे त्यांचे व त्यांच्या दोस्त राष्ट्रांच्या हितांना यु.एस.एस. आर कडून प्रत्यक्षपणे धोका होता.

**ब) शीत युद्धोत्तर काळ - नविन वास्तविकतेसाठी नविन दिशा :**

शीतयुद्धाच्या समाप्तीने यू.एस. चे दक्षिण आशियाप्रती असलेले धोरण बदलले. बिल क्लिंटनच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत आखलेले शीतयुद्धोत्तर काळातील यु.एस. परराष्ट्रधोरणाने आर्थिक हिताला प्राधान्य दिले. विचारप्रणालीपेक्षा उपयुक्ततावाद हा यु.एस. परराष्ट्रधोरण कार्यस्व असण्यातील निश्चित घटक बनला. त्यानुसार यु.एस. चे महासत्तेच्या भांडणाच्या भाषेतील द्विपक्षीय व पासून चालत आलेले धोरण हे व्यापारी हितावर आधारीत नविन उपयुक्तता वादाने बदलले गेले. हा उपयुक्तवाद राजकिय पद्धतीचा विचार न करता अत्यावश्यक व्यापार आणि आर्थिक हिताच्या संरक्षणार्थ आशियाई देशातील नविन उभरत्या बाजरपेठेतील प्रचंड आर्थिक संधी मिळवण्याकडे कललेला होता. दक्षिण आशियात नविन उपयुक्तता वादांअर्तगत यूएस ने भारत आणि पाकिस्थानकडे शीतयुद्ध काळातील दिवसांप्रमाणे न बघता वेगळ्या प्रकारे मुख्यतः क्षेत्रीय दृष्टीकोनातून पाहणे सुरू केले. नविन प्राधान्यक्रमाचा पाठपुरावा करण्यासाठी आणि परस्परसंबंधावरील शीत युद्धकाळाची छाया नष्ट करण्यासाठी यूएस ने मजबूत संघटनासाठी करार व बोलणीच्या मालिकेने मागील दोन दशकात जबरदस्त प्रयत्न केले. भारताने सुद्धा यूएस शी असलेल्या हिताच्या आदराला अनुसरून विधायकपणे देवाणघेवाण केली.

यूएसच्या दक्षिण आशियाप्रती असलेल्या धोरणातील बदल आणि त्याची भारताशी वाढती गुंतवणूक ही विविध घटकांमुळे घडून आलेली आहे. वर चर्चिल्याप्रमाणे शीतयुद्धोत्तर काळात यूएसच्या प्राधान्यात लक्षणीय बदल घडून आलेले होते. आर्थिक आणि व्यापारी हिताच्या संरक्षणाबरोबरच आण्विक देवाणघेवाण आक्रमक चीन आणि दहशतवादाला नियंत्रीत ठेवणे यासारखे म्हणजे आशियातील यूएस परराष्ट्रधोरण ध्येयात प्रकर्षाने आले. हे मुद्दे बिल क्लिंटन, जॉर्ज बुश (ज्युनीअर) आणि बराक ओबामा यांच्या काळात यूएस परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणात अव्वल स्थानी होते. या मुद्यांना समर्पकपणे तोंड देण्यासाठी यूएस ने भारतासह विविध आशियाई सत्तांशी असलेल्या त्यांच्या संबंधाची पुनर्रचना केली. भारतसुद्धा उभरत्या शीतयुद्धोत्तर काळातील जागतिक व्यवस्थेतील त्यांच्या संबंधांची पुनर्रचना करण्याच्या प्रक्रियेत होता त्याने या बदलााचे स्वागत केले आणि यूएस च्या गुंतवणूकीच्या धोरणांना विधायकपणे प्रतिसाद दिला. त्याचवेळेस भारतीय परराष्ट्र धोरणात सुद्धा उपयुक्तवादाची नविन लाट आली जीने ही गुंतवणूक प्रक्रिया मजबूत करण्याचे काम सुकर केले. (३) यापुढे दक्षिण आशियाई प्रांतातील उभरत्या

भौगोलिक डावपेचात्मक विकासाने भारताला त्याच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण प्राधान्यक्रमांची पुर्नमांडणी करणे भाग पाडले.

या पुनर्मांडणी प्रक्रियेतील यूएस व इंडिया या दोघांची अशी पक्की समज होती की आशियातील त्यांचे राष्ट्रीय आणि भौगोलिक डावपेचात्मक हित एकच आहे. हे हितांचे एकत्रीकरण तीन महत्त्वाच्या क्षेत्रात घडून आले. दहशतवादाला तोंड देणे, आण्विक देवाणघेवाणींचे व्यवस्थापन करणे व शेवटी चीनला नियंत्रीत करणे (४) या क्षेत्रातील हितांच्या योगायोगाने एकत्रीत प्रयत्न आणि घनिष्ठ डावपेचात्मक गुंतवणूकीची शक्यता आणि विस्तार वाढविला.

मागील एक दशकात हितांच्या या एकत्रीकरणा व्यतीरिक्त तेथे काही असामान्य गोष्टी घडून आल्या ज्यामुळे यूएसला भारताला घनिष्ठ करणे अत्यावश्यक बनवले. असे भासत होते. की यूएस च्या हस्तक्षेपी आणि हुकूमशाही धोरणांमुळे यूएस आशियाच्या बऱ्याच भागातील त्याची विश्वसनीयता आणि त्याचे प्रमुख स्थान गमावत आहे. यूएस च्या इराक व अफगाणिस्थानमधील एकपक्षी हस्तक्षेपावर सर्व जगभरातून टिका झाली आणि त्याहून अधिक म्हणजे यूएस ला इराक व अफगाणिस्थानमधून जबरदस्त माघार घ्यावी लागली. आकडे असे दर्शवितात की इराक युद्धाची किंमत यूएस ला ६०० अब्ज डॉलर मोजावी लागली आणि अफगाणिस्थानवर इराकपेक्षा अधिक वाईट बनत आहे. (५) यूएसची अर्थव्यवस्था ही प्रचंड अर्थसंकल्पीय त्रुट आणि प्रचंड बेरोजगारी दर यासोबतच अतिशय गंभीर अशा माघारीच्या अवस्थेतून जात आहे. या पिछेहाटीच्या पार्श्वभूमीवर यूएसला एकट्याला सत्तेचा समतोल टिकवण्याची जागतिक जबाबदारी पेलणे अवघड आहे. म्हणून यूएस हा एकत्रीत सुरक्षिततेचे ओझे उचलण्यासाठी नविन भागीदाराच्या शोधात आहे. अशावेळेस जेव्हा यूएस त्याचे स्थान गमावत आहे आणि ओहोटिला तोंड देत आहे. त्याचवेळेस जग हे चीन आणि भारताच्या आश्चर्यकारक प्रगतीचा साक्षी आहे. भारत आणि चीनची वाढती आर्थिक ताकद ही आशियातील सध्याचा सत्तेचा समतोल बदलवत आहे. तज्ञ भाकित करतात की २१ व्या शतकाच्या मध्यापर्यंत यूएस हा भारत आणि चीन नंतर तीसऱ्या स्थानी फेकला जाईल. भारताचे वाढते भूराजकीय महत्त्व तेथील प्रचंड बाजारपेठ संधी आणि आशियातील प्रमुख घटनांवर प्रभाव टाकण्याची भारताची वाढती क्षमता यामुळे यूएस ला भारताला जवळ करणे भाग पडले. यूएस हा भारताकडे फक्त व्यापारी भागीदार म्हणून बघत नाही तर आशियातील सत्तेचा समतोल टिकवण्यात यूएस ची जबाबदारी उचलण्यासाठीचे सक्षम मित्र राष्ट्र म्हणून बघते.

### आपली प्रगती तपासा

१) शीतयुद्धोत्तर काळातील भारत यूएस संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या मुद्यांची चर्चा करा.

२) शीत युद्धोत्तर काळात दक्षिण आशियाप्रती युएस परराष्ट्र धोरणावर वर्चस्व गाजवणाऱ्या मुद्यांची चर्चा करा.

**भाग २**

## ६.३ शीत युद्धोत्तर काळात दक्षिण आशियाप्रती यूएस चे परराष्ट्र व सुरक्षा धोरण

शीत युद्धोत्तर काळात दक्षिण आशियातील बिघडत जाणाऱ्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत यूएस संबंध मजबूत बनले आहे. अमेरिकेच्या माजी अध्यक्षांनी दर्शविल्याप्रमाणे मागील दोन दशकात दक्षिण आशिया हा जगभरातील अतिशय धोकादायक आणि अस्थिर प्रदेश म्हणून उदयास आला आहे. (६) दक्षिण आशियाई देश हे सिमावाद, वंशिक व धार्मिक भेद राष्ट्रीय अलगीकरण धार्मिक जहाल मतवाद सिमापलीकडील दहशतवाद आणि आण्विक विवाद यांना तोंड देत आहेत या मुद्यांनी दक्षिण आशियातील सत्ता चित्राचा समतोल बदललेला आहे. आणि या क्षेत्रातील भारत व यूएस या दोघांची हित प्रभावित केले आहे. या मुद्यांना तोंड देण्यासाठी यूएस दक्षिण आशियाई देशांसोबत नविन करार करून त्याचे दक्षिण आशियातील स्थान मजबूत करीत आहे. यूएसचे दहशत वादाविरूद्धचे युद्ध जे अफगाणिस्थानात सुरू झाले आणि ज्याने भारत (अप्रत्यक्षपणे) व पाकिस्थान (प्रत्यक्षपणे) या दोन दक्षिण आशियाई मोठ्या सत्तांना समाविष्ट केले ते म्हणजे या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. या युद्धाने यूएसला दक्षिण आशियात लष्करीदृष्ट्या प्रस्थापित होणे सुकर केले. (७) आपण काही महत्त्वाचे मुद्दे तपशीलवार पणे अभ्यासू आणि या मुद्यांनी भारत व यूएस ला कसे जवळ आणले त्याचे मुल्यमापण करू या.

## ६.४ भारत यूएस परराष्ट्रधोरण कार्यक्रमावरील प्रभावशाली मुद्दे :

अ) **दहशतवाद** : दहशतवादाचे केंद्र हे पश्चिम आशियापासून दक्षिण आशियाकडे बदलले भारत यूएस संबंधासाठी सूचितअर्थ आज दहशतवादाचा मुद्दा सार्वभौम राष्ट्राला गंभीर आव्हान उभे करतो आणि क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात आणतो. शीत युद्धोत्तर काळात दहशतवादाने देशबाह्य स्वरूप प्राप्त केले आहे. आणि दहशतवादी संघटनांना आण्विक, जैविक आणि रासायनिक शस्त्रास्त्रांसारखी मोठ्या प्रमाणावर संहार करणारी अपारंपारिक शस्त्रे मिळण्याचे मार्ग मिळाले आहे. ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यांनंतर यूएस चे दहशतवादाविरूद्धचे धोरण बदलले आहे. ते अमेरिकन परराष्ट्र धोरणाच्या अग्रस्थानी गेले आहे. यूएस ने दहशत वादाविरूद्ध युद्ध जाहिर केले आणि दहशतवादाशी मुकाबला करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटन पाठवले. दहशतवादाचे केंद्र हे पश्चिम आशियापासून दक्षिण आशियाकडे सरकल्याने त्याला अमेरिकन सुरक्षा धोरणात अभूतपूर्व महत्त्व मिळाले.

यूएसच्या दहशतवादाविरूद्धच्या युद्धाने या क्षेत्रातील त्याच्या लष्कराच्या उपस्थितीने त्याचा दक्षिण आशियातील पाया भक्कम करणे सुकर झाले. अमेरिकेने त्याचे रूपांतरण संधीत केले आणि दहशतवादाने उभ्या केलेल्या आव्हानांना तोंड देण्याच्या कारणाने अमेरिकेची लष्करी उपस्थिती येथे ठेवली आणि अमेरिकेने दक्षिण आशियातील त्याचे स्थान निश्चित केले. ९/११ च्या हल्ल्यानंतर यूएस लष्करी कार्यवायांना गती आली आणि अफगाणिस्थानात तालीबान सरकारला एकाकी पाडण्यासाठी आणि अमेरिकेवरील दहशत वादी हल्ल्याच्या पाठीमागील सुत्रधार ओसामा बिन लादेन ज्याने अफगाणिस्थानात आश्रय घेतला त्याला पकडण्यासाठी

दक्षिण आशियाई देशांसोबत नविन करार केले गेले. अफगाणिस्थानातील तालिबान सरकारने ओसामाला हस्तांतरीत करण्यास नकार दिल्याने यूएसने अफगाणिस्थान विरूद्ध युद्ध पुकारले यूएस ने अफगाणिस्थानातील त्याच्या दिर्घकालीन स्वतंत्र्य मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय संघटन पाठवले ज्यामध्ये भारत आणि पाकिस्थान या दोन दक्षिण आशियाई सत्ता समाविष्ट होत्या. भारताने यूएसला त्याच्या आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरूद्धच्या युद्धात विनाशर्त सहकार्य तत्काळ प्रदान केले भारताने यूएसला लष्करी व व्यूहशास्त्र विषयक सुविधा देऊ केल्या यूएस ला तालिबान हून अल-कायदाशी पाकिस्थानचे असलेले बेकायदा संबंध यांची जाण असली तरी ते अफगाणिस्थानातील दहशतवाद विरोधी यूएस उपयोगितेमुळे सहभागी झाले. दहशतवादाच्या धोक्याने भारत आणि अमेरिका या दोघांना त्यांच्या राष्ट्रीय हिताचे साम्य आणि या क्षेत्रातील एकत्रीत प्रयत्नांची गरज स्पष्टपणे जाणण्यास उद्युक्त केले. ९/११ च्या दहशत वादी हल्ल्यानंतर दहशतवाद हा भारत-अमेरिका संबंधाचा मध्यवर्ती मुद्दा बनला दोन्हीही देश अनुभवांची देवाणघेवाण, दहशतवादाशी संबंधीत माहितीची देवाणघेवाण करण्यावर सहमत झाले दहशतवादी सत्तेला तोंड देण्यासाठी, मजबूती मिळवण्यातील हिताचे हे एकीकरण त्यांच्यातील सहकार्य वाढवण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ ठरले ऑक्टोबर २००१ मध्ये भारत आणि अमेरिकेने एक नविन द्विपक्षीय प्रत्यार्पण करारावर सह्या केल्या. दहशतवादाच्या मुकाबल्यासाठी जागतिक व क्षेत्रीय सहकाराच्या सप्टेंबर २००१ च्या यूएन सुरक्षा परिषदेच्या ठरावाला भारत आणि अमेरिका या दोघांनी खंबीरपणे पाठिंबा दिला डिसेंबर २००१ मध्ये संरक्षण धोरण गटाच्या पारित केलेल्या संयुक्त विधान सांगते कि यूएस आणि भारत आशिया आणि त्यापलिकडील डावपेचात्मक हितात सहभागी आहे. आणि त्यांचे संरक्षण व सुरक्षा सहकार्य हे जागतिक शांतता, आर्थिक प्रगती आणि सुरक्षा यांना चालना देऊ शकते भारत आणि युनायटेड स्टेटस् मधील या सहकार्याला २००२ पर्यंत संस्थात्मक रूप दिले गेले दोन्ही देशांनी दहशतवादाच्या मुकाबल्यासाठी नविन धोरण आखायचे ठरविले.

९/११ नंतर संयुक्त प्रतिहल्ला देवाणघेवाण प्रयत्नांना संरक्षण सहकार्याचे क्षेत्र बनवले २८ जून २००५ रोजी झालेल्या भारत यूएस संबंधासाठीच्या नविन बांधणीने दहशतवाद विरोधी सहकार्य आणि एकत्रीत काम करण्याची गरज प्रतिपादन केली दहशतवादाच्या मुकाबल्यातील याच बांधिलकी आणि भागीदारीचा पुनउच्चार पंतप्रधान मनमोहनसिंगांच्या अमेरिका भेटीच्या वेळी केला गेला.

मागील दोन दशकात दहशतवादेच केंद्र हे मध्यपूर्व पासून दक्षिण आशियाकडे सरकल्याने दहशतवादी हिंसाचाराने जवळजवळ सर्व दक्षिण आशियाई देश लेचेपेचे झाले वाढता धार्मिक कट्टरतावाद आणि दहशतवादी कृत्यांनी दक्षिण आशियाच्या जवळजवळ सर्वच भागात त्याची विषवल्ली पोहचवलेली आह. आज जवळजवळ सर्वच दक्षिण आशियाई देश हे त्यांच्या स्वतःच्या शेजाऱ्यांकडून पोसल्या गेलेल्या दहशतवादेच बळी ठरले आहेत. (८) यूएस चे दहशतवादावरील युद्ध जे अफगाणिस्थानात सुरू झाले त्यामुळे दहशतवादाची लागण या उपखंडात पसरण्यास तेवढेच योगदान दिले. या युद्धामुळे अलकायदा व तालिबानचे बरेच उच्च नेत्यांनी पाकिस्थानात आश्रया घेतला आणि ते आता पाकिस्थान व उपखंडाच्या इतर भागात दहशतवादी हिंसाचारास प्रात्साहन देत आहे. भारताप्रमाणेच अमेरिकासुद्धा सुसंघटित आणि सुनियोजित दहशतवादी हल्ल्यांच्या मालिकेचा बळी ठरल्या आहेत मागील दोन दशकात कित्येक हजारो अमेरिकन नागरिक हे या हल्ल्यात देशात आणि देशाबाहेर मारले गेले. या दहशतवादी हल्ल्यांनी दक्षिण आशियातील युएसचे धोरण बदलले आहे. या उपखंडातील दहशतवादाचे

नियांत्रणाचा मुद्दा हा यूएस च्या दक्षिण आशिया धोरण-विशेषतः २००१ पासून कार्यक्रमाच्या अग्रस्थानी आहे. भारताने यूएसच्या दहशत वादावरील युद्धाला पूर्ण पाठिंबा दिला आहे. (९) यूएस वरील ९/११चा दहशतवादी हल्ला हा भारत यूएस संबंधासाठी दिसायला हानीकारक परंतू परिणामी उपकारक सिद्ध झाला आहे. या प्रसंगाने यूएस आणि इंडियाला त्यांची डावपेचात्मक भागीदारी दृढ करण्यासाठी आणि संयुक्तकृती सुरू करण्यासाठी एक संधी व व्यासपीठ प्रदान केले आहे. (१०)

अलिकडील काळात आण्विक दहशतवाद हा या उपखंडाच्या शांतता व सुरक्षेचा गंभीर धोका म्हणून उदयास आला आहे. तांत्रिकदृष्ट्या प्रगत असलेल्या दहशतवादी संघटनांकडून आण्विक हल्ल्याचा खचितच धोका आहे. या मुद्याने यूएस वरील ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर जगाचे लक्ष वेधले पाकिस्थान आणि इतर काही देश दहशतवाद्यांना आण्विक शस्त्रास्त्रे मिळवणे सुकर करतात त्या देशांच्या आण्विक धोरणामुळे आण्विक दहशत वादाची समस्या गंभीर बनलेली आहे. पाकिस्थानच्या १९९८ मधील अणूचाचणी नंतर पाकिस्थानची अण्वस्त्रे सुरक्षित ठेवण्याची क्षमता ही विविध कारणांनी संशयात पडली आहे. दहशतवादी व मुलतत्ववादी घटकांशी असलेल्या पाकिस्थानच्या ऐतिहासिक संबंधाने त्यांची अण्वस्त्रे सहज मिळवता येण्याजोगी बनविली आहे. पाकिस्थान मधील सततच्या वाढत्या जिहादी घटकांनी त्याच्या अण्वस्त्रांसाठी तत्काळ व प्रमुख धोका निर्माण झाला आहे. पाकिस्थान लष्कर आणि गुप्तहेर यांचे जिहादी घटकांशी प्रस्थापित झालेले सुत दर्शविणाऱ्या मजबूत पुरावे उपलब्ध आहेत. २००० ते २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या बऱ्याच अभ्यासगटांनी उघड केले आहे की पाकिस्थानी अण्वस्त्रांना इस्लामीक मुलतत्व वाद्यांकडून जबरदस्त धोका आहे. आतापर्यंत पाकिस्थानजवळ जवळजवळ २०० अण्वस्त्रे असल्याचे मानले जात आहे. आणि तो त्यांच्या दर्जात्मक आणि संख्यात्मक विस्तार करण्यात मग्न आहे. अणूतज्ञ आता अधिक चिंतेत आहे कारण पाकिस्थान हा सतत विखंडन उत्पादन निर्माण करत आहे, प्लुटोनियम निर्माण करण्याची क्षमता वाढवित आहे. आणि अण्वस्त्रे वाहून नेणारी वाहने तैनात करत आहे. तसेच पाकिस्थान हा तत्काळ उपयोगात आणण्यासाठीच्या छोट्या अण्वस्त्रांच्या बांधणीच्या प्रक्रियेत पाकिस्थानच्या या प्रयत्नांनी अण्वस्त्रे व अणू तंत्रज्ञान यांचे हस्तांतरण किंवा चोरिची शक्यता अजून वाढवली आहे. कारण यांची सुरक्षा उपाय हे अतिषय तोकडे आहेत. म्हणून यूएस व भारतापुढील भितीदायक आव्हान आहे की हे अणूइंधन चूकीच्या हातात पडता कामा नये याची खात्री होणे तज्ञ असे ही मानतात की आम्ही दहशतवाद हा दक्षिण आशियात दुसऱ्या प्रकारच्या आण्विक चकमकीकडे घेऊन जाऊ शकतो. त्यांच्या नुसार दक्षिण आशियाई देश दहशतवादी कृतीचा बदला म्हणून अण्वस्त्रांचा वापर करू शकतात. भारत आणि पाकिस्थान दहशतवादाला नियंत्रणात आणण्यासाठी आण्विक सूड घेण्याकडे वळू शकतात म्हणून यूएस ची दक्षिण आशियातील चिंता ही फक्त संभाव्य भारत पाक आण्विक युद्धाचीच नाही तर ती अण्वस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडून निर्माण होणाऱ्या परिणामांची सुद्धा आहे. (११)

**ब) दक्षिण आशियाचे अण्वस्त्र संपन्न होणे :**

दक्षिण आशियाचे अण्वस्त्र संपन्न होणे हा एक असा प्रमुख मुद्दा आहे ज्याने यूएसचे लक्ष या उपखंडाकडे वेधले आणि महत्त्वाकांक्षी भारत अमेरिका अणूकराराचा मार्ग रचला गेला. १९९० च्या नंतरच्या काळातील या उपखंडातील आण्विक हस्तांतरणाने दक्षिण आशियाई सुरक्षा पेच अधिकच गुंतागुंतीचा केला आज दक्षिण आशियात दोन आण्विक सत्ता आहे. यांची सीमा सामाईक असून त्यांचा शत्रुत्वाचा दिर्घ इतिहास आहे. भारत पाकिस्थानच्या या शत्रुत्वाच्या संबंध

या अण्वस्त्र संपन्नतेने अधिकच क्लिष्ठ बनवला १९९८ च्या अणूचाचणी पासूनच भारत आणि पाकिस्थान हे दोघेही अधिक विश्वसनीय अशा अण्वस्त्रमारक पद्धती विकसीत करण्यात आणि त्यांचे विखंडन इंधनसाठा वाढवण्यात गुंतलेले आहेत. आतापर्यंत भारत आणि पाकिस्थान जवळ २०० पेक्षा अधिक अण्वस्त्रे आहे असे मानले जाते आणि ते त्यांचा दर्जा व संख्या वाढवण्याच्या प्रयत्नात आहेत अणूतज्ञ हे अजून जास्त चिंतेत आहे कारण हे दोन्ही देश सतत विखंडन इंधन तयार करत आहे. त्यांची प्लूटोनियम निर्मितीची क्षमता वाढवत आहे. आणि अधिकच अण्वस्त्रवाहक वाहने तैनात करत आहेत तसेच ते तत्काळ उपयोगात आणण्यासाठीच्या छोट्या अण्वस्त्रांच्या बांधणीच्या प्रक्रियेत आहे.

अतिसंहारक अस्त्रांच्या हस्तांतरणाने दक्षिण आशियाची स्थिरता खचितच धोक्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तानच्या बाबतीत त्याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे की आण्विक समतोलाच्या दहशतीद्वारे शांतता प्रस्थापित करण्याचे प्रसिद्ध शीतयुद्ध तंत्र अपयशी ठरले आहे. भारत आणि पाकिस्तानची अण्वस्त्र संपन्नता ही शीतयुद्ध काळातील यूएस व यूएसएसआर च्या अण्वस्त्र संपन्नतेप्रमाणे नसून ती युद्धाची शक्यता टाळू शकत नाही. भारत आणि पाकिस्तानच्या अणूचाचणीनंतर बऱ्याच विशेषज्ञांनी मत मांडले की अण्वस्त्रांची मालकी असल्यामुळे निर्माण झालेल्या दहशतीचा समतोल हा भारत पाकिस्तानमधील संभाव्य युद्धाची शक्यता कमी करेल परंतू हे गृहीत चूकीचे सिद्ध झाले १९९८ मधील भारत पाकिस्तानच्या अणूचाचणीनंतर लगेचच दोन्हीही देश काश्मिरच्या सिमारेषेच्या बाजूने दुसऱ्या सर्व दृष्टीच्या युद्धाच्या काठावर येऊन पोहचले. या समोरासमोर उभे ठाकण्यात पाकिस्थानने त्यांच्या सीमेजवळ अण्वस्त्र तैनात केली आणि सर्व परिंनी युद्ध जर तीव्र होत गेले. तर त्याचे रूपांतरण आण्विक युद्धात होऊ शकले असते परंतू अमेरिकेच्या वेळेवर केलेल्या हस्तक्षेपामुळे युद्धाची तीव्रता टाळली गेली.(१३)

दक्षिण आशियाच्या अण्वस्त्र संपन्नतेच्या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातील अतिसंहारक अस्त्रांच्या हस्तांतरणावरील नियंत्रणाचा मुद्दा हा यूएस च्या दक्षिण आशियाप्रती असलेल्या डावपेचावर वर्चस्व गाजवणारा होता. दक्षिण आशियाई बाबींवरील यूएस तज्ञा स्टीफन कोहेन यांनी दक्षिण आशियाच्या अण्वस्त्र संपन्नता आणि भारत पाक संबंधासाठी त्याचा विस्तार या विषयीची अमेरिकेची चिंता अगदी योग्य शब्दात व्यक्त केली आहे, "१९९० पर्यंत वॉशिंग्टन मधील बऱ्याच जणांना वाटले की दक्षिण आशियाच्या नियंत्रणा पलिकडे गेलेला काश्मिरमधील संघर्ष हा पारंपारिक युद्धाकडे नेणारा दिसत असला तरी तो आण्विक वणवा पेटवू शकतो त्याहून अधिक म्हणजे अमेरिकेला या घटानांच्या साखळीत भरपाई करण्यात एकमेव महा सत्ता म्हणून नेतृत्वाची भूमिका बजावण्यासाठी व्यवस्थापनाचा तीव्र अधिकार होता. —— अणू हस्तांतरण न करण्याचे धोरण हे पुन्हा यूएसच्या क्षेत्रीय धोरणाचे मुख्य केंद्र बनले. (१४)

हस्तांतरण न करण्याचा कार्यक्रम हा गंभीरपणे वर उचलला गेला आणि कारगिल युद्धानंतर तो अमेरिका चा दक्षिण आशियाई धोरणाचा निश्चयक बनला. कारगिल युद्धाने यूएस चा दक्षिण आशियाच्या अण्वस्त्र संपन्नतेवरील दृष्टीकोन खूपच बदलला. या युद्धजन्य परिस्थीतीने त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी भारत व पाकिस्थानला ऐतिहासिक भेट दिली. (१५) कारगिल युद्धापासून अमेरिका भारत आणि पाकिस्थानवर तणाव कमी करण्यासाठी बोलणी करण्यासशी सतत दबाव आणत असतो. असे मानले जाते की भविष्यातील भारत पाकिस्तानमधील कुठल्याही संघर्ष हा आण्विक युद्धात रूपांतरित होऊ शकतो. म्हणून अमेरिका हा भारत आणि पाक युद्ध रोखण्यास इच्छुक आहे. (१६) अमेरिका भारत आणि पाकिस्तानाला

पुढील गोष्टींवर भर देण्यास सांगतो. अ) सर्वकष चाचणी बंदी करारावर (सिटी-बिटी) स्वाक्षरी करणे ब) विखंडन साहित्याचे उत्पादन थांबवणे आणि विखंडन साहित्य नियंत्रण करार बोलणीत सहभागी होणे क) त्यांच्या आण्विक कार्यक्रमाशी संबंधीत वस्तू व उपकरणांचा निर्यातीवर कडक नियंत्रण ठेवणे.

**क) पाकिस्तान घटक :** पाकिस्तान हा विशेषतः भारत आणि यूएस साठी चिंतेचे कारण बनला आहे. शीत युद्धोत्तर काळात पाकिस्थान हा यूएससाठी खूपच कठिण समस्या म्हणून उदयास आला आणि वेगवेगळ्या प्रसंगी यूएस ने पाकिस्थानशी मैत्री तोडल्याची स्पष्ट उदाहरणे आहेते. (१८) शीतयुद्ध काळात पाकिस्थान हा साम्यवादाच्या नियंत्रणातील त्याच्या डावपेचात्मक महत्त्वामुळे अमेरिकेच्या मदतीचा मुख्य ग्रहणकर्ता होता. तथापि शीत युद्धोत्तर काळात अमेरिकेची पाकिस्थानप्रती असलेली मदत बरीच कमी करण्यात आली पाकिस्थानला असलेला मदतीचा ओघ हा बहुत करून त्याच्या अण्वस्त्रांना त्याच्या चोरी किंवा बदलीपासून संरक्षण करण्यासाठी वळवला गेला. ९/११ नंतर दहशतवादाच्या विरोधातील एक आघाडीवरील देश म्हणून जरी पाकिस्थानला यूएसच्या दक्षिण आशियाई धोरणात महत्त्व प्राप्त झाले असले तरी यूएस मधील बहुतांश पाकिस्थानकडे एक उपद्रव कारक आणि ढासळत जाणाऱ्या अर्थव्यवस्था आणि राजकीय समस्यांमुळे अनिश्चित भविष्य असलेला देश म्हणून बघतात.

एका बाजूला पाकिस्तानचे दहशतवादी आणि जिहादी गटांशी असलेले ऐतिहासिक संबंध आणि दुसऱ्या बाजूला राजकीय अस्थिरतेचे नित्याचे वातावरण ही यूएस च्या डोकेदुखीची कारणे आहेत. मागील दोन दशकात पाकिस्थान हा दक्षिण आशियामधील व दहशतवाद्यांचे प्रमुख केंद्र आणि धार्मिक मुलतत्ववाद्यांची उपज भूमी बनला आहे. पाकिस्थान हा दुबळे सरकार निकृष्ठ प्रकारची पायाभूत व्यवस्था आणि फोफावणाऱ्या कट्टरतावादी मुस्लिम चळवळी यांना तोंड देत आहे आणि दहशतवाद्यांनी या वातावरणावर कब्जा केलेला आहे. अमेरिकेची मुख्य चिंता ही पाकिस्थानच्या अण्वस्त्राच्या सुरक्षेविषयी आहे. आणि ती दहशतवाद्यांच्या हातात पडू नये याच्या खात्रीची त्याला इच्छा आहे यूएस मधील तज्ञा मानतात की कुठल्याही अण्वस्त्रांची चोरी ही मुंबई किंवा न्यूयार्क वरील ९/११ प्रकारे आण्विक हल्ल्याकडे घेऊन जाऊ शकते यूएस गुप्तहेर संघटनेने सुद्धा अण्वस्त्र हस्तांतरण आणि अण्वस्त्र दहशतवादाच्या धोक्याला जागतिक धोक्याच्या यादित उच्च स्थानी ठेवले आहे. २००१ पासून अमेरिकेने पाकिस्थानला त्याच्या अण्वस्त्राच्या सुरक्षेसाठी १०० दशलक्षाची मदत पुरवली आहे. प्रसारमाध्यमांमध्ये अशाही बातम्या होत्या की यूएस पाकिस्थानात त्यांच्या अण्वस्त्रांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षादल तैनात करण्याचे योजत आहे अलिकडील काळातील दोन घटनांनी पाकिस्थानच्या अण्वस्त्रांची सुरक्षा करण्याच्या पाकिस्थानच्या क्षमतेतील अमेरिकेचा विश्वास डळमळीत झाला आहे. पहिले म्हणजे ए क्यू खान प्रकरण याने पाकिस्थानच्या आण्विक कुप्रसिद्ध राष्ट्रांबरोबरच्या व्यवहारातील अनधिकृत भूमिकेवर शिक्कामोर्तब केले. आणि दुसरे म्हणजे पाकिस्थानच्या संरक्षण व्यवस्थेवरील खूपसारे दहशतवादी हल्ले जे पाकिस्थानातील अपुरी सुरक्षा व्यवस्था उघड करतात. असाही संशय घेतला जात आहे की खानाच्या जाळ्याद्वारे अण्वस्त्र व तंत्रज्ञान मिळायचा मार्ग नक्कीच गवसला असेल. (१९) ए. क्यू. खानच्या आण्विक जाळे उघड होण्याने हे स्पष्ट झाले. कि पाकिस्थान त्याचे अण्वस्त्र व तंत्रज्ञान यांचे संरक्षण करण्यासाठी अयशस्वी ठरला आहे आणि त्याची सहजासहजी चोरी होऊ शकते २००४ मध्ये प्रकाशित झालेला सी. आर एस अभ्यास नोंदवतो की पाकिस्थान हा दहशत वाद्यांसाठी अण्वस्त्रांचा सक्षम स्त्रोत असू शकतो. हा अहवाल असे सांगतो की पाकिस्थान लष्करातील मुसलमानांकडून दहशतवाद्यांना आण्विक अस्त्रे व तंत्रज्ञान

गुपचुपपणे दिले असण्याची शक्यता आहे. (२०) पाकिस्थानमध्ये लष्कराने इस्लामीक मूलतत्व वाद्यांशी संबंध प्रस्थापित केले असण्याची नोंद आहे. बऱ्याच जणांनी भिती व्यक्त केली आहे की पाकिस्थानात इस्लामिक उठाव झाला तर पाकिस्थानी लष्करातील इस्लामी हि शस्त्रे कदाचित मुल तत्ववादी आणि दहशतवाद्यांना देतील. कित्येक संशोधन अहवाल सुचवतात कि पाकिस्थानी आण्विक साहित्य हे अपुऱ्या सुरक्षिततेत साठविले आहे. आणि त्याच्या संरक्षणाची काहीही महत्वाची व्यवस्था नाही. (२१)

**ड) ड्रॅगनचे आव्हान :**

२१ व्या शतकात चीन हा आंतरराष्ट्रीय स्थरावरील सत्तेचा सक्षम पर्यायी स्त्रोत म्हणून उदयास आला आहे. अर्थिक आघाडीवर चीन १.३ अब्ज लोकसंख्या ४० % बचतवर २०० अब्ज चलनसाठा असण्यासह एक महासत्ता म्हणून उदयास आला आहे. नोबल पदक प्राप्त रार्बट फोजिल परराष्ट्र बाबीतील (जानेवारी/फेब्रुवारी २०१०) त्यांच्या लेखात भाकीत करतात की २०४० पर्यंत चीनचा जीडीपी हा सुमारे १२३ हजार डॉलर इतका होईल आणि तो जगातिल उत्पन्नाच्या ४० टक्के असेल १४ टक्कयांसह यूएसचा दुसरा नंबर असेल अजून म्हणजे चीनला पश्चिमेकडील चालू असलेल्या आर्थिक उताराचा खूपच फायदा झाला आहे.

सुरक्षिततेच्या भाषेत अलिकडील काळात खूपच हल्लेखोर आणि आक्रमक चाली केल्या आहेत ज्यामुळे पूर्व आशियाई देशांमध्ये भीती निर्माण झाली असून असुरक्षिततेची भावना वाढली आहे. चीनपूर्व आशियाला केवळ त्याच्याच अमलाखाली प्रदेश म्हणून रूपांतर करण्याचा प्रयत्न करतो आहे. चीनने तैवान, तिबेट, व झीन-झीयांग या सह दक्षिण चीन समुद्राला त्याचे मध्यवर्ती डावपेच क्षेत्र बनवले आहे. दक्षिण चीनी समुद्रीक्षेत्र हे चीनच्या आर्थिक वाढीसाठी महत्त्वाचे आहे कारण याच पट्ट्यातून तेल व कच्च्या मालाचा मुख्य पुरवठा होतो. अजून म्हणजे दक्षिण चीनी समुद्रात ६१ अब्ज पेट्रोलियम बॅरल असण्याचा अंदाज आहे. चीन हा हिंदी महासागरात सुद्धा शिरायचा प्रयत्न करत आहे त्यामुळे भारत भयभीत आहे भारतीय संरक्षण विशेषज्ञ दर्शवितात की चीन हा भारताला भारताच्या शेजारील देशातील त्याची उपस्थिती वाढवून आणि भारतीय शेजाऱ्यांना त्याचे उपग्रह बनवून घेण्याचा प्रयत्न करत आहे. रॉबर्ट कपलान यांनी त्यांच्या नुकत्याच प्रकाशीत झालेल्या "Manson : The Indian Ocean and the future of american power" या पुस्तकात नमुद केले आहे की चीनच्या हिंदी महासागरातील वाढत्या शिरकावाने त्या क्षेत्रातील यूएसच्या हिताला धक्का दिला आहे. ते मत मांडतात की "चीनच्या शिरकावाने इराणी आश्वातापासून हामूजच्या समुद्रधुनी पर्यंत, ज्यामध्ये दक्षिण कोरिया आणि जापान कडील दक्षिण, चीन समुद्र सुद्धा येतो. पसरलेल्या २१ व्या शतकातल्या आर्थिक मार्गावर धोक्याची सावली उमटवली आहे. चीन हा दक्षिण चिनी समुद्राच्या हायड्रोकार्बनने समृद्ध असलेल्या पाण्यावर आणि महत्त्वपूर्ण जलमार्गावर, नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहे." (२४)

भारत आणि यूएसमधील बरेचसे लोक मानतात की चीन हा दिर्घकाळात अमेरिका व भारत या दोघांसाठी सर्वात मोठा धोका आणि सुरक्षा आव्हान म्हणून उदयास आला आहे. आणि या आव्हानाचा युक्तीने मुकाबला करण्यासाठी त्यांना संयुक्त डावपेच आखणे आवश्यक आहे. जपान, दक्षिण कोरिया आणि भारतासह असियन (ASEAN) देश हे दक्षिण, पूर्व आणि उत्तर आशियात चीनी आक्रमणाला तोंड देण्यासाठी अमेरिकेची मदत घेतात. २८ फेब्रुवारी २०१२ ला प्रसारित झालेला लेख "अलिप्तवाद २ : २१ व्या शतकातील भारतासाठी परराष्ट्र व

डावपेचात्मक धोरण" हा चीनला भारताचा जबरदस्त धोका समजतो आणि आशिया पॅसिफिक क्षेत्र अमेरिकेच्या सक्रिय सहभागाची मागणी करतो.

चीनचा आशिया पॅसेफिक क्षेत्र आणि हिंदी महासागरातील वाढत्या शिरकावाने यूएस अत्यावश्यक तेलमार्गाचे चीनपासून संरक्षण करण्यासाठी नविन भू-राजकीय डावपेच आखण्यास भाग पाडले आहे. (२६) या नविन डावपेचात भारताला त्याच्या हिंदी महासागरातील वैशिष्ट्यपूर्ण स्थानामुळे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. अमेरिका आणि भारताचे चीनला नियंत्रीत करण्यात परस्पर हित आहे. (२७) चीनची पाकिस्थानशी असलेली जुनी जवळीक सुद्धा भारत अमेरिकेसाठी गंभीर चिंतेची बाब आहे २००६ मध्ये चीन व पाकिस्थानने व्यापार आणि संयुक्त लष्करी सरावासाठी करार केलेला होता. पाकिस्थान चीनच्या सहकार्याने दोन अणुभट्ट्या उभारत आहे. पाकिस्थानला दिली गेलेली १५ अब्ज यूएस ची मदत ही सुद्धा चीनचा पाकिस्थान वरील प्रभाव कमी करण्याच्या प्रयत्नाचा भाग आहे. चीनच्या आक्रमक लष्करी बाण्याला दुर सारण्यासाठी यूएस हा मध्य, दक्षिण आणि दक्षिणपूर्व आशियावर वर्चस्व मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. यूएस हा भारताकडे चीनच्या वाढत्या लष्करी व आर्थिक सामर्थ्याला शह देण्यासाठी सक्षम प्रतिगट म्हणून पाहत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) शीतयुद्धोत्तर काळातील अमेरिकेच्या दक्षिण आशियाई धोरणाची ठळक वैशिष्टांची चर्चा करा.
२) शीतयुद्धोत्तर काळात दक्षिण आशियाच्या अण्वस्त्र संपन्नतेने यूएस च्या दक्षिण आशियाई धोरणावर कसा प्रभाव टाकला ते स्पष्ट करा.

## भाग ३

## ६.५ ९/११ नंतर दक्षिण आशियाप्रती यूएसचे सुरक्षाधोरण भारतासाठी सुची अर्थ :

९/११ नंतरच्या काळात भारत संबंध हे दोन्ही देशांच्या राष्ट्रीय आणि भूडावपेचात्मक हितांच्या वाढत्या सारखेपणाने अधिक विकसीत होत आहे. तेथे तीन प्रमुख क्षेत्रात हितांचे एकिकरण आहे पहिले म्हणजे दहशतवादावरील नियंत्रण, दुसरे अनेक हस्तांतरणावरील व्यवस्थापन आणि शेवटी चीनचे नियंत्रण दोन्हीही देश आज दहशतवादाच्या आव्हानाला तोंड देत आहेत जो त्यांच्या सुरक्षेला गंभीर धोका उत्पन्न करण्यासोबतच त्यांच्या स्थिर लोकशाहीच्या जाळ्याला नष्ट करण्याची क्षमता ठेवून आहे. भारतीय राष्ट्रीय सुरक्षेला असलेला दहशतवादाचा

धोका खराखुरा व जीवंत आहे. दक्षिण आशियातील इस्लामिक मुलतत्ववादी चळवळीचा प्रसार भारतासाठी गंभीर चिंतेची बाब आहे. या उपखंडातील जिहादी गटांचे विस्तृत जाळे आणि अलकायदा सारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांसोबत असलेले त्यांचे संबंध यामुळे भारताच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. मागील दोन दशकांपासून भारत हा पाकिस्थान पुरस्कृत छुपे युद्ध आणि काश्मिर व्हॅलीतील सिमाबाह्य दहशतवाद यांच्या झळा सोसत आहे. आता हे सिद्ध झाले आहे की भारत काश्मिर व्हॅलीमध्ये तोंड देत असलेला दहशतवाद हा फक्त सिमापलिकडचा दहशतवाद नसून आंतरराष्ट्रीय दहशतवाद आहे ज्याच्या मुकाबल्यासाठी आंतरराष्ट्रीय साधने आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य गरजेचे आहे. काश्मिरमधील इस्लामिक दहशतवादाला फक्त पाकिस्थानचाच नव्हे तर अफगाणिस्थानमधील तालिबान चळवळीचा सुद्धा पाठिंबा मिळून राहिला आहे. पाकिस्थानची गुप्तहेरसंस्था (आयएसआय) ही भारतविरूद्ध कार्यरत असलेल्या सर्व दहशतवादी गटांना आर्थिक साहाय्य, शस्त्रे आणि प्रशिक्षण देण्यात सक्रीय राहिले आहे.

याचस्थितीत भारताच्या स्वातंत्र्यापासून पहिल्या वेळेस भारत यूएस संरक्षण सहकार्य हे अभुतपूर्व पातळीपर्यंत वाढले आहे. ही अवस्था भारत यूएस संरक्षण सहकार्यातील घनिष्ट डावपेच आणि एक अभूतपूर्व उत्तेजन यांची साक्षी आहे ज्यामध्ये फक्त सामाईक चिंतेच्या मुद्यावरील बोलणीच समाविष्ट नाही तर भारताला संरक्षण साहित्य पुरवणे आणि लष्कर ते लष्कर सरावाचा सुद्धा समावेश आहे. दळणवळणाचा अत्यावश्यक जलमार्गाच्या नाविक सहकार्याचा समावेश असलेल्या भारत यूएस डावपेचात्मक भागीदारीने आशियामधील सत्ता समीकरणाच्या समतोलाच्या जुळवणीसाठी दक्षिण आशियाच्या सुरक्षा वातावरणाला रूपांतरीत केले आहे.

आशियामधील उगवती सत्ता म्हणून भारतीय क्षमता व सामर्थ्य अमेरिकेने ओळखल्यामुळे भारतीय डावपेच महत्त्वावर पुन्हा नविन जोर दिला जात आहे २००५ मध्ये यूएस राष्ट्र सचिव राईस यांनी यांच्या विधानात स्पष्ट केले की अमेरिका हा आशियातील एक क्षेत्रीय महासत्ता म्हणून भारताच्या उभरण्यासाठी पाठिंबा देईल. या हिताच्या एकिकरणाने आण्विक मुद्यांवरील यूएस चे मतभेद सुद्धा सौम्य केले. यूएस ने १९९८ मध्ये भारतीय अणूचाचणीपासून लादलेली बंधने सुद्धा खुली केली अमेरिकेने हे सुद्धा स्पष्ट केले की सिटी बिटी सही करण्याकरता अमेरिका भारतावर दबाव टाकणार नाही अणूहस्तांतरण न करण्याचा सुरूवातीचा वादांचा मुद्दा हा दोन्ही देशातील सहकार्याचा भाग बनला. यूएस ला खात्री पटली की भारताचे चलनवलन हे इतर आण्विक देशांपेक्षा अधिक चांगले आहे.

### यूएसची काश्मिर मुद्यावरील बदललेली भूमिका :

काश्मिर मधील दहशतवादाला आंतरराष्ट्रीय दहशतवादाशी जोडून अमेरिकेची जाण बदलवणे ही भारतासाठी सुसंधी होती. पाकिस्थान आणि काश्मिरमधील दहशतवादी आणि अफगाणिस्थानातील तालीबान सरकार व अलकायदा यांच्यातील तथाकथित जळणी बाबत अमेरिकेची खात्री करून देण्याचा भारताचा प्रयत्न होता. ९/११ पूर्वी जेव्हा भारताने पाकिस्थानवर काश्मिरमध्ये दहशत पसरवण्याचा आरोप केला आणि पाकिस्थानावरील अमेरिकेच्या दबावाची मागणी केली तेव्हा अमेरिकेने काश्मिरमधील दहशतवादाला स्वातंत्र्ययुद्ध संबोधले यूएस ने काश्मिरमधील दहशतवादी कृतींप्रती अर्ध अलगतावादी धोरण टिकवून ठेवले होते. जम्मू काश्मिरमधील दहशतवादी हे स्वातंत्र्यसैनिक असण्याच्या पाकिस्थानच्या भूमिकेला अमेरिकेने मान्यता दिली आणि तो पाकिस्थान विरूद्ध काही कृती करण्यास नाराज होता. तथापी

यूएसचा काश्मिर मुद्यांवरील पवित्रा सुद्धा बदलला आता अमेरिकेची खात्री पटली आहे. की काश्मिर मुद्दा हा स्वातंत्र्ययुद्ध किंवा स्थानिक दहशतवादाचा मुद्दा नाही त्याने भारताच्या या दृष्टीकोनाला सुद्धा सहमती दर्शवली की काश्मिर मुद्यावरील बोलणी ही सिमापलिकडील दहशतवाद संपल्यावरच सुरू होऊ शकते. अजून म्हणजे यूएस हा काश्मिरमधील शांततामय ठरावाच्या अलिकडील भारतीय प्रयत्नांचा पाठिराखा बनलेला आहे. भारताने काश्मिरमधील पाकिस्थान पुरस्कृत दहशतवादी कृत्यांचे आंतरराष्ट्रीयकरण करण्याच्या संधीचे सोने केले. जेव्हा अमेरिकेने लष्कर ए तय्यबा आणि जैश-ए-महम्मद या दोन काश्मिरी दहशतवादी संघटनांनान परकिय दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले तेव्हा काश्मिरमधील दहशतवादालाआंतरराष्ट्रीय दहशतवादाशी जोडण्याच्या भारताच्या प्रयत्नाला यश आले. ९/११ नंतर भारतात कित्येक मोठे दहशतवादी हल्ले घडून आले जसे जम्मू काश्मिरच्या कायदेमंडळावरील हल्ला भारतीय संसदेवरील हल्ला कलकत्यामधील अमेरिकन केंद्रावरील हल्ला नुकाताच झालेला समझौता एक्सप्रेसवरील हल्ला या हल्लांनी अमेरिकेचा पाकिस्थानप्रती असलेला दृष्टीकोन काही प्रमाणात बदलविला. अमेरिकेने या हल्लांची फक्त निर्भत्सनाच नाही केली तर पाकिस्थानला या हल्ल्याच्या पाठिमागे असलेल्या दहशतवादी संघटनांविरूद्ध कृती करण्यास सांगितले अमेरिकेने पाकिस्थानवर सिमेपलीकडील घुसखोरी कायमची थांबवण्यासाठी दबाव टाकणे सुद्धा सुरू केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) ९/११ नंतरच्या काळातील यूएसच्या दक्षिण आशियाई धोरणात बदलांची चर्चा करा.

२) ९/११ नंतरच्या काळातील काश्मिर मुद्याप्रती यूएस च्या भूमिकेतील बदल स्पष्ट करा.

## भाग ४

## ६.६ परस्परांप्रती लाभ

### अमेरिकेसाठी भारताचे महत्त्व

भारत लोकशाही देश आहे आणि चीन आणि पाकिस्थान प्रमाणे भारताचे यूएस सोबत विशिष्ट विवाद्य मुद्दे नाहीत बऱ्याच काळपासून सामाईक लोकशाही मुल्यामुळे प्रेरित झालेले यूएस व भारतामधील लोकालोकांचे संबंध मजबूत झाले आहे. हि या संबंधाची जमेची बाजू आहे भारत हा २२ अब्ज डॉलरपेक्षा जास्त व्यापार करणारा अमेरिकेचा १४ वा व्यापारी भागीदार आहे. यूएस धोरण कत्यांना भारताच्या वाढत्या आर्थिक तडाख्याविषयी खात्री आहे. अमेरिकेची माजी

राज्यसचिव कोलीन पॉवेल यांनी भविष्यात यूएस साठी भारताचे महत्त्व विषद केले आहे त्यांनी म्हटले की : आपण जगाच्या सर्वात मोठ्या लोकशाहीशी शहाणपणाने व्यवहार करायला हवा. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश बनण्यांच्या मार्गावर असलेल्या भारताजवळ विस्तार्ण हिंदी महासागर क्षेत्र आणि त्याच्या परिसरात शांतता ठेवण्याची क्षमता आहे. आपला मित्र पाकिस्थानला न दुर्लक्षिता आपल्याला भारताच्या प्रयत्नात भारताला मदत करण्यासाठी अधिक कठोरपणे आणि अधिक सातत्यपूर्वक काम करणे गरजेचे आहे. (३०) अर्थतज्ञ भाकित करतात की २१ व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारताचा जीडिपी हा सध्याच्या चार हजार अब्जपासून ३२ हजार अब्जापर्यंत वाढेल जो यूएस च्या ८% वृद्धीदराने यूएसपेक्षा जास्त असेल यूएस धोरण कर्त्यांना याचीही खात्री आहे की भारताची आर्थिक वाढ ही आशियातील यूएसच्या हिताच्या आड येणार नाही जे चीनप्रमाणे नाही आणि भारताच्या वाढीला पाठिंबा देऊन आशियातील सत्तेचा क्षेत्रीय समतोल टिकवला जाऊ शकतो. म्हणून उभरती क्षेत्रीय सत्ता म्हणून भारतीय क्षमता आणि सामर्थ्य यांना अमेरिकेकडून ओळखले जात आहे. आणि पाठिंबादिला जात आहे अमेरिकेने आंतरराष्ट्रीय घटनांमध्ये भारतामध्ये जोडीने काम करणे सुरु केले आहे. अमेरिकेचा भारताकडे असलेला विविध क्षेत्रातील मदतीचा वेग हा मागील दीड दशकात खूपच वाढलेला आहे.

अमेरिकेतकडून भारत ही सुसंधी समजली जात आहे अमेरिका भारताला व्यापारी भागीदार म्हणून पाहतो आणि कबूल करतो की भारतासोबतची आर्थिक प्रगतीच्या पार्श्वभूमिवर अमेरिकेच्या भारताप्रती धोरणात व्यापार ही वर्चस्व ठेवते अमेरिकेने भारताला केलेला निर्यात हा त्यांच्या धोरणाचे महत्त्वाचे अंग आहे अशी निर्यात ही अमेरिकेत नोकरीच्या संधी निर्माण करेल स्टीफन कोहेन वाढत्या भारत यूएस व्यापाराची माहिती देतात. १९९० मध्ये बदललेल्या भारतीय आर्थिक धोरणासह संयुक्त अमेरिकेने भारताकडे गंभीरपणे पाहणे सुरू केले अमेरिकेचा भारताकडील दोन्ही मार्गाचा व्यापार हा १९९० मधील ५.३ अब्ज डॉलरपासून १९९५ मध्ये ८.५ पर्यंत आणि १९९९ मध्ये १२ अब्ज डॉलर ज्यामध्ये आयातीतील ९.१ अब्ज डॉलर आणि निर्यातीतील ३.७ अब्ज डॉलर समाविष्ट आहे. (३१)

अध्यक्ष ओबामांच्या भारत भेटीत भारताने १२ अब्ज डॉलरची आयातीची मागणी नोंदवली ही मागणी अमेरिकेत ५० हजार ते ६० हजार नविन नोकऱ्या निर्माण करेल भारतीय कंपन्या या यूएई नंतर अमेरिकेतील दुसऱ्या सर्वात मोठी गुंतवणुकदार आहेत्त. त्यांनी यूएसमध्ये ५० हजार नविन नोकऱ्या निर्माण केल्या. (३२)

अमेरिकेचा डोळा भारताच्या वाढत्या मध्यमवर्गीय बाजारपेठेवर आहे भारताचा संरक्षण संकल्पसुद्धा वाढत आहे. ज्याचा अमेरिकेला फायदा उठवण्याची इच्छा आहे. भारतासोबत विविध क्षेत्रात सहकार्य करण्याला खूप वाव आहे. जसे हवामानबदल, अणूहस्तांतरण न करणे उर्जा व अन्नसुरक्षा डावपेचात्मक पातळीवर यूएस भारताकडे चीनचा नैसर्गिक समतोल म्हणून बघतो.

**भारतासाठी अमेरिकेचे महत्त्व :**

भारताला अमेरिकेकडून नागरी अणूकार्यक्रमासाठी आण्विक पुरवठा दरांकडून इंधनपुरवठा सुकर करण्यासाठी मदत हवी आहे. आणि असे वातावरण निर्माण करायचे आहे की भारत त्याच्या विकासासाठी अणूउर्जा निर्माण करू शकतो.

भारत आर्थिक विकासात अग्रेसर असल्याने त्याला भारतातील यूएस गुंतवणूकीद्वारे नक्कीच फायदा होईल भारताला यूएस गुंतवणूक, त्यांचे तंत्रज्ञान, नैपुण्य, साहित्य यांची गरज आहे. भारतात अमेरिकेचे आर्थिक, ऊर्जा आणि शिक्षण क्षेत्रातील सहकार्य हे त्याचे विकासहेतू साध्य करण्याकरिता महत्त्वपूर्ण आहे.

भारतातील कित्येक सुरक्षा विश्लेषक मानतात की भारत हा चीनशी असलेल्या लष्करी व आर्थिक असमतोलाची भरपाई करू शकतो आणि यूएस सोबत घनिष्ठ लष्करी मैत्री करून चीनला मात देऊ शकतो. भारताला यूएसच्या मदतीची चीनचा आक्रमकपणा  कमी करण्यात गरज आहे. भारताला चीनने आशियातील वर्चस्व सत्ता म्हणून उभारावे असे वाटत नाही आणि त्याला आशियात समतोल टिकावा म्हणून यूएस ची उपस्थिती हवी आहे.

भारताच्या अंतर्गत सुरक्षेला दहशतवादाचा खराखूरा धोका भारताविरूद्ध पाकिस्थान पुरस्कृत छूपे युद्ध हे खूप काळापासून चालू आहे. आणि अलिकडेच दहशतवादी हल्ल्यात खूपच वाढ झालेली आहे. भारताला पाकिस्थानला शिस्त लावून दहशतवदाच्या भस्मासुरावर ताबा ठेवण्यासाठी यूएसच्या मदतीची गरज आहे.

भारताला यूएन सुरक्षा समितीवर कायमचे सदस्यत्व मिळण्यासाठी अमेरिकेचा पाठिंबा हवा आहे. यूएस अध्यक्ष बराक ओबामांच्या नोव्हेंबर २०१० च्या भारतभेटीत त्यांनी भारताला यूएन सुरक्षा समितीवर कायमचे सदस्यत्व मिळण्याचे वचन दिले.

**तुमची प्रगती तपासा :**

१) अमेरिकेसाठी भारताचे महत्त्व यावर चर्चा करा.

२) भारतासाठी अमेरिकेचे महत्त्व यावर चर्चा करा.

## भाग ५

## ६.७ गुंतवणूकीच्या संधी :

काश्मिर मुद्यावर यूएस ने त्याचा शीतयुद्ध पवित्रा बदलला आहे आणि हे स्पष्ट केले आहे की यूएस हा काश्मिर मुद्यात हस्तक्षेप करण्यास इच्छुक नाही. आणि तो शिमला कराराला मान्यता देतो ज्या अन्वये हा मुद्दा द्विपक्षीय चौकटीतच सोडवला जावा २००० मध्ये त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या ऐतिहासिक भारतभेटीत त्यांनी वचन दिले की हा मुद्दा

सोडवण्यासाठी यूएस भारत आणि पाकिस्थानला जेथे शक्य असेल तेथे पाठिंबा देईल त्यांनी दोन्ही देशांना शांततेचे वातावरण निर्माण करण्यास आणि बोलणीद्वारे हा मुद्दा सोडवण्यास सुचवले.

९/११ नंतर या उपखंडातील दहशत वादाला मदत देणे, व प्रोत्साहन देणे थांबवण्यासाठी आणि अफगाणिस्थानातील त्या वेळच्या तालिबान सरकारला पाठिंबा देणे थांबवण्यासाठी यूएस पाकिस्थानवर सातत्यपूर्ण दबाव आणत आहे. त्यानंतर यूएस ने लष्कर ए तयब्बा आणि जैश ए महम्मद या दोन दहशतवादी संघटनांना परकिय दहशतवादी संघटना म्हणून जाहिर केले या दोन्ही संघटना यूएसच्या हिताच्या धोका आणणाऱ्या होण्यासाठी आणि भारतातील दहशतवादी हल्ल्यांच्या मालिकेसाठी जबाबदार होत्या.

संरक्षण सहकार्याच्या भाषेत नविन डावपेचात्मक भागिदारी चौकट जी जॉर्ज बूश यांच्या रिपब्लीक सरकारच्या काळात विकसीत झाली आणि भारत यूएस संबंध रूपांतरीत केले. तिने या दोन देशांमधील घनिष्ठ सरीण सहकार्य सुकर केले. (३३) २००१ ते २०११ पर्यंत करारांची मालिक घडून आली जीने दोन देशातील संरक्षण संबंध मजबूत केले मागील दोन दशकात यूएस आणि भारताच्या लष्करांनी १० संयुक्त सराव पार पाडले आहे आणि भारतीय नौदल जहाजे ही ३१ अमेरिकन नाविक मालमत्ता मलाक्कांच्या सामुद्रधुनी पासून आरबी समुद्रापर्यंत सुरक्षित सोडत आहे. आणि अशाप्रकारे अमेरिकन जहाजांना इतर मोहिमांसाठी मुक्त ठेवत आहे.

सहकार्याची एक नविन चौकट जिला संरक्षण तंत्रज्ञान विषयक भागीदारीतील पुढील पाऊल (NSSTP) म्हटले जाते तिने २००५ मध्ये भारतासाठी अमेरिकेच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणात नविन भूमिका दिली या चौकटीचा एक भाग म्हणून १८ जूलै २००५रोजीभारत आणि यूएस ने एक महत्त्वाचा लष्करी डावपेचात्मक करार केला ज्याचे खूप दुरगामी परिणाम या करारामुळे भारताला जबाबदार आण्विक देश म्हणून मान्यता दिली तसेच यूएस नेभारताला नागरी अणूउर्जा मुद्यांवर सहकार्य प्रदान केले. (३४)

दहशतवादाचा मुकाबला करणे हे भारत आणि अमेरिकेचे सामाईक ध्येय आहे संरक्षण व सुरक्षेच्या क्षेत्रात वाढत्या देवाणघेवाण व तंत्रज्ञान सहकार्याकडे पहिले पाऊल म्हणून जानेवारी २००० मध्ये दहशतवाद विरोधी संयुक्तकृती गट स्थापला गेला. (३५) २००१ मध्ये यूएस नेतृत्वाअंतर्गत दहशतवादाविरूद्धच्या आंतरराष्ट्रीय संघटनेत भारत सामिल झाला तसेच भारत आणि यूएस ने ऑक्टोबर २००५ मध्ये दहशतवादाशी संबंधीत अपराध, अमली पदार्थ वाहतुक आणि सुनियोजीत गुन्हे यांच्या चौकशीसाठी एकमेकांना मदत करण्यासाठी एका करारावर सह्या केल्या.

महत्त्वाकांक्षी बहुराष्ट्रीय उर्जाप्रकल्प इंटरनॅशनल थर्मो न्युक्लीअर एक्सप्रीमेंटल रिॲक्टल (ITER) मध्ये भारताचा पूर्ण भागीदार म्हणून समावेश केला गेला भारत आणि अमेरिकेने अणुउर्जा, अवकाश, क्षेपणास्त्रे, संरक्षण आणि उच्चतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य देऊ केले.

२००५ पासून दोन्ही देशांनी सहकार्य व सल्लामसलतीच्या कित्येक बैठका घेतल्या ज्यांनी त्यांचे संबंध मजबूत करण्यास मदत केली. त्यातील प्रमुख म्हणजे - नागरी अणुसहकार्य

करार १० वर्षाचा संरक्षण करार मंत्रीस्थरावरील डावपेचात्मक बोलणीची सुरूवात अर्थ व व्यापार मधील सहकार्य, यूएन एस सी च्या कायम सदस्यत्वासाठी भारतीय उमेदवारीसाठी यूएस चा पाठिंबा या कामगिरीने २१ व्या शतकात संबंध पुढे ठेवण्यास मदत केली. युएस अध्यक्ष बराक ओबामांची २०१० ची भारतभेट हिने दोन्ही देशातील सदिच्छांचे उच्च शिखर गाठले.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारत यूएस संबंधातील गुंतवणूकीच्या खूणांची चर्चा करा.

२) शीतयुद्धोत्तर काळात दहशतवादाला तोंड देण्याच्या मुद्यावर भारत युएस प्रगतीची चर्चा करा.

## भाग ६

## ६.८ अंतिम नोंदी

**भागीदारीची अपरिहार्यता :**

२१ व्या शतकातील आशियातील बदलत्या नविन सत्ता समीकरणानुसार यूएस आणि भारताच्या वतीने पक्के जाणले की ते आता तटस्थ राहू शकत नाही आणि परस्पर हिताच्या संरक्षणासाठी दोन्ही देशातील भागीदारी अटळ आहे. ही भागीदारी आशियाच्या सुरक्षा, स्थैर्य आणि प्रगतीसाठी सुद्धा गरजेची आहे.

**हितांचे वाढते एकिकरण :**

हितांच्या पुरकतेच्या आधारे भारत यूएस गुंतवणूक ही सुरक्षा मैत्रीत बदलू शकते. विविध क्षेत्रातील सामुहीक हित असे सुरक्षा, अण्वस्त्र हस्तांतरणास नकार, दहशतवाद आणि खुला कारभार यांनी वातावरण निर्माण केले आहे आणि सुरक्षामैत्रीसाठीची संभाव्यता वाढवली. या व्यतिरिक्त यूएस आणि भारत याचे दक्षिण आशियातील सामाईक हित बऱ्याच गोष्टीत आहे ज्यामध्ये चीनचा हिंदी महासागरातील शिरकाव नियंत्रीत करणे दहशतवादाचा मुकाबला, सत्तेचा क्षेत्रीय समतोल टिकवणे पासून ते पाकिस्थानला शिस्त लावणे पर्यंत च्या गोष्टींचा समावेश आहे. भारत आणि यूएस हे क्षेत्रीय सुरक्षा आणि स्थैर्य वाढवण्यास, दहशतवादावर नियंत्रण ठेवण्यास लोकशाहीला उत्तेजन देण्यास, अण्वस्त्र हस्तांतरणास अटकाव करण्यात आणि चीनवर नियंत्रण ठेवण्यात एकमेकांना सहकार्य करू शकतात.

**आशियासाठी सूचीत अर्थ :**

भारत यूएस गुंतवणूक ही जर यूएस जापान सुरक्षा मैत्रीप्रमाणे एक औपचारिक मैत्रीत रूपांतरीत झाली तर भविष्यात आशियातील प्रमुख घटनांक्रमात भारत यूएस संबंधांनी बदल होईल अशी मैत्री ही चीनच्या वाढत्या ताकदीला प्रतिशह देरारी असेल आणि हिंदी महासागरातील चीनच्या सर्व विध्वंसक शक्तीला थांबवू शकेल

**आण्विक सुरक्षा :**

दक्षिण आशियातील यूएसची प्रमुख चिंता म्हणजे भारत पाकिस्थानमधील सर्व प्रकारचे युद्ध रोखणे दोन्ही देशांची अण्वस्त्रे सुरक्षित ठेवणे व ती चोरण्यास खासकरून दहशतवाद्याकडून अटकाव करणे, अमेरिका पाकिस्थानवर सिमेपलीकडील घुसखोरी थांबवण्यासाठी आणि भारतावर पाकिस्थानला बोलणीत गुंतवण्यासाठी दबाव आणत आहे.

**संधी व आव्हाने :**

भारताची यूएसशी गुंतवणुक ही भारतासाठी संधी व आव्हान दोन्ही आहे. याच्या उलटसुद्धा सत्य आहे. सीमामुद्यावर चीनशी आणि काश्मिरमुद्यावर पाकिस्थानशी असणारा वाद तीव्र होण्याची शक्यता विचारात घेऊन भारताने यूएसशी विधायक संबंध विकसीत करणे गरजेचे आहे. तसेच यूएसने या क्षेत्रातील भारताचे वाढते प्राबल्य लक्षात घेऊन भारताकडे अधिक लक्ष द्यावयास हवे. अमेरिकेसाठी आशियातील क्षेत्रीय स्थैर्यासाठी भारताच्या विकासाला हातभार लावणे गरजेचे आहे.

**खंबीर पुढाकाराची अपरिहार्यता :**

भारताची मोठ्या सत्तेची महत्त्वाकांक्षा आहे तो क्षेत्रीय महासत्ता बनण्याच्या स्वप्नाला पोसत आहे तथापी भारताचे परराष्ट्र धोरण हे त्याच्या सत्तेच्या महत्त्वाकांक्षेच्या प्रमाणात नाही बऱ्याच भारतीय व परदेशी तज्ञांनी निरिक्षण केले आहे की भारतीय परराष्ट्रधोरण हे परराष्ट्रधोरणाविषयी आश्चर्यकारकरित्या तिटकारा असलेले आहे भारताला त्याच्या सत्तेच्या महत्त्वाकांक्षेवर आधारित सर्व समावेशक राष्ट्रीय सुरक्षा योजनेचा मसुदा करणे गरजेचे आहे. भारताने यूएसशी असलेले त्याचे द्विपक्षीय संबंध हे एकत्रीत राजकीय, सुरक्षा, व आर्थिक हिताच्या आधाराने मजबूत करायला हवे.

**सहकार्यात प्रगाढता येण्याची गरज :**

भारत आणि यूएसला त्यांचे संबंध पुढे नेण्यासाठी सततचे सहकार्य व सल्लामसलत आणि क्षेत्रीय व राजकीय मुद्यांवरील काही भक्कम पावले गरजेचे आहे त्यांना विविध मुद्यांवरील त्यांची बोलणी प्रगाढ करण्याची आवश्यकता आहे तेथे बरेच अस्पर्श राहिलेली क्षेत्र आहेत ज्यांच्यामध्ये सहकार्याची प्रचंड क्षमता सामावलेली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारत आणि यूएस मधील हितांच्या एकीकरणाची क्षेत्रे ओळखा.

२) भारत यूएस संबंध मजबूत करण्याचे उपाय सूचवा.

## ६.९ सारांश

मागील दोन दशकात भारत यूएस संबंध हे परकेपणा पासून गुंतवणूकी पर्यंत हळूहळू विकसित झाले असून मैत्रीकडे जात आहे. महत्त्वाच्या क्षेत्रातील हितांचे एकिकरण जसे दहशतवादाचे नियंत्रण आण्विक हस्तांतरणाचे व्यवस्थापन आणि चीनचे नियंत्रण यामुळे भारत आणि यूएसमधील घनिष्ठ डावपेच गुंतवणूक आणि संयुक्त प्रयत्नांची शक्यता व वाव वाढली

दक्षिण आशियाई उपखंडाच्या वेगवेगळ्या समस्या तसेच क्षेत्रीय वाद, वंशिक आणि धार्मिक तफावत, राष्ट्रीय अलगीकरण, धार्मिक कट्टरतावाद व सिमेपलीकडील दहशतवाद आणि आण्विक चकमकीची परिस्थीती यामुळे यूएसमधील सहकार्य सुद्धा सोयीचे झाले.

यूएस धोरण कर्त्यांमध्ये भारताचे वाढते महत्त्व आणि जागतिक खेळाडू म्हणून भावी क्षमता या विषयी वाढती जाण व स्विकार आहे.

आर्थिक आघाडीवर आणि सुरक्षिततेच्या भाषेत एक क्षेत्रीय सत्ता म्हणून भारताचे उभरणे हे अमेरिकेच्या आशियातील व्यापार व सुरक्षिततेच्या हिताला बाधा आणणारे नाही.

भारत यूएस गुंतवणुक ही हितांच्या पुरकतेच्या आधारावर सुरक्षा मैत्रित रूपांतरीत होऊ शकते

यूएस आणि भारताने एकत्रीतपणे काम करणे एकत्रीत ध्येयप्राप्ती आणि चिंतेच्या सामाईक कारणांसाठी एकमेकांना आधार देणे व समजणे हे दोघांच्या हिताचे आहे. दोघही नैसर्गिक भागीदार आहेत आणि एकत्रीतरित्या कार्य केल्यास ते बरेच काही करू शकतात.

काही खंबीर व निश्चयपूर्वक पाऊले उचलली जाणे हे संबंध घनिष्ठ करण्यासाठी व परस्पर संशय दुर करण्यासाठी गरजेची आहे.

## ६.१० विभागवार प्रश्न

१) शीतयुद्ध काळातील भारत यूएस संबंधावर चर्चा करा.
२) शीतयुद्धोत्तर काळातील अमेरिकेच्या दक्षिण आशियाई धोरणाचे टिकात्मक मुल्यमापन करा.
३) शीत युद्धोत्तर काळातील भारत यूएस संबंधातील बदलांवर चर्चा करा.
४) भारत यूएस गुंतवणूक ही दोन्ही देशांसाठी परस्पर कशी फायदेशीर आहे त्यावर चर्चा करा.
५) भारत यूएस संबंधातील पाकिस्थान व चीन घटकांवर चर्चा करा.

## ६.११ संदर्भ सूची


1) Dennis kux, Estranged Democrices : India and the united States, Washington, DC, National Defence university Press 1993, P, 307

2) C. Rajamohan, Beyond the clinton visit, world focus Vol.21.no.6-7, June July 2000, P3

3) Deolankar Shailendra, Foreign Policy of India : continuity and change (Pune : pratima prakashan II Edi, 2010) PP65-70.

4) The growing strategic convergence of interests between India and US has been highlighted in the **Editerial of Telegraph**, 6th April 2001

5) The times of India, November 2010

6) Robart Hathway, The US - India courtship : From clinton to Bush in Sumit Ganguly : ed **India as an emerging power,** (London, Frank Cass Publishers, 2003) P.9

7) J.K. Barnal J. N. Mohanti “the US war against terrorism : implications for south Asia Strategic analysis, vol. 26. no. 4 OCT/DEC, 2002, PP 208-519.

8) Sreedhar terrorism in south Asia, World Focus, Vol 21, No. 67 No. 6-7 June July 2000 PP 18-20.

9) Washington Post, 17th September 2001, The reference of washington, post is cited in Robert Hathaway, The US - India Courtship; From clinton to Bush in sumit Ganguly. ed. **India as an emerging power** (London: Frank cass Publishers, 2003) p 6

10) Paul Kerr, Mary Niktih, Pakistan’s Nuclear Weapons : Proloferation and Socurity issue : congressional research service 30th November 2011, http:/www..fas.org/sgp/crs/nuke/RL34248.pdf

11) John Thronhill Moving closer to the US Financial Times, London, 23rd September 2002.

12) Farewell to Foreign Arms, **Times of India** 1st August, 2010 P22 also see ashtey J Tellis, **Indias Energing Nuclear Postare Between Recessed Deterrence and Ready Arsenal,** new Delhi oxford university press 2001, p 61.

13) Stephen cohen, India Energing Power(Washington D.C.; Brooking Institution Press 2001) P 300

14) Shephen Cohen : India Pakistan and Kashmir, in sumit Ganguly ed., **India as an emerging power** (London, Frank cass publishers, 2003) pp 38-48.

15) Robert Hathaway, The US - India Courtship, From Clinton to Bush in Sumit Ganguly, ed. India as an emerging power (London: Frank Cass Publishers, 2003) pp 6-12.

16) Stephen Burgess India's Emerging Security, Strategy, Missile Defense and arms control INSS Occasional Paper 54 June 2004, USAF Institute of national Security Studies USAF Academy, Colorado.

17) Stobe Talbott "Dealing with the bomb in south Asia" Foreign Affairs Vol 78 No. 2 March 1999 P 120

18) C. Raja Mohan, "Indo - US Dialogue on Pakistan ?" **The Hindu,** April 10, 2003

19) Charies Lutes, New Players on the scene A.Q. Khan and nuclear black market 28th July 2008, www.america.gov/stipeasec.english/2008/July.

20) Jonathan Medahne, Nuclear Jerrism Brief review of Threat and responses, CRS Report to congress 22 september 2004, **www.fas.org/irp/crs/RL 32595.pdf.**

21) J David Albright Kelvin O'Nell, carry Hinderstain, securing pakistan's nuclear arsenals, principles of assistance, institute brief. www.isis-onlin,org/publication/terrorism.

22) The reference of the article cited in Times of India November 2010

23) Bharat varma, Indian must counter china's imperial ambitions, Indian Defense review vol.24.4, oct-dec2009, http/www.indiandefencereview.com/geopolitics/India must-counter-clinas-Imperial ambitions html

24) The refence of the book was cited in Times of India November 2010.

25) Sanjay Baru, Empires of his mind, Indian Express, 8th Feb 2012, P. 10 sitaram vechari, unider the influence, Hindustan Times 6th March 2012, P. 10.

26) Abanti Bhattacharya Chinas foreign policy challenges and evdving strategy stategic analysis. vol. 30, no. 1, jun-mar 2006.pp 184-85

27) Robert Hathway, The US India Courtship : from clinton to Bush in sumit Ganguly ed. **India as an emerging power London :** frank cass publishers, 2003) Pp 19-21

28) Robert Hathway, The US India Courtship : from clinton to Bush in sumit Ganguly ed. **India as an emerging power London :** frank cass publishers, 2003) P10

29) The Times of India November 2010

30) Washington File January 17, 2001

31) Shephan, Cohen India : Emerging Power washington D. C. Brookings institution, press 2001) P. 311

32) The Times of India November 2010

33) Rajeshwari Rajgopalan, Indo-US relation in the Bush white house strategic Analysis Vol.XXV.no.4 July 2001, Pp545-557

34) K Subrahmanyam Indo-US nuclear agreement partnership in a balance of power system strategic Analysis vol 29. No. 4, oct/dec 2005, pp 549-561

35) Joint Statement between the united states of america and the republic of INdia November 9 2001,

www.whitehouse.gov/news/releases/2001/81/200111109-10.html

❖❖❖❖

# ७

# भारत-रशिया संबंध (१९९१ नंतरचे)

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये

७.१ परिचय

७.२ भारत रशिया मैत्री

७.३ जागतिक संदर्भात शीत युद्धोत्तर रशियन संबंध

७.४ सामरिक भागीदारी

७.५ बहुपक्षीयता : संधी आणि आव्हाने

७.६ निष्कर्ष

७.७ सारांश

७.८ विभागवार प्रश्न

७.९ संदर्भसूची

## ७.० उद्दिष्ट्ये

या प्रकरणात आपण सोव्हिएत युनियनच्या कालावधीत सुरु झालेल्या भारत रशिया संबंधांच्या महत्त्वाच्या मुद्यांचा अभ्यास करु. या दोन मोठ्या देशातील काळाच्या कसोटीस उतरलेल्या संबंधांना भारतीय परराष्ट्र धोरणात विशेष महत्त्व आहे. आपण शीत युद्धोत्तर काळातील मजबूत सहकार्य टिकवण्याच्या दोन्ही देशांसाठीच्या उद्दिष्ट्ये व उत्तेजनांवर चर्चा करु. जे भारतीय परराष्ट्र धोरणातील अमुलाग्र बदलाशिवाय सलगता दर्शविते.

## ७.१ परिचय

भारत आणि रशियातील विशेष संबंध हे विश्वास, परस्पर सुसंगतता आणि राष्ट्रहितावर आधारीत आहे. दोन्ही देशात या संबंधांना सखोल लोकमान्यता आहे. दोन्ही देशातील असा एखादाच मतप्रवाह क्वचितच असू शकतो जो या अनुकरणीय संबंधांच्या विरोधी स्पर्धा करणारा असेल. २००८ मध्ये पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग त्यांच्या रशियाच्या भेटीत म्हणाले, "आपले सामारिक संबंध हे दोन्ही देशातील राजकीय एकमतावर आधारित आहे. दोन्ही देशात ऐतिहासिक रुपांतरण घडून आले असले तरी आपल्या भागीदारीचे सार विरल झाले नाही." महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारत रशिया संबंध हे आंतरराष्ट्रीय राजकीय पद्धतीतील भारतीय भूमिकेवर प्रभाव टाकते.

भारतीय व रशियन लोकांमधील प्रस्थापित झालेला पहिला वहिला संबंध हा १५ व्या शतकातील उत्तरार्धातील आहे. जो वास्को द गामाच्या ऐतिहासिक आगमनाच्या जवळपास पावशतकापूर्वीचा आहे. एक रशियन व्यापारी नफॅन्सी निकीटीन जो टवेर शहराचा रहिवाशी होता. त्याने भारताला भेट दिली. आणि येथील राज्यपद्धती, समाज, अर्थव्यवस्था, धर्म आणि निसर्ग याबद्दल त्याचे प्रवासवर्ण, "१४६६ ते १४७२ मधील ३ समुद्रावरील सफरी" यामध्ये अभ्यासपूर्ण विवेचन केले. तथापी दोन्ही देशातील प्रामुख्याने भौगोलिक अंतरामुळे निकिटीनच्या भेटीनंतर दिर्घकाळ पर्यंत काहीही लक्षणीय घडले नाही.

२० व्या शतकात एक रशियन लेखक, वास्तुविशारद प्रवासी आणि चित्रकार निकोलाय रोशीच हा भारताच्या घनिष्ठ संबंधात आला. वस्तुतः शेरिच ने १९२८ मध्ये हिमाचल प्रदेशातील कुलू जिल्ह्यातील नाग्गरला त्याचे घर म्हणून निवडले. जेथे तो १९४७ मधील त्याच्या मृत्यूपर्यंत राहिला. तो सांस्कृतीक स्मारकांच्या संरक्षणासाठीच्या चळवळीमागील मुख्य सुत्रधार होता. तसेच नाग्गर मधील "हिमालयीन शेरीच इन्स्टीट्यूट उरुस्वत" चा संस्थापक होता. भारतातर्फे रविंद्रनाथ टागोर हे बऱ्याच रशियन लोकांची मने जिंकण्यास यशस्वी झाले आणि त्यांची रशियात विस्तृतपणे वाखाणणी केली गेली त्यांनी रशियन भूमीला १९३० मध्ये भेट दिली. टागोरांनी त्यांच्या बंगाली पत्रांमध्ये त्याकाळी चालू असलेल्या समाजवादी प्रयोगांविषयी त्यांची निरिक्षण व मते चतुराईने सारांश रुपात लिहिलेली आहे जी नंतर "रशियातून पत्रे" (Letters from Russia) या पुस्तकात प्रसिद्ध झाली. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्याच्या इंग्रजी भाषांतराला परवानगी दिली नाही. त्याला कारण म्हणजे त्याकाळच्या सोव्हिएत युनियन मधील क्रांतीची टागोरांनी केलेली टिकात्मक स्तुती. २० सप्टेंबर १९३० ला टागोर लिहितात, "सरतेशेवटी रशियात! ज्या ज्या बाजूला मी बघतो मी आश्चर्याने भरुन जातो हे इतर सर्व देशांपेक्षा वेगळे आहे. हे नखशिखांत आमूलाग्रपणे भिन्न आहे; ते कुठल्याही भेदाभेद विना प्रत्येकाला कार्यप्रवृत्त करत आहे."

## ७.२ भारत रशिया मैत्री

विख्यात सोव्हिएत प्रयोगांनी बरेच भारतीय नेते आणि विचारवंतांना आकर्षित केले व प्रभावित केले. पंडित नेहरुंनी १९३७ मध्ये USSR ला भेट दिली आणि नियोजीत अर्थव्यवस्थेच्या संपादनाचा त्यांच्यावरती कायमस्वरुपी दबाव पडला. १९३० मधील भारताच्या साम्यवादी पक्षाच्या स्थापनेसोबतच आणि १९३० मधील त्याच्या जलदवाढीसोबत बरेच साम्यवादी नेते व विचारवंतांनी साम्यवादी क्रांतीचे स्वरुप समजण्याकरता सोव्हिएत युनियनला उघडपणे किंवा गुप्तपणे भेटी दिल्या. अशाप्रकारे २० व्या शतकात भारतीय गट आणि USSR दरम्यान विस्तृत प्रमाणावर राजकीय संबंध प्रस्थापित झाले. यामुळे भारताला स्वतंत्र घोषित करण्याच्या ४ महिने अगोदर म्हणजे एप्रिल १९४७ मध्ये USSR व भारतादरम्यान राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित या USSR साठी पहिल्या भारतीय राजदूत म्हणून नियुक्त केल्या गेल्या.

२ फेब्रुवारी १९५५ रोजी दोन्ही देशांनी भिलाई पोलाद प्रकल्पाच्या बांधणीसाठी पहिल्या महत्त्वाच्या करारावर सह्या केल्या. हा प्रकल्प त्यांच्या दरम्यानच्या आर्थिक सहकार्याचा मानसबिंदू ठरला. इतर बऱ्याच सार्वजनिक क्षेत्र विभागाच्या उभारणीत USSR ने महत्त्वपूर्ण

तंज्ञज्ञानविषयक साहाय्य पुरविले असे ऋषीकेष मधील भारताचा पहिला आटोबायोटिक प्रकल्प आणि भिलाई आणि बोकारोमधील धातुविज्ञान प्रकल्प तसेच भारताने त्याचा पहिला उपग्रह सोव्हिएतच्या मदतीने सोडला. नेहरुंच्या काळात भारत रशिया संबंध हे आर्थिक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्याबरोबरच सांस्कृतीक देवाणघेवाणीवर सुद्धा आधारलेले आहे. दोन्ही देशांनी त्यांच्या व्यक्तीगत परराष्ट्र धोरणात वसाहत वाद विरोधी आणि वंशद्वेष विरोधी धोरण अवलंबले. या आदर्शवादी समानतेमुळे दोन्ही देशांनी यूनायटेड नेशन्समध्ये आणि इतरत्र बऱ्याच आंतरराष्ट्रीय मुद्यांवर जवळजवळ समान स्थान स्विकारले.

इंदिरागांधीनी सोव्हिएत सत्तेशी ऐतिहासिक शांतता, मैत्री आणि सहकार्य करार करुन द्विपक्षीय संबंधांना अजुन मजबूती दिली. हा मैलाचा दगड ठरलेला करार ९ ऑगस्ट १९७१रोजी २० वर्षाच्या कालावधीकरिता मंजूर केला गेला या करारान्वये भारत आणि USSR जागतिक राजकारणात औपचारिकपणे सामारिक भागीदार बनले. त्याची किमंत पुढील काही महिन्यातच सिद्ध झाली. जेव्हा भारताने पाकिस्तानच्या आज्ञेवरुन US दबाव तंत्राला समर्थपणे तोंडच दिले नाही तर डिसेंबर १९७१ मध्ये रावळपिडींला निर्णायक लष्करी मात दिली. बांगलादेश मुक्त चळवळीच्या समर्थनार्थ भारताच्या मध्यस्थीला USSR कडून सामरिक पाठिंबा मिळाला. ज्यामुळे नवी दिल्लीला लष्करीकृती करण्यापासून गलितगात्र करण्याचे US व चीनचे प्रत्यन विफल झाले. दुसऱ्या बाजुला हंगेरी, झेकोस्लोवाकिया, आणि अफगाणिस्थानमधील सोव्हिएत लष्करी हस्तक्षेपावर पाश्चात्य देशांच्या टिकेच्या सुरात सुर मिळवणे टाळण्यासाठी भारताने नाजूक भूमिका घेऊन विरोध केला नाही.

**आपली प्रगती तपासा**

१) भारताचा सोव्हिएत युनियनप्रती कल यावर चर्चा करा.

२) भारत सोव्हिएत २० वर्षाचा करार यावर चर्चा करा.

## ७.३ जागतिक संदर्भात शीत युद्धोत्तर रशियन संबंध

शीत युद्धकाळात भारत आणि रशिया हे एकमेकांचे विश्वसनीय भागीदार होते. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर आणि भारतातील नवउदारमतवादी धोरणाच्या आगमनाने त्यांच्या संबंधात जबरदस्त बदल घडून आले. तथापी दोन्ही देशांनी एकमेकांच्या समस्या आणि बदललेले भू-राजकीय संदर्भ समजून घेण्यात प्रचंड प्रगल्भता दाखवली हि चिकाटी फलदायी ठरली आणि दोन्ही देशांनी बहुपक्षीय मंचात सहकार्य करण्याबरोबर संरक्षण, तंत्रज्ञान विषयक व आर्थिक क्षेत्रे यामधील द्विपक्षीय सहकार्याला गती दिलेली आहे.

शीत युद्धोत्तर काळात भारत आंतरराष्ट्रीय स्थरावर बहुश्रृतीयतेच्या उदयाच्या स्पष्ट उच्चार करत असून त्याला पाठिंबा देत आहे आणि त्याचवेळेस तो स्वतःला एक ध्रुवीय जगाच्या वास्तविकतेशी जुळवून घेत आहे. गरज असेल तेव्हा भारताला रशियाचा अमेरिकेशी समतोल हवा आहे. तथापी US शी घनिष्ट संबंधांच्या त्याच्या कल्पना त्याच्या सामरिक विचारसरणीला प्रभावित करतात. याउलट भारताचे उदारीकरण धोरण, आकर्षक आर्थिक वाढ मध्यमवर्गाच्या विस्तारामुळे निर्मित झालेली विस्तृत बाजारक्षमता आणि त्याच्या परराष्ट्र धोरणातील नविन लवचिकता त्यामुळे भारत हा US व इतर विकसीत अर्थव्यवस्थेसाठी आकर्षण केंद्र बनले आहे. भारतीय संस्थापकांनी अमेरिकेशी असलेल्या संबंधांचा इतर कुठल्याही सत्तेशी असलेल्या संबंधांवर विशेषतः रशिया सोबतच्या संबंधावर विपरीत परिणाम होणार नाही याची नेहमीच काळजी घेतलेली आहे. तथापी US ही काही फक्त एक सत्ता नाही ऐतिहासिक दृष्ट्या US सोबतचे द्विपक्षीय संबंध हे निवडक्षम होते कारण त्याच्या सामरिक भागिदारांना क्वचितच वाशिंग्टनची चिंता, रुची आणि प्राधान्य दाखवले जायचे या परिस्थितीमुळे त्याचा पारंपरिक भागीदार रशिया सोबतच्या संबंध दृढीकरणाच्या दृष्टीकोनावर व कल्पकतेवर विशेषतः १९९० च्या दशकात मर्यादा आल्या.

यालाच युरेपियन क्षेत्रातील बदलत्या सुरक्षा चित्रासह रशियन राजकारण व अर्थव्यवस्थेतील अंतर्गत क्रांतीमुळे पाठबळ मिळाले. रशियाचे साम्यवादी पद्धतीपासून बाजारपेठीय अर्थव्यवस्थेतील संक्रमण ही एक गोंधळयुक्त बाब होती याची परिणती त्याच्या अर्थव्यवस्थेचा उतरंडीत आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात US सामरिक पुढाकाराला तुल्यबळ करण्यात अक्षम ठरण्यात झाले. त्याच्याच परिणाम म्हणून रशियाने बोरिस एल्स्थीनच्या नेतृत्वाखाली यद्यपी थोड्या काळासाठी का होईना युनायटेड स्टेट शी घनिष्ठपणे जुळवून घेण्याचा प्रयत्न केला तसेच त्याने चीन सोबतचे संबंध विस्ताराने आणि पाकिस्तानसोबतचे संबंध सुरु केले. यामुळे नवी दिल्लीचा समज झाला की जागतिक कारभारात रशिया स्थीर व विश्वसनीय भागीदार राहू शकणार नाही. या विचारसरणीला रशियाच्या संक्रमण काळातील संस्थात्मक निर्णय प्रक्रियेच्या अभावामुळे बळकटी मिळाली.

भारताला १९९० च्या पूर्वार्धात रशियासोबतच्या द्विपक्षीय संबंधांच्या भविष्याविषयीच्या पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागले त्याचवेळेस रशियाला नवी दिल्ली सोबतच्या संबंधात समतोल टिकवून ठेवायचा होता. दोन्ही देशांना त्यांच्या मैत्रीची सामरिक किंमत समजण्यासाठी फारच थोडा वेळ लागला आणि त्यांनी जाणले की नविन जगात संबंध हे, हे किंवा ते वर आधारित असू शकत नाही. १९९२ मध्ये रशियन संघांच्या परराष्ट्रधोरण संकल्पनेत भारताचा क्वचितच उल्लेख होता. १९९२ ते १९९६ पर्यंत गंगा व व्होल्गा मधून बरेच पाणी वाहून गेले. १९९६ मध्ये त्यावेळचे रशियाचे परराष्ट्र मंत्री प्रीमकॉव्ह यांनी भारताशी असलेल्या संबंधांना मास्कोच्या दृष्टिकोणात मध्यवर्ती स्थान दिले. २००० मध्ये रशियाच्या राष्ट्रीय सुरक्षाप्रणालीने स्पष्ट केले की, रशियाचे परकिय आर्थिक हित हे पाश्चात्यांसोबत नाही उलट त्याऐवजी रशियाने तिसऱ्या जगातील देशांमध्ये बाजारपेठ शोधायलाच हवी (RNSD 2000) ऑक्टोबर २००० मध्ये दोन्ही देशांनी रशियन अध्यक्ष व्हॅलदीनीर पुतीनच्या भारत भेटीत सामरिक भागीदारीच्या जाहिरनाम्यावर सह्या केल्या. यामुळे १९९१ मधील भारत रशिया शांतताकरार संपुष्टात आल्यामुळे निर्माण झालेली द्विपक्षीय संबंधातील पोकळी अंशतः भरुन आली. यानंतर दोन्ही देशातील संबंध भरीव वाढीचे साक्षी बनले. भारत रशिया मैत्रीच्या भविष्याविषयीच्या अनिश्चिततेने बहुविधकारणांमुळे २१ व्या शतकातील द्विपक्षीय संबंध विकसीत करण्यास नवीन

चालना दिली. पहिलीच गोष्ट म्हणजे व्हॅलदीमीर पुतीनच्या सक्षम नेतृत्वाखाली रशियन राजकारण स्थीर झाले. आणि अर्थव्यवस्थेचे पुनरुत्थान घडून आले. भारताला त्याच्या नैसर्गिक भागिदारीसोबत पुन्हा जुळवून घेण्यासाठी ही प्रेरक बाब होती. दुसरी गोष्ट म्हणजे रशियाच्या पाश्चात्य देशासोबतच्या सुरुवातीच्या गोडव्यानंतर हळूहळू कटूता आली. विशेषतः जेव्हा मॉस्कोने त्याचे प्रभाव क्षेत्र हे पूर्व युरोपियन देश व मध्य आशियाई देशांमध्ये विस्तारले. तिसरे म्हणजे भारत-चीन मधील वाढत्या द्विपक्षीय संबंधासह नवीन चीन-रशिया कालखंड सुरु झाला व यासोबतच नवी दिल्ली, मॉस्को व बिजिंग दरम्यान बहुपक्षीय मंचावर सहकार्य वाढले. तसेच अफगाणिस्तानमधील सत्तेच्या खेळात निर्माण झालेल्या अडचणींमुळे रशिया व पाकिस्तान दरम्यानचे नवसंबंध प्रस्थापित होण्याचे प्रयत्न ठप्प झाले. यामुळे भारत व रशिया दरम्यानच्या विश्वास बांधणीला मदत झाली आणि त्याच्या संबंध बळकट्टीकरण्याकरीता दोघांना परस्पर प्रेरणा मिळाली. चौथी बाब म्हणजे भारताने त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयीच्या नेतृत्त्वांतर्गत सर्व महासत्ता सोबत म्हणजेच P-5 देशांसोबत 'आण्विक भारताचे' सामरीक संबंध पुढे आणण्यासाठी 'महासत्ता धोरण' आक्रमकपणे अवलंबिले. या प्रयत्नात नवी दिल्लीच्या धोरण कक्षात रशियाने जातीने लक्ष दिले. पाचवे म्हणजे जागतिक मंदीने लादलेल्या नवीन आंतरराष्ट्रीय वास्तविकतेने भारत, रशिया, चीन, ब्राझिल आणि इतर सक्षम स्थानिक सत्ता जसे दक्षिण आफ्रिका, अर्जेटिंना, इंडोनेशिया इ. ना आंतरराष्ट्रीय निर्णय क्षमतेत एकत्रितपणे हक्क बजावण्यास भाग पाडले. यामुळे या देशांमध्ये संवादांच्या संस्थानिकरणाची गरज निर्माण झाली. उदा. BRICS शिखर परिषदेची निर्मिती G-20, इ.

भारत व रशिया हे दोघेही नवीन उभरत्या जगात बहुध्रुवीयतेची वकालत करतात. याच कल्पनेचे इतर क्षेत्रीय व उभरत्या जागतिक सत्ता तेवढेच समर्थन करतात. बहुध्रुवीयतेच्या आशय हा केवळ एक महासत्तेच्या दादागिरीला वेसण घालण्यासाठी राजकीय आणि / किंवा आर्थिक सत्तेच्या स्वरुपात बहुविध ध्रुव म्हणून स्वतंत्र आंतरराष्ट्रीय कर्ते निर्माण करण्याच्या बाजुने आहे. बहुध्रुवीय दृष्टीकोनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) आंतरराष्ट्रीय पद्धती ही धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत बहुविध सत्तेच्या सहअस्तित्व व सहभागावर आधारीत असायवसाच हवे.
२) सार्वभौम राष्ट्रांनी कोणत्याही बाह्य दबावाविना त्यांचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखावयास हवे.
३) सार्वभौम राष्ट्रांना त्यांचे स्वतःचे परराष्ट्र धोरण अनुसरण्यासाठी साधक आंतरराष्ट्रीय वातावरण हवे.
४) आंतरराष्ट्रीय सामरीक निर्णय हे संयुक्त राष्ट्रातच घेतले जायला हवेत ज्यांना लोकशाहीकरण व अधिकच्या सहभागाद्वारे बळकटी व मजबूती द्यावयास हवी.
५) एकत्रित सुरक्षेच्या आशयाला उत्तेजन द्यावयास हवे, परंतु ते सर्वसमावेशक असावयास हवे.
६) अधिक क्षेत्रीय लाभासाठी क्षेत्रीयवादास प्रोत्साहन द्यावयास हवे.
७) आंतरराष्ट्रीय वादविवाद हे बळाचा वापर करण्याऐवजी समर्पक बोलणीद्वारे सोडविले जावेत.

भारत व रशियाला वाटते की या तत्त्वानुसार आंतरराष्ट्रीय संबंधांचे रुपांतरण हे त्यांच्या सर्वात अधिक हिताचे आहे. हा एकूणच जागतिक संदर्भ हा या पूर्वीच्या मित्रांमधील संबंधांना आकार देत आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) USSR च्या विभाजनानंतर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बदलत्या संदर्भाविषयी चर्चा करा.

२) १९९१ नंतरच्या काळातील भारत व रशिया दरम्यानच्या सामाईक समजुतीच्या मुद्यांवर चर्चा करा.

## ७.४ सामरिक भागीदारी

रचनात्मक परस्परावलंबित्व हे भारत-रशिया संबंधांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ज्यामध्ये दोन्ही देश हे परस्परांवर अवलंबून आहेत. या दोन देशांदरम्यान एकूणच ८० पेक्षा अधिक राजकीय-कायदेशीर दस्तऐवजावर सह्या केल्या गेल्या आहेत. जे विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्यासाठी ठोस आधार पुरविते. २००१ चा भारत-रशिया सामरिक करार हा सामरिक व राजकिय उपपद्धती सह बहुमार्गी द्विपक्षीय संबंध प्रस्थापित करतो. या करारान्वये दोन्ही देश सामरिक फायद्याचा लाभ घेतात. रशियाशी असलेल्या सामरिक भागीदारीमुळे काश्मिर, ऊर्जा सुरक्षितता, चीनशी असलेले संबंध, मध्य आशियाई देशांतील नैसर्गिक वायू व तेल स्त्रोतांचा लाभ यासारख्या भारतीय हितांचे सुयोग्यपणे संरक्षण केले जाते.

भारत व रशिया हे दोघेही दहशतवादाचे बळी आहेत आणि अनुक्रमे काश्मिर व चेचन्या क्षेत्रात ते अंतर्गत कलहात ओढले गेले आहेत. याचाच परिणाम म्हणून ते एकमेकांच्या चिंता समजतात तसेच दहशतवादी कारणे व स्त्रोत समजतात. दहशतवादाच्या राक्षसाला ताब्यात ठेवण्यासाठी ते संयुक्त हेरगिरी सहभाग तंत्राला बांधिल आहेत. रशियाची काश्मिर व दहशतवादावरील भूमिका ही बऱ्याच काळापासून सातत्यपूर्ण राहिलेली आहे आणि दोन्ही देशातील सत्ताबदलाने त्यात फरक पडलेला नाही. महत्त्वाचे म्हणजे रशियन संरक्षण व सामरिक पाठिंबा हा जवळजवळ कुठल्याही अटीविना आहे आणि या देशांचे इतर कोणत्याही देशांशी, मग ते चीन असो व अमेरिका, असलेल्या संबंधांशी जुळलेले नाहीत. महत्त्वपूर्ण म्हणजे भारत हा निर्णय प्रक्रियेत स्वतंत्र आहे मग तो मुद्दा रशियाशी विशेष संबंधित असला तरीही. उदाहरणार्थ, भारताची इराण, हवामान बदल वाटाघाटी, अफगाणीस्तान व सिरीया यावरील भूमिका ही रशियन भूमिकेशी समान धारणेची नव्हती. यद्यपि, काही मुद्यावरील जाणिवेतील पुरक हा द्विपक्षीय संबंधात अडसर ठरला नाही.

भारत-रशिया संबंधांमध्ये संरक्षण हा प्रमुख घटक आहे. आजसुद्धा भारतीय लष्कराचा ७०% आयातीत धातुसमान हा रशियातून येतो. रशियातून लष्करी सामग्रीची आयात ही १९६० मध्ये सुरु झाली जी ३३ अब्ज डॉलरच्या घरात जाऊन पोहोचली. वस्तुतः लष्करी सामग्री

क्षेत्रातील पुरवठादार व ग्राहक हा शीतयुद्धकाळातील संबंध हळूहळू दोन्ही देशातील एक भागिदारीत रुपांतरीत होत आहे. प्रगत शस्त्रात्रांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी संयुक्त उत्पादन तंत्र वापरले जात आहे. यातील महत्त्वपूर्ण म्हणजे ब्राम्होस क्षेपणास्त्रांची संयुक्त निर्मिती. डिफेक्सके इंडिया २००४ मध्ये रशियाचे प्रदर्शन ३४ उद्योगाला सर्वात मोठे होते. रशियाने लष्करी उपकरणांचे ३७० नमुने, दुहेरी वापर व नागरी उत्पादनाचे ७० नमुने प्रदर्शित केले. लष्करी उपकरणे, संरक्षण साहित्य, अवकाश व उपग्रह तंत्रज्ञान आणि आण्विक शक्ती क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याने भारतीय संरक्षण संस्था व रशियन लष्करी उद्योग मंडळादरम्यान परस्परावलंबित्व निर्माण केले आहे.

**ऊर्जा विभाग -**

भारत हा तेल आयात करणारा परावलंबी देश आहे. कारण तो त्याच्या पेट्रोलजन्य उत्पादनाच्या गरजेच्या ८०% तेल क्रूड स्वरुपात आयात करतो. परिणामी ऊर्जा सुरक्षेने भारत व रशिया मधील सामरिक सहकार्यासाठी वाढीव महत्त्व प्राप्त केले. ही परिस्थिती २००४ मध्ये त्यावेळचे भारताचे पेट्रोलियम मंत्री डॉ. मणीशंकर अय्यर यांनी खूपच चांगल्याप्रकारे सांगितली आहे. ते म्हणाले "स्वतंत्र भारताच्या अर्धशतकात रशियाने आपल्या क्षेत्रीय एकात्मतेची हमी दिलेली आहे आणि दुसऱ्या अर्धशतकात तो आपल्या उर्जा सुरक्षिततेची हमी देण्यास असमर्थ ठरेल, मी रशियाशी उर्जा सुरक्षितेतील सामरिक मैत्रीबद्दल बोलत आहे जी किमान भारतासाठी तरी राष्ट्रीय सुरक्षिततेवएवढी महत्त्वाची बनत आहे." (बारुह २००४) भारतीय धोरण हे रशियन आण्विक उर्जा आणि हायड्रोकार्बन स्त्रोत मिळवण्यावर केंद्रीत आहे.

डिसेंबर २००९ मध्ये भारत आणि रशियाने एका नागरी अणूकरारावर सह्या केल्या. ज्याने भारताला अखंडीत आण्वीक इंधन पुरवठा करण्याची हमी दिली. वादग्रस्त भारत, US आण्विक व्यापाराशी संबंधीत १२३ करारांना उपलक्षून वर उल्लेख केलेला करार हा भारताकडून अंतिम वापर आणि पुनप्रक्रिया याविषयी हमी मागत नाही. अशाप्रकारे भारताला कुठल्याही परिस्थितीत इंधन व उपकरणे परत करण्याची गरज नाही. कुटनाकुलम येथील अधिकची नागरी अणूभट्टी आणि पश्चिम बंगालमधील एक नवीन अणूभट्टी पुरवण्याच्या बांधिलकी व्यतीरिक्त रशियाने भारतात २० अणूउर्जा प्रकल्प बांधण्याचे वचन दिले आहे. रशियन सरकारसाठी प्रत्येक प्रकल्पाची अंदाजीत रक्कम ही १.५ अब्ज डॉलर आहे.

पेट्रोलियम व नैसर्गिक वायूक्षेत्रात भारत त्याच्या वरील दाब कमी करण्यासाठी रशियावर अवलंबून आहे. २००५ मध्ये रशियाने भारताला त्यावेळी एका बॅरलचा भाव ५० डॉलर पोहचला असताना बाजार भावापेक्षा कमी किंमतीत ऑईल देऊन भारताची बिकट परिस्थितीतून सुटका करण्यास मदत केली. याऊलट भारताच्या ONGC ने रशियन मोठे प्रकल्प साख्लीन-१ व साख्लीन-२ मध्ये आजपर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक तंत्रज्ञानविषयक आणि मानवी संपत्ती भागीदारीच्या पलिकडे जाते. भारताला रशियन हायड्रोकार्बन साठ्यात व्यापार अधिकार मिळालेले आहेत ज्याद्वारे तो बाजारात रशियन पुरवठादारांसोबत तेलाच्या देवाणघेवाणीत गुंतवू शकतो. दोन्ही देश बंगालच्या उपसागराच्या किनारपट्टीतील हायड्रोकार्बनच्या संयुक्त उत्खनन व उत्पादनावर सहमत झालेले आहे.

रशियाने साख्लीन-३ प्रकल्पासाठी US गुंतवणूकीचा दावा नाकारला आणि खरोखरच भारताला त्याचा भागीदार बनण्यास आमंत्रीत केले. अशाप्रकारचे निर्णय हे धोरणात्मक उच्च

पातळीवर घेतले जातात ते मास्कोवरील भारतीय प्रभावाची वापसी दर्शवितात. साखलिन व्यतिरक्त भारत व रशिया हे पुढेमागे मध्य आशियाई हायड्रोकार्बन क्षेत्राच्या उत्खननाचा दृष्टिकोन बाळगतात. भारताचे मध्य आशियाई रिपब्लिकमध्ये सामरिक व ऊर्जा हित आहे. भारत हा त्याच्या ऊर्जा संपत्तीच्या वैविध्यतेच्या प्रयत्नांबाबत गंभीर आहे जे सध्या पश्चिम आशियाकडे आहे. हा हेतू साध्य करण्यास्तव भारताने दुहेरी रणनीती अवलंबिली आहे. तो रशियासोबतचे संबंध मजबूत करत आहे. ज्यामुळे या प्रदेशातील बऱ्याच सत्तांवर प्रभाव टिकून राहिल. भारताची नीती ही संयुक्त भारत-रशिया प्रकल्प संभाव्यतेचा समावेश करते. त्याच वेळेस तो पूर्वीच्या सोव्हिएट रिपब्लिक सोबत त्या क्षेत्रात स्वतंत्रपणे मैत्रीपूर्ण संबंध विकसित करीत आहे.

भारताने काझागस्तान व ताजिकीस्तान सोबतचे संबंध दृढ करण्यात यशस्वी वाटचाल केली आहे आणि तो ऊझबेगिस्तान, कीर्गिझस्तान व तुर्कमेनिस्तान सोबतचे संबंध उंचावण्याच्या प्रयत्नात आहे. या देशातील ऊर्जा हितासह भारताचे ताजीकिस्तानमध्ये भू-सामरीक उद्दिष्ट आहे. याला कारण म्हणजे अफगाणिस्तान, पाकिस्तान व पश्चिम आशियासोबतचे ताजिकीस्तानचे सान्निध्य. भारताने ताजिकीस्तानमध्ये एका हवाई तळाची बोलणी केल्याचे वृत्त आहे. जो नवी दिल्लीसाठी खूप मोठा सामरिक ठेवा होऊ शकतो. हे यश रशियासोबत चांगला विश्वास व सौदाहार्यता ठेवल्याविना मिळू शकले नसते. रशियाची या क्षेत्रात फक्त स्वसंरक्षणाचीच खात्री नाही तर तेथील लोकांसोबत ऐतिहासिक राजकीय-सांस्कृतिक संबंध सुद्धा आहेत. तेथे सुमारे १० दशलक्ष रशियन हे मध्य आशियाई राज्यात आहेत व तेथे २०,००० मजबूत रशियन लष्करी व्यक्तींची सहवास आहे. त्या क्षेत्रातील परिवहन व पाइपलाइनचे मार्ग यांच्याशी रशियाची जुळणी आहे तसेच दळणवळण व वीज केंद्रातील त्याचा सहभाग हा त्याच्या सहादरीत संबंधाचा परिणाम आहे.अशाप्रकारे मध्य आशियातील प्रवेश हा भारत-रशिया संबंधातील महत्त्वाचे अंग आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) भारत-रशिया संबंधातील दहशतवाद व क्षेत्रीय सहकार्याच्या मुद्यावर चर्चा करा.

२) ऊर्जा सुरक्षितता पार्श्वभूमीवर भारताचे रशियाशी असलेले संबंध यावर चर्चा करा.

## ७.५ बहुपक्षीयता : संधी आणि आव्हाने

भारत व रशिया हे त्यांचे संबंध द्विपक्षीय चौकडीपलिकडे विकसित करण्यास तयार आहेत. दोन्ही देश सतत सध्या अस्तित्वात असलेल्या किंवा नवीन बहुपक्षीय मंचातील सहकार्याच्या संभाव्यता शोधत असतात. १९९० च्या मध्यात त्यावेळचे रशियाचे पंतप्रधान प्रिमाक्रॉव्ह यांनी अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला चाप घालण्यासाठी भारत-रशिया चीन (RIC)

युतीची कल्पना मांडली. हे तत्त्व त्यातील उपजत विरोधाभासामुळे प्रत्यक्षात अंमलात आले नाही. पहिली गोष्ट म्हणजे भारत हा भारत व चीनमधील सीमा प्रश्न मैत्रीपूर्ण पद्धतीने सुटल्याशिवाय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे चीनशी असलेल्या सामरीक संबंधात प्रगती करु शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे भारताला पाश्चात्य लोकशाहीविरोधात समतोल सत्ता म्हणून वावरण्यास रस नाही. जो त्यांना त्याच्या सामरीक किंवा इतर महत्त्वाच्या बाबतीत थोडा समजत नाही. तिसरे म्हणजे भारताचे रशिया किंवा चीन पेक्षा पाश्चात्यांसोबत अधिक चांगले व्यापारी संबंध आहे. म्हणून तो RIC सत्ता त्रिकोणाच्या पाठपुराव्यात स्वतःचे व्यापारहित धोक्यात घालणार नाही. तथापी भारताने दोन्ही देशांशी चांगले संबंध टिकवण्यासाठी त्रिपक्षीय चर्चेत सहभागी होणे चालू ठेवले. भविष्यात RIC ची कल्पना अधिक विदारक स्वरुप घेऊ शकते जे भारतासाठी विशेषतः व्यापारी पातळीवर फलदायी ठरेल.

मागील एक दशकात रशिया, चीन आणि चार मध्य आशियाई प्रजासत्ताकांचा एक मंच शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) या आशियाई मधील एक शक्तीशाली आंतरराष्ट्रीय व्यासपीठ म्हणून उदयास आला. (SCO) ची संकल्पना ही चीन व रशियाचा राजनैतिक डाव समजला जातो. ज्याद्वारे त्यांनी US च्या प्रयत्नांना शह देण्यासाठी मध्य आशियाई क्षेत्रातील त्यांचे सामरिक व उर्जाहित प्राप्त केले. बरेच आशियाई देश विशेषतः दक्षिण, पश्चिम आणि मध्य आशियातील देश हे SCO सदस्य होण्यास उत्सुक आहे. भारताने आधीच निरिक्षकाचा दर्जा प्राप्त केलेला आहे आणि तो सदस्य बनणाऱ्यांमध्ये आघाडीवर आहे. भारताचा अफगाणिस्थानमधील वाढीव रस व गुंतवणूकीसह नवी दिल्लीसाठी हे समर्पक आहे की त्याला SCO स्को मध्ये अधिक लाभ मिळावा. अफगाणीस्थान मधून पाश्चात्य लष्कर माघारी गेल्याने या उध्वस्थ देशाची भवितव्य ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यात स्को (SCO) ने तयारी केली आहे. SCO ने हे वारंवार जाहीर केले आहे की, ते दहशतवाद, जहालमतवाद आणि अलगवाद या तीन राक्षसांवर कार्य करेल. हीच भारताची चिंतेची क्षेत्रे सुद्धा आहे म्हणून भारत या संघटनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. महत्त्वाचे म्हणजे SCO ही जरी सुरक्षा संघटना असली तरी तिची लष्करी मैत्रीची योजना नाही. यामुळे भारत त्यामध्ये सहभागी होण्यापासून दुर जाऊ शकेल. त्याऐवजी SCO हा आर्थिक ऊजा आणि क्षेत्रीय सुरक्षितता मुद्यांवर जोर देते. SCO ने पूर्ण सदस्यत्व हे भारताचे रशिया सोबत असलेले संबंध अजून सुधारेल ज्याद्वारे दोन्ही देश अफगाणीस्थान आणि त्या क्षेत्रातील इतर देशांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते.

भारत रशिया संबंधाचा अतिषय महत्त्वाचा बहुपक्षीय मंच म्हणजे BRICS म्हणजेच जगभरातील पाच उभरत्या आणि सळसळत्या अर्थव्यवस्था ज्यात ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका आहे त्यांची नियमित शिखरसभा हवामान बदलासारख्या काही जागतिक मुद्यांवरील मतभिन्नता असून सुद्धा या पाच उभरत्या देशांचा गट हा जागतिक धोरणावर आणि विशेषतः आर्थिक क्षेत्रावर परिणाम करणारे अतिशय शक्तीशाली व्यासपीठ आहे. BRICS हे त्यांचे हिताचे संरक्षण आणि प्रवर्धन करण्यासाठी म्हणून केवळ ५ चा गट म्हणून निर्माण झालेला नाही तर विकसनशील देशांचे प्रातिनिधिक मंडळ म्हणून आहे. BRICS त्याच्या स्वतःचा विकास बँकेची कल्पना उचलून धरत आहे. कारण विकसनशील देशांना सध्या अस्तित्वात असलेल्या ब्रेटॉन वूडस् इन्स्टीट्यूट मध्ये जास्त अधिकार नाही. त्याचप्रमाणे BRICS च्या २०१२ च्या दिल्ली शिखर परिषदेने त्यांच्या सदस्यांना अमेरिकन डॉलरवरची विसंबितता कमी करण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या चलनात व्यापार करण्यासाठी तंत्राचे संस्थानिकीकरण जाहीर केले. जर या दोन कल्पनांनी मूर्त रुप घेतले तर BRICS हि २१ व्या शतकाची अतिषय

महत्त्वपूर्ण नविन संघटना म्हणून उदयास येऊ शकते. यामुळे भारत रशिया द्विपक्षीय संबंधाना सर्वसमावेशकपणे चालना मिळेल.

**द्विपक्षीय संबंधातील उणीवा -**

या दोन मैत्रीपूर्ण देशांमधील पुरेशा व्यापाराचा अभाव ही भारत रशिया संबंधामधील सर्वात मोठी कमतरता आहे. २००५-२००६ मध्ये द्विपक्षीय व्यापार हा फक्त ३ अब्ज डॉलर होता जो २००९ मध्ये ७ अब्ज डॉलरवर पोहचला. संयुक्त भारत रशिया व्यापार परिषद हि २०१५ पर्यंत हा व्यापार २० अब्ज डॉलर पर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवून आहे जे एक दुष्कर कार्य आहे. भारताच्या रशियाला होणाऱ्या निर्यातीत मुख्यतः RMG Cotton सहपयोगी वस्तू, औषधे, चहा, कॉफी व प्रक्रिया केलेले खनिजे यांचा समावेश होतो. तसेच तो लोखंड आणि पोलाद खते, बिगर लोहधातू, कोळसा, न्यूज प्रिंट, चांदी, रबर, यंत्रसामग्री आणि रसायनांची आयात करतो दोन्ही देश संयुक्त सहकार्य आणि व्यवसाय भागीदारी वाढविण्यासह त्यांच्या व्यापारात विविधता आणण्यास तयार आहे. अलिकडेच व्यवसायावरील संयुक्त कार्यकारी गट हे या उद्दिष्टपूर्तीसाठी स्थापन झाले आहे. तथापी दोन्ही देशांच्या खाजगी उद्योजकांची भूमिका ही व्यापार वाढवण्यात निर्णायक आहे. दुसऱ्या बाजूला दोन्ही देशातील राजकीय नेतृत्वाने व्हिसा प्रक्रिया सुलभ होण्यासाठी व संयुक्त बँकींग प्रक्रिया उभारण्यासाठी ठोस इच्छाशक्ती दर्शवणे गरजेचे आहे. भारताची रशियातील गुंतवणूक विशेषतः कमी आहे. जी द्विपक्षीय संबंध टिकवण्यासाठी पुरेशा प्रमाणात वाढणे गरजेचे आहे. सुधारीत व्यापारासाठी रशियन बँकेची हमी आणि व्हिसा यांच्या समस्या या अडथळे आहेत. याउलट रशियाजवळ कर्जवसूली द्वारे न खर्च केलेले भारतीय रुपयांचे १ अब्ज डॉलर आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) भारत आणि रशियामधील द्विपक्षीय संबंधात समाविष्ठ असणाऱ्या बहुपक्षीय मुद्यांवर चर्चा करा.

२) १९९१ नंतरच्या काळातील द्विपक्षीय संबंधातील अडचणींवर चर्चा करा.

## ७.६ निष्कर्ष

भारत रशिया संबंध हे वेगवेगळा काळ व परिस्थितीत कसोटीस उतरलेले आहे. ते जागतिक इतिहासातील एकमेवद्वितीय द्विपक्षीय संबंधापैकी एक आहे. एकमेकांपासून खूप भौगोलिक अंतरावर असून आणि त्यांच्या वैयक्तिक ताकदीत फरक असून सुद्धा हे संबंध परस्पर हित व आवडीवरच केवळ आधारलेले आहे. दोन्ही देशांच्या नेत्यांची नियमीत शिखर परिषद BRICS चे संस्थानिकरण आणि भारताची SCO मधील वाढती रुची त्यामुळे नवी दिल्ली आणि मास्कोमधील पुढील सहकार्याचा वाव वाढविते पुढील काही दशकात अफगाणीस्थान, मध्य

रशिया आणि ऊर्जासंपत्ती ही या दोन देशातील सामरिक सहकार्याची क्षेत्रे ठरतील. WTO मध्ये मास्कोच्या प्रवेशाने भारतीय व्यवसायाला रशियात व्यापार करण्यास व गुंतवणूकीस वाव आहे. दोन्ही देशांना शैक्षणिक सांस्कृतिक आणि वैज्ञानिक देवाणघेवाणीतील वाढीपासून प्रचंड लाभ होऊ शकतो या हेतूस्तव दोन्ही सरकारनी व्हिसा प्रक्रिया सैल करावी आणि त्या त्या देशातील नागरी समाजातील देवाणघेवाणीला चालना द्यावी. भारताला संयुक्त राष्ट्रात कायम सदस्यत्व देण्यासाठी रशियाचा पाठिंबा निर्णायक आहे. हा परस्पर पाठिंबा व सहकार्य हे भारताला जागतिक राजकारणात योग्य स्थान मिळण्यात आणि रशियाला एक महासत्ता म्हणून पुर्न प्रस्थापित करण्यास मदतगार ठरेल.

## ७.७ सारांश

रशिया व त्याच्या राजकीय पूर्वाधिकारी USSR हे जागतिक राजकारणात भारताचे सर्वात विश्वसनीय मित्र राहिलेले आहेत. आता हे सिद्ध झाले आहे की जगाच्या या दोन मोठ्या देशांतील मैत्री ही युक्त तत्त्वाद्वारे मार्गदर्शित केलेली नसून ती परस्परांची निकड व एकमेकांना सहकार्य करण्याची क्षमता या आधारावर स्थापलेली आहे. आजच्या संदर्भात दहशतवाद, संरक्षण, ऊर्जा सुरक्षा आणि क्षेत्रीय सहकार्य या मुद्यावरील सहकार्य हे भारत-रशिया मैत्रीचा गाभा बनले आहे. तर दुसऱ्या बाजूला परस्पर व्यापाराचा अभाव आणि एकमेकांच्या समाज व संस्कृतीप्रती असलेली सांस्कृतिक अवकळा हे ती क्षेत्रे आहेत जे या दोन देशांतील एकमेव मैत्रीच्या गुंतवणूकीसाठी व पुनर्रघट्टनासाठी वाव देते.

## ७.८ विभागवार प्रश्न

१) भारत रशिया संबंधातील समानतेवर तपशीलवारपणे चर्चा करा.

२) स्वातंत्र्योत्तत काळात भारत हा USSR च्या जवळ जाण्यामागील परिस्थिती व कारणे कोणती होती ?

३) भारत व रशियामधील द्विपक्षीय संबंधातील सलगता व बदल यावर चर्चा करा.

## ७.९ संदर्भसूची


- Chenoy, Kamal Mitra and Anuradhachenoy, India’s Foreign Policy Shifts and the calculus of power. Economic and political weekly, 42 (35) September, 1-7-2007.
- Das, P.L. “Hurdles and Hopes in Indo Russian Relations”, World Focus 347-348 Nov. - Dec. 2008.
- Ministry of External Affairs, Government of India Annual Report, 2011-12, New Delhi.
- Mittal Many cultures and societies in Transition : India, Russia and other CIS countries, 2008, Shipra publication New Delhi.

- Mohanty A. Indo-Russian Relation; from Yelstin to Putin (1991-2001), 2001, Moscow :
- Stobdan, P. (ed.) India-Russia Strategic Partnership : Common Perspectives, 2010, IDSA, New Delhi.
- Sco, “Declaration on fifth Anniversary of Shanghai Cooperation Organisation” Shanghai June 15, 2006 at

  http:/www.sectsco.org/html./01470.html


❖❖❖❖

# ८

# युरोपियन महासंघ (इ.यू) - भारत संबंध

**विभाग रचना**

८.० उद्देश
८.१ परिचय
८.२ इतिहास अवलोकन : विकास भागिदारीचा काळ
८.३ वर्तमान काळाचे विश्लेषण : विकासाकडून व्यापारी भागीदारीकडे
८.४ इ.यू. - भारत डावपेचात्मक भागिदारी
८.५ समस्याग्रस्त क्षेत्र, आव्हाने आणि भवितव्य
८.६ निष्कर्ष
८.७ सारांश
८.८ विभागवार प्रश्न
८.९ संदर्भसूची

## ८.० उद्देश :

या प्रकरणाचा मुख्य उद्देश म्हणूजे इ यू (यूरोपियन यूनिअन- युरोपिअन महासंघ) भारत संबंधाची वैशिष्ट्चे पाहणे, इतिहासाचा मागोवा घेणे आणि समकालीन मुद्यांचे विश्लेषण करणे. हे प्रकरण वाचकांना इ.यू.-भारत द्विपक्षीय संबंधाच्या विविध पैलूंचे आकलन करण्यास मदत करेल समस्यायुक्त क्षेत्राचा सुद्धा या संबंधाच्या योग्य व वस्तूनिष्ठ विश्लेषणासाठी या प्रकरणात अभ्यास करण्यात आलेला आहे.

## ८.१ परिचय :

इयू - भारत संबंधाला एक दिर्घ इतिहास एक स्थिर वर्तमान आणि महत्त्वकांक्षी भविष्य आहे. कधी काळी हे संबंध विकास भागिदारीच्या मर्यादेत होते ते आता डावपेचात्मक भागीदारीच्या रूपात आले आहे. या डावपेचात्मक भागिदारीचे महत्त्व या वस्तूस्थितीतदडले आहे की भारत आणि इयू हे दोघेही एक लोकशाही, बहुसंस्कृतिक आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेचा सामाईक दृष्टीकोन ठेवतात. एका वेळेस जेव्हा आशियामध्ये नविन आर्थिक व सुरक्षास्वरूप आकार घेत होते त्यावेळेस इयू ची या खंडातील गुंतवणूक भारताच्या भागिदारीशिवाय अपूर्ण आहे. त्याचप्रमाणे भारताला त्याच्या स्वतःच्या फायद्यासाठी उदारमतवादी, लोकशाही आणि जागतिकीकरणाकडे झुकत चाललेल्या युरोपशी गुंतवणूक करणे गरजेचे आहे. दृष्टीकोनातील सामाईकता, समकालीन आंतरराष्ट्रीय रूपरेषा आणि भावी लाभाला

अनुसरून भारत–इयू संबंध हे दोन्हींसाठी महत्त्वाचे आहेत. ही गोष्ट दोन्ही बाजूकडून सुद्धा स्विकारलेली आहे आणि संमत झालेली आहे आणि युरोपियन समितीचे अध्यक्ष हर्मन, वान, रोम्फाय यांनी त्यांच्या २०१२ मधील नवी दिल्लीच्या भेटीत स्पष्ट नमूद केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, "इयु - भारत संबंध पुढे नेण्यासाठी आपण आपला सामाईक निश्चय आहे. आपण पुरेशी प्रगती केली आहे आणि भविष्याची स्थिती निश्चित केली आहे. आपले सामाईक ध्येय म्हणजे आपल्या वाढत्या सहकार्याला परस्पर संधीत रूपांतर करणे आणि आपल्या डावपेचात्मक भागीदारीला जागतिक रचनेसाठीच्या उपयुक्त गुरूकिल्ली घटकात रूपांतरीत करणे (सेम्फाय २०१२)

भारत - इयू संबंधात झालेल्या प्रगतीला विचारात घेऊन सर्वसामान्य जाण अशी आहे की खूप सारा प्रवास झालेला आहे आणि सर्व गोष्टी योग्य मार्गावर आहेत. या मताशी सहमती दर्शवणाऱ्यांच्या बाबतीत चूकीचे काही नाही परंतू अजून सुद्धा सर्व काही आलबेल नाही या प्रकरणात आपण भारत यूएस संबंधांचे त्यांच्या मजबूतीला विचारात घेऊन विश्लेषण करण्याचा प्रयत्न करू. तसेच सध्याची पोकळी जी भारत- इयू संबंधाच्या क्षमतेला धोक्याच्या अडथळ्यांनी रोखतात, तिला समजून घेण्यासाठी टिकात्मक पद्धतीने विश्लेषण करण्याचा प्रयत्न करू. या हेतूस्तव हे प्रकरण ३ भागात विभागले गेले आहे. यामध्ये भारत -इयू संबंधाचा इतिहास समकालीन प्रगतीची चर्चा आणि त्या संबंधासाठी वर्तमान व भावी संबंधाचा अभ्यास यांचा समावेश आहे.

## ८.२ इतिहास अवलोकन :

विकास भागीदारीचा काळ : इयू-भारत संबंध १९६२ पासून अस्तित्वात आहे जेव्हा भारताने युरोपिअन आर्थिक समाज (E.E.C) याशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. भारत हा इ.इ.सी. शी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणाऱ्यांमधील पहिला देश होता. असे अव्वल संबंध असून सुद्धा भारत इयू संबंध शीतयुद्ध काळात मयार्दित राहिले त्यामागचे एक निश्चित कारण म्हणजे नवी दिल्ली द्वारे जोपासल्या जाणाऱ्या जागतिक दृष्टीकोनाविषयीच्या विचारसरणीतील तफावत शीतयुद्ध काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाच्या अलिप्ततावादी कलाने भांडवलशाही पाश्चात्यराष्ट्र आणि गटांशी मजबूत दृढ मैत्री विकसीत करण्यास कधीही परवानगी दिली नाही हीच गोष्ट भारत-इयू संबंधासाठी सुद्धा तेवढीच लागू होते ज्यामुळे हे संबंध दिघेकाळापर्यंत सौम्य राहिले.

भारताला दोष देण्यासोबतच इयूची दोषपूर्णता सुद्धा अधोरेखीत करणे गरजेचे आहे कारण इयू सुद्धा त्याच्या परराष्ट्र धोरणासाठी दक्षिण आशियाला एक प्राधान्यप्रदेश म्हणून दुर्लक्षिण्यास तेवढाच जबाबदार आहे. इयू ज्याला सध्या आजपर्यंतच्या काळातील भूभाग एकत्रीकरणातील सर्वात यशस्वी अभ्यास म्हणून समजले जाते आणि जो जगभरातील इतर प्रकल्पांसाठी एक आदर्श नमुना आहे. त्याच्याजवळ दक्षिण आशियासाठी एक सर्व समावेशक धोरण नव्हते आणि हे सुद्धा भारत इयू संबंध शीतयुद्ध समाप्तीपर्यंत माफक राहण्याचे एक कारण होते. आंरराष्ट्रीय संबंधाच्या वास्तविक रूपावलीपासून सुरूवात करता, दक्षिण आशियाला दिघे कालापासून युरोपिअन समाजाद्वारे हिताचा प्रदेश म्हणून बघितले गेले नाही. दक्षिण आशिया हा

भौगोलिक दृष्ट्या पोहोचण्यास कठिण होता आणि त्यावर सोव्हिएत आणि चीनी प्रभाव असल्याने तो इयूसाठी गुंतवणूक करण्यास नकोसा होता.

भारत-इयू संबंधातील उबदारपणाच्या अभावासाठी काही विद्वानांनी एक कारण दिलेले आहे. या विचाराचा दृष्टीकोन असा आहे की, मास्ट्रीच्ट कराराच्या औपचारिक अधिकृततेपर्वी इयूजवळ परराष्ट्रधोरण कोणताही दृष्टीकोन नव्हता. तेथे जगातील वेगवेगळेआणि भाग यांच्याशी घनिष्ठ परकिय संबंध स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे व पाया नव्हता. त्यांचा एक धोरण रूपरेषा होती ज्याद्वारे इयू जागतिक राजकारणात एक सर्वसामान्य भूमिका वठवत होता. शीतयुद्धाच्या अंतानंतर काही विशिष्ट बदलांना तो साक्षी राहिला आणि इयू ने आंतरराष्ट्रीय संबंधातील जागतिक प्रमाणाच्या काही मध्यस्थीसाठी लक्ष घालणे सुरू केले. इयूच्या परराष्ट्रधोरणाची पुनर्रचना करणे १९९२ मध्ये सुरू झाले जेव्हा मॉस्ट्रीच्ट कराराने इयूसाठी एक स्तंभ म्हणून सामाईक परराष्ट्र आणि सुरक्षाधोरण (CFSP) आणले (त्रिपाठी २०११) परराष्ट्र संबंधाच्या भाषेत CFSP चा विकास हा इयूसाठी अतिशय किंमती ठरलेला आहे. कारण त्याने तिसऱ्या जगातील देशांना राजनैतिक, आर्थिक विकास आणि सुरक्षा धोरणे या चार मुख्य क्षेत्रांद्वारे जोडण्याचा त्याच्या प्रयत्नाच्या संदर्भातील अंमलबजावणी चौकट आणि एकूणच धोरण उगम सुखर करण्याकरता मदत केली CFSP ची ही इयू स्तरावरील प्रक्रिया ही काही अशी इयूचे वास्तविक आणि वाढते आर्थिक सामर्थ्य आणि तिसऱ्या देशांच्या संदर्भात त्याचे राजकिय आणि सुरक्षा जोर यामधील तूट भरून काढण्याची गरज म्हणून होता. (क्विंगली २००७)

१९९० सुरू होण्याच्यापूर्वी भारत आणि युरोपिअन संघातील सुस्थावलेल्या संबंधांचे स्पष्टीकरण देण्यासाठी दिली गेलेली ही काही प्रमुख संभाव्य कारणे आहेत. जरी भारत इयू संबंधातील हार्दीक सलोखा आणि सख्यात्मक विस्तार हरवलेला होता तरी शीतयुद्ध काळात भारतातील बऱ्याच विकास योजना व कार्यक्रम हे इयू पुरस्कृत होते. या संदर्भात इयू हा शीतयुद्धकाळात भारताचा विकास भागिदार होता असे मानायला हरकत नाही.

भारतातील इयू सहकार्य कार्यक्रमांच्या बऱ्याच यशस्वी कथा आहेत. दुधाचा महापूर योजना ही लक्षणीय आहे जिने भारताला जगातील अग्रगण्यदेश उत्पादक बनवण्यात मदत केली, दुधाचा महापूर योजना ही १९७० ते १९९६ पर्यंतची जगाची सर्वात मोठी अन्न व विकास कार्यक्रम होता आणि जागतिक बँक भारत सरकार आणि इसी हे त्याचे आर्थिक पुरवठादार होते. शिक्षण आणि आरोग्य विभाग सुद्धा इ सी कडून मदत मिळवतो जी साधारणतः ६०० दशलक्ष युरो इतकी आहे. आकडेवरीनुसार १९७६ पासून EC ने भारतातील विकास साहाय्यतेसाठी भारताला २ अब्ज युरो दिले आहे. प्रामुख्याने इ सी ने भारत सरकारच्या समाजातील अतिशय गरीब आणि वंचित लोकांच्या जीवनाचा राहणीमानाचा दर्जा सुधारण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा दिला. भारत हा असा देश आहे जेथे बहुतांश लोक हे खेड्यात राहतात आणि कुठल्याही विकास प्रकल्पाने हे वैशिष्ट्य विचारात घ्यायलाच हवे. भारतातील ग्रामिण विकासाला इसीद्वारे प्राधान्य दिले गेले आणि इसीद्वारे १९८५ मध्ये परतफेड न करण्याच्या बोलीव ६० दशलक्ष इसीयू चा पुरवठा केला गेला.

१९७३ मध्ये भारत आणि इसीने व्यापारी आणि आर्थिक सहकार्य करारावर सह्या केल्या भारतीय उत्पादनाला अग्रक्रम दिला गेला आणि इयूच्या भारतासोबतच्या व्यापाराला चालना देण्यासाठी पाऊले उचलली गेली. या व्यापारबढतीचा एक भाग म्हणून ब्रुसेल्स मध्ये इसी

च्या आर्थिक मदतीने भारतीय व्यापारकेंद्र (ITC) सुरू केले. भारताच्या प्राथमिक निर्यात वस्तूंना इसी कडून सवलत दिली गेली यामध्ये कापड, ताग व साखरेचा समावेश होता. भारतीय कापडासाठी इसी जवळ गॅट मल्टीफायबर अरेंजमेंट (GMA) होती आणि हे फक्त भारतीय उत्पादनाच्या उत्तेजनासाठी होते. भारताला आयात करमुक्त साठ्यापासून सुद्धा लाभ झाला ज्याला इसी दरवर्षी हस्तकला व हातमाग उत्पादनासाठी संमती देतो. या पलिकडे जाऊन इसी ने भारताकडील ताग उत्पादनाच्या आयातीवरील जकात व साठा नियंत्रण उठविले ज्यामुळे ताग उद्योगाला मोठ्या प्रमाणावर मदत झाली इसी ने १९७५ मध्ये भारतासोबत साखर करार केला या कराराअंतर्गत इसी ने १.३ दशलक्ष टन साखर दरवर्षी आयात करण्याचे ठरविले आणि ते सुद्धा अशा किंमतीला जी सामान्यतः जागतिक बाजारपेठेतील किंमतीपेक्षा अधिक आहे.

थोडक्यात भारत इयू संबंधाचा इतिहास हा विकास भागीदारीने अधिक भरलेला आहे जेथे बहुतकरून भारताला लाभ झालेला आहे आणि भारताने युरोपिअन महासंघाच्या आर्थिक मदत, इतर मदत आणि पाठिब्याने त्याच्या समकालीन मुलभूत रचनांचा विकास केला आहे.

**तुमची प्रगती तपासा.**

१) शीतयुद्धकाळातील इयू भारत संबंधातील सुस्थपणासाठीची मुख्य कारणे कोणती ?

२) भारताच्या विकास कृतींसाठी इयू ने कोणता पाठिंबा बहाल केला ?

## ८.३ वर्तमान काळाचे विश्लेषण : विकासाकडून व्यापारी भागीदारी कडे

बर्लिन भिंतीच्या पतनानंतर जगात बदल घडून आले आणि या बदलांना सोव्हिएत युनिअन च्या अस्थामुळे गती मिळाली भारत ज्याने समाजवादी आर्थिक नमुना अनुसरला त्याने सार्वजनिक क्षेत्रांना प्राधान्य दिले आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात स्वदेशी मालाच्या संरक्षणाची निवड केलेली होती त्याने त्याचे आर्थिक धोरण पूर्णपणे तपासले आणि खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण स्विकारून जगाशी एकरूपता साधली. आर्थिक पद्धतीतील या बदलाने त्याचे परराष्ट्र धोरण सुद्धा प्रभावित केले आणि पाश्चात्यांप्रति अधिक मुक्त धोरण अवलंबले आणि जगभरात नविन भागिदारीच्या स्थापनेसाठी प्रयत्न सुरू केले. अजुनसुद्धा भारत खुप साऱ्या आव्हानांना तोंड देत असला तरी या अती कमीपासून उच्च वृद्धीदराच्या लक्षणीय बदल हा फक्त भारतासाठीच महत्त्वाचा नाही तर विकसनशील जग, नागरिक संस्था आणि मोठे सत्ता संबंध यांच्यासाठी सुद्धा महत्त्वाचा आहे (मलोने २०११) भारताची ही आर्थिक वृद्धीची गोष्ट वादात्मक आहे. आणि त्याला यशस्वी असे जाहिर करण्यात विद्वानांच्या एक गटाकडून जबरदस्त हरकती आहेत. तरीही डावपेचात्मक आणि परराष्ट्रधोरण दृष्टीकोनाने फुगलेल्या भारतीय आर्थिक वाढीने देशांच्या समितीत नवी दिल्लीला चांगले स्थान दिले हीच गोष्ट भारत इयू

संबंधासाठी ही लागू होते जे मागील दोन दशकात कित्येक मैलांच्या दगडांचे साक्षी राहिलेले आहे. भारताशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केल्यानंतरच्या दशकात इयू ला भारतासाठी सामान्यतः विकास भागीदार म्हणून पाहिले जात होते आणि इयू ने खरोखर काही चांगल्या प्रकल्पांना चालना देण्यासाठी मदत केली. इयूच्या विकासकाच्या भूमिकेविषयी काही मुलभूत हरकती किंवा अपप्रचार नाही आणि बुसेल्सला भारतात सदिच्छाच मिळतात ही प्राथमिक विकास भागीदारी काळानुरूप आणि भारतीय अर्थव्यवस्था खुली होण्याने बदलली आणि तिने चित्र पालटले.

मागील एक दशकात इयू भारतासोबत व्यापारसंबंधामध्ये मुसंडी मारली गेली आणि ते दोघही सध्या मुक्त व्यापार करार (FTA) चालवण्यासाठीच्या एक दिर्घकालीन व्यापार बोलणीत गुंतलेले आहे. तक्त्याद्वारे (२००९-२०१०) भारत आणि इयू मधील व्यापारातील सर्वकष वाढीचा अंदाज सहज येऊ शकतो.

तक्ता :१ २००९-१० मधील ED - भारत व्यापार भागिदारी (अब्ज युरोमध्ये)

| | |
|---|---|
| वस्तूंमधील व्यापार (२०१०) | |
| भारतात इयू वस्तूंची निर्यात | ३४.७ |
| भारतात इयूसाठी वस्तूची आयात | ३३.२ |
| वस्तूमधील व्यापार (२००९) | |
| भारतात इयू वस्तूची निर्यात | २७.५ |
| भारतात इयूसाठी वस्तूची आयात | २५.४ |
| सेवांमधील व्यापार (२०१०) | |
| भारतात इयू सेवांची निर्यात | ९.८ |
| भारतातून इयूसाठी सेवांची आयात | ८.१ |
| सेवांमधील व्यापार (२००९) | |
| भारताला इयू सेवांची निर्यात | ८.६ |
| भारतातून इयूसाठी सेवांची आयात | ७.४ |
| परकिय प्रत्यक्ष गुंतवणूक (२०१०) | |
| भारतात इयूतर्फे गुंतवणूक | ३ |
| इयूमध्ये भारताची गुंतवणुक | ०.६ |
| परकिय प्रत्यक्ष गुंतवणुक (२००९) | |
| भारतात इयूतर्फे गुंतवणूक | ३.२ |
| इयूमध्ये भारताची गुंतवणूक | ०.४ |

स्त्रोत : - European Commission Trade (online: web) Accessed on 2 June 2012 URL:http://ec,cyropa,eu/trade/creating-opportunoities/bilateral relations/countries/India/index_en,htm

इयू-भारत व्यापार जबरदस्त वाढला आहे आणि २००३ मधील २८.६ अब्ज युरोपासून २०१० मध्ये दुपट्टीपेक्षा जास्त होऊन ६७.६ अब्ज युरोपेक्षा जास्त झालेला आहे. इयूची भारतातील गुंतवणूक ही तिप्पटीपेक्षा अधिक झालेली असून ती २००३ मधील ७६९ दशलक्ष युरोपासून २०१० मधील ३ अब्ज युरोपर्यत पोहचली आहे आणि व्यावसायिक सेवांमधील व्यापार हा सुद्धा २००३ पासून तिप्पट झालेला आहे जो २००२ मधील ५.२ अब्ज युरोपासून २०१०

मधील १७.९ अब्ज युरोपर्यंत वाढला (युरोपिअन कमिशन २०१२) व्यापारातील या एकूणच वाढीसह सध्या इयू हा भाताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे आणि त्याचप्रमाणे भारत सुद्धा इयूचा ८ वा मोठा भागिदार आहे. उपलब्ध अभ्यासानुसार भारत आणि इयू यांनी FTA ला अंतिम रूप दिल्यावर ही आकडेवारी वाढू शकते. व्हॅन डेक्युस आणि क्रिस्टीना मायटॅरिटोना यांनी केलेल्या FTA च्या भावी प्रभावावरील उपलब्ध अभ्यासानुसार तेथे दोन प्रकारच्या रूपरेषा संभवतात (डेक्युस आणि मायटॅरिटोना २००७) या दोन रूपरेषा पुढीलप्रमाणे

रूपरेषा १ : दोन्ही बाजूकडील सेवांमधील जकातीच्या एक समान १० टक्के कपातीची भर घाते सेवांचे उदारीकरण हे २ टप्प्यात अमलात आणले जाते. कपातीचा पहिला अर्धा हा २००६ मध्ये लागू होईल आणि दुसरा २०१० मध्ये

रूपरेषा २ - दोन्ही बाजूकडील सेवांमधील जकातीच्या २५ टक्के कपात ही त्याच वेळेनुसार सुचवते.

अभ्यासाच्या अंदाजानुसार २०२० पर्यंत भारताची इयूला निर्यात ही रूपरेषा१ अंतर्गत १३ टक्क्यांने आणि रूपरेषा २ अंतर्गत १४ टक्क्यांनी वाढेल त्याचप्रमाणे इयूचा भारता सोबतचा व्यापार हा सुद्धा रूपरेषा १ नुसार १७ टक्क्यांनी रूपरेषा २ नुसार १८ टक्क्यांनी वाढेल थोडक्यात म्हणजे भारत आणि इयू या दोघांना FTA पासून फायदा होईल FTA च्या भारत-इयू व्यापार संबंधावरील प्रभावाविषयी चर्चा करताना ही गोष्ट लक्षात घेणे जरूरीचे आहे की युरोप आणि भारत या दोघांच्या नागरी समाजाचा काही तीव्र विरोध आहे FTA मधील काही अटींना नागरी समाजाकडून तीव्र हरकती आहेत. आणि नवी दिल्ली आणि ब्रुसेल्स यांना विरोधाच्या या मुद्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे इतके सोपे नाही हे लक्षात घेण महत्त्वाचे आहे की यापैकी काही हरकती या खूपच वास्तविक आहेत आणि FTA ला अंतिम संमती देण्यापूर्वी त्याचा गांभिर्याने विचार करायला हवा.

**आपली प्रगती तपासा :**

१) शीतयुद्धानंतरच्या नविन आर्थिक धोरणाने भारतीय परराष्ट्रधोरणाला प्रभावित केले.

२) इयू-भारत व्यापार संबंधात संख्यात्मक वाढ झालेली आहे. FTA च्या अंतिम रूपानंतर ती अधिक वाटेल.

## ८.४ इयू भारत डावपेचात्मक भागीदारी

भारत इयू संबंध मजबूती करणासाठी दोन्ही बाजूकडून बरेच पुढाकार घेतले गेले. त्या सर्वामध्ये भारत -इयू शिखर परिषद जी २००० मध्ये सुरू झाली तिने खूपच महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पहिली भारत इयू शिखर परिषद ही लिस्बेन मध्ये भरली आणि युरोपिअन कमिशनच्या मूल्यमापनानुसार, युरोपियन परिषदेने ९० च्या मध्यात सल्लागार मंडळ व संसद यांच्याशी विचारविनिमय करण्यासाठी पुढाकार घेतल्यापासून आजपर्यंत पहिली इयू-भारत शिखर परिषद ही इयू भारत संबंध वाढवण्यामधील एकच महत्त्वाचा मैलाचा दगड दर्शवते ती भारतातील भागीदारी पुरेशा प्रमाणात वाढवण्यासाठीचा आराखडा आहे. चार नियमीत शिखर परिषदानंतर दोन्ही बाजूंकडून डावपेचात्मक भागिदारी शिरण्यावर सहमती झाली आणि शेवटी २००४ मध्ये भारत इयू हे डावपेचात्मक भागिदार बनले. घनिष्ठ डावपेचात्मक भागिदारी झाल्यानंतर भारत इयू ने डावपेचात्मक भागिदारीला दिशा देण्यासाठी औपचारिक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली. ही मार्गदर्शक तत्त्वे इयू भारत संयुक्तकृती योजना (JAP) मध्ये समाविष्ट आहे. ज्याची सुरूवात इयू भारत शिखरपरिषदेनंतर २००५ मध्ये झाली. JAP नुसार २००५ मध्ये इयू आणि भारत हे खाली प्राधान्य क्षेत्रावर सहमत झाले.

१) बोलणी व सल्लायंत्रणा मजबूत करणे
२) राजकीय बोलणी आणि सहकार्य सखोल करणे
३) लोक आणि संस्कृती एकत्र आणणे
४) धोरण बोलणी आणि सहकार्य वाढवणे.
५) व्यापार आणि गुंतवणूक विकसीत करणे.

बदलत्या काळानुसार इयू भारत भागीदारी ही नविन कालखंडात शिरली आहे आणि काळाच्या मागणीशी सुसंगत होण्यासाठी JAP ची पुनर्रचना केली गेली. २००८ मध्ये खालील नविन महत्त्वाची क्षेत्रे त्यात समाविष्ट केली गेली.

१) शांतता व सर्वसमावेशक सुरक्षा वाढवणे
२) शाश्वत विकास वाढवणे.
३) संशोधन आणि तंत्रज्ञानाला वाढविणे
४) लोकालोकातील आणि संस्कृतीतील देवाणघेवाण वाढविणे

दोन्ही JAP मध्ये एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की लोकालोकातील आणि संस्कृतीक देवाणघेवाणीला खूप महत्त्व देण्यात आले आहे. भारत आणि इयूमधील लोकालोकातील संबंध हे अजून सुद्धा अमेरिका आणि कॅनडा मधील लोकांशी विकसीत झाले आहे. तसे विकसीत झालेले नाही. इयूविषयी भारतात एक सामान्य जाणीवेचा अभाव आहे. तसेच युरोपियन लोक सामान्यतः ब्रिटन फ्रान्स व जर्मनीशी संबंधीत असतात .त्यांच्या विषयी सुद्धा हा अभाव आहे व ते सुद्धा ऐतिहासिक व सांस्कृतिक कारणामुळे हे इयूभारत संबंधासाठी चांगले चिन्ह नाही. कारण लोकालोंतील संबंध हे परराष्ट्र धोरणाचे सर्वात महत्त्वाचे अंग आहे. परराष्ट्र धोरण बनविण्यात लोकांची जाण ही खूपच महत्त्वाची ठरते.

## ८.५ समस्या ग्रस्त क्षेत्र, आव्हाने आणि भवितव्य

वरील चित्र खूपच आशादायी आहे परंतु इयू भारत संबंधाशी संबंधीत काही चिंताजनक मुद्दे आहेत ज्यांचय्यावर या मुद्यांच्या सर्वकष आकलनासाठी प्रकाश टाकणे जरूरी आहे. हे समजून घेणे मजेशीर आहे की युरोप आणि भारत या दोन्ही ठिकाणी बरेच विद्वान असे आहेत की ज्यांनी इयू-भारत संबंधाला अजून पर्यंत समर्पकता दिलेली नाही युरोपिअन तज्ञ ख्रिस्तीअन वॅगनर यांच्या नुसार, "भारतीय नविन मध्यमवर्ग आणि भारताच्या परराष्ट्र धोरणातील श्रेष्ठ लोकांचा वर्ग हा युरोपपेक्षा यूएस व आशियावर जास्त केंद्रीत असतो" (वॅगनर २००८) त्याचप्रमाणे भारतीय डावपेचतज्ञ सी राजामोहन यांनी एका लेखात जागतिक राजकारणातील इयू च्या भूमिकेवर बरेच प्रश्न उभे केले (मोहन २००६) हे तज्ञ इयू भारत संबंधावर टिका करताना चूकीचे नाहीत आणि बारकाईने पाहिल्यावर बऱ्याच उणिवेच्या जागा ओळखता येऊ शकत नाही.

पहिली गोष्ट म्हणजे कुठल्याही आंतरराष्ट्रीय गुंता सोडवण्यास भारत आणि इयू ने एकत्रीतपणे प्रमुख भूमिका साकारलेली आहे असे एकही उदाहरण शोधूनही सापडणार नाही. कागदोपत्री नवि दिल्ली आणि ब्रुसेल्स या दोघांचा जागतिक राजकारणाविषयी काही समान मुद्दे आहे परंतु सामाईक कृती सुरू करणे अजून बाकी आहे. भारत आणि इयू हे पश्चिम आशियामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. परंतु इयू हे त्याच्या सुरक्षा मुद्यांसाठी वूएस वर अतिअवलंबून असल्याने त्याने यूएसद्वारा प्रणित नसलेल्या कुठल्याही आंतरराष्ट्रीय भागीदारीकडे बघायचा प्रयत्न केला नाही. काही स्कॉलर या बाबतीत असे म्हणतात की, संघ हा कॉन्ट याच्या तत्त्वज्ञान विषयीचे कान्टीयन जागाला चालना देण्यास इच्छुक आहे. कारण त्याच्या परराष्ट्रधोरण साहित्याच्या कमकुवतपणा आणि सुसंगत नसलेले धोरण उपकरणे यामुळे ते तोंड देत असलेल्या वास्तविक धोके व आव्हानांना निर्णायकपणे सामोरे जाऊ शकत नाही हे खराब काम त्यांनी त्यांचा मित्र यूएस साठी सोडले आहे. ज्याच्याजवळ लष्करी तडाखा आहे आणि जागतिक घडामोडीतील कृतींसाठी डावपेचात्मक उपाय आहे ज्यामुळे यूएस आणि नाटोच्या प्राप्तीवर इयूला मुक्त सवारी मिळते (टोकी २००८) तसेच भारत सुद्धा पश्चिम आशियात कुठलाही स्वतंत्र पुढाकार घेण्यास अपयशी ठरला आहे. आणि त्याने यूएस रचित कृती योजनाच अनुसरल्या अपवाद फक्त काही बाबतीत जसे लिबियावरील नाटोच्या (नार्थ अटलांटिक ट्रिटी अर्मनायझेशन) हल्ल्याला विरोध केला ही परराष्ट्र धोरणावरील तीव्र अभावाची काही उदाहरणे आहे आणि भारत आणि इयू या दोघांना जागतिक स्थरावर खरेखुरे राजकीय भागीदार म्हणून वर येण्यासाठी अशा कमतरता सुधारणे आवश्यक आहे.

अफगाणिस्थान हा एक दुसरा देश आहे जेथे भारत आणि युरोप हे एकत्रीतपणे वेगळेपण दाखवू शकतात. आणि सध्याच्या यूएसबरोबरच्या गुंतवणूकीशी तुलना करता बऱ्याच बाबतीत अधिक चांगल्या प्रकारे सिद्ध करू शकतात भारत अलिकडेच अफगाणिस्तान सह राजकीय भागीदारीत उतरला आणि वस्तूस्थिती म्हणजे नवि दिल्लीने या युद्धाने होरपळलेल्या देशात काही सदिच्छा मिळविण्या भारताचे अफगाणिस्थानशी ऐतिहासिक व पारंपारिक संबंध आहेत आणि काबूलला एक पसंतीचा भागीदार बनवले. ९/११ नंतर जागाचे लक्ष अफगाणिस्थानकडे सरकले कारण त्यावेळेस त्याच्यावर तालिबानची सत्ता होती. जे त्या काळातील जगाचे सर्वात विध्वंसक घटक होते ज्यांनी ९/११ चा मुख्य सुत्रधार ओसामा बीन लादेनला सुरक्षित आश्रय देण्यास काकू केले नाही. अमेरिकन प्रणित सैन्याने तालिबानी सत्तेच्या जागी कर्झई सरकार

आणल्यानंतर आंतरराष्ट्रीय संस्था व वेगवेगळ्या देशांनी अफगाणिस्थानात शांतता व प्रगती आणण्याच्या हेतूने अफगाणिस्थानाच्या पुनर्रचनेसाठी संपूर्ण सहकार्य देऊ केले. भारत आणि युई या दोघांनी अफगाण सरकारच्या विकास साहाय्यतेच्या कळकळीच्या आव्हानाला प्रतिसाद दिला आणि आता इयू हा अफगाणिस्थाच्या विकास निधीच्या सर्वात मोठ्या दात्यापैकी एक आहे. तसेच भारत हा अफगाणिस्थानच्या सहाव्या क्रमांकावरील द्विपक्षीय दात आहे. (सर्वात मोठ क्षेत्रीय दाता भारत आणि इयू ज्याने दहशतवादाचा त्रास सारखाच सहन केला आहे त्यांचे अफगाणिस्थानाला शांततामय, लोकशाही आणि स्थिर देश बनवणे यात सखोल परस्पर हित आहे. भारत आणि इयू हे अफगाणिस्थानातील काही एकत्रीत विकास प्रकल्पांवर काम करू शकतात आणि त्याद्वारे फलदायी निष्कर्ष आणू शकतात.

हवामान बदल हा अजून एक मुद्दा आहे ज्यामध्ये भारत इयू मानवाच्या अधिाक चांगल्या भवितव्यासाठी एकत्रीतपणे काम करू शकतात. दुदैवाने हवामान बदलाच्या मुद्यावर एकत्रितपणे काम करण्यासाठी एकत्रित पायावर पोहचण्यासाठी दोन्ही बाजूंकडून राष्ट्रीय हिताच्या संकुचित वृत्ती जोडल्याजाणे बाकी आहे. या मुद्यांवर असे अपेक्षित आहे की इयू हे नेतृत्व करेल आणि विकसनशील देशांच्या दृष्टीकोनाला सामावून घेण्यासाठी थोडा उदारपणा दाखवेल. दुदैवाने विकसीत व विकसनशील देशातील वादविवादात्मक कठिण परिस्थिती हा सर्वात मोठा अडथळा आहे आणि असे भासते की हवामान बदलाने व्यापारी झगड्याचे रूप घेतले आहे. भारत आणि इयू जर हवामान बदल कार्यक्रमावर एकत्रितपणे कार्य करू शकतील तर काही स्विकाराहर्य उपायांवर पोहचू शकतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) JAP, २००५ व २००८ चे मुख्य मुद्दे कोणते ?

२) इयू आणि भारत एकत्रितपणे काम करू शकतील असे सामाईक मुद्दे कोणते ?

## ८.६ निष्कर्ष

भारत इयू संबंधाने खूप लांबचा प्रवास केला आहे परंतु कुठलाही मैलाचा दगड पार केलेला नाही सामाधानाची बाब एवढीच आहे की स्थीर गतीने प्रगती चालू आहे. भारत आणि इयूद्वारे व्यापले जाऊ शकणारे क्षमतावान क्षेत्रे, अभ्यासपूर्ण कार्यक्रम आणि सामाईक पाया आहे. तेथे मजबूत राजकीय भागीदारी विकसीत करण्याकरता दोन्ही बाजूकडील राजकीय इच्छाशक्तीचा अभाव नाही परंतु विकास धीमा आहे. इयू ने भारताला फक्त क्षेत्रीय स्थरावरच नव्हे तर जागतिक स्थरावरसुद्धा महत्त्वाचा भागीदार म्हणून समजणे गरजेचे आहे.

राजकारणी क्षेत्राव्यतिरिक्त एकत्रित कार्यक्रम विकसीत व्हायला हवे आणि त्यामध्ये भारताने सुद्धा जबाबदारी स्विकारावी सामान्यतः असे लक्षात येते की भारतीय परराष्ट्रीय कार्यालयाचा इयूकडील कल कमी आहे. आणि एखाद्या संघटनेपेक्षा एकएकट्या देशांशी व्यवहार करणे पसंत करते. ब्रुसेल्स आणि नवि दिल्लीच्या थोड्या प्रयत्नाने चित्र बदलू शकते. आणि आपण आशा करू या कि लेखाकाचे प्रतिपादन भविष्यात कसोटीसुत्रे.

## ८.७ सारांश

१) कागदोपत्री इयू भारत संबंध हे योग्य मार्गांवर आहे परंतु व्यावहारिक दृष्ट्या तेथे पुढील भागीदारीची विशेषतः आंतरराष्ट्रीय संबंधाच्या समर्पक मुद्यांवर गरज आहे.
२) इयू भारत संबंधाने भूतकाळात प्रगती केलेली आहे आणि त्याचे भविष्य उज्ज्वल आहे.
३) भारत व इयूचा जागतिक दृष्टीकोन समान आहे
४) नागरि समाज सदस्यांकडून FTA वरील उचलले गेलेल्या काही टिकात्मक प्रश्नांना दोन्ही देशांनी गंभीरपणे घ्यायला हवे.

## ८.८ विभागवार प्रश्न

१) शीतयुद्ध समाप्तीपर्यंत भारत इयूसंबंध अतिशय औपचारिक का राहिले ?
२) इयू भारत राजकीय भागीदारीचे मुख्य मुद्दे कोणते ?
३) इयूच्या विकास निधीद्वारे भारताचा फायदा झाला आहे का ?
४) भारतीय परराष्ट्रधोरणातील बदल कशामुळे घडले ?
५) इयूच्या परराष्ट्रधोरणावर कुठल्या कराराने प्रचंड प्रभाव टाकला आणि कसा ?

## ८.९ संदर्भ

Dexreux yvan and M. cristina (2007), Economic imp of the potential Free Trade Agreement (FTA) between European Union and India (online : web) Accesses on 31 May 2012, URL : http://trade.ec.europa.eu/doclib/docs/2007/may/tradoc_134682.pdf

European Commission (2012) , EU-India Trade, (online: web) accessed on 2 June 2012, URL : http://ec.europ.eu/trade/creatingopportunities/bilateral-relations/countries/India/index en.htm

Lawson, Stephanie (2003), international relations, cambridge : polity Press

Malone, Raja, C (2006), “India and Balance of Power” Foreign Affairs, 85(4): 17-32

Quigely, John (2007), EU-Asia Reation and the role of European Union (ESP special representative in peter anderson and goog

wiessalaceds) The European Union and Asia : Reflection and reorientations, amsterdam: Rodopi publishing 2007

Rompuy, van Herman (2012) “Eu-India Summit” Speech Delivered on 10 February 2012 at the India Internaitonal Centre New Delhi (online : web) accessed on 2nd June 2012, URL: http://www.consilium.europa.eu/uedas/cms_data/docs/pressdata/en/ec/127927.pdf

Sachdeva Gulshai (2008) “India and the European union : Broadening, Strategic Partnership Beyond Economic linkages, international studies, 4s (4) : 341-367

Tocci Nathalie (2008), “Profilling Normative Foreign Policy : The European Union and Its Global Partners” in (ed) Nathale Tocci, who is a normativ foreign policy actor? The European Union and its Globla partners, Brussels: Centre for European Policy studies

Tripathi, Dhananjay (2011) Development Role of the European union in south Asia, New Delhi : Vij Publication

Wagner Christian (2008), “EU and India : A Deepning partnership, “Chaillot Paper No Log, Paris : Institute of securty Studies.)

❖❖❖❖

# ९

# भारताचे विकसनशील देशाशी असलेले संबंध : दक्षिण पूर्व आशिया, उपसहारन आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेच्या विशेष संदर्भात

**विभागरचना**

९.० उद्देश
९.१ परिचय
९.२ भारत व विकसनशील जग
९.३ भारत आणि दक्षिणपूर्व आशियातील संबंध
९.४ भारत - आफ्रिका संबंध
९.५ भारत - लॅटीन अमेरिका संबंध
९.६ सारांश
९.७ विभागवार प्रश्न
९.८ संदर्भसूची

## ९.० उद्देश :

या विभागाचा उद्देश म्हणजे भारताची सामान्यतः विकसनशील देशांशी आणि विशेषतः दक्षिणपूर्व आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका यांच्याशी असलेल्या संबंधातील सलगता व बदलांचा मागोवा घेणे. हा विभाग भारताचे विकसनशील देशांशी असलेल्या संबंधांचा विकास, नमुनाबंध चलनशास्त्र यांच्याविषयी माहिती देते.

## ९.१ परिचय :

भारत आणि दक्षिणेकडील विकसनशील देश यांच्या समस्या व आव्हाने हि बरीचसी सारखीच आहेत आणि ते बहुतांश आधुनिक इतिहास त्याच बाजूला राहिले आहे. तथापी भारताचे दक्षिण गोलार्धातील विकसनशील देशांशी असलेले संबंध तितकेसे सुरळीत नाही. भारत त्याच्या परिने दक्षिण पूर्व आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेतील देशांशी सलोखा दाखवण्याचा प्रयत्न करीत आहे.

## ९.२ भारत व विकसनशील जग

भारताचा आकार भौगोलिक स्थान स्त्रोतावर आधारित आणि राजकिय-सांस्कृतिक वारसा यांना विचारात घेता जागतिक आणि क्षेत्रीय स्तरावर निर्णायक भूमिका वठविण्याची भारतीय क्षमता नेहमीच वादातील राहिलेली आहे. परंतु भारताच्या क्षमतेचे वास्तवात रूपांतर करण्यासाठी एका सक्रीय आणि परिणामकारक परराष्ट्र धोरणाची गरज आहे जे सद्य स्थितीत समजून घेतले जावे. ढोबळमानाने परराष्ट्रधोरण म्हणजे राज्याच्या सिमांपलिकडील घटनांवर प्रभाव टाकण्याचा किंवा/आणि व्यवस्थापन करण्याचा राष्ट्र-राज्यांचा प्रयत्न आहे आणि या गोष्टी इतर-देश राष्ट्रबाह्य गोष्टी राज्याबाहेरी व्यक्ती यांच्या वर्तणुकीवर परिणाम करून घडवले जातात. जेणेकरून कुठल्याही गंभीर त्रासाविना त्या देशाच्या कृती चालू ठेवण्यासाठी सुसंगत बाह्य वातावरण बनवणे. ढोबळमानाने एखाद्या राष्ट्र-राज्याचे परकिय धोरणाचा हेतू उपयोगी पडणारी जागतिक व्यवस्था बनवणे होय आरि सध्याच्या जागतिक व्यवस्थेत राष्ट्रीय हिताची खात्री देणे व कमाल मर्यादा गाठणे. जागतिक व्यवस्थेचे दोन सुचित अर्थ आहे. पहिला म्हणजे ती जागतिक व क्षेत्रीय स्तरावरील सत्तांमधील व्यवस्थेशी संबंधीत आहे. दुसरे म्हणजे ती गोंधळ मुक्तपणे स्थिरता व सुस्वभावी वातावरण टिकवण्याशी जुळलेले आहे. ज्यामध्ये सुरक्षा प्रधान करणे, राष्ट्रीय विकास टिकवणे आणि नवी आव्हाने जसे ऊर्जा समस्या, पर्यावरणाचा र्हास, सामाजिक, सांस्कृतिक तंटे, वित्तीय समस्या, आर्थिक अवनती, इत्यादींना सामोरे जाणे याचा समावेश होतो. या दोन्ही संदर्भात भारताचे इतर विकसनशील देशांशी असलेले संबंध हे चर्चेचा एक केंद्रबिंदू बनते.

स्वतंत्र भारताचे विकसनशील देशाप्रती असलेले परराष्ट्र धोरण हे मागील ६ दशकात भरती ओहोटीच्या वैशिष्ट्याने सांगितले जाऊ शकते. सुरुवातीला भारताने अलिप्ततावादी चळवळीच्या (NAM) छताखाली विकसनशील देशांना एकत्र जमवण्याचाआणि त्यांना विकसीत करण्यासाठी नेतृत्व देण्याचा प्रयत्न केला. हि चळवळ ना भारतीय परराष्ट्र धोरण उद्दिष्ट पूर्ण करण्यास यशस्वी झाली ना दिर्घकाळावतीत इतर विकसनशील देशांचे (तिसरे जग) विकासकीय उद्दीष्ट प्राप्त करण्यास यशस्वी झाले. कारण त्यात कोणत्याही सामाजिक, आर्थिक घटकांचा अभाव होता. तथापी शीतयुद्धाच्या समाप्तीच्या काळात तंत्रज्ञान विषयक क्रांती आणि जागतिकीकरणाने चल बदल रूजवले; भारताच्या इतर विकसनशील देशांशी असलल्या संबंधांना सध्याच्या जागतिक व्यवस्थेत अधिक महत्त्व मिळालया लागले. अजून म्हणजे व्यवस्था बदलामुळे जग एकमेकांशी अशा प्रकारे जुळले गेले की कुठलेही देश, राज्याला हे एकाकी राहणे परवडू शकणारे नाही. या संदर्भात दक्षिण-दक्षिण सहकार्य हे सध्याच्या काळात इतर कोणत्याही काळापेक्षा अधिक वास्तववादी बनलेले आहे. भारताच्या दृष्टीकोनाने त्याचे इतर विकसनशील देशांशी असलेले संबंध हे त्याच्या विस्तृत साहित्य गरजांच्या पूर्ततेसाठी सक्षम नाही तर जागतिक हुकूमत बनवण्यास आणि जागतिक व्यवस्था त्यासाठी अधिक सुसंगत करण्याच्या त्याच्या प्रयत्नांना पाठिंबा सुद्धा देते.

मागील दोन दशकात भारताला आर्थिक मजबूती मिळून राहिली आहे आणि तो खरेदी सामर्थ्य समानता. (PBP) च्या भाषेत यूएसए व चीननंतर जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. तो त्याच्या 'कठोर सत्तेच्या' दुसर्या हाताच्या मजबूतीसाठी त्याच्या लष्कराचे जाणिवपूर्वक तत्रज्ञान विषयक आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न करून राहिलेला

आहे. मागील दोन दशकातील भारताच्या बाह्य आर्थिक कलाने इतर विकसनशील देशांशी बहुपक्षीय आणि द्विपक्षीय स्थरावर व्यापार व गुंतवणूक जुळवणूक पुनस्थापित करण्यास साहाय्यभूत ठरले. नवी दिल्ली ही विविध विकसनशील क्षेत्रातील वैयक्तीक देश तसेच बहुदेशिय संस्था यांच्याशी मुक्त आणि सलवतीचा व्यापार कराराच्या बोलणी करत आहे. विविध विकसनशील क्षेत्रात दक्षिणपूर्व आशिया (SEA), आफ्रिका व लॅटीन अमेरिका पण आहे. कठोर सत्ता ही देशाला जागतिक आणि क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास सक्षम बनवते. भाताच्या कठोर सत्ता दर्जा व्यतिरिक्त भारताचे विकसनशी देशांशी असलेल्या संबंधाच्या संदर्भात भारताचा सर्वात मोठा ठेवा म्हणजे त्याची 'सौम्य सत्ता'.

भारताच्या सौम्य सत्तेचे सर्वात मोठे साधन म्हणजे त्याचे डायस्पोरा (diaspora). भारताचे डायस्पोरा (diaspora) हा खरोखरीच एक ठेवा आहे. परंतू तो एकमेव नाही. भारताने त्याच्या सौम्य सत्तेला सर्वसामान्यतः जागतिक स्थरावर विशेषतः विकसनशील देशात उत्तेजन देण्यासाठी अवलंबिलेले एक साधन म्हणजे सार्वजनिक व्यवहार चार्तुय. जागतिकीकरण आणि माहिती क्रांतीच्या काळाने भारताच्या सौम्य सत्तेच्या नविन परिमाणांची आगाऊ सुचना दिली. विकसनशील देशात भारतासाठी संस्कृती ही सौम्य सत्तेचा एक सर्वात मोठा महत्त्वाचा स्त्रोत आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. सौम्य सत्तेच्या भाषेत भारताचा सर्वात मोठा ठेवा म्हणजे खूप सारे आव्हेने झेलून सुद्धा यशस्वीपणे कार्यरत असलेली त्याची लोकशाही होय.

**तुमची प्रगती तपासा :-**

१) शीतयुद्ध काळातील भारतीय परराष्ट्र धोरण उद्दीष्ट्ये कोणती ?

२) शीत युद्धोत्तर काळातील भारताच्या वाढत्या कठोर आणि सौम्य सत्ता क्षमतांचा सुचित अर्थ काय ?

## ९.३ भारत आणि दक्षिण पूर्व आशियातील संबंध :

भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्या भारताला दक्षिण पूर्व आशिया (SEA) पेक्षा इतर कुठलाही प्रदेश इतका घनिष्ठ नसला तरी भारताचे या प्रदेशाशी असलेले संबंध हे कालक्रमाच्या भाषेत समिश्र पोतडीसारखे आहे. या प्रदेशात असियनच्या (दक्षिण पूर्व आशियाई संघटन) दहा सदस्यासह ११ देश समाविष्ट आहे. जे प्रादेशिक सहकार्याचे एक सर्वात सळसळते व यशस्वी उदाहरण आहे. ऐतिहासिक दृष्ट्या भारताचे सी (sea) देशांशी असलेले संबंध हे बहुआयामी आणि मैत्रीपूर्ण राहिलेले आहे. कारण हे संबंध परस्पर विश्वास आणि सौम्य सत्ता आवाहनावर आधारित होते आणि ना भारताने ना मौर्य व चौला सारख्या पूर्वीच्या कुठल्या साम्राज्याने त्यांच्या

पूर्वेकडील शेजाऱ्यांप्रती साम्राज्यवादी हेतू दाखविला. तथापि हे संबंध स्वातंत्र्योत्तर काळात उतरंडीला लागले.

ढोबळमानाने भारत सी संबंध तीन ढळक अवस्थामध्ये विभागले जाऊ शकतात. पहिल्या अवस्थे (१९४७-१९६२) भारताने या क्षेत्राला नेतृत्व देऊ केले. एका बाजूला त्याने त्याच्या महत्वाकांक्षी अलिप्ततावादी चळवळीच्या साहाय्याने या प्रदेशातील देशांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला. तर दुसऱ्या बाजूने त्याने इंडोनेशिया-भारत-चीन आणि फिलीपाइन्समधील वसाहतवाद निर्मुलनाला पाठिंबा सुद्धा दिला. इंडोनेशियातील वसाहतवाद निर्मुलनाच्या प्रक्रियेत भारताची भूमिका कारणीभूत होती. त्याने इंडोनेशियाला अत्यावश्यक साधना पुरवून डचांची नाकेबंदी (१९४५-४९) पराभूत केली आणि सुलतान स्याहरीर यांना आश्रयच दिला असे नाही तर इंडोनेशियाच्या वसाहतवाद निर्मुलनाच्या प्रक्रियेस पाठिंबा देण्यासाठी दिल्लीत एक परिषद सुद्धा घेतली. पर्यायाने भारत हा स्वतंत्र इंडोनेशियासोबत करार करणाऱ्या पहिल्या देशांपैकी एक बनला. अजून म्हणजे भारताने जिनीव्हा कराराने स्थापन केलेल्या भारत-चीन वसाहतवाद निर्मुलनाच्या देखरेख आणि नियंत्रणाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे नेतृत्व केले.

पहिल्या अवस्थेत ह्या काही देशांशी भारताचे संबंध असले तरी दुसऱ्या अवस्थेत (१९६२-१९९०) हा प्रदेश भारतीय परराष्ट्र धोरण आकडेवारीत समर्पक ठरला नाही आणि याऊलट पण सत्य आहे ही अवस्था चीनकडून भारताचा पराभव होण्याने सुरू झाली. ज्यामुळे तिसऱ्या जगाचे नेतृत्व करणारी भारताची प्रतिमा छिन्नविछिन्न झाली. अजून म्हणजे त्यानंतरच्या येणाऱ्या वर्षात भारताचे लष्करी आणि तंत्रज्ञानविषयक आधुनिकीकरण कार्यक्रम आणि 'ब्लू वॉटर' नाविक महत्त्वाकांक्षा यांना सी देशांनी नीट जाणले नाही. भारताप्रतीच्या आरंभीच्या अविश्वासा व्यतिरिक्त या संबंधातील घसरणीला कित्येक स्वदेशी, क्षेत्रीय आणि जागतिक घटक सुद्धा कारणीभूत होते. भारताच्या दृष्टीने त्याचा आर्थिक स्वावलंबी धोरण कल संकुचित निर्णय प्रक्रीया यूएसए-चीन-पाकिस्तान डावपेचात्मक त्रिकोण केंद्रीत परराष्ट्र धोरण प्राधान्य आणि नेतृत्वाद्वारे या क्षेत्राकडील दुर्लक्ष ही काही कारणे होती. ज्यामुळे या अवस्थेत भारताला या देशांशी असलेल्या संबंधाताबत खुपच मोठी किंमत चुकवावी लागली. तथापी सी च्या दृष्टीकोनातून आर्थिक प्रगतीवरील लक्ष्य, पाश्चात्य सत्तेशी हातमिळवणी, भारतीय डायस्पोरा विरुद्ध आंतरिक चळवळी ही काही ध्रुव विलगीकणाचे घटक होते. ज्यांनी भारताशी या क्षेत्राच्या हातमिळवणीला पाठिंबा दिला नाही. भारताच्या या क्षेत्राशी हात मिळवणीवर शीत युद्धाची सावली सुद्धा खूपच लांब पडली. कारण या क्षेत्रातील राष्ट्रे, राज्य हे यूएसए द्वारा जरी व्हिएतनाम सारखे देश हे साम्यवादी सत्तेद्वारा प्रभावित झाले होते तरी काही प्रमाणात या क्षेत्रातील काही विशिष्ट देशांचा ईस्लामी पक्षपाती कल हा सुद्धा भारताचे या देशाशी असलेल्या संबंधाना हानिकारक होता. ह्या अवस्थेत भारत एस.इ.ए. क्षेत्रात परिघावरच राहिला. त्याला कारण म्हणजे विश्वासाचा अभाव, गमावलेली संधी आणि परस्पर गैरसमजूत.

तिसरी अवस्था (१९९०) आणि या क्षेत्राशी असलेल्या भारताच्या संबंधाची सध्यावस्था ही संस्थात्मक आणि स्वदेशी स्थरावरील गतीशील बदलाचे अउत्पादन होते. शीतयुद्ध समाप्तीतील आणि जागतिकीकरणाच्या उदयातील बदलत्या जागतिक व क्षेत्रीय वातावरणाने भारत व दक्षिण पूर्व आशियाई देशांसाठी त्यांच्या पारंपारिक प्रभावाच्या क्षेत्राच्या पलिकडे पाहण्यासाठी मार्ग आखून दिला. बदलत्या जागतिक व्यवस्थेत दुसऱ्या अवस्थेतील चल-बल

असलेल्या तात्विक प्रणाली आणि सांस्कृतिक निष्ठा याच्यापेक्षा आर्थिक हिताने आघाडी द्यायला सुरुवात केली. एका बाजूला भारताने सोव्हिएत युनिअनची सदाहरीत मैत्री गमावल्यानंतर आणि भारताला मोठ्या प्रकारे हातमिळवणी करण्यास असलेली यूएसएची नाराजी यामुळे भारत जागतिक आणि क्षेत्रीय स्तरावरील नविन मित्र आणि संघटन शोधत राहिला. त्याच वेळेस सी देशांनी सुद्धा त्यांच्या पाश्चात्य शेजाऱ्यांशी हात मिळवणी करण्यास तयारी दर्शवली. तथापि नंतर येणाऱ्या वर्षात यूएसएचे भारताशी सुधारलेल्या संबंधानेसुद्धा भारताची सी सोबत हात मिळवणी सुखर केली. अलिकडेच या प्रदेशातील चीनच्या अरेरावीने या प्रदेशातील देशांना नविन देशांकडे पाहण्यासाठी उद्युक्त केले. भारत हा चीनप्रमाणे या पैकी कुठल्याही देशांशी द्विपक्षीय सुरक्षा तणावात गुंतलेला नाही. त्याचप्रमाणे भारत सुद्धा सार्कच्या घुसर भवितव्याने निराश झाल्याने त्याने भारतीय उपखंडाच्या पलिकडे पाहणे सुरू केले. सी हा त्याच्या भौगोलिक सान्निध्य आणि सामाजिक, सांस्कृतिक समानता त्यांच्यामुळे भारतासाठी उपखंडीय रचनात्मक मर्यादांची भरपाई करण्यासाठी नैसर्गिक पर्याय बनला या क्षेत्रातील भारताच्या पुनःनविन हिताचा उपभाग म्हणून भारताने १९९० च्या सुरुवातीच्या काळात 'पूर्व-लक्षित धोरण यांची सुरुवात केली. जरी भारताच्या पूर्वलक्षित धोरणात पूर्व आशिया, ओशियानी याचा समावेश असला तरी त्याच्या धोरणाच्या केंद्रस्थानी सी राहिले. हा प्रदेश पॅसिफिक महासगार आणि हिंदी महासगार या दोन अतिषय सळसळत्या व गतिमान सामुद्रिक प्रदेशांना जोडणारा असल्याने भारताच्या आर्थिक आणि राजकीय हितासाठी सी महत्वाचा राहिला आहे. जरी भारत सी संबंध ठरवण्यासाठी अर्थशास्त्र मुख्य मुद्दा असला तरी दळणवळणाच्या महत्त्वाच्या समुद्री मार्गाचे संरक्षण करणे, उत्तरी हिंदी महासागर आणि पश्चिम पॅसिफिक महासागरातून जातात आरि प्रमाणबद्ध आणि कमी तीव्रतेचे झगडे यांच्यासह नविन धोक्यांविरुद्ध राष्ट्रहिताचे संरक्षण करणे हे काही इतर महत्वाचे मुद्दे आहेत. ज्यावर भारत आणि सी देशांचे मतऐक्य होते. भारताने १९९१ मध्ये सुरू केलेल्या पूर्वलक्ष धोरणाचा भाग म्हणून विचारसरणीपेक्षा राज्यव्यवहार सहकार्यावर भारताच्या वाढत्या जोराने भारताने दहा सदस्यीय दशिक्षणपूर्व आशियायी राष्ट्र संघटना (ASEAN) शी हातमिळवणी अधिका अधिक विस्तारली आणि त्याच्या नाविक सहकार्य डावपेचाने भारताला सी मधील नविन डावपेचात्मक घटक बनवले.

भारताचे क्षेत्रीय संघटन (ASEAN) शी वाढते संबंध हे त्याचे ह्या क्षेत्रातील वाढत्या संबंधाचे प्रकटीकरण आहे. मागील २० वर्षात भारताचे अशियनशी असलेले संबंध हे प्रतिनिधीनुरुप व स्थीर राहीले आहे. १९९२ मध्ये भारत हा अशियतचा विभागीय बोलणी भागीदार बनला आणि १९९५ मध्ये पूर्ण बोलणी भागीदार बनला. १९९६ मध्ये भारताला आसियान क्षेत्रीय मंचाचे सदस्यत्व बहाल केले गेले. पर्यायाने भारताने अण्वस्त्र मुक्त प्रदेश (१९९८) आणि सलोखा व सहकार्यासाठी असियनचा करार (२००३) या सीवरील कराराला मान्यता दिली. २००२ मध्ये भारत असियनचा शिखरस्तरीय भागीदार बनला. भारताला पूर्व आशिया शिखर परिषदेसाठी आमंत्रीत केले गेले. असियन सोबतच्या मुक्त व्यापार कराराच्या (२००८-१०) सही करण्याने आणि कार्य करण्याने या संबंधांना राजकीय खोली बहाल केली, असे मानले जाते.

भारताचे असियन सोबत तीव्रतेने वाढत जाणाऱ्या संबंदा व्यतिरिक्त त्या क्षेत्रातील काही निवडक देशांशी असलेले त्याचे द्विपक्षीय संबंध लक्षणीय आहेत. भारत आणि सिंगापूरमधील संबंध हे असेच घनिष्ठ संबंध राहिलेले आहे. सिंगापूरने भारताला या प्रदेशातील त्याची उपस्थिती विकसीत व मजबूत करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिलेले आहे. असियनमधील

भारताचा प्रवेश हा सिंगापूर द्वारा १९९२ मधील सिंगापूर शिखर परिषदेत झाला. त्यावेळपासून भारत-सिंगापूरसंबंध हे आर्थिक व राजकीय असे दोन्ही प्रकारे बहरले. सिंगापूर हा या क्षेत्रातील भारताचा सर्वाज मोठा व्यापारी भागीदार आहे आणि सर्वकष आर्थिक सहकार्य करार (CECA) असणारा या क्षेत्रातील पहिला देश आहे. डावपेचात्मक दृष्ट्या भारत आणि सिंगापूर हे बऱ्याच बहुपक्षीय आणि द्विपक्षीय संरक्षण व्यवस्थेत समाविष्ठ झालेले आहे. ज्यामध्ये सौम्य व कान्स्टेबल स्थरावरील नाविक कवायती आणि संयुक्त लष्करी कवायतींचा समावेश आहे. सिंगापूरने चांदीपूर येतील भारताच्या क्षेपणास्त्र चाचणी सुविधाचा उपयोग केला आहे. सिंगापूर हा भारतासाठी दुसरा सर्वात मोठा FDI स्त्रोत आहे. तसेच सिंगापूर हा पूर्व अशियन शिखर सारख्या इतर बहुपक्षीय मंचात भारताचा समावेश करण्यासाठी आवाज उठवण्यास कारणीभूत ठरलेला आहे.

व्हिएतनाम हा अजून एक देश आहे. जो या क्षेत्रातील भारतासाठी एक महत्त्वाचा आर्थिक आणि राजकीय भागीदार म्हणून उदयास आला आहे. मागील पाच वर्षात भारताचा व्हिएतनामशी असलेला एकूण व्यापार हा ३.५ पटींपेक्षा अधिक वाढलेला आहे. २००६-२००७ मधील एक अब्ज यूएस डॉलर अशा अतिशुल्लक भारताच्या व्हिएतनामशी असलेल्या एकूण व्यापाराने २०१०-११ मध्ये ३.५ अब्ज डॉलरची मर्यादा ओलांडली. तसेच व्हिएतनामने दक्षिण-चीन समुद्रातील समृद्धतेल उत्खनन भाग भारताला भाडे करारावर दिला. आर्थिक व राजकीय हिताव्यतीरिक्त सांस्कृतिक वारसा आणि चीनी घटक हे इतर काही घटक आहे जे ह्या देशांना जवळ आणत आहे.

भारताचे सी सोबतचे आर्थिक संबंधाची खोली चीन इतकी नसली तरी भारताच्या श्रेष्ठतम आर्थिक कामगिरीच्या अपेक्षा आणि भवितव्य कि तो जगातील मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येईल. त्याने भारताचे सी देशांसोबतच्या संबंधासाठी दृढ पाया रचला आहे. भारत हा जरी सी मध्ये बाह्य प्रदेशीय सत्ता म्हणून कार्य करण्याची शक्यता असली तरी भारत कुठल्याही बाह्य प्रदेशीय सत्तेविरुद्ध आक्रमक, लष्करी कारवाहीला सुरुवात करणे अशक्य आहे. अलिकडेच पूर्वसमुद्रात (दक्षिण चीन समुद्र) हायड्रोकार्बन स्त्रोत शोधण्याच्या व्हिएतनामच्या आमंत्रणाला आक्रमक प्रतिसाद दिल्यानंतर भारताने त्याची शोध मोहिम थंडावली. थोड्या अधिक फरकाने या क्षेत्रातील डावपेचात त्यांना राजकीय दृष्ट्या, लष्करी दृष्ट्या, आर्थिक दृष्ट्या आणि सांस्कृतिक दृष्ट्या गुंतवण्याचा समावेश होता. जेणेकरून कुठलीही एक मोठी सत्ता विशेषतः भारताची वैरी असलेली या प्रदेशावर वर्चस्व गाजवणार नाहीत. सध्याच्या काळात दोन अतिमहत्त्वाच्या प्रदेशबाह्य सत्ता, चीन आणि यूएसए या भारताला लाडीगोडी लावण्याचा प्रयत्न करत आहे. जेणेकरून ते या प्रदेशात एकमेकांचा समतोल साधतील. भारताला या क्षेत्रात अतिषय काळजीपूर्वक आणि चाणाक्ष राहायला हवे. जेणेकरून त्याच्या महत्त्वाच्या हितांना इजा होणार नाही.

**आपली प्रगती तपासा :-**

१) ज्या दक्षिण पूर्व आशियाई देशांनी या प्रदेशातील भारताची उपस्थिती उत्तेजीत केली त्यांच्या भूमिकेवर चर्चा करा.

२) भारत आणि दक्षिण पूर्व आशियामधील सहकार्याची क्षेत्रे कोणती.

## १.४ भारत - आफ्रिका संबंध

भारत हा त्याच्या संबंधात राजकाणीय, आर्थिक आणि सुरक्षा सहकार्याच्या वैशिष्ट्यपूर्ण घटकांची भर घालत आहे आणि यासाठी तो आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका आणि अलिकडेच नविन दक्षिण-दक्षिण भागिदारी जी या खंडातील काह विशिष्ट देशांच्या सहकार्याने बांधली जात आहे आणि हे खंड म्हणजे भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका (IBSA) चौकटी अंतर्गत येणारे दक्षिण आफ्रिका व ब्राझील यांच्याशी हातमिळवणी करत आहे, असे असले तरी सुद्धा त्याचे बहुतांश आफ्रिकन व लॅटीन अमेरिकन देशांशी असलेले संबंध नवजात अवस्थेत आहेत. तेथे हे सुद्धा लक्षात घेणे महत्त्वपूर्ण आहे की दक्षिण आफ्रिका आणि ब्राझील हे ब्राझील-रशिया-भारत-चीन-साऊथ आफ्रिका (BRICS) पुढाकाराचे सुद्धा सदस्य आहेत.

आफ्रिका या खंडात पंच्चावन्न राष्ट्र-राज्ये (दुसऱ्या कुठल्याही खंडापेक्षा जास्त) समाविष्ट आहेत, लोकसंख्या एक अब्ज आहे आणि जो भारतापेक्षा आकाराने दहापेटीपेक्षा जास्त आहे त्याला भारताच्या परराष्ट्र धोरणात नेहमीच कमीत कमी प्राधान्य देण्यात आलेले आहे, असे असले तरी भारत आणि आफ्रिका (विशेषतः उपसहारण आफ्रिका) यांच्यात सामाईक वैशिष्ट्यांची रेलचेल आहे. भारताची आफ्रिकेशी असलेली हातमिळवणी नेहमीच अपेक्षेपेक्षा कमी राहिलेली आहे. सारखाच वसाहतविषयक वारस, कमी विकासस्थर, समिश्र समाज, वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा, राजकिय विकासाचा हिन दर्जा, भांडणाने विदिर्ण झालेला समाज, साथीच्या व इतर रोगांनी ग्रस्त नैसर्गिक आपत्तीला सहज भेद्य हे काही प्रमुख सामाईक मुद्दे आहेत जे या भौगोलिक प्रदेशांच्या चिंता सामाईक बनवतात.

भारताचे आफ्रिकेशी असलेल्या व्यापारी व सांस्कृतिक संबंधाचा मागोवा प्राचीन व मध्ययुगीन काळापासून घेतला जाऊ शकतो. वसाहतीच्या काळातील भारतातून आफ्रिकेत होणारे स्थलांतर हा भारताचे दक्षिण आफ्रिका, केनिया, युगांडा, मॉरिशस इत्यादीसह काही ब्रिटीश आफ्रिकन वसाहतींशी वाढत्या संबंधासाठी निश्चित करणारा घटक होता. करारनाम्यानुसार मजुर व्यवसायी समाज आणि जबरदस्तीने स्थलांतर म्हणून विविध लाटेत घडून आलेले स्थलांतर हे वसाहतवादाच्या नंतरच्या काळातील भारताचे या आफ्रिकन देशांशी असलेल्या संबंधासाठीचा एक मार्गदर्शक घटक बनला. वसाहतवादाच्या काळात सुद्धा तेथे काही

उदाहरणे आहेत ज्यामध्ये मुळच्या भारतीय लोकांनी वसाहतीवादी मालकांच्या विरुद्धच्या मताची जमवाजमव करण्यास महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा गांधीचे अहिंसा चळवळीचे प्रयोग दक्षिण आफ्रिकेतच सुरू झाले.

स्वांतत्र्योतर काळातील बहुतांश वेळेस भारताचे आफ्रिकेप्रती धोरण हे एकतर टोकाचा ध्येयवाद किंवा टोकाचा वास्तववाद याने प्रभावित राहिले. नेहरूंचे आफ्रिकेप्रतीच्या धोरणाला अतिध्येयवाद होता. Sea मधील त्याच प्रकारच्या धोरणाप्रमाणे भारत हा आफ्रिकेच्या वसाहतवाद निर्मुलनाच्या प्रक्रियेचा तोंडी समर्थक होता. भारताने आफ्रिकेतील बऱ्याच मुक्ती चळवळींना पाठिंबा दिला आणि अलिप्ततावादी देशांचा प्रमुख म्हणून वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशवादाच्या विरोधी आफ्रिकन चळवळींना पाठिंबा दिला तरी सुद्धा १९६० च्या सुरुवातीपर्यंत आफ्रिकेतील फक्त काही देशांना स्वातंत्र्य मिळाले व त्यानंतरच्या आफ्रिकेच्या स्वतंत्र देशांनी या मध्ये इजिप्त, घाना येतात त्यांनी नेहरूंच्या अलिप्ततावादी चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. आफ्रिकन-आशियाई संहार्दतेत भारताची भूमिका खूप निर्णायक होती. जी १९५५ मधीलबांडूंग परिदेत दर्शवली गेली. तथापी नेहरूंचे आफ्रिकेप्रती धोरण हे एवढे ध्येयवादी होते की त्यांनी आफ्रिकेतील भारताच्या परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून भारतीयांची भूमिका ओळखली नाही. भारताचा चीनकडून झालेल्या अपमानजनक पराभवाने तिसऱ्या जगाचे नेतृत्व करण्याचा झालेला भारताचा भ्रमनिरास आणि त्या मुद्यावर आफ्रिकन देशांच्या पाठिब्यांची दुर्मिळता यामुळे त्याला दुसरे टोकाचे परकिय धोरण-टोकाचा वास्तववाद स्विकारण्यास प्रेरित केले. इंदिरा गांधींच्या काळात भारताचे आफ्रिकेप्रती असलेले परराष्ट्र धोरण हे खूपच वास्तववादी होते. ज्यामुळे दिर्घपल्ल्यात या खंडातील भारतीय प्रतिमेला इजा पोहचली. वास्तववादी धोरणाने आफ्रिकेतील भारतीय परराष्ट्रधोरणाचे हेतू साध्य केले नाहीत. १९७० मधील हुकुमशहा इदी अमिन कडून यूंगाडातील भारतीय समाजाला देशबाहेर घालवणे हेही, हा भारत-आफ्रिका संबंधातील एक निम्नतम मुद्दा होता. याहून अधिक म्हणजे या वेळेपर्यंत भारत-आफ्रिका संबंध हे शीतयुद्ध वास्तवाच्या गडद छायेखाली आले होते. भारताच्या स्वावलंबी आर्थिक धोरणाने सुद्धा भारताला या खंडातील त्याची सद्यस्थिती समजून घेण्यास मदत केली नाही. पर्यायाने राजीव गांधींनी आफ्रिकेप्रतीचे वास्तवादी धोरण आधुनिक करण्याचा प्रयत्न केला. १९८६ मधील आफ्रिका विकास निधीची स्थापना हे आफ्रिकेतील गमावलेले वैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठीचे एक पाऊल होते.

शीत युद्धोत्तर काळातील भारत आणि आफ्रिकेतील व्यवस्थागत, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि स्वदेशी गतिमान बदलांनी अशा वातावरणाला आकार दिला ज्यात भारत आफ्रिकासंबंध हे इतर कुठल्याही काळापेक्षा अधिक समर्पक बनले. प्रत्येक सरत्या वर्षागणिक भारत आफ्रिका संबंधांना अधिकचे डावपेचात्मक महत्त्व प्राप्त होत आहे. १९८० च्या काळात बहुतांश आफ्रिकन देश हे त्यांच्या आर्थिक इतिहासात सर्वात मोठ्या दुरावस्थेच्या काळाचे साक्षी राहिले. कारण नव-उदार रचनात्मक तडजोड कार्यक्रम (SAP) नेत्यांना कर्जाच्या सापड्यात ढकलले होते आणि या देशांची आर्थिक वाढ डबघाईस आली तरी सुद्धा १९९० च्या काळात आणि सध्याच्या शतकाच्या पहिल्या पाच वर्षात भारताने आफ्रिकन देशांना गोडिगुलाबी लावायचा आटोकाट प्रयत्न केला नाही हे तर स्पष्ट होते की आफ्रिका हा भारतासाठी एक भावी केंद्रीत प्रदेश म्हणून उगम पावणार होता. भारताची मागील १५ वर्षातील जबरदस्त आर्थिक वाढ, वाढता मध्यमवर्ग आणि भौगोलिक संपत्तीचा ऱ्हास यामुळे भारताला परदेशात नविन भौगोलिक संपत्ती पुरवठा करणारे स्त्रोत शोधण्यास भाग पाडले. या संदर्भात आफ्रिका हा खनिज, जमिन आणि उर्जा

संपत्तीचा आदर्श पुरवठादार स्त्रोत बनला आहे. आफ्रिकेजवळ तुलनात्क दृष्ट्या या संपत्तीचा वापर करण्यासाठी कमी प्रतीचे तंत्रज्ञान विषयक क्षमतासह उच्च संपत्ती गणना आहे.

भारत हे उर्जेचे भुकेले राष्ट्र राज्य आहे. भारताचे स्वदेशी स्त्रोत हे त्याच्या वाढत्या उर्जेची गरज भागवण्यासाठी सक्षम नाही. हायड्रोकार्बन पुरवठ्यासाठीचे बाह्य अवलंबित्व हे त्याच्या एकूण (गरजेच्या) खपाच्या ७० टक्के पेक्षा अधिक आहे. पूर्वापारपणे पश्चिम आशिया हा भारताच्या हायड्रोकार्बन गरजेसाठी पर्शिअन आखातासारख्या अनिश्चित प्रदेशावरील अतिअवलंबत्व भारताच्या उर्जासुरक्षेसाठी नकारात्मक शाखा विस्तार आहे म्हणून भारत त्याच्या बाह्य उर्जा पुरवठादारांच्या वैविध्यतेच्या प्रयत्नात आहेत. आफ्रिका हे भारतासाठी त्याची तेलाची गरज भागवणारे एक टिकाव धरू शकणारा पर्याय म्हणून उभरले आहे. आफ्रिकेजवळ जगाच्या एकूण तेल साठ्याच्या जवळपास ८ टक्के आणि जगाच्या तेल उत्पादनाच्या ११ टक्के साठा आहे. २०१० मध्ये आफ्रिकेकडून भारताची एकूण क्रूड ऑईल आयात हि २०.६ टक्के होती. या देशाची तेल आणि नैसर्गिक वायू संघटना (ONGC) विदेश लिमिटेड (OVL) ने सिबिया व नायजेरियातील विविध तेल शोध मोहिमांत शेअर्स प्राप्त केले. भारताच्या तेल आयातीच्या १५ टक्के आयात ही केवळ नायजेरीयातून होते. (OVL) ही सुदानच्या ग्रेटर नाईल प्रोजेक्ट आणि कोट डी आयव्हरी मधील समुद्रकिनाऱ्यावरील खोद कामातील विविध तेलशोध संयुक्त मोहिमेत सहभागी झाले आहे. या व्यतिरिक्त भारतीय खाजगी क्षेत्रातील कंपन्या ह्या अंगोला, बर्किना फासो, इक्वेटोरियलगिनीया, घाना, गिनीयाबीसो आणि सिनेगलमध्ये जोखिम पत्करत आहे.

भारताच्या सध्याच्या उर्जा गरजेसाठीच आफ्रिका महत्वपूर्ण नाही. तर तो त्याच्या भावी उर्जासुरक्षेसाठी सुद्धा महत्वाचा आहे. त्याच्या बाह्यहायड्रोकार्बन पुरवठादार स्त्रोतांच्या विस्तारासाठी प्रयत्न करण्याव्यतिरिक्त भारत त्याच्या उर्जाक्षेत्राच्या शाखाविस्ताराबाबत सुद्धा निश्चयी आहे. स्वदेशी पातळीवरसुद्धा केंद्रकीय उर्जेचा वापर एक चांगला पर्याय म्हणून सुद्धा एकमत नाही. केंद्रकीय उर्जा २०५० पर्यंत भारताच्या उर्जेच्या साधारतः पाव हिस्स्याची गरज भागवू शकते. भारत अमेरिका केंद्रकीय करारने आफ्रिकन देशांशी असलेला केंद्रकीय व्यापाराचा पर्याय कायदेशीरपणे खुला केला. जागतिक युरोनिअम साठ्याच्या जवळ जवळ १५ टक्के साठा हा फक्त दक्षिण आफ्रिका, नामिबिया आणि नायजेरियामध्ये कोळसा हा अजून एक उर्जास्त्रोत आहे. ज्याच्या शोधात भारत आहे. वेगवेगळ्या अंदाजपत्रकानुसार कोळसा हा भारताच्या प्राथमिक, व्यावसायिक उर्जास्त्रोताच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक भाग दर्शवतो. भारताचा घरगुती कोळसा पुरवठा हा संपत चालल्याने आफ्रिका हा महत्त्वाचा कोळसा पुरवठादार स्त्रोत बनू शकतो. उदा. दक्षिण आफ्रिका हा फक्त उच्च प्रतिचा कोळसा पुरवठा करण्यासच सक्षम आहे, असे नाही तर त्यांने कोळश्याचे पेट्रोलिअम मध्ये रूपांतर करण्याचे तंत्रज्ञानसुद्धा विकसीत केले आहे. अजून म्हणजे भारताचे हायड्रोकार्बन स्त्रोतावरील अवलंबित्व दुर करण्यासाठी भारत हा पेट्रोल आणि डिझेल सोबत जैवइंधन आणि इथॅनोल चे संमिश्रण करण्याची योजना करत आहे. आफ्रिकेजवळ खूप सारी पडिक जमीन पडलेली आहे. जिचा वापर जैवइंधन उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या उस आणि इतर वनस्पतींच्या वाढीसाठी होऊ शकतो आणि होत आहे. आफ्रिकेची जमीन संपदा सुद्धा भारताची अन्नसुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी वापरली जाऊ शकते. आकडे दशर्वितात की २०१० मध्ये ८० पेक्षा जास्त भारतीय कंपन्यांनी इथिओपिया, केनिया आणि मादागास्कर या सारख्या देशात जमीन विकत घेण्यात किंवा भाडे कराराने घेण्यात २.४ अब्ज डॉलरपेक्षा अधिक रक्कम गुंतवली.

भारताला औद्योगिक आणि डावपेचात्मक हेतूसाठी लागणार्या धातू आणि अधातू खनिज संपत्तीसाठी सुद्धा आफ्रिका ओळखली जाते. उदा. आफ्रिका हा सोने (जागतिक सोन्याच्या निम्म्यापेक्षा जास्त उत्पादन हे दक्षिण आफ्रिका आणि घानामध्ये होते), बॉक्साईट (गिनिया मध्ये जगाच्या बॉक्साईटच्या १५ टक्के साठा आहे.), मँगनीज (घाना आणि दक्षिण आफ्रिकेत जगाच्या निम्मेपेक्षा जास्त मँगनीज आहे.), शिसे (दक्षिण आफ्रिका आणि मोरास्को हे शिश्याचे एक प्रमुख उत्पादक आहेत.), तांबे (काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक, झांबिया), कोमिअम (झिबाँबे आणि दक्षिण आफ्रिकेजवळ जागतिक कोमिअमच्या ९९ टक्क्यापेक्षा जास्त साठा आहे), कोबाल्ट (काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक आणि झांबिया), हिरे, व्हॅनेडिअम, टिटॅनिअम, प्लॅटिनम यांचा प्रमुख उत्पादक आहे.

सळसळत्या खाजगी क्षेत्राद्वारे मार्गदर्शन लाभलेला भारत हा परकिय प्रत्यक्ष गुंतवणूकीसाठी एक हमत्त्वाचा स्त्रोत म्हणून आणि आफ्रिकेतील एक महत्त्वाचा व्यापारी भागीदार म्हणून उदयास येत आहे. जरी भारत हा आफ्रिका खंडातील चीनच्या गुंतवणूकीपेक्षा पिछाडीवर असला तरी नवी दिल्लीच्या राजकीय हालचालींनी पाठिबा मिळालेल्या भारतातील अलिकडील खाजगी कंपन्यांनी वेगवेगळ्या आफ्रिकी देशात कृतीचा तडाखा दाखवला आहे. मागील दशकात भारताचा नायजेरिया, टाझांनिया, केनिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्याशी असलेला जबरदस्त व्यापार व गुंतवणूक नेत्रदिपक आहे. भारतीय कंपन्यांनी आफ्रिकन बाजारपेठेत ठसा उमटविलेला आहे. जसे रॅम्बॅक्सी लॅबोरेटरीझ लिमिटेड जी बऱ्याच आफ्रिकन देशांना उच्च प्रतीची औषधे वाजवी दरात पुरविते. त्याप्रमाणे २००८ मध्ये भारतीय औषधी कंपनी CIPLA आणि युगांडाचे सरकार आणि युगांडन औषधी उत्पादक क्वालिटी केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी संयुक्त प्रकल्प सुरू केला. भारतीय कंपन्या जसे भारती एअरटेल आणि टाटा ज्यांना राज्याचा पाठिंबा नाही त्यांनी नायजेरियाच्या बाजारपेठेत मोठी गुंतवणूक केली आहे.

हिंदी महासागराचा एक भूराजकीय आणि भूआर्थिक आकर्षण केंद्र म्हणून उदय झाल्याने भारताचा सुरक्षा उद्देशांची आफ्रिके सोबत गुंतवणूक घडून आली. पाश्चात्य अर्थव्यवस्थेतील सापेक्ष उतार आणि चीन आणि भारताचा प्रमुख आर्थिक सत्ताकेंद्र म्हणून उदय यामुळे दळणवळणाच्या समुद्री मार्गाचे जागतिक आकृतीबंध बदलले. आता हिंदी महासागर हा सर्वात महत्वाचा व्यापारी मार्ग म्हणून उदयास आला आहे. या संदर्भात भारताचे आफ्रिकेशी सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारत हा आफ्रिकेशी गुंतण्यासाठी बहुआयामी धोरण अवलंबत आहे. पारंपारिक दृष्ट्या भारत हा आफ्रिकेशी बहुपक्षीय मार्ग आणि क्षेत्रीय संघटनाच्या चौकटी अंतर्गत जुळण्याचा प्रयत्न करत आलेला आहे. उदा. भारताने नेहमीच ऑर्गनायझेशन ऑफ आफ्रिकन युनीटी (OAO) ला आणि त्याचा वारसदार आफ्रिकन युनियनला (AU) १९६३ मधील त्याच्या आरंभापासूनच पाठिंबा व मान्यता दिली आहे. अपवाद फक्त काही दुर्मिळ वेळचा जसे वेस्टर्न सहारा विरिपब्लीक ला २००० मध्ये अमान्य करणे तसेच भारत हा वेगवेगळ्या अक्षेत्रीय संघटनांशी हात मिळवणी करत आहे. ज्यामध्ये साऊथ आफ्रिकन डेव्हलपमेंट कम्युनिटी (SADC) ECOWAS (१५ देशांची इकोनॅमिक कम्यूनिटी ऑफ वेस्ट आफ्रिकन स्टेटस्), ECCAS (११ सदस्यीय इकोनॉकि कम्यूनिटी फॉर सेंट्रल आफ्रिकन स्टेटस), COMESA (कॉमन मार्केट फॉर इस्टर्न अँड साऊदर्न आफ्रिकन कंट्रीझ) आणि EAC (इस्ट ऑफ्रिकन कम्यूनीटी) यांचा समावेश होतो. भारत आफ्रिकेच्या सहकार्याने करत असलेल्या प्रमुख विकास सहकार्य पुढाकारात न्यू

पार्टनरशीप फॉर आफ्रिकन डेव्हलपमेंट (NEPAD) व मिलेनिम डेव्हलपमेंट गोल्स (MDG) आणि पॅन आफ्रिकन इ-नेटवर्क हे आहेत. भौतिक आणि मानवी पायाभूत सुविधांच्या विकासाद्वारे होत असलेले विकास सहकार्य हे सौम्य सत्ता पुढे आणण्यासाठी जबरदस्त क्षमता निर्माण करते. (या खंडातील चीनची डावपेचात्मक अरेरावी असून सुद्धा भारताने ऑफ्रिकेत चीनपेक्षा अधिक विधायक प्रतिमा पुढे आणण्यात यश मिळवलेले आहे. दुसऱ्या आफ्रिका इंडिया फोरम समिट २०११ जी इथिओपीयाची राजधानी आदिस अबाबा मध्ये भरली त्यात पंतप्रधान मनमोहन सिंगांनी भारत आफ्रिका संबंधातील दक्षिण-दक्षिण सहकार्याचे निर्णायक महत्त्वावर जोर दिला. आफ्रिकेतील भारताच्या पुढाकाराला पाठिंबा देण्यासाठी IBSA आणि BRICS यांनी पर्यायी बहुपक्षीय मार्ग पुरविले आहेत. IOR - ARC हा अजून एक बहुपक्षीय पुढाकार आहे. ज्यामध्ये हिंदी महासागराच्या किनारपट्टीवरील देश समाविष्ट आहे.

आफ्रिकन देशांना बहुपक्षिय मार्गाद्वारे जोडण्या व्यतिरिक्त भारत हा प्रमुख आफ्रिकन देशांशी त्याचे द्विपक्षीय संबंध राजकीय दृष्ट्या विकसीत करून राहिलेला आहे. दक्षिण आफ्रिका, नायजेरिया, केनिया, मॉरिशस, इथिओपिआ, टांझानिया, सेनेगल हे देश आफ्रिकेतील भारतासाठीचे प्रमुख राजकीय भागीदार म्हणून उदयास आले.

भारताच्या वसाहतीवादी इतिहासाचा वाटेकरी आणि सामाईक विकास मुद्दे भारताला आफ्रिकन देशांच्या विकासात त्या देशांसाठी समकालीन भागीदार म्हणून नेऊन ठेवले आहे. याहून अधिक म्हणजे आफ्रिकन गरजांच्या पायावर विकास सहकार्य आणि क्षमता बांधणीवरील भारताचा जोर याला आफ्रिकी श्रेष्ठ राजकारणी व्यवसायवर्ग आणि उभरता मध्यमवर्ग यांच्याकडून पुरेशी पसंती मिळालेली आहे. भारताचे अँग्लोफोन, भौगोलिक संपत्तीने समृद्ध राष्ट्र आणि आफ्रिकेच्या हिंदी महासागर किनारपट्टीवरील देश-राज्ये यांच्याशी असलेले द्विपक्षीय संबंध मयार्दित आहे. भारताची आफ्रिकेतील राजकीय उपस्थिती ही खूपच कमी आहे. याबाबतीत चीनने भारताला मागे टाकलेले आहे. त्यामुळे भारताला आफ्रिकेप्रती एक सातत्यपूर्ण आणि टाकाऊ धोरण विकसीत करण्यावर जाणीवपूर्वक कार्य करण्याची गरज आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) आफ्रिका व भारतामधील एकीकरणाची क्षेत्रे कोणती ?

२) नेतृत्व आणि संघटनात्मक घटक हे भारत आफ्रिका संबंधात कशाप्रकारे महत्वपूर्ण भूमिका निभावतात.

## ९.५ भारत - लॅटीन अमेरिका संबंध

भारत आणि लॅटीन अमेरिका यांचे सांस्कृतिक भिन्नता, वसाहत वाद, वारशाची भिन्नता आणि भौगोलिक दृष्ट्या दूरता असून सुद्धा शीतयुद्धानंतरच्या जागतिक व्यवस्थेमुळे बऱ्याच आव्हानांना सामोरे जात आहेत. तसेच बर्याच संधी जोखून पाहत आहे या आव्हाने व संधींनी भारत आणि लॅटीन अमेरिकेला त्यांच्या कमी लेखल्या गेलेल्या परस्पर संबंधांचा पुनर्विचार व पुनरुज्जीवन करण्यास उदयुक्त केले आहे. भारताचे लॅटीन अमेरिकन देशांशी असलेले संबंध हे खूप जुने नाहीत. लॅटीन अमेरिकेचा शोध लागल्यापूसनच त्याच्या वेगवेगळ्या भागांवर स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स आणि ब्रिटनने वसाहती केल्या. जरी भारतीय स्थलांतरीत हे कॅरिबिअन बेटावरती स्थिरावले असले तरी बहुतांश खंडीय लॅटीन अमेरिका हा भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या आवाक्याबाहेर होता आणि याच्या उलटसुद्धा हे सत्य आहे. तथापी अलिकडील काळात भारत आणि लॅटीन अमेरिकन देशांनी (LAC) परस्परांचे महत्व ओळखलेले आहे. परस्पर सहकार्य हे मुख्यत्वेकरून व्यापार, गुंतवणूक आणि भौगोलिक संपत्ती शोध मोहिम या क्षेत्रात सुरू झाली. भारताचे मर्कोसर (२००४) आणि चाईल (२००६) यांच्याशी असलेले FTA हे बदलत्या प्रथेचे निर्देशक आहेत. व्हेनेझुअुला हा भारताच्या हायड्रोकार्बन उर्जा गरजेसाठी महत्वाचा स्त्रोत म्हणून उदय पावलेला आहे.

अलिकडील काळात भारत व ब्राझिल हे विविध मुद्द्यांवर व विविध मार्गाद्वारे नैसर्गिक भागिदार म्हणून उदयास आले आहेत. भारत व ब्राझिल यांचे ध्येय म्हणजे गरीबांसाठी अधिक नोकऱ्या उपलब्ध करून आणि तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत अर्थव्यवस्था विकसित करून मध्यम वर्ग वाढविणे. तसेच दोन्ही देश आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील त्यांचा राजकीय प्रभाव वाढवण्याची स्पर्धा करत आहे. व्यवस्थेमुळे या दोन देशातील दक्षिण-दक्षिण सहकार्य अधिक टिकाऊ बनवले आहे. कारण देवाणघेवाण ही फक्त राजकीय आणि आर्थिक क्षेत्रापुरतीच मर्यादीत नसून तिने विविधांगी जाळे उभारण्याचा मार्ग मोकळा केलेला आहे. भारत आणि ब्राझील ज्यांना जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्था मानली जाते. त्यांना त्यांच्या आर्थिक वाढीच्या पाठिंबा व शाश्वतीसाठी तसेच असममित आणि विस्तीर्ण विकसीत आकृतीबंधाचे अस्तित्व नाकारण्यासाठी स्वतःच्या काही गरजा क्षमता आणि मर्यादा आहेत. भारत आणि ब्राझिलने मागील काही वर्षात आकर्षक आर्थिकवृद्धी दर नोंदविलेला आहे आणि पुढील दोन दशकात त्यांचे आठ टक्क्यांपेक्षा जास्त आर्थिक वृद्धी दर प्राप्त करण्याचे ध्येय आहे. जेणेकरून ते विकासाची गंगा त्या प्रदेशाकडे आणि त्या लोकांकडे घेऊन जातील. ज्यांना आधी विकासाचा स्पर्श झालेला नाही, तसेच ते राहणीमानाचा दर्जा उंचावतील, आधुनिक अर्थव्यवस्था भक्कम करतील आणि वाढत्या एकीकृत विस्तृत जगात एक महत्वपूर्ण भागीदार म्हणून सहभागी होतील.

द्विपक्षीय पातळीवर भारत आणि ब्राझील सहकार्य करत आहे आणि विविध मुद्द्यावर सहकार्य करू शकतात. जागतिक तापमान वाढीची वाढती चिंता सौम्य करण्यासाठी इथॅनॉल आणि बायोडिझेल यासारखे पुनर्नविकरण उर्जास्त्रोत हे जिवाश्म इंधन खपतसाठी आवश्यक पर्याय म्हणून पाहिले जात आहे. ब्राझील हा जगाचा पहिला देश आहे. जो इंधन म्हणून इथॅनोलचा वापर करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर कार्य्रम राबवतो. ब्राझीलमध्ये इंधनासाठीचे इथॅनोल हे उसापासून मिळवले जाते आणि ते शुद्ध स्वरूपात गॅसोलिनमध्ये मिश्रण करून ज्याला गॅसोहोल (२४ टक्के इथॅनोल ७६ टक्के गॅसोलिन) म्हणतात. त्या स्वरूपात वापरले जाते. जैवइंधन

उद्योग हा स्वच्छ व पर्यावरणपूरक इंधन पुरवून भारताची उर्जा गरज पूर्ण करण्याकरता महत्वाचे योगदान देऊ शकतो. जैवइंधन हि भारताची उर्जा गरज पूर्तित अतिशय महत्वाची भूमिका निभावू शकतात. ब्राझील त्यांच्या २० टक्के वाहनात शुद्ध इथॅनोल आणि उरलेल्या वाहनात २२ ते २६ टक्के इथॅनोल - पेट्रोल मिश्रण वापरते. भारत सरकारने देशाच्या डिझेल गरजेच्या २० टक्केची पूर्तता होण्यासाठी महत्वाकांक्षी राष्ट्रीय जैव इंधन मोहिम विकसीत केली आहे. आज नॅनो तंत्रज्ञान हे क्रांतीकारी तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते. जे विकसनशील देशात उर्जा, वातावरण, आरोग्य आणि शेतीशी संबंधीत मध्यवर्ती गरजांबाबत मदत करू शकते. भारतातील नॅनो तंत्रज्ञानाचा विकास हा शोध आणि विकासाला उत्तेजन देण्याप्रतीच्या धोरणापूरती नवजात अवस्थेत आहे. यामध्ये बहुत करून सरकार पुरस्कृत पुढाकार आहे आणि उद्योग धंद्याचा सहभाग अजून होत आहे. लॅटीन अमेरिकेत ब्राझील हा नॅनो तंत्रज्ञान संशोधनात अग्रगण्य राहीलेला आहे आणि तो पहिला देश आहे ज्याने त्याच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रम अमलात आणले आहे.

भारत आणि ब्राझिलने विविध तंत्रज्ञान विषयक मुद्द्यांवर सहकार्य करण्याची तयारी दर्शविलेली आहे. जी त्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती सुसद्य करण्यास मदत करू शकेल. ते संरक्षक उर्जा, नॅनो तंत्रज्ञान शेती अवकाश इत्यादी क्षेत्रातील तंत्रज्ञान विषयक सहकार्याबाबत बोलणी करत आहेत. भौगोलिक संपत्तीच्या कठोर मर्यादांना तोंड देत असलेले भारत आणि ब्राझिल आधुनिक अर्थव्यवस्था विकसीत करण्याचा प्रयत्न करत आहे. विकासाचा अभाव आणि संशोधनाचा तुलनात्कदृष्ट्या निम्नस्तर यामुळे या देशांना, त्यांचे या क्षेत्रात नैपुण्य नसल्यामुळे, तंत्रज्ञान नव्हे, तंत्र आयात करणे भाग पडते. विकसीत देशांकडून विकसनशील देशांकडे होणारा तंत्रज्ञानाचा प्रसार हा बहुधा पाश्चात्य देशांवरील तंत्रज्ञानविषयक अवलंबित वाकडे घेऊन जातो.

भारत आणि ब्राझिल हे दक्षिण-दक्षिण सहकार्य चौकटी अंतर्गत भागीदारी करत आहे आणि इतर विकसनशील देशांना त्यामध्ये आणून त्याचा विस्तार वाढत आहे. अलिकडेच भरलेल्या IBSA शिखर परिषदेतील दक्षिण आफ्रिकीय अधिकारी हे IBSA च्या प्राप्तीचे प्रतिक म्हणून एक संयुक्त संशोधन उपग्रह सोडण्याच्या मार्गावर असून त्याबाबत आशावादी आहे. दक्षिण आफ्रिका हे उपग्रह वाहन बनवणार, ब्राझील हे मोजमापाची साधने बनवणारा आणि भारत त्याला पृथ्वी व हवामानाच्या निरिक्षणासाठी प्रेक्षपित करणार प्रिटोरिया (२०११) मध्ये अलिकडेच भरलेल्या IBSA शिखर परिषदेने ठरवले की लक्ष्य हे प्रमुख क्षेत्रावर द्यायचे आणि हे तीन देशांना वाटून द्यायचे : - व्यापार व पायाभूत बांधणीसाठी दक्षिण आफ्रिका, आरोग्य व तंत्रज्ञानासाठी भारत आणि शेती व वातावरणासाठी ब्राझील.

भारत आणि ब्राझील हे बऱ्याच बहुपक्षीय संघटनांचे मध्यवर्ती भागीदार आहेत आणि बऱ्याच मुद्द्यांवर त्यांचा दृष्टीकोन समान आहे. यामध्ये G2O, G4, BRICS आणि IBSA यांचा समावेश होता. जरी या सर्व बहुपक्षीय मंचांचे स्वतःचे असे अधिकार असले तरी वैशिष्ट्य पूर्णता जपण्याची गरज आहे. तसेच या सर्व बहुपक्षीय मचांच्या यशस्वीतेसाठी एकमेकांचे अधिकारांचे अतिक्रमण टाळण्याची सुद्धा गरज आहे.

थोडक्यात म्हणजे असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की भारताचे दक्षिण पूर्व आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेशी असलेले संबंध हे गमावलेल्या संधी, गैरसमजूत, चूकीचा अंदाज, अविश्वास आणि अव्यवस्थापनाने ओळखले जाऊ शकतात. अलिकडेच जरी भारताचे

SEA शी असलेल्या संबंधाने चांगला आकार घेतला असला आणि आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेच्या बाबतीत चांगली सुरुवात झालेली असली तरी नंतरच्या दोन भौगोलिक एककात भारताला बरेच अंतर पादाक्रांत करायचे आहे. त्या सर्वच बाबतीत. चीनची उपस्थिती विस्तृत आहे म्हणून भारताने धोरण आखणी करणे गरजेचे आहे. जेणे करून वर उल्लेखित सर्व क्षेत्रांच्या देशांशी असलेले त्याचे संबंध तो सुधारू शकतो.

**आपली प्रगती तपासा**

१) भारताच्या लॅटीन अमेरिकेशी असलेल्या हात मिळवणीत भारत-ब्राझील संबंधाच्या महत्वाची चर्चा करा.

२) बहुपक्षीय व्यवस्थेत भारताचा लॅटीन अमेरिके प्रती असलेल्या जागतिक दृष्टीकोनास आकार देण्यास कशा प्रकारे महत्वाची भूमिका वठविली ?

## ९.६ सारांश

भारताने विकसनशील जगाला नेतृत्व देण्यासाठी पुन्हा एकदा धैर्य व तयारी दाखवली ही वस्तुस्थिती असली तरी त्याचे दक्षिण पूर्व आशिया आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका येथील देशांशी असलेले संबंध शीत युद्ध काळात खूपच कमी होते. या काळातील संबंधातील हा कमीपणा पद्धत, घरगुती आणि नेतृत्व घटकांच्या अधिक प्रमाणामुळे असू शकतो. तथापी जागतिक स्थरावरील पद्धतीतील बदल, घरगुती स्थरावरील धोरण बदल आणि परराष्ट्र धोरण काळातील रुपांतरण जे मागील दोन दशकात घडून आले त्याने विकसनशील देशांशी भारताच्या हातमिळवणीच्या प्रमाण व तीव्रतेत नमुन्यादाखल रूपावली बदल घडवून आणला आहे. भारत व्यापार, जमीन संपत्ती, हिस्सेदारी, जागतिक कारभार, हवामान बदलाचे मुद्दे असलेल्या विविध क्षेत्रात दक्षिणेशी असलेले द्विपशीय व बहुपक्षीय संबंध वाढवून राहिला आहे. याहून अधिक म्हणजे भारताची विकसनशील देशांशी असलेली देवाणघेवाण दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या चौकटीने मार्गदर्शित राहिलेली आहे. जरी भारत आणि दक्षिण आशिया एकमेकांना राजकिय भागीदार मानतात आणि त्याचे संबंध जबरदस्त वाढत असले तरी भारताची आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेशी असलेल्या गुंतवणूकीला खूप प्रवास करायचा आहे.

## १.७ विभागवार प्रश्न

१) भारताच्या विकसनशील देशाप्रती असलेल्या जागतिक दृष्टीकोनाचा पाया उभारणाऱ्या प्रणाली व घरगुती बदल स्पष्ट करा.

२) भारत आणि दक्षिण पूर्व आशियामधील एकीकरणाचे व विलगी करणाचे मुद्दे कोणते ?

३) भारत आणि दक्षिणपूर्व आशियामधील शाश्वत संबंध विकसीत करण्यातील व्हिएतनाम व सिंगापूरच्या भूमिकेची चर्चा करा.

४) भारत आणि दक्षिणपूर्व आशियामधील निवडक देश यांच्या मधील सहकार्याचे विभाग ओळखा.

५) भारताच्या आफ्रिकेशी असलेल्या हात मिळवणीतील सलगता व बदल स्पष्ट करा.

६) भारत आफ्रिका संबंधांची बहुपक्षीय व द्विपक्षीय परिणामे कोणती ?

७) भारताच्या न्यूटीन अमेरिकेशी असलेल्या हात मिळवणीच्या परिमाणांचे विश्लेषण करा.

८) भारत व आफ्रिका यामधील सहकार्याची क्षेत्रे कोणती ?

९) IBSA व BRICS यासारखे प्रदेशापलिकडील बहुपक्षीय मंच हे भारताच्या आफ्रिका व लॅटीन अमेरिकेशी वाढत्या संबंधात कसे कारणीभूत ठरले आहेत ?

१०) भारताच्या विकसनशील देशांशी असलेल्या सहकार्यातील चिनी घटकाचे स्पष्टीकरण करा.

## १.८ संदर्भसूची


* Sheethi, K. M. and Vijayan P. (2005), "Political Economy of Indian Third world Policy" In Rajesh Harshe and K. M. Seethi (eds.), Emerging with the world : Critical Reflections on India's Foreign Policy, PPs 47-72, New Delhi : Orient Longman.

* Thomas, A. M. (2005), "India and Southeast Asia : The Look East Policy in perspective". In Rajen Harshe and K. M. Sheethi (eds.) Emerging with the world : critical Reflections on India's Foreign Policy, PP. 297-318, New Delhi : Orient Longman.

* Ghosal, Baldas (1996), "China, India and Southeast Asia : Prospects and Problems," In Baldas Ghosal (ed.) India and Southeast Asia : Challenges in opportunities. PP. 41-53, New Delhi, Konark.

* Singh, K. R. (2005), "The Indian Ocean Rim Association for Regional Co-operation in the Indian Ocean," In Rajen Harshe and K. M. Sheethi (eds.) Emerging with the world : Critical Reflections on India's Foreign Policy, PP. 342-355, New Delhi : Orient Longman.

* Hussain Karki (1996), "China, India and Southeast Asia after the cold war". In Baldas Ghosal (ed.) India and Southeast Asia : Challenges in opportunities. PP. 41-53, New Delhi, Konark.

* Harshe, Rajen (2005), "Recasting Indo-African Development Co-operation," In Rajen Harshe and K. M. Sheethi (eds.) Emerging with the world : Critical Reflections on India's Foreign Policy, PP. 442-458, New Delhi : Orient Longman.

* Beri Ruchita (2003), "India's Africa Policy in the post cold war Era : An Assessment" Strategic Analysis, Vol-27, No. 2, Apr-Jun 2003, PP. 216-312.

* Alden Chris and Marco Antonid Vieira (2005), "The New Diplomacy of the South : South Africa, Brazil, India and Trilateralism", Third World Quarterly, Vol-26, No. 7, PP. 1077-1095.

❖❖❖❖

# १०

# भारत व संयुक्त राष्ट्र (UN)

**घटक रचना :**

१०.० उद्देश
१०.१ परिचय
१०.२ संयुक्त राष्ट्रांची उत्क्रान्ती
१०.३ भारत आणि UN
१०.४ भारताचे UN मधील योगदान
१०.५ भारत आणि संयुक्त राष्ग्राची पुनर्रचना
१०.६ शांतता प्रस्थापित करणाऱ्या मोहिमा
१०.७ UN शांतता मोहिमेतील भारताचे योगदान
१०.८ सारांश
१०.९ विभागवार प्रश्न
१०.१० संदर्भसूची

## १०.० उद्देश :

हा विभाग मागील दोन दशकातील UN चा विकास आणि त्याची बदलती भूमिका यांच्या पार्श्वभूमीवर शीतयुद्धकाळ आणि शीतयुद्धोत्तरकाळातील भारत-UN संबंधांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो. या विभागाचा मुख्य उद्देश म्हणजे भारताचे संयुक्त राष्ट्रातील आणि विशेषतः UN शांती दलातील योगदानाचे मूल्यमापन करणे. त्याच वेळेस हा विभाग संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेवर कायम सदस्यत्व प्राप्त करण्याच्या भारताच्या सध्याच्या प्रयत्नावर चर्चा करतो. हे प्रकरण अभ्यासल्यावर विद्यार्थी भारत आणि UN संबंध सर्वकषपणे आणि मागील सहा दशकात भारताचे UN मधील योगदान समजून घेण्यास समर्थ ठरतील.

## १०.१ परिचय :

UN हे आंतरराष्ट्रीय समुदायातील १९३ देशांचे प्रतिनिधीत्व करते. ही एकमेव आंतर सरकारी संघटना आहे जे खरोखरीच जागतिक समुदाय दर्शविते. UN ही संघटना आंतरराष्ट्रीय झगडे-तंट्याला प्रतिबंध करण्यास व राष्ट्राराष्ट्रातील सहकार्य वाढविण्यास वचनबद्ध आहे.

## १०.२ संयुक्त राष्ट्रांची उत्क्रान्ती

राष्ट्र-राज्यातील समस्या व विविध मुद्दे शांततामय मार्गाने सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची गरज ही प्रथम पहिल्या महायुद्धाच्या नंतरच्या काळात तीव्रतेने जाणवली. बऱ्याच जणांनी मत मांडले की आंतरराष्ट्रीय संघटनेच्या निर्मितीने युद्ध टाळण्यास मदत होईल. या विचारांनी प्रेरित होऊन राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. राष्ट्रीय सत्तेला नियंत्रणात ठेवू शकणाऱ्या संघटनेची निर्मिती ही महत्त्वाकांक्षी राष्ट्रे-राज्ये यांच्यासाठी बेचव कल्पना होती. तथापि राष्ट्रसंघ हा अशा राष्ट्रांमध्ये टिकू शकला नाही जे आंतरराष्ट्रीय पद्धतीला बेबंदशाही म्हणून आणि भांडणांना राष्ट्रीय हित प्राप्त करण्यासाठी अटळ साधन म्हणून पाहायचे. राष्ट्रसंघ हा जगाला प्राणघातक अशा दुसऱ्या महायुद्धापासून वाचविण्यास अपयशी ठरला. दुसऱ्या महायुद्धाने घडवून आणलेल्या महाभयानक विनाशाने आंतरराष्ट्रीय समुदायाची या सत्येतेबाबत खाली पटविली की तिसरे महायुद्ध हे पृथ्वीवरील मानव जातीच्या अंतात परिणत होईल. म्हणून आंतरराष्ट्रीय समुदायाने जाणले की तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून जगाला वाचविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रयत्न अवशंभावी आहेत. या जाणीवेने UN च्या स्थापनेच्या मार्गाचा पाया घातला.

संयुक्त राष्ट्राची स्थापना २४ ऑक्टोबर १९४५ रोजी झाली. आंतरराष्ट्रीय शांता व सुरक्षा टिकविणे, आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे आर्थिक व सामाजिक विकास प्राप्त करणे, मानवी अधिकारांचे संरक्षण करणे ही या संघटनेच्या स्थापनेमागील मुख्य उद्दीष्ट्ये होती. UN घटनेत ही उद्दीष्ट्ये स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली आहेत. १९४५ मधील UN सनदीची स्वीकृती हा एक अर्थपूर्ण क्षण होता. कारण त्याने एका नवीन जागतिक व्यवस्थेच्या निर्मितीची सूचना दिली. UN ची सदन ही आंतरराष्ट्रीय समुदायाची राज्य घटना बनली.

एक जागतिक IGO च्या निर्मितीच्या ध्येयवादी दृष्टीकोनावर (UN) ची स्थापना झाली जीचे धोरण म्हणजे प्रजासत्ताक राष्ट्रांमधील सहकार्य आणि सामाईक हिताला चालना देणे आणि केंद्रीय अधिकाराच्या अभावी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील भांडणांचे व्यवस्थापन करणे. UN च्या सनदीने सह-समित्यांना UN चे प्रमुख भाग म्हणून ओळखले. सुरक्षा समिती, सर्वसामान्य कायदेमंडळ, सचिवालय, आंतरराष्ट्रीय न्यायसभा, विश्वस्त मंडळ आणि आर्थिक व सामाजिक परिषद या व्यतिरिक्त मागील सहा दशकात UN च्या अधिकार क्षेत्राअंतर्गत ३० पेक्षा अधिक बहुपक्षीय संस्था समित्या व रचनांची निर्मिती करण्यात आली आहे.

UN चा पाया हा दोन स्तंभावर आधारित आहे. पहिले म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्यावर आणि दुसरा संहार्दपूर्ण मानवी मूल्ये व आदर्श यांच्यावर आंतरराष्ट्रीय कायद्याच्या काही मुलभूत तत्वांच्या पायावर UN ची स्थापना झाली आहे. देशामधील प्रजासत्ताक समानता, प्रजासत्ताक देशाच्या आंतरराष्ट्रीय बाबीत ढवळा ढवळ न करणे. राज्यांमधील समस्या, मुद्दे ही भांडणाद्वारे नव्हे तर सहकार्याद्वारे सोडविणे, स्वसंरक्षणाचा अधिकार ही काही मुलभूत तत्त्वे आहेत. ज्यावर UN स्थापली गेलेली आहे. ही तत्वे UN राज्यघटनेच्या विविध कलमांद्वारे प्रतित होतात. या तत्वांनी UN साठीच्या कृतींचा भावी आकृती बंध निश्चित केलेला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्वांबरोबर UN ची स्थापना ही मुलभूत मानवी मूल्ये जसे शांतता, सहकार्य, बंधुता, स्वातंत्र्य आणि समानता यावर आधारीत आहे. UN ही या मुल्यांना चालना देण्यास व

त्यांच्या संरक्षणासाठी कटिबद्ध आहेत. ही UN ची दिशादर्शक तत्वे आहे. UN चा एक मुलभूत उद्देश म्हणजे मानवी अधिकारांना चालना देणे व त्यांचे सरक्षण करणे. जो या तत्वातून उद्‌भवलेला आहे. माजी अमेरिकन परराष्ट्र मंत्री कॉर्डेल हल म्हणतात की, UN ची स्थापना मानवीय सर्वोच्च आकांक्षांच्या परिपूर्ततेसाठी झाली आहे. १० डिसेंबर १९४८ रोजी UN ने मानवी हक्क करारनामा घोषित करून व स्विकारून मानवी हक्क संरक्षणाच्या दिशेत एक क्रांतिकारी पाऊल टाकले. मागील ६० वर्षात UN ने मानवी हक्क चालना व संरक्षणासाठीच्या बऱ्याच करारांवर निर्णय घेतले.

संयुक्त राष्ट्र ही राष्ट्र व राज्यांमधील - द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक स्थरावरील समस्या सोडविण्यासाठी समर्पित एक कार्यकारी आंतरराष्ट्रीय परिषद म्हणून समजली जाते. हे बहुदेशीय एकत्रीकरणाचे आदर्श उदाहरण आहे. देशादेशांमधील समस्या सोडवितांना UN सदस्य राष्ट्रांच्या धोरण व कृतींचे नियमन करण्याचा प्रयत्न करते. परस्पर सहकार्य, एकत्रीत विचारविनिमय आणि शांततेद्वारे देशांमधील समस्या सोडवण्यासाठी UN हे अतिउत्तम व्यासपीठ आहे. UN ही आंतरराष्ट्रीय सुरक्षा बाबीतील तंट्याच्या निस्तारण्यासाठीची यंत्रणा आहे. UN ने असे एक व्यासपीठ दिलेले आहे. जिथे राष्ट्रे त्यांचे दृष्टीन भांडू शकतात आणि वादाचे मुद्दे उचलू शकतात. शशी थरूर यांच्या अनुसार ''UN हा असा एक मंच आहे जेथे प्रजासत्ताक राष्ट्रे जागतिक समस्या सोडवण्यासाठी डावपेच आखू शकतात आणि या डावपेचांना परिणाम स्वरूप देण्यासाठीचे UN एक साधन आहे.'' UN हे असे व्यापीठ आहे जे सदस्य राष्ट्रांना त्यांच्या समस्या मांडण्यास वादविवाद करण्यास आंतरराष्ट्रीय समुदायासमोर त्यांचा पवित्रा विशद करण्यास आणि इतरांसोबत सल्लामसलत करण्यात संधी प्रधान करते. राष्ट्रस्तरीय समस्येसह तिथेच बर्याच आंतरराष्ट्रीय समस्या आहे ज्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायाला चिंतीत करतात. उदा. मानवी अधिकारांचे संरक्षण करणे, पर्यावरण प्रदुषण , अण्वस्त्रे आणि अतिसंहारक अस्त्रांचे हस्तांतरण आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद. UN अशाच समस्यांवर आंतरराष्ट्रीय जनमत एकत्रीत करण्याचा आणि त्या समस्या सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न करते. अशा जागतिक स्थरावरील समस्या सोडविण्यासाठी फक्त संबंधांचे नियमनच नव्हे तर राष्ट्रांच्या समस्यात्मक कृती सुद्धा गरजेच्या आहे. मागील सहा दशकातील UN चे योगदान अधोरेखित करताना UN वरील एक तज्ञ इन्स्लाऊड अगदी समर्पक बोलतात, ''कुठल्याही परिस्थितीत UN ला दुर्लक्षित केले जाऊ शकत नाही. मग ते काल्पनिक अव्यावहारिक हेतूवाद असो किंवा उपहासात्मक तिरस्काराशी संबंधांत असो. याने लक्षणीय दुरदृष्टीता प्राप्त केली आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) UN च्या स्थापने मागील प्रमुख उद्देश कोणते ?

२) UN च्या रचनेची थोडक्यात चर्चा करा.

## १०.३ भारत आणि UN

भारत आणि संयुक्त राष्ट्र संबंधाचा दिर्घ इतिहास आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांशी त्याच्या स्थापनेपासूनच चांगले संबंध टिकविले आहे. जेव्हा UN अस्तित्वात आली तेव्हा भारत ब्रिटीश राजवटी खाली होता. भारताचा दर्जा विचारात न घेता त्याला UN चा संस्थापक सदस्य बनण्याची संधी मिळाली. UN वर सनदेवर सही करणाऱ्या UN च्या ५१ मुळ सदस्यांपैकी भारत एक राहिलेला आहे. प्रसिद्ध सॅनफ्रँसिस्को परिषदेने UN ला जन्म दिला. भारताला या परिषदेला उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळाले. भारत हा १ जानेवारी १९४२ रोजी वॉशिंग्टन येथील संयुक्त राष्ट्रांच्या जाहिरनाम्यावर सही करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या मुळ सदस्यांपैकी एक आहे आणि त्याने २५ एप्रिल ते २६ जून १९४५ पर्यंतच्या सॅनफ्रँसिस्को येथील एतिहासिक आंतरराष्ट्रीय संघटनेशी UN परिषदेत सहभाग नोंदविला. त्या परिषदेत भारताने UN सनदीवरच सही केली आणि ३० ऑक्टोबर १९४५ रोजी UN चा सदस्य बनला. १९४५ पासून २०१२ पर्यंत भारत आणि UN मधील संबंध हे परस्पर सहकार्य, आदर आणि विश्वासाचे राहिले आहे. भारत हा भूमिका व लेखी या दोन्हीमध्ये UN ची उद्दिष्ट्ये तत्त्वे आणि मुल्ये यांना बांधील आहे. विविध UN समित्यांचा एक माननीय सदस्य म्हणून आर्थिक साहाय्य पुरवण्यापासून ते UN कामकाजात सक्रियपणे सहभागी होऊन भारताने या संघटनेच्या विकासात भरघोस योगदान दिले आहे. २९ सप्टेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताची UN प्रतीचा कल अधोरेकित केला. त्यांनी स्पष्ट केले की, ''भारताची UN प्रति प्रवृत्ती ही अगदीपूर्ण सहकार्याची आहे आणि UN सनदीशी भूमीका व लेखी या दोन्ही बाबतीत विशाल बांधिलकी पाळणारी आहे.'' त्यांनी असेही स्पष्ट केले की भारत हा परिषदेतील ती भूमिका वठविण्यासाठी UN च्या विविध कृती व प्रयत्नात पूर्णपणे सहभागी असेल. ज्याशी तिची भौगोलिक स्थिती, लोकसंख्या आणि शांततामय प्रगतीप्रती योगदान तिला अधिकार देईल.'' शांततामय रितीने राष्ट्रांमधील वाद सोडविण्यात UN च्या क्षमतेतील भारताचा विश्वास हा १९४० मधील एका भारतीय चालीद्वारे पुराव्या दाखल सिद्ध केला जाऊ शकतो. भारताने स्वतः पाकिस्तानशी असलेला काश्मिर मुद्दा संयुक्त राष्ट्रात नेला.

भारत आणि UN मधील दिर्घकालीन सहकार्य संबंधाच्या मागील मुलभूत कारण हे भारत आणि UN या दोघांना ताब्यात ठेवणाऱ्या मध्यवर्ती तत्वात दडलेले आहे. भारत हा जागतिक शांततेशी बांधील आहे आणि भारत UN ला जागतिक शांतता मिळवण्याचे साधन समजतो. भारतीय परराष्ट्र धोरण आणि UN सनदीतील सुसंगतीने भारत UN भागीदारीला मजबूती दिली. शांतता, अहिंसा, न्याय, न्याय अधिकार, स्वातंत्र्य यांची तत्वे ही UN ची इमारत उभारण्यासाठीची पायाभूत तत्वे आहेत. जी भारतीय राज्य घटनेत सुद्धा जतन केलेली आहे. या व्यतिरिक्त तिथे बरीच सामाईक तत्वे आहे. ज्यांना भारत आणि UN ने मान्यता दिलेली आहे. उदा. वसाहतवादाला प्रतिकार, स्वयंनिर्णयाच्या अधिकाराला पाठिंबा, शांततामय सहअस्तित्व, शांतेद्वारे शांतता, जागतिक वाद आणि भांडणापेक्षा सहकार्यावर जोर. स्वतंत्र भारताने बऱ्याच द्विपक्षीय व बहुपक्षीय कराराला मान्यता दिलेली आहे. जे UN सनदीच्या कायदेशीर अटींवर आधारीत होते. आणि UN चे हेतू व उद्दिष्टांचा आदर अधोरेखीत करतात.

भारताची राज्य घटना ही आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेच्या बांधिलकची ग्वाही देते. भारतीय घटना ही फक्त भारताच्या घरगुती व्यवस्थेशी संबंधीत नाही तर ती भारतीय राज्याला

आंतरराष्ट्रीय समुदायाशी कशा प्रकारे संबंध टिकवावे याचे मार्गदर्शन सुद्धा करते. भारतीय राज्य घटनेचे कलम 51A हे भारतीय परराष्ट्र धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे सामावते जे शांतता व सुरक्षा प्रती भारताची बांधिलकी दर्शवते. त्यानुसार राष्ट्राने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेला चालना देणे, देशांमध्ये न्याय व सन्माननीय संबंध टिकवणे, सघटीत लोकांचे एकमेकांशी व्यवहार करण्यातील आंतरराष्ट्रीय कायदे आणि करारसक्तीसाठी आदर वाढवणे आणि लवादाद्वारे आंतरराष्ट्रीय वादविवादांचे निराकरण करण्यास उत्तेजन देणे. UN सुद्धा याच तत्वांना मान्यता देते. UN सनद याच मार्गदर्शन तत्वांना जतन करते. स्वतंत्र भारताच्या उदयापासूनच UN च्या कामकाजाला पाठिंबा देणे आणि त्यात सक्रीय सहभागी होणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट राहीले आहे.

शांततेद्वारे शांततेसाठी प्रयत्न करणे हा भारत आणि UN मधील संबंधदृढ करणारा घटक आहे. २० जून १९५४ रोजी भारत आणि चीनद्वारा संयुक्तपणे सुरू केलेल्या शांततामय सह-अस्तित्वाच्या पाच तत्वांचा ज्यांना पंचशील प्रणाली म्हटले जाते त्यांना UN सनदीत सुद्धा प्रतिध्वनी ऐकू येतो. वस्तुतः पंचशील हे UN सनदीच्या अत्यावश्यक घटकांचा सार आहे. १९५९ मध्ये पंचशीलला पाठिंबा देण्यासाठीचा एक ठराव UN सर्वसाधारण सभेत आणला गेला. ज्याला ८२ UN सदस्य राष्ट्रांनी पाठिंबा दर्शविला.

**आपली प्रगती तपासा**

१) १९५० च्या आणि १९६० च्या काळातील भारताचे UN शी असलेल्या संबंधावर चर्चा करा.

२) भारत आणि UN नी मान्यता दिलेली सामाईक तत्वे कोणती ?

## १०.४ भारताचे UN मधील योगदान

१. विजयालक्ष्मी पंडित या UN आमसभेच्या पहिल्या स्त्री अध्यक्षा म्हणून निवडल्या गेल्या.

२. सुरुवातीच्या वर्षात भारताने विकसनशील देशांचे हित दर्शविले आणि वसाहतवाद आणि वर्णसंकर विरोधी धोरण यांच्या विरोधी लढ्याला पाठिंबा दिला. भारताने आशिया आणि आफ्रिकेच्या वसाहतवादात अडकललेल्या देशांसाठी स्वयंनिर्णयाच्या अधिकारासाठी कळकळीची विनंती केली. नेहरूंनी स्वयंनिर्णयाच्या अधिकाराप्रती भारतीय दृष्टीकोनाची रूपरेषा आखली. स्वयंनिर्णयाच्या अधिकारावरील भारतीय पावित्र्याचे स्पष्टीकरण करतांना विजया लक्ष्मी पंडित म्हणाला, ''आशियातील गुलाम लोकांचा आवाज परिषदेत अधिकारपणे कदाचित ऐकला जाऊ शकणार नाही आणि ज्यांनी त्यांच्या स्वातंत्र्याचा जन्मसिद्ध अधिकार

बळकावलेला आहे ते कदाचित त्यांच्यासाठी उपहासात्मक रितीने दावा करतील. परंतू तेथे खरोखरीच नाकारलेला न्याय असू शकणार नाही.'' नेहरूंनी सुद्धा स्पष्टपणे सांगितले की, ''आम्हाला विशेषतः वसाहतवादी आणि पारतंत्र्यातील देश व लोकांच्या बंधनमुक्तीत आणि सर्व लोकांसाठी कागदोपत्री आणि व्यवहारात समान संधीच्या मान्यता देण्यात रूची आहे.

३. भारताने जागतिक निश:स्त्रीकरण आणि शस्त्रास्त्र स्पर्धांच्या समाप्तीच्या प्रती आणि एक अधिक न्याय आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या निर्मितीप्रती योगदान दिले.

४. तसेच भारताने बऱ्याच कुंठित अवस्था सोडवण्यात मध्यस्थाची भूमिका साकारली जसे कोरियन संकट.

५. भारताने विकसनशील देशाच्या आर्थिक चिंता सडेतोडपणे सांगण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. जसे व्यापार व विकासावरील त्रिवार्षिक UN परिषद आणि १९९२ मध्ये रियो दि जनिरो मधील पर्यावरण आणि विकास परिषद.

६. १९५० मध्ये भारताने नविन राज्यांच्या प्रदेशांच्या मुद्यावरील भांडण सोडवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली.

७. भारताने आमसभेचे व्यासपीठ हे साम्राज्यशाही, वसाहतवाद, वर्णसंकर विरोध यांना विरोध करण्यासाठी वापरले. दक्षिण आफ्रिकेतील वंश विद्वेषी सत्तेच्या विरुद्ध आंतरराष्ट्रीय अनुज्ञाच्या आवाहनास भारताची भूमिका कारणीभूत होती.

८. १९७० मध्ये भारताने विकसनशील देशांच्या अधिकारासाठी खूप प्रयत्न केले आणि नविन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेसाठी आमसभेच्या पाठिब्यांची जमवाजमव केली.

९. तो ७७ च्या गटाचा आणि नंतर जी-१५ देशांच्या मध्यवर्ती गटांचा सक्रिय सदस्य राहिलेला आहे.

१०. भारताने पर्यावरण संरक्षण आणि मानवी अधिकारांसाठी चालना व त्याचे संरक्षण या सारख्या क्षेत्रात योगदान दिले.

११. भारत हा UN नियमीत संकल्पाच्या मुख्य योगदात्यांपैकी मूळ आहे. २००९ च्या संयुक्त राष्ट्र लोकशाही फंडात भारताचे योगदान १६ दशलक्ष अमेरिकन डॉलर होते.

## १०.५ भारत आणि संयुक्त राष्ट्राची पुनर्रचना

शीत युद्धोत्तर काळातील उद्भवणाऱ्या आव्हानांना व विशेषतः आंतरराष्ट्रीय बाबींमधील UN च्या अरेरावीला तोंड देण्यासाठी UN च्या पुनर्रचनेच्या मागणीने जोर धरला. UN च्या मजबूतीकरणासाठी, पुनरुज्जीवनासाठी आणि त्याला अधिक लोकशाहीरुप देण्यासाठी सुधारणा आवश्यक होत्या. त्यासाठी पुढील मागण्या होत्या :

- UN ची रचना व प्रक्रियेत सुधारणा करणे.
- अर्थसंकल्पिय प्रक्रियेत सुधारणा करणे.
- दैनंदिन कारभारात सुधारणा करणे.
- UN च्या अधिकार क्षेत्रात सुधारणा करणे.
- सुरक्षा परिषदेच्या रचना व कार्य पद्धतीत सुधारणा करणे.

सुरक्षा परिषदेची रचना व कार्यपद्धती ही सुधारणा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. तज्ञांना वाटते की, सुरक्षा परिषद ही समकालीन जगाच्या राजकीय वास्तविकता दर्शवित नाही. UN ची सदस्य संख्या ही मागील सहा दशकात १९४५ मधील ५१ पासून २०११ मधील १९३ पर्यंत अशी जबरदस्त वाढलेली आहे. तथापि सुरक्षा समिती ही बहुतकरून स्थिर राहिलेली आहे आणि अशाप्रकारे सुरक्षा परिषदेचे प्रातिनिधिक स्वरूप धोक्यात घातले आहे. अजून म्हणजे सुरक्षा परिषदेच्या कृती व जबाबदाऱ्या हा काळासोबत वाढलेल्या आहे. सुरक्षा परिषदेत पाच स्थायी व सहा अस्थायी सदस्य आहेत. सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्यांची संख्या ही १९६० च्या काळात सहा पासून दहा पर्यंत वाढविण्यात आली. तथापि स्थायी सदस्य संख्या ही आजपर्यंत पाचच राहिलेली आहे. म्हणून सुरक्षा परिषदेया स्थायी व अस्थायी सदस्य संख्या वाढविण्याची जोरदार मागणी आहे. जेणेकरून ही संघटना खरोखरीच प्रातिनिधिक व लोकशाही बनेल आणि तिच्या वाढीव जबाबदाऱ्या कार्यक्षमतेने पाया घालण्यास ती सक्षम बनेल. अजून म्हणजे सधया विकसनशील देशांद्वारे मोठ्या प्रमाणावर सदस्यता ग्रहण करणे सुरु आहे. आणि जुनीच रचना चालू असल्याने त्यांना अपूरे प्रतिनिधित्व मिळते. UNSC (UN सुरक्षा समिती) वर पाश्चात्य विकसित देशांचे वर्चस्व राहिलेले आहे आणि विकसनशील देशांना सुरक्षा परिषदेच्या निर्वाय प्रक्रियेपासून दूर ठेवले जाते. म्हणून आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका यांना त्यांच्या UN मधील त्यांच्या संख्याबलानुसार पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची विशेष मागणी आहे. जरी तेथे UN मधील सुधारणांसाठी एकमुखी मागणी असली तरी सुधारणांच्या स्वरुपावरुन सदस्य राष्ट्रात अत्यल्प एकमत व स्पष्टपणा आहे.

भारताने UN च्या सुधारणा व पुनर्रचना करण्याच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील चालू असलेल्या पुढाकाराला खंबीर पाठिंबा दिलेला आहे. जेणेकरुन जो आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेच्या उभरत्या आव्हांनाना परिणामकरित्या तोंड देऊ शकेल. भारत या गोष्टीवर जोर देत आहे की संयुक्त राष्ट्रांनी त्याची विश्वासर्हता व कार्यक्षमता वाढविताना खरोखर प्रतिनिधिक बनण्यासाठी सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. भारत हा संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेच्या रचनेविषयी अधिक चिंतीत आहे आणि त्याने त्याच्या विस्ताराची विनंती केली आहे. भारत हा सुरक्षा परिषद अधिक प्रतिनिधिक बनविण्यासाठी आणि UN ची वाढली सदस्यसंख्या प्रतिबिंबित करण्यासाठी तिच्या विस्ताराच्या पक्षात आहे. भारताचे म्हणणे आहे की सुरक्षा परिषदेच्या विस्ताराने तिची विश्वसनीयता वाढेल व तीला आंतरराष्ट्रीय समुदायात अधिक पाठिंबा मिळेल. भारताला स्थायी व अस्थायी अशी दोन्ही सदस्यसंख्या वाढणे हवे आहे.

भारत स्वतः UNSC च्या स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्याच्या स्पर्धेत आहे. भारत हा UN सुरक्षा परिषदेवर अस्थायी सदस्य म्हणून सातवेळा निवडून आलेला आहे आणि आता भारत हा ब्राझील, जर्मनी, जापान यांच्यासह संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेवरील स्थायी सदस्यत्व मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. भारत हा UNSC च्या स्थायी सदस्यत्वासाठी पुढील गोष्टीवरून दावा करतो.

- प्रचंड लोकसंख्या
- सर्वात मोठी लोकशाही
- वाढती आर्थिक ताकद, क्रय शक्ती समानता
- प्रचंड सैन्य दल
- भारताचे UN मधील त्याच्या आरंभापासूनचे विशेषतः शांती मोहिमातील योगदान
- UN ला वित्तीय पुरवठा

ही गोष्ट नमुद करणे गरजेचे आहे की, भारताला १९५५ मध्ये परिषदेवर स्थायी सदस्यत्व बहाल केले गेले होते. परंतू हा प्रस्ताव भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूकडून नाकारला गेला. नेहरूंनी सांगितले की, ते सदस्यत्व चीनला दिले जावे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) मागील सहा दशकातील भारताच्या UN मधील योगदानाची चर्चा करा.

२) भारताचा UN सुरक्षा परिषदेवरील दावा कोणत्या घटकांवर आधारीत आहे.

## १०.६ शांतता प्रस्थापित करणाऱ्या मोहिमा

शांतता मोहिम हि संज्ञा १९५० च्या काळात १९४७ मधील ग्रीसमधील UN मोहिमेच्या नंतर अस्तित्वात आली. दुसऱ्या महायुद्धा नंतरच्या पहिल्या दशकात UN ने मध्यस्थी केलेल्या युद्ध विरामांवर नियंत्रण ठेवण्याच्या UN च्या गरजेतून शांतता मोहिम विकसीत झाली. UN सनदीत शांतता मोहिम चालविण्यासाठी काहीही विशेष अटी टाकण्यात आलेल्या नाही तर UN सनदीच्या सहाव्या व सातव्या प्रकरणात सूचित सत्ता म्हणून नमूद आहे. UN चे माजी डेप्युटी सेक्रेटरी जनरल मराक गोल्डिंग यांनी शांतता मोहिमेची व्याख्या केली आहे. त्यांच्यानुसार, "संयुक्त राष्ट्रांच्या मैदानी मोहिमा ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय परिमाण असलेले वास्तविक किंवा संभाव्य आंतरराष्ट्रीय कल किंवा अंतर्गत कलहांना मदत करणे नियंत्रीत करणे किंवा सोडविण्यासाठी UN च्या हुकूमती अंतर्गत संबधीत पक्षांच्या संमतीने आंतरराष्ट्रीय कर्मचारी, नागरिक आणि सैन्य तैनात करणे."

शांतता मोहिमेचा शोध हा UN च्या इतिहासातील महत्त्वाचा विकास आहे. हे महत्त्वाचे आहे कारण शांतता मोहिमांचा आशय हा UN च्या घटनेच्या विरुद्ध जातो. UN ची घटना ही राज्यांमधील सार्वभौम समानता आणि राज्याच्या सार्वभौमत्वाचा आदर या दोन मुलभूत तत्वांवर आधारित आहे. UN ची रचना ही जरी आंतरराष्ट्रीय सत्तेसारखी असली तरी UN ची घटना सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गथ बाबीत ढवळाढवळ करण्याची परवानगी देत नाही. संयुक्त राष्ट्रांचे माजी महासचीव बुत्रोज घली यांनी परराष्ट्र बाबींवरील संपादित झालेल्या एका लेखात ही गोष्ट अगदी स्पष्ट केली आहे. "समदीच्या सावल्या परिच्छेदातील दुसऱ्या कलमाअंतर्गत UN हा कुठलाही सदस्य राष्ट्राच्या अंतर्गत बाबीत प्रतिबंधात्मक राजनैतिकतेच्या बुरख्याखाली किंवा मानवतावादी हेतूसाठी कधीही ढवळाढवळ करणार नाही." शांतता मोहिमा या राष्ट्रीय सार्वभौमत्वाच्या तत्वाचे उल्लंघन करतात. संबंधीत राष्ट्राच्या संमतीशिवाय सुद्धा शांततापणे हस्तक्षेप करतात. सुरक्षा विश्लेषक जसजित सिंग यांच्यानुसार "शांतता मोहिमेचा विस्तार हा

UN समदीच्या पायाच्या प्रत्यक्षपणे विरोधाभासाची आहे ज्यांने कायद्याची मुलभूत समस्या निर्माण झाली आहे. ”

शांततादलांचे शीत युद्धकार्य म्हणजे युद्ध विरामावर देखरेख करणे. सुरुवातीला शांतता मोहिमांचा वाव हा आंतरराष्ट्रीय वादातील युद्धखोर शत्रुना एकमेकांजवळ न येऊ देण्यापुरती सिमित होता. UN शांततादल हे कलह सोडविण्यासाठीचे अलिप्त दल म्हणून कार्य करायचे. शांतता मोहिमांना यद्धखोर पक्ष्यांकडून कायदेशीरता बहाल केली जायची. शांतता मोहिमेची अत्यावश्यक तत्वे म्हणजे कमीत कमी बळाचा वापर आणि नि:पक्षपातीपणा हि होती. सुरुवातीच्या शांततामोहिमा या UN सनदीच्या सहाव्या प्रकरणाच्या अटींतर्गत चालवल्या गेल्या. संबंधीत देशात शांतता दले तैनात करण्यापूर्वी UN आणि यजमान देश यांच्यात दलांच्या स्थितीवर कायदेशीरपणे सहमत व्हावे लागले.

शीत युद्धा दरम्यान जगाच्या बऱ्याच आपतग्रस्त क्षेत्रात जरी UN हस्तक्षेपाच्या मागण्या करण्यात आल्या तसे शीत युद्धातील गुप्त कार्यक्रम महासत्वांचे कलहग्रस्त हित आणि सुरक्षा परिषदेच्या पाच स्थायी सदस्यांमधील परस्पर विश्वासाचा अभाव यामुळे UN ला या मोहिमांना मान्यता देणे शक्य झाले नाही. शांतता मोहिमेच्या प्रस्तावाला एखाद्या स्थायी सदस्याच्या हिताच्या ते आड येत असल्यास मनाई केली जाते. शीतयुद्ध काळात आंतरराज्यीय कलह नियंत्रणासाठी शांतता मोहिमांशी संबंधीत बरेच प्रस्ताव सुरक्षा परिषदेत चर्चेसाठी आले. तथापी शीतयुद्ध डावपेचाचा भाग म्हणून US किंवा USSR कडून नकाराधीकार वापरला गेला. या काळात फक्त १३ प्रस्तावांना स्विकृती मिळाली. आणि शांतता मोहिमा मंजूर झाल्या याउलट शीत युद्धोत्तर काळात १९९० पासून २००९ पर्यंत ४७ शांतता मोहिमांना अमेरिका किंवा USSR च्या हस्तक्षेपाने यश मिळू शकले नाही.

शीत युद्धोत्तर काळात शांतता मोहिमा कृतींचे स्वरुप व कार्यपद्धती बदलली आहे. आता शांतता प्रस्थापित करणे ही वेगळ्या प्रकारची मोहिम आहे. ज्यात कलह व्यवस्थापनासाठी UN ने सैन्य दल तैनात केले आहे. आजच्या शांतता मोहिमेतील UN शांतता दलांची भूमिका म्हणजे एखाद्या राज्यातील चालू असलेली लढाई थांबवणे, युद्धविराम टिकवणे आणि वाटाघाटीद्वारे कलहाच्या शांततामय निराकरणासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) UN शांतता मोहिम कृतींचे स्वरुप व भूमिका यावर चर्चा करा.

२) शीत युद्धोत्तर काळातील UN शांतता मोहिमातील दर्जात्मक बदली थोडक्यात चर्चा करा.

## १०.७ UN शांतता मोहिमेतील भारताचे योगदान

भारताचे UN मधील महत्वपूर्ण योगदान म्हणजे शांतता मोहिमा. भारत हा मोहिमांची संख्या, दल अधिकारी आणि कर्मचारी यांच्या भाषेत सर्वात मोठा योगदाता आहे. सध्या भारत हा बांग्लादेश आणि पाकिस्तान नंतर UN च्या परदेशी कामावरील ९३३२ भारतीय सैनिक आणि पोलिसांसह तिसरा सर्वात मोठा योगदाता आहे. भारताचे शांतता मोहिमांमधील योगदान हे UN सनदीत नमूद केलेल्या उद्दीष्टांचे प्रतिबिंद आहे. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा टिकवणे हे UN चे मुख्य उद्दिष्ट आहे आणि भारत हे ध्येय साध्य करण्या प्रती योगदान देत आहे.

भारताच्या स्वातंत्र्यापासून भारत हा UN शांतता मोहिमात कमी अधिक क्षमतेने सक्रियपणे योगदान देत आहे. या योगदानामुळे भारताने सर्व जग भरावून खूप साऱ्या सदिच्छा प्राप्त केलेल्या आहेत. भारत हा १९५० पासून UN शांतता मोहिमांचा सर्वात मोठा सैन्य तुकडी योगदाता आहे. आजपर्यंत भारताने ४३ UN शांतता मोहिमांमध्ये सहभाग नोंदविलेला आहे आणि १,५०,००० पेक्षा अधिक तुकड्या भारताद्वारे तैनात केल्या गेल्या आहेत. UN मोहिमांवर सेवा बजावताना १३५ भारतीय सैनिकांनी त्यांच्या प्राणांचे बलिदान केलेले आहे. या व्यतिरिक्त भारताने विविध UN मोहिमांवर लष्करी सल्लागार पुरविले आहेत. UN वरील एक तज्ञ रमेश ठाकूर यांच्या नुसार UN मोहिमांवर तुकड्यांच्या योगदानासाठी भारताला का सांगितले जाते याची मुख्यतः ३ कारणे आहेत.

१) त्याच्या लष्करी दलाचा आकार व व्यावसायिकता.
२) अगदी अलिकडे पर्यंत बहुतांश विकसनशील देशांच्या अशा दलांचा अभाव.
३) जागतिक कामकाजातील भारताचा प्रभाव.

भारत UN ला शांतता मोहिमांद्वारे शांतता मोहिमांच्या आरंभापासून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा टिकविण्यास मदत करत आहे. भारताचे शांतता मोहिमांमधील योगदान १९५०-५४ च्या कोरियाई वैद्यकीय गटासोबत सुरू होऊन २००७ च्या लिबेरिया मोहिमेंपर्यंत होते. भारत हा कोरिया, भारत-चीन, मध्य-पूर्व, कांगो, कंबोडिया, मोझांम्बिक, सोमालिया रवांडा, आंगोला, सीयरालेवन, इथिओपिया, लेबनार्न, सुदान, आयव्हरीकोस्ट, ईस्ट तिमोर आणि हैथीच्या UN शांतता मोहिमात आतापर्यंत सहभागी झाला आहे. भारत हा बांगलादेश आणि पाकिस्ताननंतर संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमांत सैनिक तुकड्यांचा तिसरा सर्वात मोठा योगदाना आहे. अलिकडील काळात ८६८० भारतीय कर्मचारी परदेशात तैनात आहेत. ज्यापैकी १४ शांतता मोहिमांपैकी ९ मध्ये २७ स्त्रिया आहेत.

भारतीय तुकड्यांना त्यांचा अनुभव, चांगले प्रशिक्षण आणि उपकरणे आणि निर्दोष शिस्तीचा पूर्व इतिहास यामुळे अधिक मागणी आहे. तुकड्यांच्या योगदाना व्यतिरिक्त भारताने विविध मोहिमांत दल अधिकारी पुरविले आहेत आणि त्यांची कौशल्य व अनुभव यांचा उपयोग विशेषतः शांतता मोहिमा यशस्वीपणे पार पाडण्यात UN सोबतच्या काही कृती आणि गमिनी युद्धात करून घेतला आहे. २०११-१२ मध्ये ३ भारतीय लष्करी अधिकारी हे शांतता दलात महत्त्वपूर्ण पदावर आहेत. लेफ्टनंट जनरल रणधीर कुमार मेहता हे UN सेक्रेटरी जनरलचे

लष्करी सल्लागार आहेत आणि दोन वरिष्ठ लष्करी अधिकारी हे UN शांतता मोहिमेचे २०११ पर्यंत नेतृत्व करत होते. तसेच भारत हा इतर देशातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही पुरवत आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) UN शांतता मोहिमांतील भारताच्या योगदानाची चर्चा करा.

२) UN शांतता मोहिमात भारताला योगदान देण्यास का सांगितले जाते.

## १०.८ सारांश

१. UN ही आंतरराष्ट्रीय समुदायातील १९३ देशांचे प्रतिनिधीत्व करते. ही एकमेव आंतर सरकारी संघटना आहे. जी खरोखरच जागतिक समुदायाला दर्शविते. UN ही संघटना आंतरराष्ट्रीय कलहाला अटकाव करण्यास आणि राष्ट्रांमधील सहकार्य सुकर करण्यास कटीबद्ध आहे.

२. भारताच्या संयुक्त राष्ट्रासोबतच्या संबंधाचा दीर्घ इतिहास आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांशी तिच्या स्थापनेपासूनच चांगले संबंध टिकविले आहे.

३. शीत युद्धोत्तर काळातील उद्भवणाऱ्या आव्हानांना आणि विशेतः आंतरराष्ट्रीय बाबींमधील UN च्या अरेरावीला तोंड देण्यासाठी UN च्या पुनर्रचनेच्या मागणीने जोर धरला.

४. भारत स्वतः UNSC च्या स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्याच्या स्पर्धेत आहे. भारत हा UN सुरक्षा परिषदेवर अस्थायी सदस्य म्हणून सातवेळा निवडून आलेला आहे आणि आता भारत हा ब्राझील, जर्मनी व जापान यांच्यासह संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेवरील स्थायी सदस्यत्व मिळविण्याच्या प्रयत्नात आहे.

५. शांतता मोहिम ही संज्ञा १९५० च्या काळात १९४७ मधील ग्रीसमधील UN मोहिमेच्या नंतर अस्तित्वात आली. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पहिल्या दशकात UN ने मध्यस्थी केलेल्या युद्धविरामांवर नियंत्रण ठेवण्याच्या UN च्या गरजेतून शांतता मोहिम विकसित झाली.

६. भारताने UN मधील सर्वात महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे शांतता मोहिमा या होत. भारत हा मोहिमांची संख्या, दल अधिकारी आणि कर्मचारी यांच्या भाषेत सर्वात मोठा योगदाता आहे.

७. भारत हा कोरीया, भारत-चीन, मध्य पूर्व, काँगो, कंबोडीया, मोझांबिक, सोमालिया, रवांडा, अंगोला, सिलरा लेवन, इथिओपिया, लेबनॉन, सुदान, आयव्हरी कोस्ट, पूर्व टिमोर, हैथी च्या

UN शांतता मोहिमात आतापर्यंत सहभागी झाला आहे. भारत हा बांगलादेश व पाकिस्तान नंतर संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमात सैनिक तुकड्यांचा तिसरा सर्वात मोठा योगदाता आहे.

८. भारतीय तुकड्यांना त्यांचा अनुभव, चांगले प्रशिक्षण व उपकरणे आणि निर्दोष शिस्तीचा पूर्वेतिहास यामुळे अधिक मागणी आहे.

## १०.९ विभागवार प्रश्न

१) UN चे पायाभूत हेतू, मुलभूत तत्त्वे आणि रचना यावर चर्चा करा.

२) मागील सहा दशकातील भारताची UN शी असलेली सोबत यावर चर्चा करा.

३) भारताचे UN शांतता दलातील योगदानाचे मूल्यमापन करा.

४) तुम्हाला वाटते का की भारत हा UN सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य बनण्यास पात्र आहे? कारणे द्या.

## १०.१० संदर्भसूची


* Thomas Weiss, Forsythe, The United Nations and Changing World Politics (Oxford : West View Press, 1997)
* Stanley Meisler, United Nations : The first fifty years (New York : Atlantic Monthly Press, 1997)
* Linda Fasulo, An Insider guide to UN. (London Yale University Press, 2009)


❖❖❖❖

# ११

# भारताचे आण्विक धोरण

**विभाग रचना:**

११.० उद्देश
११.१ परिचय
११.२ भारत आणि आण्विक नि:शस्त्रीकरण
११.३ आण्विक संदिग्धतेचा वारसा
११.४ आण्विक भारत
११.५ भारतातील आण्विक चर्चा
११.६ आण्विकीकरणाची सक्ती
११.७ भारताची आण्विक तत्त्व प्रणाली
११.८ NPT व CTBT वरील भारताचा पवित्रा
११.९ भारताच्या आण्विक प्रतिबंधकाचा विकास
११.१० दक्षिण आशियाचे आण्विकीकरण : डावपेचात्मक सूचित अर्थ
११.११ सारांश
११.१२ विभागवार प्रश्न

## ११.० उद्देश :

हा विभाग भारताच्या स्वातंत्र्यापासूनच्या भारताच्या आण्विक धोरणाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो. हा विभाग आण्विक नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रास्त्र स्पर्धा, NPT, CTBT यावरील भारताच्या पवित्र्यावर चर्चा करण्यासह भारताच्या आण्विक धोरणाच्या विकासावर जोर देतो. त्याच वेळेस हा विभाग आण्विकीकरणामागील सक्ती आणि भारताच्या आण्विक प्रणालीच्या रचनेचा शोध घेतो. या विभागाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी हा शस्त्रास्त्र स्पर्धा आणि नि:शस्त्रीकरण संबंधित मुद्दे यावरील भारताचा पवित्रा समजून घेण्यासोबतच भारताच्या आण्विक धोरणाचा विकास समजून घेण्यास समर्थ ठरतील.

## ११.१ परिचय :

भारताला आण्विक युगात स्वातंत्र्य मिळाले ही ती वेळ होती जेव्हा अमेरिकेने दोन जपानी शहरांवर टाकलेल्या अणूबाँब ने निर्माण झालेल्या विनाशाला सर्व जग साक्षी राहिले.

दुसऱ्या जागतिक युद्धानंतर अण्वस्त्र स्पर्धेने पृथ्वीवरील मानव जातीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला. अण्वस्त्रे प्राप्त करण्याच्या बऱ्याच राष्ट्रांमधील खुळी स्पर्धा ही सर्व प्रकारच्या आण्विक हस्तांतरणात परिणत झाली. १९६० पर्यंत अमेरिका USSR, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या पाच राष्ट्रांनी अण्वस्त्र विकसीत करण्याची क्षमता प्राप्त केली. शेकडो अण्वस्त्रांनी भरलेल्या या जगात भारताने एका बाजूला शांततामय आण्विक धोरण स्विकारायचे ठरवले, तर दुसऱ्या बाजूला संपूर्ण अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाची मागणी केली. स्वातंत्र्यानंतर भारताने सर्वकष आर्थिक विकास कार्यक्रमीच सुरुवात केली आणि भारताच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी अणूउर्जेचा वापर करण्याचे ठरवले. त्यावेळेच्या भारताच्या राजकीय पुढाऱ्यांनी भारतीय शास्त्रज्ञांना विकास कार्याकरता स्वतःचे आण्विक तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी उत्तेजन दिले.

## ११.२ भारत आणि आण्विक निःशस्त्रीकरण

भारताने अण्वस्त्र हस्तांतरण विरोधी निर्दोष पूर्वेतिहास टिकविलेला आहे. स्वातंत्र्यापासूनच भारत हा लिखित व कृतीतून सर्वसामान्य आणि संपूर्ण निःशस्त्रीकरणाच्या ध्येयाला बांधील राहिलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अगदी स्पष्टपणे सांगितले की भारताची अण्वस्त्र विकसीत करण्याची कुठलीही योजना नाही आणि भारताचा आण्विक कार्यक्रम हा शांतता व विकासासाठी आहे. भारताचा अण्वस्त्र आणि सर्व प्रकारच्या स्पर्धांना असलेला विरोध हा १९५० मध्येच दिसून आला. १९५० च्या सुरुवातीला आण्विक उर्जेच्या वापरावरील नियंत्रणासाठीच्या UN अणूउर्जा आयोगाच्या प्रस्तावाला भारताने पाठिंबा दिला. या प्रस्तावाला समर्थन करताना भारताने जागतिक समुदायाला फक्त शांततामय हेतूस्तव अणूउर्जेचा वापर मयार्दित ठेवण्यासाठी आणि अण्वस्त्रांच्या वापरापासून दुर राहण्याचे आवाहन केले. १९५४ मध्ये भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला अणूचाचणीवर बंदी घालण्याचे आवाहन केले. सर्व प्रकारच्या अणूचाचणीवर बंदी घालण्याचे आवाहन करणारा भारत पहिला देश होता. भारताने १९६३ च्या अंशिक अणू-चाचणी बंदी कराराला पाठिंबा दिला आणि त्यात सहभागी झाला. १९६० च्या उत्तरार्धात UN च्या आमसभेने सर्व अण्वस्त्रांच्या निःशस्त्रीकरणाचा आणि नष्ट करण्याचा ठराव एकमुखाने संमत केला. १९६८ चा आण्विक हस्तांतरण विरोधी करार त्याच ठरावावर आधारित होता. तथापी भारताने NPT च्या अटींविरोधी स्वतःच्या हितासाठी या करावर सही करण्यास नकार दिला. १९७४ मध्ये भारताने स्वतःची पहिली अणू चाचणी घेतली जिला शांततामय आण्विक स्फोट संबोधले गेले. अणूचाचणी नंतर सुद्धा भारताने आण्विक शस्त्रास्त्र कार्यक्रम सुरू केला नाही आणि आण्विक निःशस्त्री करणाचे कार्य चालू ठेवले. १९७८ मध्ये भारताने आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी बोलणी करण्याचा प्रस्ताव ठेवला. जो अण्वस्त्रांचा वापर किंवा त्याचा वापर करण्याच्या धमकीला अटकाव करेल. १९८२ मध्ये भारताने 'आण्विक गोठवणूक' म्हणजेच आण्विक शस्त्रांसाठी विखंडन साहित्याच्या उत्पादनावर, अण्वस्त्रांच्या उत्पादनावर आणि संबंधीत वाहक पद्धतीवर बंदीचे आवाहन केले. १९८८ मध्ये त्यावेळचे भारतीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी UN आमसभेत जागतिक आणि क्षेत्रीय अण्वस्त्रे निःशस्त्रीकरणासाठीची कृती योजना टप्प्याटप्प्याने करण्याचा प्रस्ताव ठेवला. या योजनेने जागतिक निःशस्त्रीकरणासह क्षेत्रीय निःशस्त्रीकरण सुचवले. 'अण्वस्त्रमुक्त आणि अहिंसक जागतिक व्यवस्था आणण्यासाठीची कृती योजना' असे या योजनेचे नामकरण केले गेले. ही कृती योजना २०१० पर्यंत ३ टप्प्यात सर्व अण्वस्त्रांचे निराकरणासाठी आखली गेली. या योजनेच्या अटीनुसार २०१० पर्यंत टप्प्याटप्प्याने सर्व अण्वस्त्रे संपविण्याची सर्व देशांची

बंधनकारक जबाबदारी आहे. अजुन म्हणजे सर्व अण्वस्त्र संपन्न राष्ट्रांनी या आण्विक निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी व्हायलाच हवे. इतर सर्व देशांनी सुद्धा या प्रक्रियेचा भाग बनायलाच हवे. या योजनेने संयुक्त राष्ट्राच्या आश्रयाखाली एक सर्वंकष जागतिक सुरक्षा व्यवस्था स्थापण्याचे आवाहन केले. काही तज्ञ मानतात की ही कृतीयोजना म्हणजे पाकिस्तानचा अण्वस्त्र कार्यक्रम भारताच्या आणण्याचा प्रयत्न होता. जरी भारताने ११ आणि १३ मे १९९८ रोजी अणूचाचण्या केल्या आणि स्वतःला अण्वस्त्रधारी राज्य घोषित केले, तरी त्याने पुढील अणूचाचण्यासाठी स्वयंअनुशासनाचा अधिकार लगेच जाहिर केला. तसेच भारताने जाहिर केले की तो त्यांच्या सुरक्षेसाठी कमीत कमी विश्वसनीय आण्विक प्रतिबंध टिकवेल.

**आपली प्रगती तपासा :-**

१) १९६० च्या अंतापर्यंत कोणत्या देशांनी अण्वस्त्र विकसीत करण्याची क्षमता प्राप्त केली ?

२) भारताने दुसरी अणूचाचणी केव्हा पार पाडली.

## ११.३ आण्विक संदिग्धतेचा वारसा

कित्येक विश्लेषक मानतात की, भारताचे आण्विक धोरण हे संदिग्धतेने भरलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे राजकीय नेते हे त्या बेबंदशाही जगात भारताच्या डावपेचात्मक संरक्षणाच्या हितासाठी अण्वस्त्राच्या गरजेविषयी परस्पर विरोधी भूमिका असणारे होते. हि संदिग्धता विरोधाभासी धोरणांपासून उद्‌भवली. उदा.

१. एका बाजूला भारताने अण्वस्त्राप्रती तीव्र नापसंती दर्शविली आणि अण्वस्त्रांच्या जागतिक बंदीची हाक दिली तर दुसऱ्या बाजूला भारताने विखंडन उत्पादनाच्या निर्मितीची क्षमता टिकविली.

२. भारताने अण्वस्त्रांच्या हस्तांतरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक स्थरावर संघटन रचनेच्या निर्मितीची हाक दिली आणि त्याच वेळेस अण्वस्त्र विकसीत करण्याच्या त्याच्या अधिकारावरील कुठल्याही बाह्य, राजकीय किंवा कायदेशीर बंधनाला झुगारले.

३. भारताने जरी त्याचा आण्विक पर्याय खुला ठेवला तरी त्याने तो दोलायमान अवस्थेत ठेवला. अणूबाँब निर्मितीची योजना ना त्याने व्यक्त केली ना त्यावरील हक्क सोडला.

४. जरी भारताने आण्विक चाचणी पार पाडली आणि अणूबाँब बनवण्याची त्याची क्षमता सिद्ध केली तरी त्याने त्याचा विकास करण्यापासून दूर ठेवले. भारताने त्याची पहिली अणूचाचणी घेतल्यानंतर अणूबाँब बनवण्यासंक्ष जवळ जवळ २४ वर्ष घेतली.

## ११.४ आण्विक भारत

**आण्विक समर्थ राष्ट्रापासून अण्वस्त्र संपन्न राष्ट्रापर्यंतचा भारताचा विकास :**

आण्विक समर्थ राष्ट्रापासून अण्वस्त्र संपन्न राष्ट्रापर्यंतचा भारताचा विकास हा त्याच्या शत्रु राष्ट्र पाकिस्तानच्या तुलनेत खूपच समाधान पूर्ण व हळू आहे. स्वातंत्र्यापासूनच भारत हा अणूउर्जेचा वापर शांततामय हेतूस्तव करण्यास बांधील होता. भारत हा आण्विक उर्जेचा वापर विकासात्मक हेतूसाठी करण्याच्या बाजूने होता. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी अणूउर्जेचे महत्व आणले. भारतीय शास्त्रज्ञांची खात्री होती की अणूउर्जा ही विकास प्रक्रियेला गती देईल. स्वातंत्र्यापासून भारताने नागरी अणू संशोधनाचे कार्य लघु पातळीवर US व कॅनडाच्या साहाय्याने सुरू केले. भारताने या देशांकडून अणूसंयत्र, जडपाणी आणि समृद्ध युरेनिअम प्राप्त केला. बऱ्याच तज्ञांचे म्हणणे आहे की जरी भारत हा १९५० च्या काळात अण्वस्त्रे विकसीत करण्यास सक्षम होता. तरी भारताने अण्वस्त्र कार्यक्रम सुरू केला नाही. भारताने हे धोरण संपूर्ण शीतयुद्ध काळात टिकवले.

तथापी १९७० च्या काळात विविध अंतर्गत व बाह्यदबावाने भारताला त्याचे आण्विक धोरण बदलणे भाग पडले. १९६० मधील भारत-चीन युद्ध आणि १९६४ मधील चीनचा अणूस्फोट यामुळे भारताला त्याच्या आण्विक धोरणावर पुनर्विचार करण्यास बाध्य केले. त्या वेळच्या भारतीय पंतप्रधान श्रीमती इंदिरागांधी यांनी हे स्पष्ट केले की, त्यांच्या सरकारचे आण्विक धोरण हे भारतीय सुरक्षेला असलेल्या संभाव्य धोक्याच्या आधारे आखले जावे. १९७० मधील दक्षिण आशियाई उपखंडातील अस्थिर सुरक्षा वातावरणाला लक्षात घेता भारताने अणूचाचणी घेण्याचे ठरविले. १९७४ मध्ये भारताने पहिली अणूचाचणी घेतली आणि जगाला दाखवून दिले की भारत अणूबाँब बनवण्यास तयार आहे हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की अणूबाँब बनवण्याची क्षमता असूनसुद्धा शस्त्र संपन्नतेचा मार्ग अनुसरला नाही. पहिल्या अणूचाचणीनंतर भारताला स्वतःला अण्वस्त्र सज्ज राष्ट्र म्हणून घोषित करण्यास आणि अणूबाँब बनविण्यास २४ वर्ष लागली.

शीत युद्धोत्तर काळात पाकिस्तानच्या आण्विक क्षमतेतील स्थिर वाढ, वाढता चिनी आण्विक धोका आणि पाकिस्तान चीन आण्विक संबंध यामुळे भारताला आण्विक पर्याय खुला ठेवण्याचा त्याचा पारंपारिक पवित्रा बदलणे भाग पाडले. मे १९९८ मध्ये भारताने भूगर्भाखाली ५ अणूचाचण्या केल्या आणि भारतीय आण्विक धोरणा संदर्भात असलेला चार दशकांचा दिर्घकालीन असंदिग्धता आणि अनिश्चितेचा कालखंडाचा शेवट केला. भारताचा १९९८ चा पुढे अणूचाचणी घेण्याचा आणि अणूबाँब बनवण्याचा निर्णय हा आण्विक क्षेत्रातील नविन कालखंडाची सुरुवात होती.

**आपली प्रगती तपासा :-**

१) भारताने त्याची पहिली अणूचाचणी कोणत्या वर्षी पार पाडली.

२) भारताने स्वतःला अण्वस्त्र सज्ज राष्ट्र म्हणून केव्हा घोषित केले.

## ११.५ भारतातील आण्विक चर्चा :-

भारताचे आण्विक धोरण हे अणूउर्जेच्या वापरावरील चर्चेच्या मालिकेद्वारे विकसीत झाले. १९५० पासून तर १९९० पर्यंत शास्त्रज्ञ लष्करी विश्लेषक आणि राजकारणी लोकांचे वर्ग होते ज्यांनी अणूउर्जेचा वापर विनाशाच्या हेतुस्तव करण्याला एक तर पाठिंबा दिला किंवा नाऊमेद केले. शीत युद्ध काळात भारतातील अणूचर्चा ही भारताने अण्वस्त्र तयार करावे की नाही या एकाच मुद्द्याभोवती घुटमळत होती. या चर्चेत असलेले सहभागी व्यक्ती म्हणजे त्यावेळचे शास्त्रज्ञ व राजकिय पुढारी होते. स्वातंत्र्यानंतर लगेचच अणूउर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष डॉ. होमी भाभा यांनी सुचविले की, भारताने एकतर अण्वस्त्र सज्ज राष्ट्रांकडून सुरक्षेची हमी मिळवावी किंवा त्यांची स्वतःची अण्वस्त्रे विकसीत करावी. नेहरूंच्या आण्विक सल्लागारांनी सुद्धा जागतिक निशस्त्री करणाची ध्येय साध्य न झाल्यास त्यांना अण्वस्त्र सज्ज बनविण्यास सुचविले. तथापि भारतीय अणूशास्त्रज्ञांची ही जाण त्यावेळच्या राजकीय नेत्यांनी समजून घेतली नाही. भारताचे स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय नेतृत्व आणि खास करून नेहरू यांना अण्वस्त्राबद्दल तीव्र तिटकारा होता आणि म्हणून त्यांनी डॉ. भाभा आणि इतर अणूशास्त्रज्ञांचा भारताच्या अण्वस्त्र सज्जतेचा प्रस्ताव नाकारला. अणूधोरणावरील त्यांचा पवित्रा स्पष्ट करतांना १९५७ मध्ये नेहरू म्हणाले, ''मला वाटते मी भारताच्या कुठल्याही भावी सरकारच्या वतीने काही खात्री देऊ शकतो की जे काही घडो, जी काही परिस्थीती निर्माण होओ. आपण या अणूउर्जेचा वापर विनाशासाठी कधीही करता कामा नये.''

ह्याच मुद्द्यावरील चर्चा ही शीत युद्धोत्तर काळात सुद्धा चालू राहिली. शीत युद्धोत्तर काळात स्टीफन कोहेन यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे तीन वैचारिक गट होते. ज्यांनी भारताच्या अणू धोरणाची चर्चा केली.

१. पहिला गट हा नव उदारमतवाद्याचा होता. ज्यांनी आर्थिक सुधारणा आणि आर्थिक वाढीवर जोर दिला आणि सांगितले की ठाम आण्विक व परराष्ट्र धोरण हे आर्थिक प्रगतीच्या भारतीय प्रयत्नांना धोका पोहचवू शकतो.

२. हा दुसऱ्या गटाने डावेपेचात्मक ताब्याचा नेहरूंचा वारसा दशर्विला आणि आण्विक क्षेत्रात कृतीच्या स्वातंत्र्यावर भर दिला.

३. तिसऱ्या गटात बहुतांश उजव्या विचार सरणीचे लोक होते. ज्यांनी भारतासाठी मजबूत संरक्षण आणि अणुबाँबच्या विकासाचा सल्ला दिला. (Stephan Cohen, Arming without Aiming, India's Military modernization, Brooking Institution 2010).

भारतातील आण्विक चर्चा ही आण्विकीकरणाच्या भारताच्या निर्णयानंतरसुद्धा सुरूच राहिली. शस्त्रसज्जतेचा भारत-पाक संबंधावरील डावपेचात्मक परिणाम आणि अणुचाचण्यांवरील भारताचा स्वयंअनुशासनाचा पवित्रा हे चर्चेचे मुद्दे राहिले. भारत व पाकिस्तानच्या १९९८ च्या अणुचाचण्यानंतर बऱ्याच भारतीय व परदेशी लष्करतज्ञांनी सांगितले की पाकिस्तान अण्वस्त्राचा वापर जम्मू काश्मिर मधील त्याचे ध्येय पुढे रेटण्यासाठी करेल. त्याच वेळेस काहींनी भारत-पाकिस्तानमधील पुढील युद्धाच्या वाढीव धोक्यावर जोर दिला. (Stephen Kinzer, Kashmir gets scarier, the new York time, P. 11) नोव्हेंबर २००८ मधील भारतावरील हल्ल्यानंतर काही अणुतज्ञांकडून वाढती मागणी आहे की पाकिस्तान चीनकडून असलेल्या वाढत्या धोक्याला अनुसरून भारताने पुढील अणुचाचण्या करावयास हव्यात. भारताचे प्रथम वापर न करण्याच्या तत्वावर सुद्धा पुनर्विचार करण्याची मागणी आहे. गुप्तहेर संस्थांच्या पक्क्या खात्रीनुसार पाकिस्तानजवळ ९० अण्वस्त्रे आहेत व तो विखंडन उत्पादन सतत निर्माण करीत असल्याच्या बातम्यांनी वरील मागणी जोर धरत आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) भारतीय अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष कोण होते ?

२) शीतयुद्धोत्तर काळातील भारताच्या अण्विक धोरणावर चर्चा करणाऱ्या तीन गटांची नावे सांगा.

## ११.६ आण्विकीकरणाची सक्ती

### (१) दक्षिण आशियातील बिघडत चाललेले सुरक्षा वातावरण -

शीतयुद्धोत्तर काळात दक्षिण आशियातील सुरक्षा वातावरण हे विविध घटनांमुळे बिघडत चाललेले आहे. चीन व पाकिस्तानकडून वाढणाऱ्या सुरक्षा धोक्यानी भारतासाठी डावपेचात्मक समस्या निर्माण केल्या. दोन्ही देशांजवळ अण्वस्त्रे आहेत आणि त्यांनी भारताला अनिश्चित स्थितीत आणले. जेथे भारताला तुलनात्मक क्षमता प्राप्त करणे भाग पडले. भारतीय पंतप्रधान ए. बी. वाजपेयी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांना लिहिलेल्या पत्रात (ज्याची गोपनीयता उघड झाली व ते १४ मे १९९८ रोजी न्यूयॉर्क टाईम्स मध्ये प्रकाशित झाले) चिनी धोका व त्यामुळे भारताला अणुबाँब बनवणे कसे भाग पडले हे स्पष्टपणे नमूद व अधोरेखित केले

आहे. पंतप्रधान वाजपेयी यांनी दक्षिण आशियातील बिघडत चाललेले सुरक्षा वातावरण आणि त्याचे भारतीय सुरक्षेवरील परिणाम नमूद केले आहेत. त्यांनी दर्शविले की चीनची पाकिस्तानला आण्विक मदत असून कशा प्रकारे चीनसारखे एक उघड अणुराष्ट्र हे पाकिस्तानला प्रच्छन्न अणू राष्ट्र बनण्यास मदत करत आहे. सुस्थापित नसलेल्या सीमा प्रश्नांमुळे उद्‌भवणाऱ्या दक्षिण आशियातील अविश्वासाच्या वातावरणावरसुद्धा वाजपेयींनी चिंता व्यक्त केली. तीच धोक्याची जाण ही त्यावेळचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्या स्पष्टीकरणात प्रतिध्वनीत झाली. त्यावेळचे भारताच्या पंतप्रधानांचे राष्टीय सुरक्षा सल्लागार ब्रजेश मिश्रा यांची अणुसज्जतेच्या सक्तीवर भाष्य करतांना स्पष्टपणे प्रतिपादले, ''पूर्वीच्या सरकारप्रमाणेच हे सरकार सुद्धा भारताच्या शेजारील आण्विक वातावरणाविषयी खूपच चिंतीत आहे. या चाचण्या भारतीय लोकांना खात्री देतील की, त्यांचे राष्ट्रीय सुरक्षा हित हे सर्वात महत्त्वाचे आहे आणि त्याला वाव दिला जाईल व त्याचे संरक्षण केले जाईल.'' (Brijesh Mishra, Government concern over the nuclear environment in the neighbourhood, the hindu, 16th May, 1998, P. 1) त्याचवेळेस NDA सरकारने हे स्पष्ट केले, ''या चाचण्या कोणत्याही देशाला अनुलक्षून नाही आणि त्याचा अर्थ या क्षेत्रातील भू-डावपेचात्मक धोक्यांना संतुलित करण्याचा एक विश्वसनीय पर्याय पुरविणे हा आहे.'' (The hindu, 14 May 1998, nuclear tests not directed towards any country, P. 1)

### (२) चिनी धोका

अण्वस्त्र प्राप्त करण्याच्या भारताच्या शोधाचे मूळ हे चीनची अण्वस्त्र सज्जता, चिनी आक्रमणाचा धोका आणि चीन-पाकिस्तान आण्विक संबंध यात दडलेले आहे. १९६४ मध्ये चीनने केलेल्या पहिल्या अणुचाचणीनंतर भारताचे आण्विक धोरणे हे आमूलाग्र बदलले. १९६२ मध्ये चीनकडून पराभव झाल्यानंतर व चीनच्या अणुचाचणीने भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा धोका स्वभावतःच वाढला. ज्यामुळे भारताने १९७४ मध्ये पहिली अणुचाचणी केली. १९९८ मधील दुसऱ्या अणुचाचणीचा निर्णय हा सुद्‌धा चीनी घटकाने प्रभावित होता. चीनची वाढती लष्करी ताकद आणि रेंगाळणाऱ्या सीमा प्रश्नामुळे असलेली त्याची भारताशी उघड शत्रुता यामुळे भारतावर दडपण आणले.

### (३) चीन-पाकिस्तान आण्विक संबंध

चीनचे पाकिस्तानला आण्विक सहाय्य हा भारतासाठी गंभीर चिंतेचा मुद्दा असून दक्षिण आशियातील आण्विक हस्तांतरणासाठी कारणीभूत सुद्धा आहे. चीनचे पाकिस्तानला त्याच्या अणुकार्यक्रमाच्या बांधणीत १९७० पासून मदत केली आहे. चीनने पाकिस्तानला अती समृद्‌ध युरेनिअमचा पुरवठा, युरेनिअमच्या प्रक्रियेसाठी आवश्यक बांगडी चुंबक व इतर आवश्यक गोष्टींचा पुरवठा केला. चीनने पाकिस्तानी अभियंते व शास्त्रज्ञांनासुद्धा प्रशिक्षित केल्याचे समजते. १९९० च्या सुरुवातीस चीनने पाकिस्तानला १८६ मैल पल्ला असलेले अण्वस्त्र वाहक क्षेपणास्त्र $M_{11}$ पुरविले. चीनने पाकिस्तानला लघु पल्ल्याचे क्षेपणास्त्र तंत्रज्ञानसुद्धा पुरविले. कित्येक गुप्तहेर अहवालांनी नोंदवल्यानुसार पाकिस्तानी अणुबॉंब ही चीनने पुरविलेल्या नक्कलीवर अधारीत आहे. १९८० च्या अंतापर्यंत चीनच्या मदतीमुळे पाकिस्तानजवळ अण्वस्त्रे असण्याविषयी खात्रीशील अहवाल होते. १९९५ मध्ये चीनने पाकिस्तानला पाच हजारपेक्षा जास् बांगडी चुंबक (रींग चुंबक) विकले. (Washington Past, 5th Feb. 1996) वॉशिंग्टनचा वारसा प्रतिष्ठानने चीनची पाकिस्तानला आण्विक सहाय्यता व त्याचे भारतावरील परिणाम यावरील अहवाल ''पाकिस्तानला चीनच्या आण्विक मदतीचे डावपेचात्मक परिणाम''

तयार केला. या अहवालाने दर्शविले की, ''पाकिस्तानच्या अणुकार्यक्रमातील चीनच्या सखोल गुंतवणुकीमुळे नवीन भारत सरकारला आण्विक चाचणीचा निर्णय घ्यावयास लावले.'' (Fisher Richard and John Dori "The strategic implications of China's nuclear aid to Pakistan" Washington : Heritage Foundation, 1998 हा अहवाल पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
http://www.heritage.org/Research/Asiaandpacific/EM532.cfm)

या अहवालाने दक्षिण आशियातील आण्विक हस्तांतरणास आणि दक्षिण आशियात आण्विक युद्धाचा धोका वाढविण्यास स्पष्टपणे चीनला जबाबदार धरले.

**(४) भेदभावपूर्ण आण्विक पद्धती -**

आण्विक क्षेत्रात अण्वस्त्र समृद्ध देशांनी त्यांचे वर्चस्व टिकविण्यासाठी निर्माण केलेल्या NPT (आण्विक हस्तांतरण न करण्याचा करार) आणि CTBT (सर्वकष अणुचाचणी बंदी करार) च्या भेदभावपूर्ण आण्विक पद्धती हे सुद्धा भारताला अणुचाचणी करण्यास बाध्य करणारे एक कारण आहे. NPT व CTBT कराराने निर्माण केलेली आण्विक पद्ती ही सर्व अण्वस्त्रांच्या निराकारण करण्याच्या सार्वत्रिक तंत्र देण्यास अपयशी ठरली. हे करार अणुसंपन्न देशांच्या अण्वस्त्रांना कायदेशीर करण्यासाठी व इतरांना ते बनविण्यास अटकाव करण्यासाठी आखले गेले.

**आपली प्रगती तपासा :-**

१) चीनने त्याची पहिली अणुचाचणी केव्हा केली ?

२) NPT व CTBT चे पूर्ण रूप काय ?

## ११.७ भारताची आण्विक तत्त्व प्रणाली

१९९८ च्या अणुचाचणी नंतर लगेचच भारताने त्याच्या अण्वस्त्राच्या मार्गदर्शनाकरिता एक मसुदा प्रणाली आखली. भारताची आण्विक प्रणाली ही भारताला एक जबाबदार अणुराष्ट्र बनवण्यासाठी आणि भारताला किमान विश्वसनिय प्रतिबंध पुरवण्यासाठी योजली गेलेली आहे. भारताची आण्विक प्रणाली ही संरक्षणात्मक स्वरूपाची आहे. ज्यावरून हे स्पष्ट होते की भारत हा अण्वस्त्र प्रथम न वापरण्याच्या तत्वाची बांधिल आहे आणि भारत अण्वस्त्रसज्ज नसलेल्या राष्ट्रांविरुद्ध अण्वस्त्राचा वापर करणार नाही ही प्रणाली पुढे स्पष्ट करते की भारतातील आण्विक अदिकार व नियंत्रण पद्धती ही नागरी नियंत्रणाखाली आहे. भारताच्या आण्विक प्रणालीची मुख्य वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) अण्वस्त्रावरील नागरी नियंत्रण : भारतातील आण्विक अधिकार व नियंत्रण पद्धती ही नागरी नियमानुसार आहे.

२) किमान विश्वसनिय प्रतिबंध विकसित करण्यावर जोर हे तत्व भारताने किती अण्वस्त्रे बाळगावीत हे ठरवण्यातील लवचीकता प्रदान करते.

३) भारत शस्त्रास्त्र स्पर्धेत गुंतणार नाही.

४) प्रथम वापर न करणे : भारतीय भूप्रदेशावर झालेल्या आण्विक हल्ल्याचा जसाच तसे तोंड देण्यासाठी फक्त अण्वस्त्रे वापरली जातील हे तत्व प्रतिबंधाच्या सिद्धांतावर आधारित आहे आणि युद्धाची शक्यता कमी करण्यास मदत करते.

५) अण्वस्त्रांचे प्रत्युत्तर हे प्रचंड असेल आणि त्याने महाभयानक विनाश लादला जाईल.

६) भारत हा अण्वस्त्र सज्ज नसलेल्या राष्ट्राविरुद्ध अण्वस्त्राचा वापर करणार नाही.

७) भारत आण्विक क्षेपणास्त्र संबंधित साहित्य व तंत्रज्ञानाच्या निर्यातीवर कळकळीत नियंत्रण पाळेल.

८) भारताला विखंडन उत्पादन कपात करार बोलणींमध्ये सहभागी होईल.

९) भारत अणुचाचणींवर पुढे ढकलण्याचा अधिकार ठेवेल. १९९८ मध्ये तेव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जाहिर केले की, भारताला अणुचाचणी करण्याची गरज नाही आणि अणुचाचणी स्वेच्छेने पुढे ढकलण्याचा अधिकार घेतला.

१०) भारत हा अण्वस्त्र निशस्त्रीकरणाच्या ध्येयाशी नेहमीच बाधील राहिल.

११) भारत हा आण्विक व्यापाावर आधारित विमाने, चल, जमिनीवरील क्षेपणास्त्रे आणि समुद्रावरील सामग्रीची कार्यक्षम, टिकाऊ विविध बले उभारिल.

- आण्विक प्रणालीने पुढील गोष्टी दर्शवण्यात महत्वपूर्ण योगदान दिले.
- अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाच्या ध्येयास भारताची कायमची बांधिलकी.
- एक जबाबदार अण्वस्त्र सज्ज राष्ट्र म्हणून भारताचा उदय.
- एक जागतिक प्रथम वापर न करण्याच्या करारासाठी द्विपक्षीय करारामध्ये तसेच चर्चामध्ये सहभागी होण्याची भारताची बांधिलकी.
- अण्वस्त्रे व तंत्रज्ञानाच्या निर्यातीत न गुंतण्याची बांधिलकी.

## ११.८ NPT व CTBT वरील भारताचा पवित्रा

**आण्विक अहस्तांतरण करार** (NPT - Nuclear Non-Proliferation Treaty)

NPT हा सर्वात जास्त स्विकृत असलेला शस्त्रास्त्र नियंत्रण करार आहे. हा करार १ जुलै १९६८ रोजी सही करण्यासाठी मुक्त झाला. हा करार ५ मार्च १९७० रोजी US मंजुरीच्या ठेवीसह अमलात आला. या कराराच्या महत्त्वाच्या अटी खालीलप्रमाणे:

- आण्विक अहस्तांतरण करार (NPT) हा पाच मान्यताप्राप्त अण्वस्त्र फेडरेशन राष्ट्रांना (युनायटेड स्टेटस्, रशियन फेडरेशन, युनायटेड किंगडम, फ्रान्स, चीन) इतर कोणत्याही अण्वस्त्र नसलेल्या राष्ट्रांना अण्वस्त्रांचे इतर आण्विक स्फोटक पदार्थ किंवा त्यांचे तंत्रज्ञान हस्तांतरण न करण्यास भाग पाडते.
- अण्वस्त्रे नसलेल्या राष्ट्रांनी अण्वस्त्रे किंवा आण्विक स्फोटक साहित्ये प्राप्त करू नये किंवा निर्मित करू नये.
- राष्ट्राच्या अधिकाराअंतर्गत शांततामय नागरी सुविधांमध्ये असलेले सर्व आण्विक साहित्य IAEA ला जाहीर करावे. IAEA जाहिर केलेल्या सुविधा अंतर्गत किंवा त्याबाहेरील विशेष चौकशी संदर्भात राष्ट्राशी संपर्क साधू शकतो. (Source: http://www.fas.org/nuke/controll/npt/)

११ मे १९९५ च्या कराराच्या अटींच्या बरहुकुम १७० पेक्षा जास्त देशांनी न्यूयार्क मधील 1995NPT Review and Extension Conference NPTREC - 1995 एनपीटी पुनर्विलोकन आणि विस्तार परिषद) ला हजेरी लावली. या शिखर परिषदेत ३ महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले.

- पहिले म्हणजे NPT ही अमर्यादीत कालावधीसाठी आणि कुठल्याही अटीविना विस्तारली गेली.
- दुसरे म्हणजे अंमलबजावणीच्या दुसऱ्या सत्रात घटक पक्ष्यांना कराराचा मार्गदर्शनासाठी आण्विक हस्तांतरण आरि नि:शस्त्रीकरणाची तत्वे व उद्दीष्ट्ये मानली गेली.
- तिसरे म्हणजे भावी पुनर्विलोकन परिषदेसाठी जलद पुनर्विलोकन प्रक्रिया स्थापली गेली.
- शेवटी मध्यपूर्वेत अतिसंहारक शस्त्रास्त्र मुक्त प्रदेशाच्या स्थापनेला एका कराराने मान्यता दिली. (Source: http://www.fas.org/nuke/controll/npt/)

याची नोंद घेणे महत्वपूर्ण आहे की ईस्त्राईल, भारत व पाकिस्तान यांनी या करारावर सही केलेली नाही आणि उत्तर कोरीयाने २००३ मध्ये या करारातून अंग काढून घेतले. सर्वकष अणुचाचणी करार (CTBT) (Comprehensive Test Ban Treaty)

CTBT करार हा १९९६ मध्ये UNGA कडून सहीसाठी खुला केला गेला. CTBT ने आण्विक चाचणी विरोधी जागतिक निकष प्रस्थापित केले आहेत व अण्वस्त्र हस्तांतरणाला प्रतिबंध करण्याच्या व अण्वस्त्र नि:शस्त्रिकरणाला उत्तेजन देण्याच्या जागतिक समुदायाच्या प्रयत्न हा महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सर्वकष चाचणी बंदी कराराचा (CTBT) हेतू हा सर्व अण्वस्त्र चाचणी स्फोटाला प्रतिबंध करणे हा आहे. हा करार अंमलात येण्यापूर्वी हा कराराच्या १४ व्या कलमांतर्गत याला ४४ राष्ट्रांची मंजुरी आवश्यक आहे.

या ४४ राष्ट्रांपैकी

- भारत, पाकिस्तान व उत्तर कोरिया या तीन राष्ट्रांनी या करारावर सह्या केलेल्या नाहीत.
- चीन, ईजिप्त, इंडोनेशिया, इराण, ईस्त्राईल व युनायटेड स्टेटस् यांनी करारावर सही केली परंतु त्याला मंजुरी मात्र दिली नाही.

भारत हा CTBT च्या बोलणी मध्ये सक्रीयपणे सहभागी झाला. तथापि कराराच्या शेवटच्या अटी या पुढील मुद्द्यावर भारतीय चिंतेला अनुसरून नाहीत -

- अहस्तांतरण
- जागतिक नि:शस्त्रीकरण
- भारताची सुरक्षितता आणि लष्करी स्वायत्तेतेशी संबंधित मुद्दे
- हा करार काही आण्विक ताकदींच्या पक्षात असल्याने तो दोषपूर्ण व भेदभावजन्य आहे.
- भारताने या कराराव सही केली नाही कारण
- हे करार अण्वस्त्रसज्ज राष्ट्राच्या आण्विक क्षमतेला कायदेशीर करण्यासाठी आखले गेले.
- हा करार पक्षपाती होता आणि त्याने काही राष्ट्रांच्या आण्विक वर्चस्ववाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
- या कराराने जगाला दोन गटात विभागले - आण्विक समृद्ध व आण्विक गरीब.
- असे करताना या कराराने आण्विक समृद्ध राष्ट्रांना त्यांची अण्वस्त्रे टिकवून ठेवण्यास परवानगी दिली आणि आण्विक गरीब राष्ट्रांना अण्वस्त्रे निर्माण करण्यास अटकाव करण्याचे रचनात्मक तंत्र निर्माण केले.
- हे करार अण्वस्त्र नष्ट करण्यासाठी किंवा आण्विक नि:शस्त्रीकरणासाठी कोणताही कालबद्ध कार्यक्रम समाविष्ट करीत नाही. हा करार भारताच्या संपूर्ण आण्विक नि:शस्त्रीकरणाच्या ध्येयाशी सुसंगत नाही.
- अजून म्हणजे भारताला आण्विक क्षेत्रातील त्याची स्वायत्तता टिकवून ठेवायची ईच्छा होती. त्याला त्याचा आण्विक पर्याय खुला ठेवायची व दक्षिण आशियातील अनिश्चित सुरक्षा वातावणाच्या पार्श्वभूमीवर विखंडन उत्पादन चालू ठेवायची ईच्छा होती.
- NPT ने अण्वस्त्र सज्ज राष्ट्रांचा आण्विक शस्त्रसाठा हा सदा-सर्वदासाठी कायदेशीर केलेला आहे.
- अशा प्रकारे NPT हा जागतिक आण्विक नि:शस्त्रीकरणाच्या ध्येयामध्ये एक मोठा अडथळा आहे.
- या कराराच्या अी या देशाच्या हिताच्या विरोधी असून देशाच्या सार्वभौमत्वावर गदा आणणाऱ्या आहेत.
- भारताने हे सुद्धा स्पष्ट केले आहे की भारत NPT मध्ये अण्वस्त्रे नसलेले राष्ट्र म्हणून सहभागी होणार नाही.

**आपली प्रगती तपासा:-**

१) CTBT करार हा सही करण्यासाठी केव्हा खुला झाला ?

२) NPT वर सही न करणारे देश कोणते ?

_______________

_______________

_______________

_______________

_______________

## ११.९ भारताच्या आण्विक प्रतिबंधकाचा विकास

आज अण्वस्त्रे ही भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा एक अविभाज्य भाग आहे. भारताचा अण्वस्त्र कार्यक्रम हा अधिकृतरीत्या किमान प्रतिबंधकाच्या आशयावर आधारीत आहे. (Talbott, Stobe, Dealing with the bomb in South Asia, Foreign Affairs, Jan/Feb 1999, Vol. 78, No. 2, P. 119, Also see Ashley Telis, India's Emerging Nuclear Pasture : Between Recessed deterrence and ready arsenal (Santa Monica, CA : Rand, 2001) PP. 392-398.) तथापी तज्ञ मानतात की किमान प्रतिबंधकाचा आशय हा गतिशिल आहे आणि किमान म्हणजे नेमके किती हे सांगणे कठिण आहे. त्याच्या नुसार या गतिशिलतेने भारताच्या विस्तारक्षम डावपेचांना कायदेशीर करण्यास योगदान दिले आहे. परिणामी भारतातील क्षेपणास्त्रांची सतत वाढ होत आहे. भारताने ३०० किलोमीटरच्या ब्राम्होस पासून दिर्घ पल्ल्याच्या अग्नीच्या मालिकेपर्यंत कित्येक क्षेपणास्त्रे विकसीत केली आहे. भारताने क्षेपणास्त्राच्या तोंडावर अण्वस्त्रे लावण्याच्या तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवलेले आहे आणि तो अधिका अधिक विखंडन साहित्य सतत व जलद गतीने निर्माण करत आहे.

**भारताचा क्षेपणास्त्र साठा.**

स्त्रोत
http://en.wikipedia.org/wikipedia_and_weapons_of_mass_destructi on

| नाव | वर्ग | पल्ला | भार | स्थिती |
|---|---|---|---|---|
| अग्नी - I | SRMB | ७०० किमी | १००० किग्रॅ | कार्यरत |
| अग्नी - II | MRBM | २००० किमी<br>३००० किमी | - ५०० किग्रॅ<br>१००० किग्रॅ | कार्यरत |
| अग्नी - III | IRBM | ५००० किमी | २४९० किग्रॅ | कार्यरत |
| अग्नी - IV | MRBM | ३००० किमी<br>३८०० किमी | - ५०० किग्रॅ<br>१५०० किग्रॅ | २०१४-१५ ला प्रतिष्ठापना |
| अग्नी - V | ICBM | ५००० किमी<br>६००० किमी | १५०० किग्रॅ + | २०१४-१५ ला प्रतिष्ठापना |
| अग्नी VI | ICBM | ५,२०० किमी<br>१०,००० किमी | - ७०० किग्रॅ<br>१४०० किग्रॅ | विकासांतर्गत |
| धनुष | SRBM | ३५० किमी | ५०० किग्रॅ | विकसीत झाले परंतु वापरले नाही |
| निर्भय | सबसॉनिक क्रुझ मिसाईल | १००० किमी | ? | विकासार्तगत |
| ब्रम्होस I | सुपरसॉनिक क्रुझ मिसाईल | २९० किमी | ३०० किग्रॅ | कार्यरत |
| बम्होस II | हायपरसॉनिक क्रुझ मिसाईल | २९० किमी | ३०० किग्रॅ | विकासांतर्गत |
| P-70 | अँटी शिपींग | ६५ किमी | ५३० किग्रॅ | कार्यरत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अमेटिस्ट | मिसाईल | | | |
| P-270 | सुपरसॉवक क्रुझ | १२० किमी | ३२० किग्रॅ | कार्यरत |
| मॉक्सिट | मिसाईल | | | |
| पॉपेये | ASM | ७८ किमी | ३४० किग्रॅ | कार्यरत |
| पृथ्वी - I | SRBM | १५० किमी | १००० किग्रॅ | कार्यरत |
| पृथ्वी - II | SRBM | २५० किमी | ५०० किग्रॅ | कार्यरत |
| पृथ्वी - III | SRBM | ३५० किमी | ५०० किग्रॅ | कार्यरत |
| सागरिका | SLBM | ७०० किमी | –१५० किग्रॅ | अरिहंत |
| K-15 | | २२० ० किमी | १००० किग्रॅ | SSBN च्या प्रतिक्षेत |
| K-4 | SLBM | ३५०० किमी | १५० किग्रॅ | चाचपणी |
| | | | १००० किग्रॅ | अंतर्गत |
| शौर्य | TBM | ७०० किमी | १५० किग्रॅ | |
| | | २२०० किमी | १००० किग्रॅ | कार्यरत |

विखंडन साहित्यावरील अंतरराष्ट्रीय मंडळाच्या वर्तमान पत्रातील लेखात आलेल्या ताज्या अहवालानुसार, ''भारताजवळ सायरस व ध्रुव अणूभट्यामधील इंधनापासून निर्मित अण्वस्त्र बनवण्याच्या प्रतीच्या सुमारे ५६० किग्रॅ प्लटोनिअमचा साठा आहे. हा सुमारे ११० बाँब बनविण्यासाठी पुरेसा आहे. तसेच भारत काही युरोनियमची समृद्धी सुद्धा करत आहे. असे सर्वसामान्यपणे मानले जाते की याचा वापर पाणबुड्यांच्या इंधनासाठी आहे. (Raja Menon and R. Rajaraman, keep on talking times of India 22 July 2010, P. 16). भारताजवळ पाकिस्तानपेक्षा अधिक मोठे लष्कर आहे आणि तो त्याच्या मोठ्या संरक्षण आधुनिकरणाच्या प्रयत्नात आहे. यामुळे पाकिस्तानला त्याचा अणू प्रतिबंधक अधिक जोराने करण्यास उद्युक्त केले आहे. भारत हा अण्वस्त्रे पाहून नेण्यास सक्षम असणाऱ्या क्रुझ क्षेपणास्त्राचा विकास करत आहे. त्याचवेळेस भारत अग्नी बॅलिस्टीक क्षेपणास्त्राला आधारित नविन SLBM वर कार्यकरत आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) भारताच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची नावे काय ?

२) अग्नी-५ बॅलेस्टिक क्षेपणास्त्राचा पल्ला साधारणतः किती आहे ?

## ११.१० दक्षिण आशियाचे आण्विकीकरण : डावपेचात्मक सूचित अर्थ

**आण्विक शस्त्र स्पर्धेच्या कालखंडातून मुक्तता.**

अलिकडच्या काळात भारत व पाकिस्तान या दौघांच्या लष्करी डावपेचात अण्वस्त्रांनी प्रमुख भूमिका बजावली आहे. या देशांनी लष्करी हिताच्या व्यवस्थापनासाठी ज्या वारंवारतेने अण्वस्त्र विकसीत केली. त्याने शस्त्रास्त्र स्पर्धेच्या भयानक विचलीत करणार प्रघात मुक्त केला. अण्वस्त्र स्पर्धा ही अण्वस्त्राच्या स्पर्धक प्राप्तीमुळे निर्माण होते. अण्वस्त्रांची अतिविनाशकारी ताकद ही शत्रू राष्ट्रांना त्यांच्या मध्ये असलेल्या बाँब किंवा क्षेपणास्त्र तुट भरून काढण्यासाी सतत प्रयत्न करण्यास भाग पाडते. हे शीत युद्ध काळातील US व USSR मधील अण्वस्त्र स्पर्धेने सोदाहरण स्पष्ट केले जाऊ शकते. शस्त्रास्त्र स्पर्धेचा परिणाम म्हणून US व USSR चे आण्विक बल १९६० व १९७० च्या काळात परस्परांचे अस्त्रे व मारक क्षमता-क्षेपणास्त्रे ही स्पर्धात्मकरित्या गणित पद्धतीने वाढली. मे १९९८ मध्ये उघड आण्विक दर्जा मिळवण्यासाठी भारत आणि पाकिस्तान ने आण्विक संदिग्धता सोडून देऊन अणूचाचण्या केल्या. या चाचण्यांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रे व मारक क्षमता मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू आहे. आज दोन्ही राष्ट्रांजवळ कित्येक अणूबाँब बनवण्यासाठीचे पुरेसे विखंडन साहित्य असल्याचे अहवाल आहे. दक्षिण आशियातील आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धेच्या बाबतीत भारत आणि पाकिस्तानच्या एकमेकासापेक्ष राष्ट्रीय सुरक्षा चिंतेने त्यांना त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षा हिताच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे मजबूत पारंपारिक तसेच आण्विक शस्त्रे प्राप्त करण्यास भाग पाडले. दक्षिण आशियाची शस्त्रास्त्र स्पर्धा जी भारत आणि पाकिस्तानच्या अणूचाचण्यानंतर सुरू झाली. ती या देशांकडून अण्वस्त्र विकासासाठी लागणारे विखंडन साहित्य आणि क्षेपणास्त्र मिळविण्याच्या स्पर्धेत परिणत झाली. भारतातील अण्वस्त्राच्या तैनातीने पाकिस्तानातील अणूपुरस्कर्त्यांचे स्थान मजबूत झाले आणि उलटपक्षी सुद्धा हे सत्य आहे. या शस्त्रास्त्र स्पर्धेचे कारण समजून घेतांना विश्लेषक म्हणतात. भारत आणि पाकिस्तान या अण्वस्त्रे प्राप्त करण्याचा निर्णय हा अण्वस्त्रे सज्जतेच्या गृहीत फायद्याच्या किंमती फायदा पृथःकरणाचा परिणाम आहे. वरूण सहानी यांच्यानुसार ''भारत आणि पाकिस्तान वरील दक्षिण आशियाच्या अण्वस्त्र सज्जतेचा प्रभाव हा त्यांच्या बल वापरण्याच्या संबंधीत क्षमोचाविचार करता असममित राहिलेला आहे. याने पाकिस्तानला भारताविरुद्ध बल वापरण्याचे असिमीत स्वातंत्र्य दिले असले तरी त्याने भारताला तीच गोष्ट पाकिस्तान विरुद्ध करण्यासाठी भारतावर खुपच गंभीर निर्बंध घातलेले आहे. (Sahani Varun, "the stability - instability paradox : A less than perfeot explanation" in E. Sridhanran, ed., India-Pakistan nuclear relationship. thecries of deterrence and international relations (New Delhi : Routledges 2007, PP. 208-238)

शस्त्रास्त्र स्पर्धा ही नेहमीच संरक्षण संकल्पात वाढ घडवून आणते आणि सहभागी राष्ट्रांना खूपच खर्च करावयास लावते. ती स्पर्धेतील देशांना प्रचंड पैसा खर्च करण्यास भाग पाडते. मागील एक दशकात भारत व पाकिस्तानचा संरक्षण खर्च हा लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. सध्या भारत हा संरक्षणावर GDP च्या ३ टक्के किंवा ३० अब्ज डॉलर दरवर्षी खर्च करत आहे. पुढील दहा वर्षात भारत हा संरक्षण साहित्यावर ८० अब्ज डॉलर खर्च करण्याचे मानले जाते. (Farewell to Foreign Arms, Time sof India, 1st August 2010, P. 22) भारत व पाकिस्तानच्या बाबतीत हे लक्षात घेणे महत्त्वपूर्ण आहे की आण्विक प्रतिबंधक क्षमतेने त्यांच्या पारंपारीक शस्त्र खर्चावर अंकुश ठेवलेला नाही. भारत व

पाकिस्तानची पारंपारीक शस्त्रास्त्र ही स्थिर वाढ दर्शविते. त्यांचा संरक्षण खर्च वर्षागणिक वाढतच चाललेला आहे. त्यांची सध्याची शत्रुता पाहता दोन्ही देश हे नजीकच्या भविष्यासाठी संरक्षण साहित्याचे भुकेलेले ग्राहक राहण्याचीच शक्यता आहे. भारत व पाकिस्तानकडून आण्विक शस्त्रास्त्र साठ्याच्या सततच्या विस्ताराने या उपखंडातील आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धेची भीती वाढवलेली आहे आणि या दोन देशांमधील आधीच त्रस्त संबंधात तेल ओतलेले आहे. या शस्त्रास्त्र स्पर्धेचा परिणाम म्हणून दक्षिण आशियातील मूलभूत व चिरस्थायी धोका सुरक्षा तज्ज्ञांनी दर्शविल्याप्रमाणे हे आहे की गैरसमजुतीने किंवा अग्रहक्काद्वारे किंवा अचानक तीव्रता वाढल्याने अणुयुद्ध सुरू होऊ शकते. (Stephen Burgress, India's Emerging Security Strategy, missile defence and arms control, INSS Occasional Paper 54, June 2004, USAF Institute of National Security Studies, USAF Academy, Colarado) तज्ञ यापुढे मानतात की या देशांनी तैनात केलेल्या आण्विक अस्तांनी सहेतुक किंवा अनवधानाने अण्वस्त्र हल्ला होण्याची भीती पराकोटीला नेली आहे. या परिस्थितीत माजी CIA संचालक जेम्स कुल्सी यांनी १९९३ मध्ये दिलेला इशारा आठवणे महत्त्वपूर्ण आहे. US कायदे मंडळा समोचित त्यांच्या साक्षीत ते म्हणाले, ''भारत व पाकिस्तानामधील शस्त्रास्त्र स्पर्धा ही कदाचित अण्वस्त्रासह अती संघटक शस्त्रांचे संभाव्य भवितव्य दर्शविते.'' म्हणूनच या देशांनी सध्या चालू असलेली कुंठीत अवस्था तोडण्यासाठी सुयोग्य चर्चेत गुंतण्याची वाढती गरज आहे. फक्त सततची चर्चाच भारत व पाकिस्तानला पुढील अण्वस्त्रे तैनात करण्यापासून परावृत्त करू शकते.

**आपली प्रगती तपासा :-**

१) आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धेची व्याख्या द्या.

२) पाकिस्तानने पहिली अणुचाचणी केव्हा केली ?

## ११.११ सारांश

- स्वातंत्र्यानंतर भारताने सर्वांगिण आर्थिक विकास कार्यक्रम हाती घेतला व भारताच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी अणू ऊर्जेचा वापर करण्याचे ठरविले.
- भारताने आण्विक अहस्तांतरणाची निर्दोष ख्याती टिकवून ठेवली आहे. स्वातंत्र्यापासूनच भारताने हा वचन व लिखित स्वरूपात सर्वसामान्य व संपूर्ण नि:शस्त्रीकरणाच्या ध्येयाशी बांधिल राहिलेला आहे.
- भारताचे स्वातंत्र्यानंतरचे राजकीय नेतृत्व हे या बेबंदशाही जगात भारताच्या लष्करी हिताच्या संरक्षणासाठी अण्वस्त्रांच्या गरजेविषयी परस्परविरोधी भूमिका असणारे होते.

- शीतयुद्धोत्तर काळात पाकिस्तानच्या आण्विक क्षमतेतील वाढ, वाढता चीनी आण्विक धोका आणि पाकिस्तान-चीन आण्विक संबंध यामुळे भारताला त्याचे अणूपर्याय खुला ठेवण्याचे पारंपारीक धोरण बदलणे भाग पडले.
- चीन व पाकिस्तान या दोघांकडूनच्या वाढत्या लष्करी धोक्याने भारतासाठी लष्करी समस्या निर्माण केली. दोन्ही देशांजवळ अण्वस्त्रे आहेत व त्यांनी भारताला धोक्याच्या परिस्थितीत आणले. जेथे भारताला तुल्यबळ क्षमता विकसित करणे भाग पडले.
- १९९८ नंतर अणुचाचणीनंतर लगेचच भारताने त्याच्या अण्वस्त्राच्या मार्गदर्शनासाठी एक मसुदा प्रणाली आखली. भारताने आण्विक धोरण हे भारताला एक जबाबदार अणु राष्ट्र बनविण्यासाठी आणि भारताला किमान विश्वसनीय प्रतिबंध पुरविण्यासाठी योजने गेलेले आहे.
- भारत व पाकिस्तानकडून आण्विक शस्त्रसाठ्याच्या सततच्या विस्ताराने या उपखंडातील आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धेची भीती वाढलेली आहे आणि या दोन देशातील आधीच बिघडलेल्या संबंधात तेल टाकलेले आहे.

## ११.१२ विभागवार प्रश्न

१) स्वातंत्र्यापासून भारताच्या आण्विक धोरणाचा विकास यावर चर्चा करा.
२) NPT व CTBT वरील भारताच्या भूमिकेवर चर्चा करा.
३) भारताच्या नवीन आण्विक मसुद्याची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
४) दक्षिण आशियाच्या आण्विकीकरणाचे लष्करी परिणाम कोणते ?
५) उघड उघड आण्विकीकरणाच्या भारताच्या निर्णयाच्या पाठीमागील संपत्तीवर सविस्तर चर्चा करा.

❖❖❖❖

# १२

# उभरत्या जागतिक व्यवस्थेत भारत विभागवार रचना

**घटक रचना :**

१२.० उद्देश
१२.१ परिचय
१२.२ उभरत्या जागतिक व्यवस्थेत भारत
१२.३ सारांश
१२.४ विभागवार प्रश्न
१२.५ संदर्भ

## १२.० उद्देश

या पाठाचा उद्देश म्हणजे उभरत्या जागतिक व्यवस्थेचे स्वरुप समजणे आणि त्यात भारताचे स्थान निश्चित करणे यामध्ये ते घटक विचारात घ्यावे लागतील ज्यांनी सध्याच्या जागतिक व्यवस्थेच्या घडणीवर प्रभाव टाकलेला आहे आणि देशाच्या राजकारणाच्या चलनवलनाला आकार दिलेला आहे. दुसऱ्या बाजुने पाहायचे म्हटले तर यामध्ये भारताची भूमिका ओळखणे आणि समजणे आणि भारताला कोणत्या संभाव्य आव्हानांना व मुद्यांना तोंड द्यावे लागेल. हे समजून घेणे हा सुद्धा या पाठाचा उद्देश आहे.

## १२.१ परिचय

उभरत्या जागतिक व्यवस्थेत आपण भारताला कसे समजून घेतो हे जाणण्याच्या प्रयत्नात काही प्रश्न उभे राहतात हे प्रश्न हे जग कसे बदलले आहे. याच्याशी संबंधित आहे. तसेच साव्हिएत युनियनच्या पतनांनतर अशा कोणत्या मोठ्या घटना आहेत ज्यांनी जगाला आकार दिला आहे? भारत जागतिक स्तरावर या बदलांना कसा जाणतो आणि आंतरराष्ट्रीय संबंधाप्रती भारताच्या दृष्टीकोनात या बदलांचे स्त्रोत कसे आहेत? उभरत्या जागतिक व्यवस्थेचा आकार काय आहे? ते कोणत्या दिशेने जात आहे? आपण जागतिक परस्पर संबंधांच्या जोमदार गतीशील स्वरुपात त्या व्यवस्थेचे स्वरुप कसे समजते? या जागतिक व्यवस्थेशी समकालीन मुद्दे कोणते आहेत? भारत या उभरत्या जागतिक व्यवस्थेत राजकारण ते अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक उद्दिष्ट्येपर्यंत कोणती भूमिका निभावतो. भारताला तोंड द्यावे

लागणारी अशी कोणते आंतरराष्ट्रीय आव्हाने आहेत? अशा आव्हांनाना भारताचा प्रतिसाद काय असेल? भारत जगात बदल घडवेल? कि जग भारतात? हे ते प्रश्न आहेत जे नक्कीच माझ्या मनात उद्‌भवतात. जरी हे सर्वच्या सर्व प्रश्न या पाठात विचारात घेतले नसले तरी काहींचा जरुर विचार केला आहे. आणि इतरांचा आकलनासाठी संदर्भ घेतला आहे.

## १२.२ उभरत्या जागतिक व्यवस्थेत भारत

मागील दोन दशकात जग झपाट्याने बदलले आहे. जागतिक व्यवस्थेचे पायाभूत घटक असलेली राष्ट्र राज्य संकल्पनाच स्वतः बदलत आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे सुमारे एक तृतीयांश सदस्य हे वांशिक भांडणे, बंडखोर चळवळी व बंडखोरीने त्रस्त आहेत. देशाच्या सीमा अधिकाधिक पारगम्य बनत आहे. चलनदर झपाट्याने केंद्रीय बँकाच्या नियंत्रणाबाहेर जात आहे, लोक एका देशातून दुसऱ्या देशात सहजासहजी प्रवेश करतात आणि दहशतवादी, बंदुका आणि मादक पदार्थ हे देशाच्या सार्वभौमत्वाला धोका पाहेचवत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या जलद बदलांपासून काय उद्‌भवणार आहे याबद्दल अनिश्चितता आहे. ४० वर्षाच्या दिर्घकालीन शितयुद्ध समाप्तीसह सोव्हिएत युनियनच्या पतनाने लोकशाही व उदारमतवादी जगाच्या विजयाचा धडा रचला गेला. हा ऐतिहासिक शेवट अशाप्रकारे एक महत्त्वाचा मुद्दा ठरला. अशाप्रकारे जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्रवासाचा मार्ग मोकळा झाला आणि जकात व व्यापारावरील सर्वसाधारण करारावर सह्या केल्या जाऊन त्याची परिणती जागतिक व्यापार संघटनेत यासह जागतिक राजकारण व अर्थव्यवस्था प्रदान करणाऱ्या पद्धतीतील भांडणे संपली आणि आता तिथे एकच पद्धत राहीली जी जागतिक संबंध चालू ठेवेल. जागतिक सत्तेची हळूहळू का होईना पण स्थीर स्थापना, मग ती संयुक्त राष्ट्र स्वरुपात असो की WTO की आंतरराष्ट्रीय न्यायालय असो, हे जग एकसंघ झाल्याचे आणि आंतरराष्ट्रीय सत्तेद्वारा चालविले जात असल्याचे दर्शविते जेथे राष्ट्रीय सरकारांना त्यांच्या राज्यघटना आंतरराष्ट्रीय दर्जाप्रमाणे सुधारित कराव्या लागतील.

स्वतंत्र सार्वभौम राज्याची व्यवस्था ही काही फार जुनी घटना नाही. वेस्टफॅलीयाचा करार ज्याने १६४८ मध्ये ३० वर्षापासून चाललेले युद्ध संपवले त्याने मागील ४०० वर्षापेक्षा कमी कालावधीत स्वतंत्र सार्वभौम राज्याची पद्धती स्थापन केली जी पुन्हा २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत युरोकेंद्रीत होती. ही राज्यपद्धतीची जागतिक व्यवस्था जी परस्पर परिचीत क्षेत्रांतील बळाची मक्तेदारी असलेल्या सार्वभौम राष्ट्रराज्यांच्या आंतरराष्ट्रीय पद्धतीची बनलेली आहे. ती बदलत आहे. हि व्यवस्था आंतरराष्ट्रीय वलयापासून अंतर्गत बाबींचे वेगळेपण दर्शविते ज्यामध्ये एखाद्या राज्याला दुसऱ्या राज्याच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ करायचा कायदेशीर अधिकार नाही. राज्यांना स्वतःची काळजी स्वतःच घ्यावी लागते. राज्याचे मुख्य कार्य म्हणजे त्याच्या नागरिकांची सुरक्षा व सुस्थितीची खात्री देणे आणि बाह्यहस्तक्षेपापासून त्यांचे संरक्षण करणे ही पद्धत राज्याराज्यातील परस्परसंबंध व दळणवळणाची साधने म्हणून औपाचारिक राजनैतिक संबंधांनी ओळखली जाते आणि करार करुन किंवा मोडून संबंध टिकवले जातात. अमूर्त तत्त्वे नियम आणि कृतीयोजना ज्या राज्याच्या वेस्टफॅलीयन पद्धतीत समाविष्ट आहे ती आधुनिक राजकीय जीवनाची मध्यवर्ती संघटना वैशिष्ट्ये बनली आहेत आणि ती राज्यांच्या दैनंदिनकृतीत वापरली जातात. वेस्टफॅलियन पद्धत ही समकालीन जागतिक बाबींच्या कार्य करण्यावर प्रभाव टाकतेच यामुळे अंतर्गत व आंतरराष्ट्रीय बाबींमधील द्विविभाजनाची जाण पक्की होते. अंतर्गत

सत्ता ही सरकारच्या – राजकारणाची केंद्रीय संस्था – अस्तित्वाने आणि आंतरराष्ट्रीय सत्ता ही त्याच्या गैरहजेरीने परिव्याख्यीत केले आहे. परंपरावादी आणि जागतिक / परिवर्तनवादी यामधील समकालीन चर्चा ही आजच्या जागतिक व्यवस्थेविषयी आकलन करुन देते. परंपरावाद्यांसाठी वेस्टफॅलिया पद्धती आधुनिक राजकीय जीवनाच्या घटनेसाठी आणि आज जग कसे चालते ती गतीशीलता समजण्यासाठी मध्यवर्ती राहते. जागतिकीकरणवादी व परिवर्तनवाद्यांसाठी वेस्टफॅलिया तत्त्वे ही अडगळीची ठरतात. कारण त्यांच्यासाठी समकालीन आर्थिक सांस्कृतिक व राजकीय कृती त्या विस्तृत प्रमाणावर असतात.

तरीही सत्ता पद्धतीचा समतोल तुटण्यात परिणती जागतिक सरकारवरील सुरुवातीचा पहिला प्रयोग राष्ट्रसंघाच्या स्वरुपात झाला ज्यावेळेस दोन महायुद्धे लढली गेली व पश्चिम युरोपियन केंद्रीत जगाची वसाहतविषयक वर्चस्ववादी रचना खंडित होऊन तत्त्वांवर विभाजीत पण तरीही साम्राज्यवादी जागतिक रचना ही दोन जागतिक खेळाडू उत्तर अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यात विभागली गेली. जागतिक व्यवस्था आता राज्यकारभार अर्थव्यवस्था व राजकारणाच्या दोन परस्पर वेगळ्या पद्धतीत विभाजीत झाली. राज्यपद्धती सार्वभौम असली तरी वर्चस्ववादी सत्वा ज्या US आणि USSR मध्ये केंद्रीत होत्या त्यांच्या हितासाठी सुसंघटीत झाल्या.

सोव्हिएत रशियाच्या पतनाने जागतिक व्यवस्थेची वेगळ्या प्रकारे आणि नाट्यमयरित्या पुनर्रचना झाली. ऐतिहासिक सिद्धांताचा शेवट आणि नागरिकरण सिद्धांताचा झगडा या गोष्टी बदलती जागतिक परिस्थिती आणि आपण ती कशी जाणतो हे समजून घेण्यास महत्त्वपूर्ण ठरली. पहिल्याने युद्धसमाप्ती जाहीर केली आणि म्हणून जगाच्या राज्यकारभार पद्धतीच्या वादविवादाचा शेवट केला आणि याच्या विरोधी म्हणजे दुसऱ्याने सांस्कृतिक तृटीरेखांवर भर दिला ज्यामध्ये जागतिक शांततेचा धोका मोठा राहिला व टिकून राहिला आणि म्हणून संस्कृतीच्या धरतीवर जगाच्या पुनर्रचना सुचवली जाते. पहिल्याने जागतिक अर्थसत्तेद्वारा नियंत्रीत बाजारु पद्धतीची गरज व अपरिहार्यता यावर वादाला सुरुवात केली ज्याची परिणती जागतिक व्यापार संघटनेत झाली. जागतिक व्यवस्थापनाच्या विरोधी या विवादाप्रती संशयखोरवृत्ती, कट कारस्थानांकडून पुढे आणली गेली. ते म्हणतात की जागतिकीकरण कार्यक्रमासोबत गुप्तसत्ता वर्ग आहे जो हुकूमशाही जागतिक व्यवस्थेद्वारे जगावर राज्य करण्याचे आखत आहे. जी सार्वभौम राष्ट्र ज्यांना बदलेल आणि एक धेरणारा मतप्रचार असा आहे की, जो याच्या स्थापलेला इतिहासाचा प्रगतीचा शेवट समजतो. राजकारण आणि वित्तामध्ये वैशिष्ट्यपूर्ण घटनांची जुळवणी करण्याविषयी तर्क बांधले जात आहे आणि ते सुद्धा बऱ्याच आघाडीवरील संघटनाद्वारे दोलायमान प्रभावी राजकीय कटाद्वारे बऱ्याच ऐतिहासिक आणि चालू घडामोडी या गुप्त राजकीय एकत्रीकरण आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेद्वारे जागतिक वर्चस्व प्राप्त करण्यासाठी चालू योजनातील टप्पे म्हणून पाहिजे जातात.

राज्यांमधील परस्परसंबंधातील हाती घेतलेल्या विकास, ज्याचे त्यांच्या पद्धतशीर वातावरणावर परिणाम होतात तो समजल्यानंतर एक जागतिक व्यवस्था जी पद्धतीच्या रचनात्मक व्यवस्थेचा संदर्भात परिव्यखीत केली जाते यामध्ये मागवी समाज हा संघटनात्मक स्थरावर परस्पर संबंध ठेवतो. आतापर्यंत आधुनिक जग हे स्वतंत्र राष्ट्र / राज्ये याच्या व्यवस्थेच्या वर्चस्वाखालील क्षेत्र राहिलेले आहे. याला जागतिकीकरण बळांकडून गंभीररित्या आव्हाने मिळत आहेत आणि क्षीण केले जात आहे. याउलट जागतिकीकरणाची सुरुवात जुन्या राज्यव्यवस्थेच्या संक्रमणासाठी झालेली आहे.

मग शीतयुद्धानंतर उभरत्या जागतिक व्यवस्थेची अशी कोणती निश्चित वैशिष्ट्ये आहेत? संदिग्धता न संपल्याने आपण काही विशिष्ट शक्यता पडताळून पाहू.

**१) संदिग्धता आणि शुद्धता असुन सुद्धा संक्रमण :**

आपल्याला ही वस्तुस्थिती मान्य करावीच लागेल की आंतरराष्ट्रीय वातावरणात संदिग्धता तसेच खडबळ असून सुद्धा तेथे संक्रमण / बदल नक्कीच घडून येत आहे. शीत युद्धाच्या समाप्ती ने जर्मनी व जापानला लघुपल्यात फायदा करुन दिल्याचे दिसले. परंतू दिर्घकालावधीत US ला झुकते माप दिल्याचे दिसते. सत्तेचा समतोल हा वेळ व संदर्भापासून दुर जात असल्याचे दिसते. शस्त्रास्त्र नियंत्रण, पारंपारिक शस्त्रास्त्रे, आण्विक निःशस्त्रीकरण, इस्लामिक / धार्मिक आणि वंशिक मुलतत्ववादी झगडे, पर्यावरणविषयक मुद्दे यांनी प्रमुख स्थान पटकावले आहे. हे संक्रमण आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या सततच्या गतीशीलतेने प्रभावीत झालेले आहे आणि म्हणून त्याची निष्पत्ती भाकीत करणे कठिण बनले आहे. आंतरराष्ट्रीय स्थरावरील घडणारे बदल समजून घेण्याची खिडकी खूपच अरुंद व कालसिमित आहे. आंतरराष्ट्रीय स्थरावरील कोणतीही देवाणघेवाण ही संबंधावरील दिर्घकालीन तसेच अल्पकालीन मुद्यांवर तपासली जायला हवी म्हणूनच जागतिक राजकारणाचे संक्रमण स्वरुप हे सध्याच्या जागतिक व्यवस्थेचे एक परिव्यख्यीत वैशिष्ट आहे.

**२) विविध स्थरावरील सत्तेचे विकेंद्रीकरण :**

शीत युद्धोत्तर जागतिक व्यवस्था ही सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर लगेचच US ही एकमेव महासत्ता राहिली आणि जागतिक राजकारणात हस्तक्षेप करण्याच्या आणि प्रभाव टाकण्याच्या अमेरिकेचा क्षमतेशी बरोबरी साधणारे दुसरा कोणताही देश राहिला नाही, या ध्रुवीय जगापासून बहुध्रुवीय जगापर्यंत जेथे क्षेत्रीय सत्ता केंद्रीत असे रशिया, जपान, भारत, चीन, ब्राझील, कोरिया, ऑस्ट्रेलिया, साऊथ आफ्रिका, इस्त्राईल, इंडोनेशिया आणि मलेशिया ही उद्भवली ज्यांनी त्यांचे क्षेत्र राजकारण व अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकला, यामध्ये दोलायमान राहिलेली आहे. अशाप्रकारे सत्तास्थरीकरण हे बहुस्तरीय व लवचिक आहे. शीत युद्धाच्या समाप्तीने जगाला पुनर्रचित करण्यासाठी कठिण द्विध्रुवीय जगाच्या झोपड्या मोडीत काढल्या आणि त्यांने त्यांच्या राष्ट्रीय हिताचा मुक्तपणे पाठपुरावा करण्यासाठी अधिक जागा उपलब्ध करुन दिली.

**३) चिंतेच्या मुद्यांवर जागतिक राजकारण :**

सुरक्षा, तंत्रज्ञान, पारगम्य सीमा, प्रभावी बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय दबावगट, देखरेख संस्था वित्तीय व सुरक्षा सत्ता, कायदेविषयक सत्ता, बहुपक्षीय राजकारण ही काही उदाहरणे आहेत जी आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुद्यांच्या बदलत्या स्वरुपाला समजून घेण्यात ठळकपणे लक्षात येतात.

**४) सार्वभौम व क्षेत्रीय अधिकारांवर घासाघीस :**

जग राष्ट्राला झीजवत असल्याने घासाघीस कशाची करावी व किती करावी हा ताण निर्माण होतो. आंतरराष्ट्रीय पद्धतीने जे लादले जाते ते राष्ट्रीय सरकार आणि लोकसंख्येने किती प्रमाणात स्विकारावे? अर्थव्यवस्थेच्या बाबतीत WTO च्या धोरणांवर पुरेशी टिका निर्माण होते मग तो सबसिडी चा विषय असो कि किंमतीचा. मानवी हक्क आणि कोर्टाचे क्षेत्रीय अधिकार

क्षेत्र यांच्या बाबतीत भांडणे ही राष्ट्रीय अधिकार क्षेत्र विरुद्ध आंतरराष्ट्रीय सत्ता अधिक्षेत्र यावर मुबलक असतात.

या पद्धतीचा विकास पाहिला असता भारताचा जागतिक राज्यपद्धतीतील प्रवेश हा खूपच उशिरा झालेला आहे. वसाहतवादी सरकारच्या अधिपत्याखाली असल्याने भारताचा जागतिक व्यवस्थेतील समावेश हा परकिय राज्यकारभाराचा परिणाम म्हणून होता ज्यामुळे त्याचा आधुनिक देश म्हणून उदय झाला तरीही सुरुवातीच्या वर्षात त्याचा प्रतिसाद जरी उच्च आदर्शवाद, वसाहतवादाच्या जागतिक संदर्भाअंतर्गत, उदासिनता आणि वहुपक्षियतेचा पाठिराखा असून सुद्धा थंड राहिला त्यानंतर जागतिक राजकारण आणि विशेषतः शीतयुद्ध यामुळे भारताची भूमिका जागतिक खेळाडू म्हणून झाली. भारताची स्वतःची प्रतिमा ही विविध बाह्य व अंतर्गत अशा दोन्ही घटकांनी खराब झाली जी जागतिक ओळखीसाठी सुसंगत राहिली नाही. असे मानले जाते की वाढ होण्यासाठीची भारताची क्षमता ही नियंत्रीत अर्थव्यवस्थेच्या वजनदार बांधणी रचनेने सिमित राहिली. जी तीव्र आर्थिक संकटानंतर १९९० मध्ये सोडून द्यावी लागली.

भारताची अर्थव्यवस्था खुली होण्याने भारतीय अंतर्गत परिस्थितीत काही आत्मविश्वास जरुर आला. ज्यामुळे सरकारला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक धाडसी पाऊले घेण्यासाठी बळ मिळाले. १९९० चा काळ हा भारतीय परराष्ट्र धोरणातील मोठा बदल दर्शवितो आणि पर्यायाने त्याची स्वतःची जाण तसेच जागतिक ओळख दर्शवितो. या काळातच सोव्हिएत युनियनच्या पतनाची ऐतिहासिक महत्त्वाची घटना घडली ज्यामुळे भारतीय राज्यकर्त्यांना बदलत्या जागतिक राजकारणाच्या त्याच्या जाणीवेत तत्काळ बदल घडविण्यास उद्युक्त केले. आणि त्या अनुशंगाने बदलत्या परिस्थितीत त्याची भूमिका समर्पक होण्यासाठी त्याच्या परराष्ट्र धोरणात सुधारणा करण्यास प्रवृत्त केले.

जागतिक राजकारण वित्तीय व कायदेविषयक सत्ता देशोदेशीय संघटना आणि चळवळी, बहुराष्ट्रीय व्यापार आणि सहकार्य आणि जागतिक चिंतेचे विषय जसे दहशतवाद किंवा जागतिक तापमानवाढ, सुरक्षा, विकास आणि आंतरराष्ट्रीय स्थरावरील द्रवशक्ती प्राधान्यक्रम इत्यादींचे आगमन या नविन अटी आहेत ज्यामध्ये राष्ट्रीय सरकारला काम करायचे आहे. आणि भारत त्याला अपवाद नाही. या एकत्रीत जगात भारत जसा जगाशी जुळतो तसेच जगाकडून भारत जुळला जातो म्हणून परिक्षा अशी आहे की भारत जगाशी त्याच्या परिने किती प्रमाणात जुळतो आणि परस्पर सहकार्य संबंधांवर जग भारताशी किती प्रमाणात एकसंघ होते.

शीत युद्धोत्तर परराष्ट्र धोरणाच्या आखणीने बदल घडवून आणले आहे जे भारतीय परराष्ट्रधोरणाचा इतिहास बघता क्रांतीक्रारी वाटू शकतात. कारण भारताला जगाच्या राजकीय व आर्थिक वातावरणाच्या क्रांतीक्रारी बदलानुरुप त्याचे धोरण जुळवून व बदलून घ्यावे लागेल. बहुधा त्यांचे परराष्ट्र धोरण आणि त्यांचा आंतरराष्ट्रीय कल सहजासहजी बदलवत नाहीत ते अंतर्गत किंवा जगातील क्रांतीक्रारक बदलांना सहजपणे प्रतिसाद देतात. म्हणून भारतीय परराष्ट्र धोरणात काय बदल झाला आहे. याची नोंद घेणे गरजेचे आहे.

**१)** भारताच्या बाह्यजगाशी असलेल्या संबंधातील तत्त्वज्ञान विषयक बदल हा राज्यकर्त्यांद्वारा सुरळीत झालेल्या नेहरुंच्या आदर्शवादापासून सत्ता हितांद्वारे चालविलेल्या जगाच्या अधिक वास्तववादी आकलनाकडे झाला. शीतयुद्ध आणि एकपार्टी अंमल आणि समाजवादाद्वारा निर्देशीत

झालेली अंतर्गत आघाडी आणि आंतरराष्ट्रीय आघाडी अशा दोन्ही ठिकाणच्या जुन्या राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेसह ज्यावर भारताचे परराष्ट्रधोरण विसंबून होते ते कोसळले. परिणामी त्याच्याजवळ निवन उभरत्या परिस्थितीच्या समर्थनार्थ जुना विश्वास सोडून देण्याव्यतिरिक्त इतर पर्याय राहिला नाही.

**२)** तिसऱ्या जगाच्या व्यापारी एकतेपासून सत्ता संघटनाद्वारे चालविलेल्या राष्ट्रीय हिताच्या जाणीवेपर्यंतच्या बदल म्हणजे बदलत्या परिस्थितीत भारताच्या अंगिकारलेल्या धोरणाचे एक वैशिष्ट्य आहे. अलिप्ततावाद हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून आणि तिसऱ्या जगाच्या भाषावर प्रकाश टाकणाऱ्या व्यापारी एकतेच्या एक डबा म्हणून समजला जातो. शीतयुद्ध समाप्तीने भारताला या कल्पनेच्या बांधिलकीवर आणि पूर्वीच्या राष्ट्रीय सरकारशी असलेल्या त्याच्या संबंधावर पुनर्विचार करण्यास भाग पाडले.

**३)** पाश्चात्याशी असलेल्या पूर्वीच्या विरोधी संबंधापासून त्यांच्याशी समेट घडविण्यापर्यंतची लवचिकता भारताने दाखविली. पाश्चात्यांशी असलेले चार दशकापासूनचे दूरस्थ संबंध सुधारले. शीतयुद्ध, साम्राज्यवाद विरोधी परंपरा आणि स्वदेशी तत्त्वज्ञानाने भारतीय संबंध सिमित ठेवले आणि पाश्चात्यांशी असलेली देवाणघेवाण पाश्चात्य विरोधी असण्यापर्यंत मर्यादित ठेवली. भारताचे शीत युद्धोत्तर धोरण प्रामुख्याने कवचातून बाहेर येण्यावर व पाश्चात्य विरोधी स्त्रोतांना हुसकावून लावण्यावर केंद्रित राहिले.

**४)** मोठ्या सत्तांसोबत पुनर्रचित संबंध ही अतिशय गरजेची निवड राहिलेली आहे. जो संपूर्ण शीतयुद्धोत्तर काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. मागील दोन दशकात एकमेव महासत्तेत केंद्रीकृत झालेली सत्ता समीकरणे समजून घेणे व US शी संबंध प्रस्थापित करणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य राहिलेले आहे. US सोबत संबंध प्रस्थापित करण्याव्यतिरिक्त रशियाशी पूर्वीचा मित्र म्हणून चीनशी एक नवीन उगवता जागतिक स्पर्धक म्हणून संबंध प्रस्थापित करणे हे भारतासाठी महत्त्वाचे राहिलेले आहे.

**५)** दक्षिण आशियाई उपखंडातील शेजारी तसेच पश्चिम आशिया आणि मध्यपूर्व व दक्षिण पूर्व आशियाई शेजारी यांच्याशी संबंध पुनर्रस्थापित करणे ही क्षेत्रीय एकीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची पायरी होती. त्या काळाबद्दल अधिक सांगणे नको आणि भारताची ऊर्जा ही पाकिस्तान व चीनशी ताणल्या गेलेल्या संबंधात खर्च होत होती आणि जरी मध्य पूर्वेतील मुस्लिम राष्ट्रांशी भारताचे स्थिर संबंध असले तरी अफगाणिस्तानमध्ये US ने तालिबानशी युद्ध पुकारलेले होते आणि भारताची या युद्धावरील भूमिका आणि त्याच्या US ला असलेला पूर्ण पाठिंबा यामुळे त्याचा इतर मुस्लिम देशांसोबत असलेल्या संबंधाबाबत ताण होता. पाकिस्तान तसेच चीनला नियंत्रणात ठेवणे व मध्यपूर्व तसेच दक्षिण आशियाई देशातील मुस्लिम राष्ट्रे यांच्याशी ऐक्य साधणे ही भारताच्या परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाने होती. भारताची उपखंडाला एक पूर्ण ऐक्याची गरज आहे. हिंदू राष्ट्रवाद व मूलतत्त्व वादाच्या उभरण्याने हे आव्हानसुद्धा परराष्ट्र धोरणाच्या अंतर्गत आघाडीवर उभे ठाकलेले आहे.

भारत हा स्थित्यंतराचा अवस्थेतून गेलेला आहे आणि त्याचे परराष्ट्र धोरण आखत आहे आणि काही प्रमाणात त्याच्या अत्यावश्यक बाबी जरी स्पष्टपणे, निःसंदिग्धपणे नसल्या तरी

धोरणात नोंद घेतली जाऊ शकते आणि मागिल दोन दशकातील घेतलेले राजनैतिक निर्णय व चाली मांडलेल्या आहेत. यात महत्त्वाचे काय राहते तर ते म्हणजे ते रुंद समथर समजून होणे. पहिले म्हणजे एका साम्यवादी समाजाच्या उभारणीवरील एकत्रित राष्ट्रीय मतैक्यापासून ते आधुनिक भांडवलशाही उभारणीवरील मतैक्यापर्यंतचे स्थित्यंतर आणि तरीसुद्धा अंतर्गत आणि बहुपक्षीय अशा दोन्ही मंचावरील समानतेच्या वितरणाची आणि न्यायकल्पनेच्या चिंतेला न दुर्लक्षिता असे मानले जाते की भारतीय परराष्ट्र धोरणाचे यश हे भारतीय जागतिकीकरणाचा वेग आणि त्याचे उर्वरीत जणाशी ऐक्य यावर अवलंबून आहे. दुसरे म्हणजे वाढत्या अर्थव्यवस्थांशी असलेल्या आंतरराष्ट्रीय संबंधांना आकार देण्यासाठी अर्थव्यवस्थेचे महत्त्व. ज्यात परराष्ट्र धोरणाचे चिन्ह असलेल्या परकीय मदतीच्या भिकेच्या कटोऱ्यापासून ते संबंध प्रस्थापित करण्याच्या नवीन मार्ग म्हणून प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक करण्यापर्यंतच्या बदल दिसतो. तिसरे म्हणजे तिसऱ्या जगापासून ते स्वतःच्या राष्ट्रीय हिताकरीता उत्थान. चौथे म्हणजे भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव असणाऱ्या पाश्चात्य विरोधी धोरणाला नाकारणे आणि पाचवे म्हणजे आदर्शवादी विचारसरणीतून ते आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयीच्या अधिक हटवादी दृष्टीकोनापर्यंतचे स्थित्यंतर.

नवीन जागतिक व्यवस्था व उभरत्या जागतिक व्यवस्थेतील भारताचे परराष्ट्र धोरण या दोहोंच्या स्वरुप व रचनेशी संबंध आल्यानंतर तेथे एक जोखमीची बाब राहते की जी परराष्ट्र धोरण पुढाकार आणि त्याची निर्मितीला मार्गदर्शित करेल. जर आपण मानले की राज्य पद्धतीची जुनी व्यवस्था जाऊन त्याजागी जागतिक सरकारची नवीन व्यवस्था येत आहे तर या प्रमाणात असे समजा की राष्ट्र / राज्ये यांना त्यांची सार्वभौमत्व आणि क्षेत्रीय अधिकारक्षेत्र या स्वरुपात आव्हाने आहेत, यद्यपी आगामी वर्षात महत्त्व धूसर होणारे नाही आणि ते आंतरराष्ट्रीय पद्धतीत महत्त्वाचे खेळाडू राहणार आहेत. तथापि दुसऱ्या बाजूने बघता, आंतरराष्ट्रीय सत्तेला जगाला राज्यकारभाराच्या, मग ते अर्थशास्त्र, मानव अधिकार असो की आण्विक मुद्दे असोत, एका पद्धतीत एकीकृत करण्यात जागतिक राजकारणात महत्त्व नाही. भारताला जगाचे स्वरुप समजून घ्यावे लागेल. जागतिकीकरण व राष्ट्रीयक सरकारशी संबंधित मुद्दा नाही परंतु तो संस्कृती, वर्ग, वंश, धर्म, क्षेत्राच्या लोकांना एक करतो. परराष्ट्र धोरण हे लोकांच्या आशा आकांक्षा कशा प्रकारे राष्ट्रीय धोरणाचा भाग आहेत आणि कशा प्रकारे जागतिक मुद्दे हे धोरणांचा परिणाम समजण्यासाठी लोकांच्या स्तरापर्यंत पोहोचतात आणि कशा प्रकारे अश्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी लोकांना चालना मिळते. अशा समस्यांना तोंड देत आहे. भारतात भरभक्कम लोकशाही कार्यरत असल्याने आणि उभरत्या जागतिक व्यवस्थेशी जुळवून घेण्यासाठी संस्थात्मक सुविधा असल्याने भारत फायद्यात आहे. त्याच्या समोरचे आव्हान म्हणजे धोरण बनविण्याच्या प्रक्रियेला लोकशाहीकरण करण्याची इच्छाशक्ती हे आहे.

भारतीय परराष्ट्र धोरणाला आंतरराष्ट्रीय स्तरावरील सत्ता रचनेच्या स्तरीकरणालासुद्धा विचारात घ्यावे लागेल व विविध स्तरावर जुळवून घ्यावे लागेल. त्याला जागतिक राजकारणाच्या गतीशीलतेला चटकन प्रतिसाद देण्याचे तंत्र आणि पूर्वग्रहाशिवाय जुळवून घेण्याची त्याची क्षमता विकसित करावी लागेल. जागतिक राजकारणाच्या संक्रामक स्वरुपातील हे शक्तीचे स्तरीकरण सुद्धा राष्ट्रे / राज्ये यापासून ते आंतरराष्ट्रीय सत्तेपर्यंत तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणातील इतर घटक जसे बहुराष्ट्रीय संस्था, देशोदेशीच्या सामाजिक चळवळी, विविध बहुपक्षीय मंच किंवा दहशतवादी गटसुद्धा यामुळे बदलत राहते. म्हणूनच त्याला जुन्या सैद्धांतिक राज्यपद्धतीच्या

कलाकडून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे गतीमान स्वरुप समजण्यासाठी व त्याला प्रतिसाद देण्यासाठी दूर जावे लागेल.

जागतिक राजकारण हे जागतिक स्वरुपाचे मुद्दे तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या आकलनातील मूलभूत असलेल्या त्या मुद्यांच्या स्वरुपातील बदल त्यांनी परवर्तित आहे. जागतिक ऊर्जा गरज, पर्यावरणाविषयक चिंता, दहशतवाद, जागतिक आर्थिक एकीकृतता आणि त्याचे पतन, पारगम्य सीमा हे काही मुद्दे आहेत ज्यांना अराज्य केंद्रीत भूमिकेची गरज आहे. याच गोष्टींचे परंपरागत सैद्धांन्तिक पद्धतीद्वारा पृथक्करण करण्याचा प्रयत्न आपली आकलनशीलता ठप्प करु शकतो आणि तरीसुद्धा समस्या सुटणार नाही. म्हणून आपल्या धोरण निर्मितीला आकार द्यावयास हवा. दुसऱ्या बाजूने पाहता गैरसमज झाल्यास परिस्थिती नियंत्रणात न राहता अधिकच बिघडू शकण्याचा धोका आहे. उदाहरणार्थ  परंपरागत राज्य पद्धतीच्या दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय दहशतवादाने धोरण निर्मितीत चुकीच्या मार्गदर्शनाची शक्यता असल्याने आंतरराज्यीय संबंध बिघडण्याचे संकेत जाऊ शकतात. उलटपक्षी सुरक्षा, विकास, इ. मुद्यांना पूर्वीच्या जाणिवेपेक्षा एक बदलत्या जाणीवेची गरज आहे. पारंपारिक देशाकडून सुरक्षा मुद्यावर खूपच मर्यादित व लष्करी तोडगा दिला जातो जो राष्ट्रीय समाजाद्वारे तोंड देणाऱ्या सध्याच्या सुरक्षा आव्हांनाना समजण्यासाठी पुरेशा मदतगार ठरणार नाही. म्हणून सरकारी स्तरावरील धोरण आखणीला बदलत्या वातावरणातील मुद्यांना समजण्यातील आव्हानांना तोंडद्यावे लागेल आणि त्याला लोक, जे माहिती व फलनिष्पतीच्या आकलनाचे मार्ग आहेत त्यांच्यासह सरकार व धोरणकर्ते यामधील संभाषणसंबंध विकसित करावे लागतील. भारत याला अपवाद नाही. मग ती ऊर्जा गरज असो ज्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय ऊर्जा नियमन सत्ता व आण्विक सत्ता यांना त्याची भूमिका स्पष्ट करुन सांगावी लागली व परिणामतः US सोबत १२३ आण्विक करारावर सह्या झाल्या किंवा दहशतवादाचा मुद्दा ज्याने भारताचे पाकिस्तानशी असलेले संबंध सततचे ताणलेले आहेत.

शेवटी भारतीय परराष्ट्र धोरणाला राष्ट्रवादाच्या अतिरेकाने आव्हान दिले जाईल ज्याचा बहुपक्षीय स्वरुपाच्या मुद्यावर पायमल्ली करणारा किंवा रोखून धरणारा परिणाम होईल ज्याला राष्ट्रीय सार्वभौमत्व तसेच क्षेत्रीय वर्चस्वतेच्या पराधीनतेची गरज भासेल. उभरत्या जागतिक व्यवस्थेच्या संदर्भाथ जी जागतिक सरकारकडे झुकत आहे, आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षेची राष्ट्रीय जाणीव हा विवादाचा मुख्य मुद्दा आहे. भारतासारख्या देशांना या बदलत्या संकल्पनेशी चटकन जुळवून द्यावे लागेल आणि या जलद बदलांविषयी देशाला माहिती करुन देण्यासाठी अधिकचे प्रयत्न करावे लागतील कारण पाश्चात्य देशांशी तुलना करता भारत देश खूप उशिरा उगम पावला आणि नवजात अवस्थेतील देशाला अशा परिस्थितीशी ज्यात सार्वभौम अवस्थेशी तडजोड करावी लागेल, जुळवून घेणे कठिण जाऊ शकते.

## १२.३ सारांश

थोडक्यात जागतिक व्यवस्थेचे संक्रमण स्वरुप हे जागतिक सरकारच्या कठिण परंतू वास्तविकतेकडे झुकत आहे. ही उभरती व्यवस्था काही आव्हाने उभी करत आहे. जी मुलभूत असून अशा संक्रमणप्रती लुडबुड्या स्वरुपाची आहे ही ती म्हणजे सार्वभौमत्व, अधिकारक्षेत्र आणि आंतरराष्ट्रीय संबंधांच्या स्वरुपाच्या विश्लेषणाशी निगडीत राष्ट्रीय सरकारे याला पुनर्रचित

जगात शांतता सुरक्षा आणि विकासाच्या जागतिक मुद्यांच्या आपल्या आकलनातील एका क्रांतीकारी बदलाची गरज लागेल. भारत हा नक्कीच एक उभरता देश आहे आणि त्याची शक्तीची कळकळ ही मागील दोन दशकात जबरदस्त वाढत आहे. तो जागतिक, आर्थिक सत्तांबद्दल आणि अर्थव्यवस्थेची अंतर्गत वाढीच्या गाडीवर स्वार आहे. तो त्याची भूमिका पुनर्रचित करत आहे आणि त्याचे तटस्थ आदर्शवादी परराष्ट्र धोरणापासून एक वास्तववादी व व्यवहार्य धोरणात रुपांतरीत होत आहे. तथापि एका बाजूला आंतरराष्ट्रीय संबंधांच्या राज्यपद्धती रचनेशी जगाच्या विरोधी स्वरुपाचे आव्हान आणि राज्यकारभाराच्या अंतर्गत आणि बाह्य सत्तेचे स्थर आणि सक्रंमणाशी जुळवणी आणि परस्पर हिताकरता गतीशील जागतिक देवाणघेवाणीला प्रतिसाद या गोष्टी जागतिक राजकारणातील भारतीय भुमिकेची गुरुकिल्ली राहील.

## १२.४ विभागवार प्रश्न

१) नविन जागतिक व्यवस्थेच्या उगमासाठी जबाबदार घटक कोणते आणि ते जागतिक राजकारणावर कशाप्रकारे परिणाम करताना दिसतात.

२) परंपरावादी आणि परिवर्तनवादी जागतिक व्यवस्थेची त्यांची मते कोणत्या मुद्यांवर मांडतात ?

३) इतिहासाचा शेवट आणि संस्कृतीचा झगडा हे सिद्धांत काय गृहीत धरतात ?

४) या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे उभरत्या जागतिक व्यवस्थेच्या निश्चित वैशिष्ट्या व्यतिरिक्त तुम्ही इतर काय सुचवू शकतात ?

५) भारतीय परराष्ट्र धोरण हे त्याच्या आधीच्या परिस्थितीशी तुलना करता विशेषतः शीत युद्धोत्तर काळात कोणत्या बदलाचे साक्षी राहिलेले आहे याचे वर्णन करा.

६) नविन उभरत्या जागतिक व्यवस्थेत भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाने कोणते ?

## १२.५ संदर्भ


1) Kanwal Gurmeet, The New World order, an Appraisal - 1, in strategic Analsysis, June 1999.
2) Fukuyama, Francis, The End of History, The National interest, 16 (Summer 1989), 4.
3) Held, David (ed.), A Globalizing World : Culture, Economics, Politics, Routledge, London, 2000.
4) Huntington Samuel The Clash of civilization and the Remaking or world order, Penguin Publication, New Delhi, 2000.
5) Mohan C. Raja, Crossing The Rubicon : The Shaping of India's New Foreign Policy, Viking Publication, New Delhi, 2003.


❖❖❖❖